हाल सातवाहनाची गाथासप्तशती

संपादक आणि 'प्रतिष्ठान' टीकेचे कर्ते

श्री. सदाशिव आत्माराम जोगळेकर; एम्. ए., एलएल्. बी.

पुरस्कार लेखक :

श्री. विद्यासागर सदाशिव बखले, एम्. ए., एलएल्. बी.


डिस्ट्रिक्ट ॲन्ड सेशन्स जज्ज, पुणें.

प्रसाद प्रकाशन, पुणें.

प्रकाशक
यशवंत गोपाळ जोशी
प्रसाद प्रकाशन
६८९ सदाशिव, पुणें २

प्रकाशन
वर्षप्रतिपदा: श. १८७८
ता. १२।४।५६

मुद्रक
मा. ह. पटवर्धन,
संगम प्रेस लि.,
३८३ नारायण पेठ,
पुणें २



—स. आ. जोगळेकर

— सुकन्या, सुकलत्र, सुगृहिणी, सुमाता —

माझी पत्नी

सौ. शांताबाई

जिच्या सहकार्यामुळेंच अंगीकृत कार्यें पूर्ण व यशस्वी झालीं
तिला सप्रेम समर्पण

श्री. स. आ. जोगळेकर यांचें साहित्य :

१ मानवी कर्तव्यें.
२ जोसेफ मॅझिनी.
३ स्वातंत्र्याचीं मूलतत्त्वें.
४ देवगिरी.
५ घारापुरी.
६ सह्याद्रि.
७ सिंहासनबत्तिशी.
८ शृङ्गारनायिका.
९ गाथासप्तशती.

पुरस्कार

श्री. जोगळेकर यांनीं संपादित केलेल्या या गाथासप्तशतीचा पुरस्कार करतांना महाराष्ट्राचा एक अभिमानी म्हणून मला जितका आनंद होत आहे, तितकाच या महत्त्वाच्या ग्रंथाचा महाराष्ट्रीयांना परिपूर्ण परिचय करून देण्याचें श्रेय गेलीं चाळीस वर्षे ज्यांचा माझा अकृत्रिम स्नेह आहे त्या माझ्या स्नेह्यांनी घेतलें म्हणून मला अभिमानही वाटत आहे. सुमारें पस्तीस वर्षांपूर्वी मी महाराष्ट्राच्या प्राचीन इतिहासाचें अध्ययन करीत होतों. त्या वेळीं राष्ट्रीय भावनेच्या सर्वस्वीं आहारीं जाऊन ते मानवी कर्तव्यांचा उहापोह करीत असल्यामुळें भारताच्या प्राचीन इतिहासाकडे पाहण्याचा त्यांचा दृष्टिकोन थोडासा अनास्थेचा होता. वयोमानामुळें म्हणा किंवा आजूबाजूच्या परिस्थितीकडे पाहून, वर्तमान काळाबद्दल अनास्था व भविष्यकाळाबद्दल नैराश्य वाटूं लागल्यामुळें भूतकाळाकडे आस्थेनें, कौतुकानें व संशोधक बुद्धीनें पाहण्याची प्रवृत्ति निर्माण होणें साहजिक आहे. श्री. जोगळेकर हे प्राचीन इतिहासाच्या क्षेत्रांत वावरूं लागले तेव्हांपासून त्यांच्या एतद्विषयक उद्योगाबद्दल मीं त्यांचें नेहमींच कौतुक करीत आलों आहें. वाट चुकलेला एक स्नेही मार्गावर आला या भावनेनें ! प्राचीन इतिहासाच्या क्षेत्रांतील श्री. जोगळेकर यांच्या हालचालींपैकीं गाथासप्तशतीवरील हा सर्वांगपरिपूर्ण ग्रंथ ही सर्वांत महत्त्वाची मोहीम आहे. श्री. जोगळेकरांच्या 'सह्याद्री' चें सर्वत्र कौतुक झालें. सरळ रस्त्यानें जातांना कांहीं प्रेक्षणीय असें दिसलें म्हणजे त्याचेंच निरीक्षण करण्यांत रमून जावें अशी कांहीं व्यक्तींना खोड असते. सह्याद्रि वाचतांना मला या खोडीची आठवण झाली. गाथासप्तशतीचें संपादन करतांना मात्र श्री. जोगळेकर अगदीं सरळ मार्गानें गेलेले आहेत. आपला ग्रंथ सर्वांगपरिपूर्ण करण्याचें ध्येय त्यांनीं गाठलेलें आहे. महाराष्ट्राचा प्राचीन इतिहास, समाजव्यवस्था, लोकरीति वगैरे आनुषांगिक विषयांच्या विस्तृत विवेचनासह महाराष्ट्राचा हा आद्य ग्रंथ महाराष्ट्राच्या अभिमान्यांच्या हातीं देऊन श्री. जोगळेकरांनीं महाराष्ट्राची अपूर्व सेवा केलेली आहे यांत संशय नाहीं.

हाल सातवाहनाचा काळ कोणताही असो, गाथासप्तशती हा महाराष्ट्राचा आद्य ग्रंथ आहे यांत संशय नाहीं. या ग्रंथांत महाराष्ट्राची सर्व वैशिष्ट्यें प्रकट

झालेलीं आहेत. संस्कृत ही अखिल भारतांत पण्डितांची व कवींची भाषा मानली जात असे. काव्यादि ग्रंथ संस्कृतांतच लिहिण्याची प्रथा होती. आणि देवादिकांचीं व ऋषितांचीं अवतारकृत्यें अगर राजवंशांचे पराक्रम व प्रेमलीला हेच काव्यांचे विषय असत. त्या काळांत महाराष्ट्री गाथाकवींनीं स्वतंत्र पायंडा पाडला. महाराष्ट्री प्राकृत भाषेंत महाराष्ट्राच्या ग्रामीण जनतेचें समकालीन जीवन हा वर्ण्य विषय घेऊन त्यांनीं केलेल्या काव्यनिर्मितींतून प्रतीत होणारे महाराष्ट्राचे गुण आजही दृग्गोचर झाल्यावांचून रहात नाहींत. संस्कृत साहित्यावरील आपल्या विख्यात ग्रंथांत डॉ. कीथ यांनीं गाथासप्तशतीबद्दल पुढील उद्गार काढले आहेत :

Even as it is it has a closeness to life and common realities which is hardly to be seen in Sanskrit this may be a characteristic of the Maharashtra people' who even to day have a certain homeliness and a rough good sense.

त्या काळीं इतिहास म्हणजे राजांच्या पराक्रमाचें वर्णन अशी महाराष्ट्रीयांची समजूत नव्हती. राजांच्या प्रासादांत व लीलांतच काव्य संभवतें असें ते समजत नव्हते. ग्रामीण जनतेंतही, घरोघरीं, खरें प्रासादिक काव्य आढळतें, अशी त्यांची निष्ठा होती. हें महाराष्ट्राचें एक वैशिष्ट्यच मानलें पाहिजे. अन्य प्राकृत भाषांत किंवा अन्य प्रदेशांत असे प्रयत्न झालेलेच नाहींत. ग्रामीण जनतेच्या जीवनावर, त्यांच्याच भाषेंत रचलेला असा गाथासप्तशती हा एकमेव ग्रंथ आहे. भारतांतील सुसंस्कृत पण्डितांच्या प्रशंसेचा हव्यास न बाळगतां, राजकुलांच्या विक्रमांचें वर्णन करण्याचा स्वार्थसाधक उपक्रम टाळून, शेतांवर राबणाऱ्या आणि रानावनांत राहणाऱ्या ग्रामीण व वन्य जनतेवर आपली काव्यप्रतिभा केंद्रित करणारे कवि महाराष्ट्रांतच निर्माण झालेले आहेत. गाथासप्तशतीचा संपादक हाल सातवाहन हा राजा होता. त्यानें स्वतः व त्याच्या पदरीं असलेल्या कवींनीं या संग्रहांत समाविष्ट झालेल्या गाथा लिहिल्या असतील; कदाचित् ग्रामीण जनतेंत प्रचलित असलेल्या गाथांवर थोडाबहुत संस्कार करून त्यानें त्या संकलित केल्या असतील. कसेंही असो. त्याचा महाराष्ट्री

प्राकृताबद्दलचा अभिमान आणि ग्रामीण जनतेच्या जीवनाबद्दलची आस्था या गाथांतून पदोपदीं प्रत्ययास येते. सातवाहनांच्या संस्कृत भाषेच्या अज्ञानाची आणि प्राकृत भाषांच्या पुरस्काराची पण्डितांनीं पदोपदीं कुचेष्टा केलेली आहे. परंतु असल्या कुचेष्टांनीं भिण्याचा अगर मीक घालण्याचा महाराष्ट्रीयांचा त्या वेळीं तरी स्वभावधर्म नव्हता. संस्कृत काव्याला सर्वस्वीं अपरिचित असें एक क्षेत्र हाल सातवाहनानें कवींना उपलब्ध करून दिलें याचें श्रेय सर्वस्वीं त्याच्या महाराष्ट्रीयत्वालाच आहे. संस्कृत पण्डितांना प्राकृत गाथासप्तशतीच्या गुणांची ओळख पटण्यास कितीतरी वर्षें, नव्हे शतकें लागलीं. अखेरीस

अविनाशिनमग्राम्यमकरोत् सातवाहनः ।
विशुद्ध जातिभिः कोशं रत्नैरिव सुभाषितैः ।।

असे उद्गार काढून बाणभट्टानें काव्य वाङ्मयांतलें गाथासप्तशतीचें योग्य स्थान निश्चित केलें व तें पण्डितांच्या निदर्शनास आणून दिलें.

पण महाराष्ट्रीयांचें तरी त्यांच्या या आद्य ग्रंथाकडे कोठें लक्ष होतें? सातवाहन राजे हे महाराष्ट्रीय होते कीं आन्ध्र या विषयीं खुद्द आधुनिक महाराष्ट्रीयांना शंका आहेत. सातवाहनांचा उल्लेख आन्ध्र म्हणून आलेला आहे हें खरें, पण तें केव्हां? पुराणांतील वंशावळी निर्माण अगर निश्चित झाल्या किंवा त्यांचें अखेरचें संस्करण झालें तेव्हां. त्यावेळीं सातवाहन राजे हल्लींच्या आन्ध्र प्रांतावर राज्य करीत होते हें निश्चित. यामुळेंच त्यांचा उल्लेख आन्ध्र राजे म्हणून झालेला आहे. सातवाहनांचे सगळयांत जुने शिलालेख महाराष्ट्रांत आहेत त्यांचीं नाणीं महाराष्ट्रांतच आढळतात, त्यांची राजधानी पैठणला होती, गाथासप्तशती महाराष्ट्री प्राकृतांत लिहिलेली आहे व तींत महाराष्ट्रीय ग्रामीण जनतेचें जीवन वर्णिलेलें आहे. या सर्व पुराव्याचा साकल्यानें विचार केला तर सातवाहन राजे हे महाराष्ट्रीयच होते याबद्दल शंका रहात नाहीं.

श्री. जोगळेकर यांनीं संपादित केलेल्या गाथासप्तशती या ग्रंथानें महाराष्ट्राच्या प्राचीन इतिहासाकडे जनतेचें लक्ष वेधलें जाईल अशी आशा करण्यास हरकत नाहीं. श्री. जोगळेकर यांचा हा ग्रंथ इतका परिपूर्ण आहे कीं त्याला प्राचीन महाराष्ट्राचा लोकेतिहास—History of the People म्हणण्यास

हरकत नाहीं. इतिहासाची सामान्य कल्पना म्हणजे राजांच्या वंशावळी व त्यांच्या युद्धांचे वृत्तांत. आजपर्यंत इतिहासानें जनतेकडे बरेंच दुर्लक्ष केलेलें आहे. महाराष्ट्रानें मात्र जनतेच्या जीवनाकडे डोळेझाक केलेली नाहीं असें गाथासप्तशतीवरून दिसून येतें. गाथासप्तशती वाचतांना महाराष्ट्रांतील दोन हजार वर्षांपूर्वीच्या ग्रामीण जनतेच्या जीवनाचीं चित्रें चित्तासमोर उभीं राहतात. येथें ग्रामीण जनतेच्या राहणीचें वर्णन आहे, त्यांच्या देवांचें व उत्सवांचें वर्णन आहे, त्यांच्या आहारविहारांचे उल्लेख आहेत, त्यांच्या आशा-आकांक्षा सशब्द झालेल्या आहेत. क्वचित् प्रसंगीं कांहीं गाथांतील शृङ्गार विशिष्ट संस्कृतीच्या कांहीं लोकांना न रुचण्यासारखा आहे, हें खरें. पण दोन हजार वर्षांपूर्वीच्या ग्रामीण जनतेच्या शब्दचित्रांत अधून मधून शृंगाराच्या छटा व्यक्त होणें साहजिक आहे.

श्री. जोगळेकरांनीं सातवाहनकालीन समाजाचें चित्र महाराष्ट्रीय जनतेपुढें मांडलें आहे. गेल्या दोन हजार वर्षांत आमच्या सामाजिक जीवनांत झालेलीं परिवर्तनें, परचक्रांमुळें आमच्या जीवनांत झालेला फरक, आमच्या जीवनाचीं तात्त्विक मूल्यें वगैरे विषयांचा त्यांनीं परामर्ष घेतला असता तर विषय अधिक रंगला असता. पण अगोदरच विस्तार वाढलेला; शिवाय तें थोडेंसें अप्रयोजक व अप्रस्तुतही झालें असतें. महाराष्ट्राच्या ग्रामीण जनतेच्या उत्क्रांतीचें परिपूर्ण चित्र श्री. जोगळेकर हेच पुढें केव्हां तरी आपणांस दाखवतील अशी आपण आशा करूं या.

संगम : पुणें.
३१।३।५६

विद्यासागर सदाशिव बखले.

दोन शब्द :

गाथासप्तशतीच्या संपादनाचा उद्योग कोणत्या मुहूर्तावर हातीं घेतला, कोण जाणें. अध्ययनाला सुरवात केव्हां झाली तेंही आतां आठवत नाहीं. १९४० सालीं तापानें फणफणलों होतों, तेव्हां भ्रमांत हाच विषय चालला होता, असें सांगतात. या कामाला लागलों तेव्हांपासून आप्तेष्टांना व आश्रयदात्यांना पारखा झालों. एकलकोंडा झालों, हा उद्योग पुरा व हातावेगळा होण्याला इतकीं वर्षें लागणार आहेत व व्यावसायिक नुकसानीही सोसावी लागणार आहे असा अंदाज होता तर कदाचित् तो हातींही घेतला नसता; मीच काय, प्रकाशकांनीं व मुद्रकांनींही; हालानें आम्हां सर्वांचेच हाल केले; पण त्याच्याच पुण्याईनें सर्व माणसें घरचींच मिळाल्यामुळें काम पुरें झालें. घरचीं माणसें झालीं तरी त्यांना किती त्रास द्यावयाचा याला कांहीं मर्यादा आहे कीं नाहीं ? पण झालें गेलें होऊन गेलें. या उद्योगांत इतकीं वर्षें एवढा गढलों होतों कीं आतां तो पुरा झाल्यामुळें जणूं बेकार झालों आहे असें वाटत आहे !

माझे मित्र श्री. विद्यासागर बखले यांनीं या विषयाशीं माझा प्रथम परिचय करून दिला तेव्हां त्यांनीं व मींही विद्यापीठाची पहिली पदवीही संपादन केलेली नव्हती. पुढें आम्हीं दोघांनींही पदवीलयी संपादन केली. ते संशोधन–कार्यांत पडणार आणि मी राजकीय बेकारींत काळ कंठणार अशीं चिन्हें दिसत होतीं. पण कालप्रभावामुळें दोघांचें ही भवितव्य बदललें. सुमारें वीस बावीस वर्षें पहिल्या दर्जाची वकीली करून ते न्यायाधीश झाले व आतां सेवानिवृत्तीच्या मार्गावर आहेत. आणि त्यांनीं तेव्हां माझ्या मनांत पेरलेलें बीज आणि नंतर डॉ. सुकथनकारांनीं स्थानांतर–रोपण केलेलें रोप आतां सुमारें पस्तीस वर्षांनीं फलधारण करीत आहे ! हा दोष क्षेत्राचा म्हणूनच माझ्या या ग्रंथाला त्यांनीं पुरस्कार लिहावा यांत विशेष औचित्य आहे. मी सातवाहनांच्या इतिहासाचें अध्ययन सुरू केलें तेव्हांपासून कितीकदां तरी आम्हीं याविषयीं चर्चा केलेल्या आहेत. शिवाय, डॉ. रामकृष्ण भांडारकर व डॉ. सुकथनकर यांच्या तोडीचा त्यांचा सातवाहन या विषयाचा

व्यासंग व अधिकार आहे; फार काय, डॉ. केतकरांना महाराष्ट्राचा प्राचीन इतिहास लिहिण्याची प्रेरणा त्यांच्या एतद्विषयक लेखांमुळेंच झालेली आहे. २। विद्वानाचा पुरस्कार मिळाला हें माझें भाग्य व मैत्रीची कृतकृत्यताही! याबद्दल त्यांचे आभार मानणे ही ही कृतघ्नता होईल!

या कामांत मला अनेक मित्रांचें साह्य झालेलें आहे. विख्यात संशोधक महामहोपाध्याय डॉ. मिराशी एम्. ए., पी. एच्. डी; यांनीं मला अनुपलब्ध व हवी असलेली माहिती तत्परतेनें पुरविली आहे. डॉ. मोरेश्वर दीक्षित, एम्. ए.; पी. एच्. डी.; यांनीं मजबरोबर गाथासप्तशतीचीं हस्तलिखितें वाचून गाथा कवींचीं वेळोवेळीं मार्गेपुढें असलेली नांवें निश्चित केलीं आहेत आणि अनेकदां आपल्या संशोधनाचा फायदा घेऊं दिला आहे. अभ्यासाची बैठक अगोदर कोण मोडतो तें पाहूं अशा इर्ष्येनें त्यांनीं मजबरोबर काम केलें. भांडारकर ओरियंटल रिसर्च इन्स्टिटयूटचे डॉ. गोडे, एम्. ए., डी. लिट्: यानीं मला लागलीं तीं हस्तलिखितें व ग्रंथ दीर्घकालपर्यंत वापरूं दिले आहेत. प्रसंगविशेषीं इतर संशोधकांच्या तांतडीच्या मागण्या डावलूनही; इतकेंच नव्हे मला अज्ञात असे अनेक संदर्भ काढून दिले आहेत. माझे मित्र श्री. दत्तात्रय श्रीधर मराठे, बी. ए., एल्. एल्. बी., वकील यांनीं डॉ. वेबर यांची गाथासप्तशतीची जर्मन आवृत्ति सबंध वाचून मला समजावून सांगितलेली आहे. श्री. शालिग्राम एम्. ए. या संस्कृत पण्डितांनीं गृहकृत्याच्या पद्धतीनें गाथांचें भाषांतर मजकडून करवून घेतलें. डॉ. वसंत गजानन राहुरकर यांनीं अनेक निवळ व भ्रष्ट प्राकृत अशा गाथा समजावून सांगितल्या. श्री. अनंतराव करंदीकर यांनीं भाषांतर वाचून अनेक सूचना केल्या, पण त्या वेळीं तो भाग छापून झालेला असलेमुळें मला त्यांचा योग्य तो उपयोग करून घेतां आला नाहीं. श्री. कर्वे यांनी शब्दकोश तपासून दिला. श्री. दीनानाथ दलाल, श्री. रामभाऊ देशमुख व श्री. रॉय किणीकर यांनीं तर गाथासप्तशती माझ्या हातून पुरी होईल किंवा नाहीं याबद्दल आपसांत पैजा लावल्या होत्या असें ऐकतों. उद्योगाबद्दल प्रशंसा करणारांपेक्षां विलंबाबद्दल निर्भर्त्सना करणारांची आपुलकी व संख्या अधिक! आमचे श्री. यशवंतराव जोशी व संगमचे श्री. माधवराव पटवर्धन यांचा तर

मी अंत पाहिला. अलीकडे तर आम्ही एकमेकांना टाळूं लागलों होतों ! या सर्व मित्रांचें मी अंतःकरणपूर्वक आभार मानतों.

प्रस्तावना, भाषांतर व टीका यांतील अनेक दोषांची मला आतां विशेष जाणीव होत आहे. कांहीं सांगावयाचें होतें तें राहून गेलें. कांहीं दुबार सांगितलें गेलें. पुढील आवृत्तीचा योग आल्यास ते दूर करीन. सर्वच टीकाकारांचीं मतें प्रकाशित होतात असें नाहीं; जीं प्रकाशित होत नाहींत. तीं उपेक्षा करण्याच्या लायकीची असतात असेंही नाहीं. कोठें कांहीं दोष आढळल्यास वाचकांनीं ते माझ्या निदर्शनास आणण्याची कृपा करावी अशी विनंति आहे.

शालिवाहन शकाच्या वर्षप्रतिपदेस या ग्रंथाचें प्रकाशन होत आहे हा योगायोगच म्हटला पाहिजे, कारण या शकाची प्रस्थापना गौतमीपुत्र सातकर्णीनें केलेली आहे.

माझी ही कृति महाराष्ट्राला प्रिय होईल अशी आशा आहे.

स. आ. जोगळेकर

अनुक्रमणिका

शरीर-खण्ड :

विषयसूचि

गाथासप्तशतीत उल्लेखिलेल्या व प्रस्तावनेंत चर्चिलेल्या विषयांची व आधार-ग्रंथांची सूचि शिष्टसंमत प्रथेनुसार द्यावयाची तयारी केली होती; पण त्यांचा विस्तार फार झाला; मर्यादा कोठेंच घालतां येईना. संशोधक मित्र तर म्हणूं लागले कीं संपूर्ण शब्दसूचीही दिली पाहिजे. करावें तेवढें थोडें! गाथासप्तशतींत आलेल्या सर्व विषयांची चर्चा प्रस्तावनेंत केलेली आहे. प्रस्तावनेची मांडणी विषयवारीनें केलेली आहे आणि प्रत्येक प्रकरणांतील विषयांची मांडणी अकारानुक्रमें केलेली आहे. या व्यवस्थेमुळें अनुक्रमणिकेवरून स्थूलमानानें कोणताही विषय सहज सांपडूं शकेल; ज्या बाबतींत अडचण पडेल व जागोजाग चर्चा असेल असेच विषय या सूचींत समाविष्ट केलेले आहेत. आंकडे 'प्रतिष्ठान टीका' संज्ञक प्रस्तावनेंतील पृष्ठांचे आहेत.

गाथासप्तशती

उपोद्घात

(१) प्रस्तावनेचा प्रस्ताव :

महाराष्ट्राच्या प्राचीन इतिहासाचा व प्राकृत भाषेंतील एकाद्या ग्रंथाचा अभ्यास माझे हातून होईल असा योग माझ्या कुंडलींत असल्याचें भविष्य एकाद्या ज्योतिष्यानें पंधरा सोळा वर्षांपूर्वीं वर्तविलें असतें तर त्याची गणना मी पढतमूर्खांत किंवा खुशामती लफंग्यांत केली असती. कारण महाविद्यालयीन अध्ययनांत हे माझे विषय नव्हते आणि चरितार्थासाठीं स्वीकाराव्या लागलेल्या पेशामुळें व्यासंगशक्ति तोंवर आटून गेली होती. शिवाय, वय वाढलें म्हणजे नवे मित्र जोडतां येत नाहींत, त्याचप्रमाणें ताजे अभ्यासविषयही संपादन करतां येत नाहींत. म्हणून वाटतें, केवळ योगायोगामुळें किंवा पूर्वजन्मानुबंधामुळें मी या विषयाकडे वळलों.

माझे सन्मित्र श्री. विद्यासागर बखले यांनीं पंडित भगवानलाल इंद्रजी सुवर्णपदक मिळविलेला Sātavāhanas & Contemporary Kṣatrapas हा निबंध (J. B. B. R. A. S : N. S : Vol III) त्यांच्या मुर्वतीखातर मी वरवर वाचला होता आणि सुमारें तीस बत्तीस वर्षांपूर्वी त्यांचे सहवासांत गाथासप्तशतींतील कांहीं सुभाषितांचें रसग्रहण केलें होतें. अशा परिस्थितींत ग्रंथसंग्रहोन्मादामुळें म्हणा किंवा अंतर्यामांतील सुप्त वा विस्मृत प्रवृत्तींच्या प्रेरणेमुळें म्हणा, 'निर्णयसागर'न काव्यमालेंत छापलेली गाथासप्तशतीची एक जीर्ण मुद्रित प्रत मी पुण्याच्या जुन्या बाजारांत खरेदी केली. सदर पुस्तकाच्या मूळ मालकानें समासांत जागोजाग इंग्रजी, मराठी टीपा लिहिलेल्या होत्या. वाटलें, बरें झालें, विषय समजण्याला अनायासें सोबत मिळाली; प्राकृत गाथांची भाषा बोजड नाहीं, विषय साधे व रसिकाला रुचण्याजोगे आहेत; शिवाय मदतीला संस्कृत छाया व टीका आहेतच. बरेचवेळां प्रयत्न केला तरीही गाथा समजेनात व ज्या समजल्या त्यांचें स्वारस्य उमजेना. म्हणून या वेळीं, आणि

फक्त या वेळींच नव्हे, स्वतःच्या अज्ञानाची लाज वाटली. मानवी संस्कृतीचा मूलाधार असलेल्या संस्कृत या विषयाची उनाड विद्यार्थी दशेंत उपेक्षा केली याबद्दल पश्चात्ताप वाटला आणि हौसेनें हातीं घेतलेला हा ग्रंथ नाइलाजानें बाजूला ठेवला.

आणि माझ्या आयुष्यांत एक अकल्पित घटना घडली नसती तर तो तसाच, भविष्यकाळीं, फुरसतीच्या वेळीं, आतां यापुढें ही अपेक्षित फुरसत केव्हां मिळणार कोण जाणे, वाचावयासाठीं म्हणून बाजूला ठेवलेल्या इतर अनेक ग्रंथांबरोबर पडून राहिला असता.

मध्यंतरीं, कसा कोण जाणे, मला प्राचीन व मध्ययुगीन नाणीं गोळा करण्याचा छंद लागला. स्वाभाविक छांदिष्टपणांत ही भर पडली. प्रचलित नाण्यांचा संग्रह करण्याचें व्यसन लागण्यापूर्वीच, आणि माझ्या मतें सुदैवानें, पण आप्तेष्टांच्या मतें शापपूर्वक दुर्दैवानें, तें मला अजूनही जडलेलें नाहीं, मी मुद्राराक्षसाच्या आहारीं गेलों. जुन्या नाण्यांच्या नांवाखालीं मी पुष्कळ भंगार जमविली. त्यांवरील लेख वाचतां येत नव्हते, म्हणून तीं दुर्मिळ व ऐतिहासिक महत्वाचीं आहेत अशा भ्रमांत होतों. पुढें मुद्राशास्त्रावरील ग्रंथ आणि तोंवर जमविलेल्या नाण्यांवरील लेख वाचले, तेव्हां तीं सामान्य आहेत तें प्रत्ययास आलें. या हिरमोडानंतर त्यांपैकीं बऱ्याच नाण्यांची विल्हेवाट लावली. औदार्याच्या आविर्भावानें, संशोधनोत्तेजनाच्या निमित्तानें कांहीं इष्टमित्रांना देऊन टाकलीं; कांहीं मोडींत घातलीं, तेवढींच प्रापंचिक कामाला आलीं. एवढें मात्र झालें कीं या छंदामुळें हिंदुस्तानच्या प्राचीन व मध्ययुगीन इतिहासाची उजळणी झाली आणि मुद्राशास्त्राचीं मूलतत्त्वें अवगत झालीं. नंतर जुनीं नाणीं आणि भारतीय स्फूर्तिस्थानांच्या सान्निध्यांत जागृत होणाऱ्यां संवेदनांचें संपादन करणासाठीं मी नव्या हिरीरीनें उठावणी केली. या ना त्या निमित्तानें, केव्हां कामासाठीं तर केव्हां कामें बुडवून, कधीं स्वतःच्या खर्चानें तर कधीं पक्षकारांनीं सोंपविलेल्या कामगिरीच्या निमित्तानें कांजीवरम्‌पासून पेशावरपर्यंत प्रवास केला आणि शेकडों नाणीं जमविलीं. इतिहासाची निश्चित माहिती असावी म्हणून मी कालानुक्रमवार आणि ऐतिहासिक घटना आणि मुद्रा व शिल्पकृत्यें यांचे बाबतींत तपशीलवार असे राजघराण्यांचे समांतर स्तंभांचे तक्ते तयार केले. अधिकृत

इतिहासग्रंथावरून हे तक्ते सहज पुरे करतां येतील आणि या पद्धतीनें हिंदुस्थानचा इतिहास कोणीं तयार केलेला नसल्यामुळे आपण सहजासहजीं संशोधक होऊन जाऊं, अशी भोळी आकांक्षा मी मनाशीं बाळगली होती. प्राथमिक याद्या तयार झाल्या व त्यांत तपशील नमूद होऊं लागले, तेव्हां प्रत्ययास आलें, कीं हिंदुस्थानच्या प्राचीन इतिहासांतल्या सूक्ष्मच नव्हे, स्थूल बाबतींतही एका पंडिताचा दुसऱ्याशीं मेळ नाहीं. सर्वांचें विवेचन तात्पुरतें तर्कशुद्ध वाटे. त्रिखण्डमान्य अशा या पण्डितांच्या भिन्न मतांची व मतभिन्नतेच्या कारणांची माहिती नमूद असावी म्हणून तक्त्यांतील खणांत तपशील भरूं लागलों. तेव्हां प्रारंभींच्या सांगाड्याभोंवतीं व्यूह निर्माण झाले. ते परस्परांशीं झगडूं लागले आणि त्यांत गुरफटून मी गोंधळून गेलों.

एकाद्या मंत्राची बीजशक्ति किंवा प्रक्रिया अवगत नसतांहि केवळ चाळा म्हणून तो जपावा आणि यदृच्छेनें हा जप शास्त्रोक्त व पर्वकाळीं होऊन गुरुदर्शन होण्यापुरती सिद्धि प्राप्त व्हावी, असा अकल्पित प्रकार या बाबतींत झाला.

प्राचीन नाणीं गोळा करीत असतांना मला महाराष्ट्रांत जागोजाग सातवाहनांचीं कांहीं नाणीं मिळालीं होतीं. पुराणांत व हिंदुस्थानच्या देशी विदेशी इतिहासांत सातवाहनांना आन्ध्र ही संज्ञा दिलेली आहे. गतानुगतिकत्वानें माझ्या तक्त्यांतील एतद्विषयक स्तंभावर मी हेंच शीर्षक लावलें होतें. माझ्याकडे कांहीं प्राचीन नाणीं आहेत व त्यांत सातवाहनांचींही नाणीं आहेत असें समजल्यावरून तीं पाहण्यासाठीं येथील भाण्डारकर ओरिएन्टल रिसर्च इन्स्टिट्यूटचे प्रमुख व विख्यात संशोधक डॉ. सुकथनकर हे एके सकाळीं माझ्या एका स्नेह्याबरोबर मजकडे आले. आंतरराष्ट्रीय कीर्तीचे विद्वान आपण होऊन मजकडे आले, मी हुरळलों. त्यांनीं माझीं नाणीं पाहिलीं व तक्ते पाहिले औपचारिक अभिनंदनानंतर झालेल्या संभाषणावरून माझ्या तुटपुंज्या ज्ञानाची व गाढ अज्ञानाची त्यांना कल्पना आली. आठवतें कीं माझ्या तक्त्यांतील आन्ध्र या शीर्षकावर बोट ठेवून ते म्हणाले, ' सातवाहन हे आन्ध्र नव्हते; त्यांच्या राजवटीशीं संबद्ध असलेले पौराणिक व साहित्यिक उल्लेख, शिलालेख, शिल्पकृत्यें व मुद्रा आणि गाथासप्तशती वगैरे किती तरी साधनें आजवर उपलब्ध झालेलीं आहेत; या उपेक्षित कालखण्डावर तुम्ही आपलें लक्ष केंद्रित करा आणि शक्य तर त्यांचा इतिहास लिहा. '

गाथासप्तशतीचें नांव निघतांच मी चमकलों. अप्राप्य द्राक्षांमुळें आंबल्या-सारख्या आविर्भावानें म्हणालों, मी तर ऐकतों कीं तो केवळ उत्तान लावण्यांचा संग्रह आहे. जणूं मी एक आर्ष पण्डित व 'संस्कृति-संरक्षक' आहे आणि या मुळेंच तो मी आजवर वाचला नव्हता !

हा प्रवाद खरा नाहीं, ते म्हणाले : गाथासप्तशती हा प्राकृत वाङ्मयांतील आद्य व अग्रगण्य ग्रंथ आहे; प्राचीन व बहुमोल सुभाषिताचा संग्रह आहे; प्राचीन महाराष्ट्राच्या ग्रामीण जीवनाचें प्रामाणिक प्रतिबिंब त्यांत उमटलेलें आहे; विद्वानांनीं त्याची स्तुति केलेली आहे, साहित्यशास्त्रज्ञांनीं त्यांतील वचनें उद्धृत केलेलीं आहेत; अनेक रसिक पण्डितांनीं त्यावर टीका लिहिल्या आहेत; तुम्हीं नीट वाचून पहा, म्हणजे गाथांचें महत्त्व व स्वारस्य प्रत्ययाला येईल.

त्या दिवशीं हें बोलणें तेवढ्यावरच राहिलें. मी म्हटलें, त्यांचे मार्ग वेगळे, आपले वेगळे. कोठें अज्ञाताचा शोध लावणारा दर्यावर्दी व कोठें खपाट्यावरला हेलकरी ! पुन्हां कधीं भेटलेच तर हवापाण्याच्या गोष्टी करून वा व्यवसायाची शिष्ट सबब सांगून वेळ मारून नेऊं. पण प्रसंग आला तेव्हां तें जमलें नाहीं. दुसऱ्या कांहीं निमित्तानें ते मजकडे आले असतां सातवाहनांचा विषय काढून जणूं खणपटीलाच बसले. अभ्यासासाठीं नेमून दिलेल्या गृहकृत्याबाबत चुकार विद्यार्थ्यानें उडवाउडवी करावी, तसें माझें वर्तन पाहून त्यांना उद्वेग वाटलासें दिसलें. कोण कोणासाठीं व कशासाठीं व्याकुल होतो !

आणि त्याच वेळीं महाराष्ट्राच्या प्राचीन, विशेषतः सातवाहनांच्या इतिहासाचा व गाथासप्तशतीचा अभ्यास करावयाचा मी निश्चय केला.

सातवाहनांचें मूलस्थान : The Home of the Sātavāhanas हा या विषयावरला माझा पहिला लेख. त्याची जुनरी कागदावर टंकमुद्रित केलेली प्रत मी त्यांच्या हातीं दिली तेव्हां त्यांना किती समाधान वाटलें म्हणून सांगूं ! हा लेख वाचून पाहिल्यानंतर तो त्यांनीं ॲनल्समध्यें छापावयाचें ठरविलें आणि मला तसें सांगितलें. तेव्हां मी म्हणालों,

आंतरराष्ट्रीय कीर्तीच्या महापण्डितांचे संशोधनात्मक लेख आपल्या नियत-कालिकांत येतात. त्यांच्या पङ्क्तींत बसण्याची माझी पात्रता आहे किंवा कस हें तुम्हीं ठरवावयाचें आहे. या लेखावरून मला कोणी महामूर्खांत काढलें तर त्याचें अपयश पर्यायानें तुमच्यावर येणार.

यावर ते म्हणाले,

तसें होईल असें मला वाटत नाहीं. शिवाय तुम्ही वकील लोक प्रतिपक्षा-बद्दल वापरतां तशीं कडक विशेषणें आम्हीं संशोधक लोक योजीत नाहीं. अमूक कारणांसाठीं, तमुक पुराव्यावरून, तुमचा सिद्धान्त अग्राह्य आहे, एवढाच आक्षेप फार तर एकादा दुसरा संशोधक घेईल. त्याचा प्रतिपक्ष करण्याची तयारी असली म्हणजे झालें.

पुढें त्यांनीं हा लेख मंजूर करून Annals of the Bhandarkar Oriental Institute-Silver Jubilee Volume : (1917-1942) मध्यें प्रसिध्द करविला.

गाथासप्तशतीची मराठी आवृत्ति संपादित करण्याचा विचार मी त्याच वेळीं त्यांना सांगितला. या संकल्पाबद्दल त्यांनीं माझें अभिनंदन केलें, आणि मार्गदर्शनाचें आश्वासन दिलें. त्यांच्या प्रोत्साहनामुळेंच मी हें काम हातीं घेतलें हें मी येथें कृतज्ञतापूर्वक नमूद करतों. माझ्या दुर्दैवानें त्यांचें मार्गदर्शन मला लाभलें नाहीं. ही मुद्रित प्रत त्यांच्या हातीं देतां येती तर मला कृतकृत्य वाटलें असतें; पण तसा योग्य नव्हता !

गाथासप्तशतीचें वाचन फिरून सुरू झालें. वस्तुतः गाथा सोप्या आहेत, पण आमचें ज्ञान अगाध. म्हणून त्या व आनुषंगिक विषय समजावून घेण्या-साठीं अनेकांची मदत घ्यावी लागली. या कार्यांत माझ्या इतक्या स्नेह्यांनीं मला एवढी मदत केलेली आहे कीं त्यांचा नामनिर्देशही करतां येणार नाहीं. श्रम माझे, श्रेय त्यांचें. गाथासप्तशतीचें संपादन हालानें केलें आणि त्यानें माझे व माझ्या स्नेह्यांचे पुष्कळ दिवसपर्यंत पुष्कळ हाल केले हें मात्र खरें !

(२) गाथासप्तशतीचा महाराष्ट्रीयांना परिचय :

गाथासप्तशती हा महाराष्ट्रांत सिद्ध झालेला व महाराष्ट्री प्राकृतांतला आद्यग्रंथ होय. कालानुक्रमानें आद्य व गुणमानानें अग्रगण्य. तरी महाराष्ट्रांतील रसिकांचें, विद्वानांचें व संशोधकांचें त्याकडे असावें तितकें लक्ष नाहीं.

भारतीयांना गाथासप्तशतीचा पहिला स्थूल परिचय करून देण्याचें श्रेय रावसाहेब विश्वनाथ नारायण मंडलिकांचें. वसई येथील एका ब्राह्मणाच्या संग्रहीं

असलेल्या त्रुटित हस्तलिखिताचा अभ्यास करून त्यांनीं 'शालिवाहन व शालिवाहनसप्तशती' हा निबंध मुंबईच्या रॉयल एशियाटिक सोसायटीपुढें ता. १९।३।१८८३ रोजीं वाचला. तो पुढें सदर संस्थेच्या नियतकालिकांत प्रसिद्ध (J. B. B. R. A. S: Vol. X, pp. 128-38) झाला. यानंतर डॉ. रामकृष्ण भांडारकरांनीं मुंबई गॅझेटीयरसाठीं लिहिलेल्या Early History of the Deccan (Goverement Central Press : 1884) या ग्रंथांत या विषयाचें आणखी विवेचन केलें. श्री नारायण विष्णु बापट यांनीं या ग्रंथाचें मराठींत भाषांतर (दख्खनचा प्राचीन इतिहास : १८८७) केलें. त्यांत ते सांगतात, " प्राचीन महाराष्ट्रींत...सप्तशती नामक ग्रंथ...पद्यरत्नावलीच्या तऱ्हेचा असून त्यांत बहुतकरून शृंगारपर...पद्यांचा संग्रह आहे. अन्ध्रभृत्यांच्या कारकीर्दींत विद्याग्रंथकलापाची समृद्धीची स्थिति होती आणि प्राकृत भाषांचा व विशेषेंकरून महाराष्ट्रीचा फार करून पहिल्यानेंच लोक ग्रंथ लिहिण्याचे कामीं उपयोग करूं लागले असावे असा बेधडक सिद्धांत करण्यास बाध नाहीं."

महाराष्ट्राला गाथासप्तशतीच्या अंतरंगाचा पहिला परिचय करून देण्याचें श्रेय श्री. राजारामशास्त्री भागवतांचें. प्रथम ग्रंथमालेंत प्रसिद्ध झालेला त्यांचा 'प्राकृत भाषेची विचिकित्सा' हा निबंध अलीकडे पुस्तकरूपांत उपलब्ध झाला आहे. त्यांतील चोवीस पानें या विषयाला दिलेलीं आहेत. त्यांत त्यांनीं गाथासप्तशतींतील सोळा गाथा उध्दृत केल्या आहेत; तद्भव (३०), तत्सम (६३) व देशी (११२) शब्दांचा कोश दिला आहे; संपादक, लेखक व लेखिका यांबद्दल चर्चा केली आहे; तत्कालीन धार्मिक, सामाजिक व सांस्कृतिक स्थितीबद्दल गाथांतील उल्लेखांवरून निघणारे निष्कर्ष नमूद केले आहेत. माझ्या माहितीप्रमाणें मूळ ग्रंथाबद्दल दुसऱ्या कोणीही आजवर एवढें व इतकें चांगलें विवेचन व रसग्रहण केलेलें नाहीं. शास्त्रीबुवा सांगतात, " सेतुबंधाच्या भाषेंत जसा व जितका कृत्रिमपणा आढळतो तसा व तितका साधेपणा सप्तशतींत आढळतो." गाथांतील साध्या उक्तींवर शृंगाराचा आरोप आलेला पाहून ते त्वेषाने विचारतात, " शृंगाराची कावीळ झालेल्या आलंकारिकांनीं जी भलतीच वाट दाखविली त्या वाटेनें प्राकृत ग्रंथावर संस्कृत टीका करणारे भट्ट व शास्त्री डोळे मिटून गेले, ही अंधपरंपरा दांडगी नव्हे काय ? "

पुरातत्त्वभूषण श्री. राजवाडे आणि विद्याभूषण श्री. बुले यांनीं अनुक्रमें 'सरस्वतीमंदिर' व 'विविधज्ञानविस्तार' या नियतकालिकांतून गाथासप्तशतींतील गणपती या विषयाची चर्चा केली. यानंतर बऱ्याच वर्षांनीं हाच वाद श्रीं. बुले शास्त्री (वागीश्वरी : वर्ष १, अंक १) व श्री. अप्रबुद्ध (वागीश्वरी : वर्ष ३, अंक १) यांचे दरम्यान झाला. त्याचा समारोप महामहोपाध्याय प्राचार्य मिराशी यांना 'गाथासप्तशतीचा काल' या लेखांत (युगवाणी : १९४६. मार्च) केला. हा वाद अनेक वर्षे चालला. पण तो सामान्य मराठी वाचकांच्या डोक्यावरून गेला आणि गाथासप्तशतीचें स्वारस्य त्यांना अनुभवावयाला मिळालें नाहीं.

श्री. प्र. वों. कानिटकर यांनीं 'विविधज्ञानविस्तारां'तून (वर्ष ६१ : अंक २ व ३) 'गाथासप्तशतींतील सुभाषितें' मराठी भाषांतरासह प्रसिद्ध केलीं. त्यांचा 'प्राकृत काव्यें व गाथासप्तशती' हा लेख 'महाराष्ट्र–साहित्य-पत्रिकें'त प्रसिद्ध झालेला आहे. १९४५ च्या 'दीपावली' वार्षिकांत मी 'गाथासप्तशती' या लेखांत रसग्रहणाच्या धर्तीनें या ग्रंथाचा ओझरता परिचय करून दिला. 'मौज' च्या १९४६ च्या दिवाळी अंकांत श्री. बनहट्टी यांनीं 'महाराष्ट्राचें पहिलें अमृतमधुर काव्य' ह्या लेखांत या विषयाचा परामर्ष घेतला. त्यांत त्यांनीं केलेलें कांहीं गाथांचें समवृत्त भाषांतर आलेलें आहे. 'वेश्यांचें प्रेम विजयी होवो' (झंकार : १९४८, दिवाळी अंक), 'श्यामला' (दिपावली : १९४९), 'मद्यपान' (वाङ्मयशोभा : मार्च, १९५०) आणि 'संकेत व संकेतस्थानें' (दीपावली : १९५१) या लेखांत गाथासप्तशतींतिल त्या त्या विषयांवरील उल्लेख एकत्रित करून त्यांची चर्चा मी केलेली आहे.

नियतकालिकांचें आयुष्य मर्यादित असतें; यामुळें असे लेख काळाच्या उदरांत गडप होऊन जातात.

म्हणूनच म्हणावें लागतें कीं गाथासप्तशतीच्या बाबतींत सामान्य मराठी वाचकांचें ज्ञान जवळ जवळ शून्यांशावर आहे. गाथा या नामार्धावरून कोणास वाटतें कीं हा संतवाङ्मयाचा प्रकार असावा आणि सप्तशती या नामार्धावरून कोणास वाटतें कीं हा देवीवाङ्मयाचा ग्रंथ असावा! आणि आतां तर काय. श्री. जोशी हे या ग्रंथाचें प्रकाशन करीत असल्यामुळें हे गैरसमज कांहीं काळा-पर्यंत बळावण्याचा किंवा यामुळें ते टीकाविषय होण्याचा संभव आहे!

(३) गाथासप्तशतीच्या मुद्रित व हस्तलिखित प्रती आणि टीका :

मुद्रित प्रती

गाथासप्तशतीला पहिला मुद्रणसंस्कार देण्याचें श्रेय डॉ. वेबरचें; आणि या ग्रंथाचा सांगोपांग अभ्यास करण्याचेंही. त्यांनीं गाथासप्तशतींतील ३७० गाथा १८७०सालीं Uber das Saptacatakam des Hala या नांवानें लाइप्झिग येथें प्रसिद्ध केल्या. १८७२ व १८७४ या सालांत आणखी कांहीं गाथा मिळवून त्या त्यांनीं Zeitschrifter Deutschen Morgen landischen Gasellschaft या जर्मन नियतकालिकांतून (26: pp 735 foll) प्रसिद्ध केल्या. गाथासप्तशतीची संपूर्ण आवृत्ति त्यांनीं १८८१सालीं लाइप्झिग येथून Das Saptacatakam Des Hala या नांवानें प्रसिद्ध केली. गाथासप्तशतीच्या मुद्रित प्रतींत वेबरची आवृति अग्रगण्य आहे; कालानुक्रमाच्या व शास्त्रशुद्धतेच्या दृष्टीनेंही. ही आवृत्ति सिद्ध करण्यासाठीं त्यांनीं अनेक हस्तलिखित प्रतींचा साधारण देवानें 'मुक्तावली' या नांवानें 'व्रज्या' पद्धतीनें मांडणी केलेल्या गाथासप्तशतीचा आणि कुलनाथ, गंगाधर व पीतांबर यांच्या टीकांचा उपयोग केलेला आहे. त्यांनीं गाथासप्तशतीचे दोन भाग केलेले आहेत. पहिल्या अधिकृत भागांत ६९८ गाथा दिल्या आहेत; उत्तरार्धांतील गाथा अनधिकृत किंवा प्रक्षिप्त आहेत. संपादकाच्या नांवाचा उल्लेख करणाऱ्या अंतिम गाथांचाही पहिल्या भागांत समावेश केल्यामुळें गंगाधराच्या प्रतींत आढळणाऱ्या ६९५ ते ६९९ या गाथा त्यांना उत्तरार्धांत घालाव्या लागल्या आहेत. उत्तरार्धांतील क्र. ७०१ व ७०२ या गाथा त्यांनीं अनुक्रम कुलनाथ व पीतांबर यांच्या सटीक प्रतींवरून घेतल्या आहेत; क्र ७०३ ते ७९३ या गाथा गाथासप्तशतीच्या वेगवेगळया हस्तलिखितांवरून, क्र. ७९४ ते ८०८ या गाथा साधारणदेवाच्या मुक्तावलीवरून, क्र. ८०९ ते ९४७ आणि क्र. ९४८ ते ९५९ या गाथा अनुक्रमें गाथासप्तशतीच्या पहिल्या व दुसऱ्या तेलंग प्रतींवरून आणि क्र. ९६० ते ९९४ या गाथा अलंकारशास्त्रावरील वेगवेगळ्या ग्रंथावरून घेतलेल्या आहेत. क्र. १ ते ९६५ या गाथांचे हस्तलिखितांत आढळून येणारे सूक्ष्म प्राकृत व छायांतील स्थूल संस्कृत पाठभेदही त्यांनीं दिले आहेत. क्र. ९६६ ते ९९४ या गाथांचे पाठभेद

त्यांनीं दिलेले नाहींत. गाथांच्या संस्कृत छाया त्यांनीं दिलेल्या नाहींत. कोठें कोठें संस्कृत टीकांतील उतारे दिले आहेत. जागोजाग टीपा दिल्या आहेत आणि कांहीं गाथांचे जर्मन भाषांतरही केले आहे. विस्तृत प्रस्तावना, वेगवेगळ्या हस्तलिखितांतील गाथांच्या क्रमांकाचा मेळ घालणारीं कोष्टकें, गाथारंभांची सूचि आणि संपूर्ण शब्दसूचि या वैशिष्ट्यांमुळें हा ग्रंथ सर्वांगपरिपूर्ण आहे.

हिंदुस्थानांत गाथासप्तशती प्रथम प्रसिद्ध करण्याचें श्रेय निर्णयसागरचें. पंडित दुर्गाप्रसाद व श्री. पणशीकरशास्त्री यांनीं संपादित केलेली गाथासप्तशती गंगाधर-भट्टाच्या भावलेशप्रकाशिका या टीकेसह निर्णयसागरनें काव्यमालेंत (क्र. २१) प्रसिद्ध केली. ही प्रत चार हस्तलिखितांवर आधारलेली असून त्यांतील पाठभेद मुद्रित आवृत्तींत नमूद केलेले आहेत. संपादकांनीं सातवाहन या शीर्षका-खालीं लिहिलेली संस्कृत प्रस्तावना व गाथांची अकारवारीनें केलेली अनुक्रम-णिका ग्रंथास जोडलेली आहे. या प्रतीची द्वितीयावृत्ति १९११ सालीं प्रसिध्द झाली आहे. पंडित मथुरानाथ शास्त्री यांनीं लिहिलेली संस्कृत छाया आणि स्वतंत्र व विस्तृत प्रस्तावना व टीका यांसह मूळ गाथासप्तशती निर्णयसागरनेंच मुद्रित व प्रसिध्द केली आहे. पंजाब युनिव्हर्सिटीच्या लायब्ररींतील हस्तलिखिताच्या आधारानें लाहोरचे श्री. जगदीशलाल यांनीं संपादिलेली गाथासप्तशती प्रथम ओरिएन्टल कॉलेज मॅगेझीनमध्यें आणि नंतर ग्रंथरूपानें प्रसिद्ध झाली आहे. मूळ हस्तलिखित त्रुटित आहे. चवथ्या शतकांतील शेवटच्या १५, पांचव्या शतकांतील १००, सहाव्या शतकांतील ५५ व सातव्या शतकांतील ९८ एवढ्याच गाथा या प्रतींत दिलेल्या आहेत या गाथांवरील हारितात्र पीतांबराची अप्रका-शित टीका या प्रतींत दिलेली आहे. आरंभीं विवेचनात्मक प्रस्तावना व अखेरीस गाथांची वर्णानुक्रमसूचि जोडलेली आहे.

हस्तलिखितें

गाथासप्तशतीचीं हस्तलिखितें हिंदुस्थानांत काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंत जागोजाग उपलब्ध झालेलीं आहेत. आपल्याला मिळालेल्या हस्तलिखितांचें पृथक्करण करून वेबरनें विधान केले आहे (Vorwort p. xxvii) कीं गाथासप्तशतीचे कमींत कमी सहा भिन्न पाठ प्रचलित आहेत, त्यांमधील भिन्नता गाथांच्या संख्येंत व मांडणींतही आढळून येते, सर्व प्रतींना साधारण अशा गाथांची संख्या ४३० आहे आणि गाथासप्तशतीचा मूळचा गाभा एवढाच आहे.

हाल सातवाहनानें एक कोटि गाथा जमविल्या व त्यांतून सातशें निवडून त्यांचा कोष केला, असा अंतर्गत पुरावा आहे. अर्थात् मूळ गाथा सातशेंच असल्या पाहिजेत.

गाथासप्तशतींतील सुभाषितें संकीर्ण स्वरूपाचीं आहेत; वर्गीकरणाच्या कोणत्याही पद्धतीनें त्यांची बांधणी केलेली नाहीं. म्हणून नकला करणारांना किंवा करावेणारांना जणूं संपादकाचे अधिकार मिळाले. या अधिकारांत मुळांतल्या कांहीं गाथा वगळून त्यांचे जागीं त्यांनीं आपल्या, आपल्या आवडीच्या किंवा स्थानिक प्रचारांतल्या गाथांचा आपल्या प्रतींत समावेश केला. वेबरच्या आवृत्तींतील उत्तरार्धांतील अनेक गाथा उत्तरकालीन आहेत आणि त्यांचें अंतर्याम व वृत्तादि बाह्यांगही मुळाहून भिन्न आहे हें सहज दिसून येतें. हस्तलिखितांच्या युगांत ग्रंथाची अधिकृत आवृत्ति उपलब्ध नसतां त्याची लोकप्रियता व प्रसार जितका अधिक तितके पाठ व पाठभेद आणि प्रक्षिप्त भाग अधिक.

साधारणदेवानें ' मुक्तावलि ' या नांवानें संपादित केलेल्या गाथासप्तशतींतील गाथांची मांडणी ' व्रज्या ' पद्धतीनें केलेली आहे. वर्गीकरणाची ही पद्धत उघड उत्तरकालीन आहे. व्रज्या या संज्ञेचें स्पष्टीकरण वज्जालग्गांत दिलेलें आहे :

एकत्थे पत्थावे जत्थ पढिज्जन्ति पउरगाहाओ ।
तं खलु वज्जालग्गं वज्ज त्ति य पद्धई भणिया ॥

व्रज्या (वज्जा: दे. = पद्धई = पद्धति) म्हणजे एकाच विषयावरील वचनांचा संग्रह करण्याची पद्धति. कवींद्रवचनसमुच्चयाच्या प्रस्तावनेंत डॉ. थॉमस सांगतात कीं वज्जा, व्रज्या व वर्ग हे शब्द समानार्थी (Bibliotheca Indica: No.1309. Ed: F. W. Thomas) आहेत. वज्जालग्ग, कवींद्र-वचनसमुच्चय, सुभाषितावली, सूक्तिमुक्तावली वगैरे मध्ययुगीन सुभाषित-संग्रहांची मांडणी याच धर्तीची आहे.

साधारणदेवाच्या मुक्तावलींतील वर्गीकरण येथें देतो. वेबरच्या आवृत्तींतील विखुरलेले संदर्भ शीर्षकाच्या प्रथम अक्षरानुक्रमानें जुळवून हें कोष्टक तयार केलें आहे. क्रमांकाचा मुकाबला माझ्या प्रतीशीं जुळविलेला आहे.

वेबरला उपलब्ध झालेल्या तेलंग प्रतींची मांडणी वज्जापद्धतीचीच आहे; पण मुक्तावलीहून हें वर्गीकरण वेगळें आहे आणि मांडणीची पद्धतही वेगळी आहे. चार पांच विषयांवरील मिळून एकंदर शंभर अशा गाथांचीं सात शतकें या प्रतींत आहेत. इतर प्रतींत न आढळणाऱ्या अशा बऱ्याच गाथा या प्रतींत मिळालेल्या दिलेल्या आहेत. तेलंग -प्रतींची शतकवार मांडणी अशी आहे. (१) जोक्कार (जयकार), णमोक्कार (नमस्कार); सुहासिअ (सुभाषित); अन्नावरस (अन्या-पदेश),मुद्धणववहू (मुग्धा नववधू);होन्तवहुआ (भविष्यत् वधू) (२) इत्थि-आवण्णण (इत्थिआ=स्त्री); सुरआणुराअ (सुरतानुराग). (३) विरहपद्धति. (४) दूईवअण (दूतीवचन); गामीण (ग्रामीण); कुलवहू (कुलवधू). (५) असअणा (असती); अभिसारिआ (अभिसारिका); वेसा (वेश्या); जरई (वृद्धा); करमरी (बन्दिनी). (६) पणअकलहपद्धई (प्रणयकलहपद्धति). (७) खण्डिआ (खण्डिता); पुप्फवई (पुष्पवती); गब्भिणी (गर्भिणी); वाही (व्याधस्त्री); उडुवण्णण (उडुवर्णन).

टीकाः

गाथासप्तशतीवरील अनेक टीका आजवर उपलब्ध झालेल्या आहेत. ऑफ्रेटच्या यादींत पुढील टीकाकारांचीं नांवें नमूद केलेलीं आहेतः (१) कुलनाथ, (२) गंगाधर, (३) पीतांबर, (४) प्रेमराज, (५) भुवनपाल आणि (६) साधारणदेव. पीतांबराच्या टीकेंत पुढील टीकाकारांचा उल्लेख आलेला आहेः (७) कुलपति, (८) चैतन्य, (९) भट्ट, (१०) भट्ट राघव आणि (११) भोजराज.डॉ. रामकृष्ण भांडारकरांनीं (१२) आजड या टीकाकाराचा उल्लेख केलेला आहे (Report on the Search for Sanskrit Manus. cripts during the years 1887-1891. p 26.) पंजाब युनिव्हर्सिटीच्या लायब्ररींत (१३) माधवयज्व मिश्रानें लिहिलेल्या 'तात्पर्यदीपिका' नांवाच्या टीकेचें हस्तलिखित आहे. (*GathaSapta Sati* Jagadish Lal Shastri Intro-p. 15). यांपैकीं गंगाधर व पीतांबर यांच्या टीका मुद्रित झालेल्या आहेत. (१४) पण्डित मथुरानाथ शास्त्री यांची अर्वाचीन टीका निर्णय सागरनें प्रसिद्ध केली आहे. पीतांबर व गंगाधर यांना आणखी कांहीं टीका

उपलब्ध होत्या असें त्यांच्या टीकांतलि उल्लेखांवरून दिसतें; मात्र या टीका-कारांचीं नांवें त्यांनीं दिलेलीं नाहींत; पण 'इति टीकान्तरे' 'इति प्राचीन टीका' असे हवाले दिले आहेत.

गाथासप्तशतीचा टीकाकार कुलनाथ, कुलनाथदेव व कुलबालदेव हे एकच असें त्यांच्या टीकांच्या भिन्न प्रतींवरून दिसतें. या टीकेचें एक हस्तलिखित भांडारकर इन्स्टिटयूटच्या संग्रहीं आहे. [गाथा-कोश No. 386 of 1888-89. New No. 30. गाथासंख्या ७००]. या संग्रहांत श्री भुवनपालाची 'छेकोक्तिविचार-लीला', व श्री. प्रेमराजाची 'साहित्यजन्मावनि' या टीकांच्या त्रुटित प्रती (अनुक्रमें No.245 of 1880-81, गाथासंख्या ६००; No 181 of 1879-80 New No. 35 गाथा संख्या ४४०) आहेत. श्री भुवनपाल हा जैन असावा. कारण सहाव्या शतकावरील टीकेच्या आरंभीं त्यानें जिनाला वंदन केलेलें आहे. आपल्या टीकेंत प्रेमराजानें स्वतःबद्दल माहिती दिली आहे ती अशी : श्री क्षत्रिय श्री सहगिल (सहिगल्ल,सहिगिल) वंशोद्भव श्री प्रयागदासात्मज (प्रियागदासात्मज) श्री प्रेमराज.'

टीकांची संख्या हें मूळ ग्रंथाची लोकप्रियता अजमावण्याचें एक साधन आहे. काव्यप्रकाशावरील ७२ टीकांची यादी महामहोपाध्याय श्री. काणे यांनीं (Sāhitya-Darpaṇa: Index p. clxv–clxvi) दिली आहे. पण काव्यप्रकाश हा ग्रंथ सूत्रमय असून समजण्यास अवघड आहे. गाथासप्तशतीची भाषा सोपी व विषय सुबोध आहेत. म्हणून विद्यार्थ्यांच्या नव्हे, रसिकांच्या आग्रहामुळें किंवा स्वयंस्फूर्तीनें या टीका लिहिण्यांत आल्या असल्या पाहिजेत, हें उघड आहे.

गाथासप्तशतीच्या टीकाकारांत भट्ट गंगाधर हाच विशेष विख्यात व लोकप्रिय आहे. कारण त्याच्याच टीकेच्या अनेक हस्तलिखित प्रती जागोजाग उपलब्ध झालेल्या आहेत. गंगाधराच्या देशकालाबद्दल कांहींही माहिती उपलब्ध नाहीं, एवढेंच पंडित दुर्गाप्रसाद यांनीं आपल्या प्रस्तावनेंत सांगितलें आहे. त्याच्या टीकेवरून त्याच्याबद्दल थोडीफार माहिती मिळूं शकते, ती अशी :

पण्डित दुर्गाप्रसाद यांना जयपुर येथें उपलब्ध झालेल्या 'गाथासप्तशती'वरील गंगाधराच्या टीकेच्या हस्तलिखितावर ' नेत्ररामङ्भूशाके (१६३२) लिखितं ' असा लेखनकाल नमूद आहे. हा आंकडा संवताचा आहे असें मानलें तर या प्रतीचा लेखनकाल १५९५ इ. हा येतो. गंगाधरानें टीकेंत वापरलेल्या ग्रंथांवरून त्यांच्या काळाची वरील मर्यादा ठरवितां येते. अनेकार्थ, अमरकोश, देशी, मेदिनी व हारावली या कोशांचा त्यानें टीकेंत जागोजाग वापर लेलेला आहे. पैकीं मेदिनी हा कोश चवदाव्या शतकाच्या अखेरीस तयार झाला असावा असा डॉ. भांडारकरांचा अंदाज (मालतीमाधवः प्रस्तावनाः१८७६.पृ.१३)आहे. या उल्लेखांवरून निष्कर्ष निघतो कीं गंगाधराचा काल पंधरावें किंवा सोळावें शतक हा असावा. क्र. ४९० या गाथेंत ' झिल्ली ' हा शब्द आलेला आहे. टीकेंत गंगाधर सांगतो : " झिल्ली ' झींगुर ' इति कान्यकुब्जभाषया प्रसिद्धः कीटविशेषः।' यावरून वेबर निष्कर्ष काढतो कीं तो मध्यदेशांतील अगर कनोजचा रहिवासी असावा. (Vorwort. p. xxxiv). तो वैदिक धर्मानुयायी व शैव असावा. दाक्षिणात्यांमध्यें प्रचलित असलेली मातुलकन्या-परिणयाची प्रथा त्याला माहीत नसल्यामुळें वाटतें कीं तो यजुर्वेदी असावा. गाथेचा विषय, प्रसंग, नायक व नायिका यांचा प्रास्ताविक परिचय करून दिल्यानंतर गंगाधर गाथेचा आशय थोडक्या शब्दांत सांगतो, श्लेष असेल तर त्याची फोड सांगतो. त्यानें प्राकृत भाषेचा व व्याकरणाचा चांगला अभ्यास केला होता. त्यानें टीकेंत प्राकृत व्याकरणांतील नियम उध्दृत केले आहेत आणि देशी शब्दांचे अर्थ साधार दिले आहेत; यावरून त्याच्या काळांत वाचकांना प्राकृत व्याकरण अवगत नव्हतें व देशी शब्द प्रचारांत राहिलेले नव्हते असें दिसतें. त्यानें साहित्यशास्त्राचा चांगला अभ्यास केलेला होता. पिङ्गल व मातृगुप्ताचार्य या प्राचीन लेखकांचा आणि काव्यप्रकाश व साहित्यदर्पण या मध्ययुगीन ग्रंथांचा त्यानें उल्लेख केलेला आहे. त्यानें कामशास्त्राचेंहि अध्ययन केलें होतें. रतिरहस्य, कामसूत्र व अनङ्गरंग या ग्रंथांचा त्यानें उल्लेख केलेला आहे. त्यानें टीका लिहिली तेव्हां त्याच्यासमोर गाथासप्तशतीचे अनेक पाठ व टीका होत्या, असें दिसतें. गाथासप्तशतींतील वचनें शृंगारिक आहेत असें गृहीत धरून त्यानें टीका लिहिलेली आहे. तरीहि त्याच्यापूर्वी होऊन गेलेल्या आलंकारिकांच्या

यानानें त्यानें पुष्कळच संयम दाखविला आहे. विद्वानांना व अभ्यासकांसाठीं किंवा सामान्यासाठींसें असें गाथासप्तशतीत कांहीं नसल्यामुळें त्यानें आपली भावलेशप्रकाशिका ही टीका रसिकासाठीं, सुसंस्कृत रसिकांसाठीं लिहिलेली आहे असें तिच्या रंगरूपावरून दिसतें.

(४) गाथासप्तशतीच्या या आवृत्तीची मांडणी व वैशिष्टयें :

वेगवेगळ्या मुद्रित आवृत्तींवरून व लिखित प्रतींवरून अभ्यास करीत असतांना आलेल्या अडचणी आणि महाराष्ट्रांतील अभ्यासकांच्या आणि सर्वसाधारण व रसिक वाचकांच्या अपेक्षा विचारात घेऊन मीं या आवृत्तीची मांडणी थोडी वेगळी केलेली आहे माझ्या मांडणीचा व या आवृत्तीतील वैशिष्टयांचा तपशील येथें सांगतों.

(१) क्रमांकः प्रत्येक गाथेच्या आरंभीं धांवते व अखेरीस शतकांतर्गत क्रमांक दिले आहेत. प्रत्येक पानावर आंतल्या वरच्या कोपऱ्यांत त्या पानावर सुरू होणाऱ्या गाथेचें शतक व शतकांतर्गत क्रमांक दिलेले आहत. हिंदुस्थानांत सर्वत्र काव्यमाला प्रत वापरण्यांत येत असल्यामुळें तींतील अनुक्रम मी स्वीकारलेला आहे. हस्तलिखितांच्या वेगवेगळ्या प्रतींत गाथांचे अनुक्रम वेगवेगळे आहेत. वेबरने त्याच्या मुकाबल्याचीं कोष्टकें दिलीं आहेत. (२) प्राकृत गाथा व त्यांच्या (३) संस्कृत छाया यांचा मुकाबला मी बव्हंशीं गंगाधराशीं ठेवलेला आहे. (४) माझ्या आवृत्तीतील क्र. ७०१ पासून ९९५ पर्यंतच्या गाथा वेबरच्या जर्मन आवृत्तीवरून घेतल्या आहेत वर नमूद केलेल्या कारणामुळें अनुक्रम तोच असला तरी क्रमांक तेच आलेले नाहींत. मुकाबला पहाणाऱ्या वाचकांच्या सोयीसाठीं या गाथांचे अखेरीस वेबरचे क्रमांक इंग्रजीत दिले आहेत. (५) वेबरने कोणत्याही गाथांच्या छाया दिलल्या नाहींत. उत्तरार्धातील गाथांपैकीं ज्यांच्या छाया मला अलंकारवाङ्मयांत उपलब्ध झाल्या त्या मी दिल्या आहेत. (६) क्र. ९९५ ते १००६ या गाथा प्रबन्धचिंतामणीवरून [(१) पुरातन प्रबन्धसंग्रहः सिंघी जैन ग्रंथ माला; २) The Prabandha Chintamani: C H Tawney·Bibliothca Indica,] घेतलेल्या आहेत.

या गाथा हालानें गाथासप्तशतीसाठीं संपादन केल्या असा तेथें उल्लेख आलेला आहे. गाथासप्तशतीच्या कोणत्याही हस्तलिखित अगर मुद्रित प्रतीत या गाथा नाहींत. (७) प्रत्येक गाथेला मी अन्वर्थक संज्ञा दिली आहे. त्यामुळें कांहीं ठिकाणीं टीकेचा संक्षेप करणें शक्य झालें आहे. (८) मराठी संज्ञांसमोर इंग्रजी शीर्षकें दिलीं आहेत. तीं मुख्यत्वेंकरून परदेशी वाचकांसाठीं आहेत. इंग्रजी व मराठी संज्ञा समानार्थी आहेतच असें नाहीं. (९) गाथांचें मराठी भाषांतर शक्य तितकें सोपें केलेलें आहे. मुळांत नसलेला पण समजुतीसाठीं अवश्य असलेला भाग कंसांत घातला आहे. निरुपयोगी अशा एकाही शब्दाची योजना करावयाची नाहीं, अभिप्रेत अर्थ शक्य तितक्या कमी शब्दांत व्यक्त करावयाचा अशा कटाक्षानें गाथांची रचना केलेली असल्यामुळें भाषांतर करणें वेळोवेळीं फार अवघड वाटलें (१०) भाषांतरापुढें वेगळया परिच्छेदांत टीका दिलेली आहे. संस्कृत काव्यांवरील टीकाकार अन्वयार्थ सांगतात. मीं या पध्दतीचा स्वीकार केलेला नाहीं. गंगाधराची टीका त्रोटक आहे आणि पंडित मथुरानाथ शास्त्री यांची अति विस्तृत. गाथासप्तशतींतील सर्वच गाथा शृंगारिक आहेत असें गृहीत धरून त्यांचा तसा अर्थ लावण्यासाठीं टीकाकारांनीं व गाथा उध्दृत करणाऱ्या साहित्यशास्त्रकारांनीं जणूं परस्परांशीं स्पर्धा मांडलेली आहे. उलटपक्षीं प्रत्येक गाथेंत कांहीं गंभीर नीतितत्त्व आहे असें गृहीत धरून पीतांबरानें टीका लिहिली आहे. माझी टीका अशी एकांगी नाहीं; आधुनिक पद्धतीनें लिहिलेली आहे; संयमानें लिहिलेली आहे. गाथासप्तशतीवरील संस्कृत टीका वाचल्या असतील त्यांनाच माझ्या संयमाची प्रचीति जागोजाग येईल मी शृंगाराचा परिपोष उत्तानांत होऊ दिलेला नाहीं. तरीही कांही प्रतिष्ठित मजवर सभ्यतेच्या मर्यादा ओलांडल्याचा आरोप करताल. या संयमामुळें कांहीं रसिकांचा अपेक्षाभंग होईल हें मी जाणून आहे (११) माझ्या टीकेंत मी सर्व उपलब्ध टीकांचा उपयोग केलेला आहे. (१२) प्रत्येक गाथेचे मला महत्त्वाचे वाटले तेवढेच पाठभेद पादटीपांत नमूद केले आहेत. कितीही क्षुल्लक असला तरी प्रत्येक पाठभेद साधार नमूद करावयाचाच, ही आधुनिक संशोधकांची पद्धत मी स्वीकारिली नाहीं. सामान्य वाचकांना व अभ्यासू वाचकानाही त्यांचा फारसा उपयोग होत नाहीं. ग्रंथारंभीं (१३) विस्तृत व विवेचक उपोध्दात दिलेला

आहे आणि अखेरीस अनेक परिशिष्टें जोडलेली आहेत. पैकीं (१४) गाथांच्या आरंभाची अकारानुक्रमें अनुक्रमणिका (१५) अलंकारांचें कोष्टक, (१६) कवि-कवयित्री यांची नामसूचि आणि (१७) शब्दकोश हीं विशेष महत्त्वाचीं आहेत. गाथेच्या आरंभींच पाठभेद असला तर तोही वेबरनें आपल्या अनुक्रमणिकेंत नमूद केला आहे. ही पध्दत मुख्यत्वेंकरून हस्तलिखितांचा अभ्यास करणारांना व अन्य ग्रंथातील संदर्भांचा पडताळा पाहणारांनाच सोयीची आहे ती मीं स्वीकारली नाहीं. मीं वापरलेल्या मुद्रित व हस्तलिखित प्रतींत मिळालीं तेवढीं लेखक-लेखिकांचीं सर्व नांवें मी परिशिष्टांत दिलेलीं आहेत. पीतांबर व भुवनपाल यांनीं नमूद केलेलीं नांवें कोठें जुळतात, कोठें जुळत नाहींत. आज नाहीं उद्यां, कोणाला तरी त्यांचा उपयोग होणें शक्य आहे अशी खात्री झाली, म्हणूनच हे कोष्टक तयार केले आहे. अलंकारांच्या व्याख्या तेवढ्या टीकेंत दिल्या आहेत. विस्तार टाळण्यासाठीं अधिक विवेचन केलेलें नाहीं. कोणी कोणती गाथा कोणत्या अलंकाराचें उदाहरण म्हणून उदाहृत केलेली आहे याचा तपशील कोष्टकांत दिलेला आहे. गाथासप्तशतींत आलेल्या प्रत्येक शब्दाची सूचि वेबरनें संदर्भासह दिलेली आहे; बऱ्याच शब्दांचे अर्थ दिलेले नाहीत. सर्व देशी व निवडक प्राकृत असे शब्द त्यांच्या अर्थासह मी माझ्या शब्दकोशांत दिलेले आहेत. विस्तार टाळण्यासाठीं सर्व संदर्भ मात्र दिलेले नाहींत. मराठींतील प्रचलित शब्द व वाक्प्रचार यांशीं यांपैकीं कांहींचा संबंध मीं जुळविलेला आहे. मी प्राकृत भाषेचा व व्युत्पत्तिशास्त्राचा सशास्त्र अभ्यास केलेला नाहीं. यामुळें कांहीं प्रमाद अजाणतेपण झालेले असण्याचा संभव आहे.

देवानें दिली तेवढी बुद्धि दैवानें दिल्या तेवढ्या वेळांत केंद्रित करून, शक्य तेवढे परिश्रम करून, माझ्या मतें शक्य तितकी सर्वांगपरिपूर्ण अशी ही गाथा-सप्तशतीची मराठी आवृत्ती मी आज महाराष्ट्र-सरस्वतीच्या चरणीं ठेवीत आहे. यांतील वैगुण्यें कोणी निदर्शनास आणल्यास तीं दूर करण्यास आणि कोणी आणखी एखादी दिशा दाखविल्यास आणखी परिश्रम करण्यास मी राजी आहे. गाथासप्तशती अमृतमधुर आहे. ही प्राकृत माधुरी मराठीच्या नगरीं वाहून आणणाऱ्या पाणक्याचें श्रेय मिळालें तरी तेवढें मला पुरें आहे. या ग्रंथाच्या वाचनानें महाराष्ट्रांत सातवाहन या महाराष्ट्राच्या आद्य महा-वंशाच्या इतिहासाबद्दल अंधुकशीही जिज्ञासा व अभिमान उत्पन्न झाला तर माझे दुबळे हात गगनाला पोंचले असें समाधान मला होईल.

(५) प्राकृत भाषा व सारस्वत :

प्राकृत भाषांची उत्क्रांति :

गाथासप्तशती महाराष्ट्री प्राकृतांत गाथावृत्तांत रचलेली आहे.

प्राकृत भाषा अनेक आहेत; देशकालपरत्वें आणि जातिधर्मपरत्वें. प्राकृत भाषा संस्कृतोद्भव आहेत असें मानण्याकडे आधुनिक संशोधकांचा कल आहे. संशोधक सांगतात, प्राकृत ही संज्ञा प्रकृति किंवा प्रकट या संस्कृत शब्दापासून सिद्ध झालेली आहे. प्रकृति म्हणजे मूल कारण, मूल धर्म, मूल स्थिति, मूल स्वभाव, मूल स्वरूप. रुद्रटाच्या (इ. स. ८०० ते ८५०) काव्यालंकाराचा टीकाकार नमिसाधु (लेखनकाल इ.स. १०६८) सांगतो : (काव्यालंकार : निर्णयसागरः पृ. १३) " प्रकृतेति । सकलजगज्जन्तूनां व्याकरणादिभिरनाहितसंस्कारः सहजो वचन-व्यापारः प्रकृतिः । तत्र भवं सैव वा प्राकृतम् । " प्राकृत म्हणजे संस्कृतच्या संस्कारांपासून व व्याकरणाच्या नियंत्रणापासून अलिप्त अशी सामान्य जनतेची स्वभावसिद्ध बोलभाषा. उलटपक्षीं संस्कृत ही आर्यांची, शिष्टांची, सुसंस्कृतांची पण्डितांची, देवांची, व्याकरणाच्या नियमानीं बांधलेली भाषा. प्रकृति या शब्दाच्या प्रजा या अर्थावरून (उदा : राजा प्रकृतिरञ्जनात्‌ प्राकृत म्हणजे प्रजेची भाषा असा अर्थ लावण्यांत आलेला आहे. उलटपक्षीं संस्कृत ही राज्यकर्त्यांची, राजदरबारची, यज्ञशाळेची, मंत्राची भाषा. यावरून या दोन्ही भाषा एकाच काळीं प्रचलित असल्या पाहिजेत असें अनुमान निघतें. प्राकृतसंजीवनींत सांगितलें आहे, " प्राकृतस्य तु सर्वमेव संस्कृतं योनिः । ' उलटपक्षीं डॉ. गुणे सांगतात (An Introduction to Comparative Philology: p. 161) कीं संस्कृत व प्राकृत यांचीं कुळें वेगळीं आहेत. भिन्न मूलत्वाचा सिद्धान्त टिकण्यासारखा नाहीं. दोन्ही भाषांवर एतद्देशीय अन्य भाषांचे संस्कार झालेले आहेत. संस्कृत शब्दांचीं प्राकृत रूपें कशीं करावीत हेच प्राकृत व्याकरणकार मुख्यत्वेंकरून शिकवितात; जनव्यवहाराच्या ओघांत अपभ्रंश कसे होतात त्याचें विवेचन करीत नाहींत (Gaüḍavaho : Shri S P Pandit : Introduction : p. lvi) श्री. राजारामशास्त्री भागवत (संस्कृत व प्राकृत : पृ. १५-६) सांगतात, " प्रकृति हा शब्द संस्कृत

भाषेचा वाचक नाही" त्यांच्या मतें "प्राकृत हा शब्द संस्कृतांत जें कांहीं ग्रंथांमध्यें व दिवाटींतलें असेल त्यास लावतात. प्राकृतांत प्राकृत हा शब्द पाअड असा लिहितात. या शब्दाचें प्रकट असें संस्कृतांत भाषांतर होतें. त्या अर्थी पाअडभाषा म्हणजे प्रकट अर्थात ज्या गूढ व सुबोध केलेल्या नव्हेत त्या भाषा असा मूळचा अर्थ असावा."

वररुचि हा प्राकृत भाषांचा आद्य व्याकरणकार. त्याच्या काळाबद्दल वाद आहे. तो पाणिनीचा समकालीन असणें अशक्य नाही (डॉ केतकर : प्राचीन महाराष्ट्र, पृ ३१४) महाराष्ट्री, पैशाची, शौरसेनी व मागधी या चार प्राकृत भाषांचा त्यानें प्राकृतप्रकाश व्याकरणांत विचार केलेला आहे. खि. पू. तिसऱ्या शतकापासून खिस्तोत्तर अकराव्या शतकाच्या अखेरीपर्यंतचें बौद्धांचें धार्मिक व लौकिक साहित्य पाली या प्राकृत भाषेत रचलेलें आहे. श्वेतांबर जैनांचें धार्मिक साहित्य अर्धमागधींत आहे व लौकिक साहित्य जैन-महाराष्ट्रींत आहे. महाराष्ट्रीच्या या पोटभेदाला ही संज्ञा श्री जेकोबी यांनीं हेमचंद्राच्या वचनाच्या अनुरोधानें दिलेली आहे हेमचंद्र सांगतो : अकृत्रिमस्वादुपदां परमार्थाभि धायिनीम्। सर्वभाषापरिणतां जैनीं वाचमुपास्महे ॥ (काव्यानुशासनः १-१). परंपरा सांगते कीं चंद्रगुप्त मौर्याचे काळांत मगध देशांत पडलेल्या दीर्घकालीन दुष्काळांत जैनांचा एक जथा जीवधारणार्थ थेर भद्रबाहूच्या नेतृत्वाखालीं दक्षिणेंत स्थायिक झाला होता; त्यांच्या येथील वास्तव्यांत त्यांच्या भाषेवर महाराष्ट्री प्राकृताचे संस्कार झाले आणि मगधांत परततांना त्यांनीं ते बरोबर नेले; यामुळे हा पोटभेद निर्माण झाला. भद्रबाहूच्या शिष्यांनीं धर्मप्रसारार्थ हिंदुस्थानांत सर्वत्र संचार केला आणि त्यांच्याबरोबर महाराष्ट्रीचा सर्वत्र प्रसार झाला.

संस्कृत ही अल्पसंख्य आर्यांची भाषा. ती बहुजनसमाजाची भाषा कधींही नव्हती; एवढेंच नव्हे, धार्मिक कृत्यांसाठीं संस्कृतचा उपयोग करणाऱ्या आर्यांचें घरगुती सामान्य व्यवहार प्राकृतांतूनच होत असत, असें अनुमान करण्यास जागा आहे. तसें नसतें तर यज्ञदीक्षा पुरी होईपर्यंत प्राकृत बोलतां कामा नये असा दण्डक सूत्रकारांनीं घातला नसता आर्यसंस्कृति ही मुख्यत्वेंकरून संस्कृतज्ञ ब्राह्मणक्षत्रियांची संस्कृति. आर्यांच्या वसाहतींबरोबर आर्यसंस्कृतीचा

सर्वत्र फैलाव झाला असें सांगण्यांत येतें. हें विधान मर्यादित स्वरूपातच स्वीकारलें पाहिजे. वसाहतींमुळें आर्यसंस्कृतीचीं केंद्रें जागोजाग प्रस्थापित झालीं आणि भोंवतालच्या आर्येतरांवर आर्य संस्कृतीचे अस्पष्ट संस्कार झाले, हें व एवढेंच खरें परिस्थितीच्या अनुरोधानें आर्यांनीं समाजधारणेचे सिद्धान्त उत्क्रान्त केले आणि आर्येतरांवर आपल्या संस्कृतीचे संस्कार करून त्यांना भारतीय संघटनेंत समाविष्ट करून घेण्याचा हेतुपुरःसर प्रयत्न केला, हेंही खरें. अल्पसंख्य प्राचीन आर्यांनीं योजिलेला भारताच्या आर्यीकरणाचा प्रयत्न यशस्वी झाला नाहीं. संस्कृत भाषेच्या अज्ञानामुळें आणि वन्य संस्कृतीच्या प्रादुर्भावामुळें बहुसंख्य आर्येतरांना आर्यांच्या धर्मकृत्याचा व तत्वज्ञानाचा अर्थबोध झाला नाहीं; यामुळें त्यांच्या प्रभुत्वाला मान्यता देणाऱ्या प्रजेमध्येंही आर्यसंस्कृतीबद्दल औदासीन्य होतें. शिवाय बहुजनसमाजापासून धुरीणत्वाच्या आविर्भावानें, पण वस्तुतः उच्चवर्णत्वाच्या अभिनिवेशानें शक्य तावर अलग व आलिप्त राहण्याच्या आर्यांच्या वृत्तीमुळें विषादही होता. वृषल क्षत्रियांच्या उठावणीमुळें ब्राह्मण-क्षत्रियांची पुरातन पुरोहित व राजघराणीं कोलमडूं लागलीं व आर्यांचा दरारा ओसरूं लागला, तसतशी या औदासीन्यावर व विषादावर वैमनस्याची छटा येऊं लागली आर्य संस्कृतीचा तोंवर फारसा फैलाव झाला नव्हता अशा मगध देशांत महावीर व गौतम यांनीं जैन व बौद्ध धर्मांची स्थापना केली. या धर्मांच्या तत्वांमध्यें एवढें साम्य आहे कीं तीं कोणीं कोणापासून उचललीं याबद्दल अनुमान करणें अशक्य आहे आर्यांना तत्त्वतः अगम्य अगर अज्ञात असें या नव्या धर्मांत कांहींही नव्हतें. बहुजनसमाजाला आकलनीय अशा सनातन तत्त्वांचें गौरवपूर्ण गुरूधारण होतें, त्याला ज्याबद्दल आत्मीयता नव्हती, विस्मय विशाद होता, अशा कांहीं वैदिक विधींच्या शांप्रेचाटणाचा उपहासपूर्व प्रेरणा होती. शिवाय हे धर्म जन्मजात उच्चनीच भावापासून अलिप्त होते आणि प्राकृतांतून प्रेरित होते, म्हणून ते बहुजनसमाजांत त्वरेनें प्रसृत झाले. या धर्मांची व प्रचारकांची प्रशान्त सत्ता व संपत्ति यांच्या केंद्रीकरणाला पोषक असल्यामुळें नवक्षत्रिय राजांनीं व नवोदित वैश्यांना त्यांचा स्वीकार केला बौद्ध व जैन धर्मांच्या आक्रमक प्रसारामुळें वैदिक धर्म :आणि संस्कृत संस्कृति कांहीं काळपर्यंत स्तिमित झाली.

राजाश्रयाला चटावलेल्या या धर्मांच्या प्रवर्तकांनीं राजकीय पारतंत्र्याचाही पुरस्कार चालविलेला पाहून खवळलेल्या ब्राह्मणक्षत्रियांनीं खि. पू. दुसऱ्या-शतकांत पतंजलीच्या प्रेरणेनें संघटित होऊन पुष्यमित्र शुंग व पहिला सातकर्णी सातवाहन यांच्या नेतृत्वाखालीं धर्मानें बौद्ध पण जातीनें भारताला परकीय अशा यवनराज मीनँडर विरुद्ध उठावणी केली व यवन सत्तेचा उच्छेद केला. भारताचें हें पुनरुत्थान जेवढें राजकीय तेवढेंच धार्मिक व सांस्कृतिकही होतें. खि. पू. पहिल्या शतकांत दुसऱ्या सातकर्णीनें मालवगणांच्या सहकार्यानें माळव्यांत जैनांनीं आवाहन करून आणलेल्या शकांचा उच्छेद केला. खिस्तोत्तर पहिल्या शतकांत गोतमीपुत्र सातकर्णीनें महाराष्ट्रांत व सौराष्ट्रांत क्षहरातांचा उच्छेद केला. या महत्कृत्यांच्या मानानें चंद्रगुप्त विक्रमादित्यानें चवथ्या शतकाच्या अखेरीस केलेलें सौराष्ट्र क्षत्रपांचें उच्चाटण दुय्यम दर्जाचें वाटतें. या काळांत सातवाहनांनीं महाराष्ट्रांत महाराष्ट्री प्राकृताचा पुरस्कार केला, या भाषेच्या मातृभूमीला महाराष्ट्र हें अभिधान यथार्थ ठरेल असें कर्तृत्व केलें.

सुमारें साडे पांचशें वर्षांच्या या काळांत ब्राह्मण क्षत्रियांनीं आर्य संस्कृतीच्या पुनरुज्जीवनार्थ व अभ्युदयार्थ अनेक उपायांचा अवलंब केला. बहुजनसमाजाला आकलनीय असा भागवत धर्म त्यांनीं उत्क्रांत केला. बेसनगर येथील हेलिओ-डोरसचा स्तंभलेख आणि नाणेघाटांतील राणी नायनिकेचा लेख याला साक्ष आहेत. हिंदुस्थानच्या वायव्य सरहद्दीवर हिंदी-यवनांचीं राज्यें होतीं. हे लोक मूळचे मूर्तिपूजक. या भागांत स्थायिक झाल्यावर त्यांनीं बौद्ध मूर्ति निर्माण केल्या व कुषाणांनीं त्यांच्या व गांधारांतील मूर्तींच्या प्रतिकृति आर्यावर्तांत आणल्या. महायानाच्या जोडीनें वैदिकांनींही या काळांत अनेक सगुण देवदेवता मूर्ति व माहात्म्यें यांसह निर्माण केल्या. प्रचारामुळें भ्रष्ट व दुष्काळामुळें उध्वस्त झालेल्या धर्मवचनांचें बौद्धांनीं व जैनांनीं परिषदा भरवून शुद्धीकरण केलें. वैदिकांनींही या काळांत आपल्या स्मृतींचें व इतिहासपुराणांचें संशोधन व संपादन केलें. त्यांनीं संस्कृत भाषेला राजाश्रय मिळविला. परदेशांत स्वतःचें आसन स्थिर करण्यासाठीं हरप्रयत्न करण्यास सज्ज असलेले अल्पसंख्य परकीय लोक एतद्देशीय सुसंस्कृतांचा पाठिंबा मिळविण्यास उत्सुक असतात. या न्यायानें

प्रथम सौराष्ट्र क्षत्रपांनीं संस्कृत भाषेला राजाश्रय दिला. पुढें तर संस्कृत भाषेचा पुरस्कार हें अभिजात्याचें लक्षण मानण्यांत येऊं लागलें. चंद्रगुप्त विक्रमादित्याच्या कारकीर्दीत उज्जयिनींत संस्कृत भाषेला लोकभाषेचें स्वरूप प्राप्त झालें. भोजदेव सरस्वतीकण्ठाभरणः २.१५) विचारतो: काले श्री साहसाङ्कस्य के न संस्कृतवादिनः ? राजदरबारीं व रसिकांकडून मिळालेल्या प्रोत्साहनामुळें भासाच्या काळांतली स्मितवती संस्कृत भाषा कालिदासाच्या काळांत विलासवती झाली.

वैदिक संस्कृतीच्या पुनरुत्थापकांनीं प्रारंभीं संस्कृतच्या जोडीनें प्राकृतांचा-ही पुरस्कार केलेला दिसतो. शकांचा उच्छेद करणाऱ्या मालवांच्या नाण्यांवरील लेख संस्कृतांत आहेत आणि वैदिक धर्मानुयायी सातवाहनांचे शिलालेख प्राकृतांत आहेत. सातवाहनांनीं संस्कृत भाषेचा पुरस्कार कधींच केलेला दिसत नाहीं. त्यांच्या संस्कृत भाषेच्या अज्ञानाबद्दल (मोदकं देहि राजन्, मोदकैः परिताडय माम् ।), प्राकृत भाषेच्या पुरस्काराबद्दल (श्रूयते च कुन्तलेषु सातवाहनो नाम राजा; तेन प्राकृतभाषात्मकमन्तःपुरं एवेति समानं पूर्वेण । राजशेखर : काव्यमीमांसा), त्यांच्या संकरज उत्पत्तीबद्दल आणि रांगड्या रीतरिवाजांबद्दल (कर्तर्या कुन्तलः शातकर्णिः महादेवीं मलयवतीं जघान । वात्स्यायन : कामसूत्र) अनेकांनीं त्यांचा उपहास केलेला आहे. सातवाहनांनीं महाराष्ट्री प्राकृताचा पुरस्कार केला म्हणूनच हालावर प्राकृत सरस्वती प्रसन्न झाली. निसर्गच कोपला तर सातवाहनांची शिल्पकृत्यें कोलमडतील व त्यांत कोरलेले त्यांचे शिलालेख नष्ट होतील. तरीही त्यांची उज्जल कीर्ति गाथासप्तशतीच्या अजरामर रूपांत चिरंजीव राहील हें मात्र निश्चित.

महाराष्ट्री प्राकृताचें मूलस्थान कोणतें, या विषयीं संशोधकांचें एकमत नाहीं. मागधी व अर्धमागधी या मगधाच्या भाषा आणि शौरसेनी ही शूरसेनांची, इत्यादि समीकरणें त्यांना मान्य आहेत; पण महाराष्ट्री ही महाराष्ट्राची भाषा हें मात्र त्यांना कबूल नाहीं. कोणी सांगतात, प्राकृत भाषांना जीं तीं नांवें प्राप्त झालीं तेव्हां महाराष्ट्र या नांवाचा देशच उत्कात झालेला नव्हता, कोणी सांगतात, त्या काळीं महाराष्ट्र हें नांव धारण करणारे लोकच अस्तित्वांत नव्हते; कोणी सांगतात हिंदुस्थानांतील सर्व देशांत या भाषेंत लेखन झालेलें असल्यामुळें तिचा संबंध विशिष्ट प्रदेशाशीं जोडतां येत नाहीं.

कोणी सांगताल, वररुचीच्या प्राकृत व्याकरणांतील महाराष्ट्री ही संज्ञाच प्रक्षिप्त आहे. सारेंच विलक्षण! आरंभीं सर्वच प्राकृत भाषा त्या त्या प्रदेशांतील रहिवाशांच्या बोलभाषा होत्या. वैयाकरणांनीं व साहित्यिकांनीं त्यांचें बाह्यांग व अंतरंग निर्मळ व उज्ज्वल केलें. जैनांच्या धर्मप्रसाराच्या व सातवाहनांच्या सत्तेच्या साहचर्यांत महाराष्ट्रीचा हिंदुस्थानभर प्रसार झाला. हाल सातवाहनाची सत्तसई व जयवल्लभाचा वज्जालग्ग हे सुभाषित-कोश, आणि प्रवरसेन वाकाटकाचे रावणवहो व वाक्पतिराजाचें गउडवहो हीं महाकाव्यें, हे महाराष्ट्री प्राकृतांतील मुख्य ग्रंथ होत. पैकीं सत्तसई व रावणहो हे ग्रंथ निःसंशय महाराष्ट्रांत निर्माण झालेले आहेत. महाराष्ट्री प्राकृतांत उत्कृष्ट व अफाट वाङ्मय असलें पाहिजे असे या ग्रंथांवरून अनुमान करतां येतें. म्हणूनच संस्कृत साहित्यशास्त्रकारांनी व आलंकारिकांनीं महाराष्ट्रीला प्राकृत भाषांमध्यें अग्रस्थान दिलें. महाकवि दण्डी काव्यादर्शांत (१·३४) सांगतो: "महाराष्ट्राश्रयां भाषां प्रकृष्टं प्राकृतं विदुः।" म्हणूनच महाराष्ट्री प्राकृत हा महाराष्ट्रीयांचा एक अभिमानविषय आहे. मूलतः ही भाषा महाराष्ट्राचीच, हें निःसंशय शिवाय प्रचलित मराठीशीं महाराष्ट्रीचें निकटचें नातें व साम्य आहे हें अनेक उदाहरणांवरून व व्युत्पत्तीवरून सिद्ध करून (श्री घाटगे: Mahārāṣṭrī Language & Literature: Journal of the University of Bombay Vol. IV Part VI.: p. 31) दाखविण्यांत आलेलें आहे.

प्राकृत भाषा :

प्राकृतांत प्रचलित असलेल्या शब्दांचे तीन वर्ग पडतात: तत्सम; तद्भव व देशी. संस्कृत शब्द जसेच्या तसे प्राकृतांत घेतले जातात, ते तत्सम; उदा० अञ्जलि, सुंदर. वर्णलोप, वर्णागम किंवा वर्णपरिवर्तन यांहीं सिद्ध झालेले ते तद्भव; उदा० आर्य=आरिअ, ईर्ष्या=ईसा. आरंभीं संस्कृतशीं ज्यांचा तिळमात्र संबंध नसलेले आणि बहुजनसमाजाच्या वापरांतले ते देशी; उदा० तुप्प=घृत, भुंड=शूकर. प्राकृतांत प्रचारांत असलेले तत्सम शब्द पाहिले असतां ते मूलतः मृदु आहेत असें दिसून येतें. तद्भव शब्द सिद्ध करतांना मृदूच्या कठोर वर्णांना नरम

स्वरूप देण्यांत येतें. देशी शब्द साधारणतः कठोरवर्णविरहित व जोडाक्षर-रहित असतात. सुलभोच्चारप्रवणतेमुळें कोणाला प्राकृत भाषा मधुर वाटते तर कोणाला (श्री. चिंतामणराव वैद्य) ती पुळुळीत वाटते. 'भिन्नरुचिर्हि लोकाः' हेंच खरें.

प्राकृत वाङ्मयांत देशी शब्द जागोजाग आढळतात; कारण हें वाङ्मय बहुंशीं बहुजनसमाजाचें किंवा बहुजनसमाजासाठीं निर्माण केलेलें आहे. प्राकृतांत देशी शब्द कधीं स्वाभाविकपणें आलेले असतात, तर कोठें प्राचीनत्वाचा आभास अगर प्रादेशिकत्वाचा आविर्भाव निर्माण करण्यासाठीं त्याची योजना कृत्रिमपणें केलेली असते. देशी शब्दांची विपुलता हें प्राकृताच्या प्राचीनत्वाचें एक लक्षण आहे. प्राकृतावर संस्कृतची छाप पडूं लागली तसतशी त्यांत विविध प्रकारची कृत्रिमता येऊं लागली. जयवल्लभानें वज्जालग्गांत उध्दृत केलेली गाथा पहा :

देसियसद्दपलोट्टं महुरक्खरछन्दसंठियं ललियं ।
फुडवियडपायडत्थं पाइअकव्वं पढेयव्वं ।।२८।।
[देशीशब्दपर्यस्तं मधुराक्षरच्छन्दः संस्थितं ललितं ।
स्फुटविकटप्रकटार्थं प्राकृतकाव्यं पठनीयं ।।]

" प्राकृत काव्यांत देशी व मधुर शब्द पुष्कळ असतात. त्यांचा छंद गोड असतो व अर्थ स्पष्ट असतो. असें हें प्राकृत काव्य प्रत्येकानें वाचावें. "

संस्कृत शब्दांना प्राकृत रूप मिळतें तेव्हां त्यांना मार्दव व माधुर्य प्राप्त होतें. देशी शब्दांमुळें प्राकृतांत जिव्हाळा येतो. या लाडिकपणामुळें प्राकृत भाषेवर संस्कृत पंडितही लुब्ध झालेले आहेत. संस्कृत व प्राकृत भाषांची तुलना करतांना राजशेखर कर्पूरमंजिरींत (निर्णयसागरः १·८) सांगतो :

परुसा सक्कअबधा पाउअबंधो वि होइ सउमारो ।
पुरिसमहिलाणं जेत्तिअमिहंतरं तेत्तिअमिमाणं ।।
[पुरुषाः संस्कृतगुंफाः प्राकृतगुंफोऽपि भवति सुकुमारः ।
पुरुषमहिलानां यावदिहान्तरं तेषु तावत् ।।]

"संस्कृत कठोर व प्राकृत सुकुमार; राकट पुरुष व नाजूक स्त्री यांमध्यें आहे तेवढें अंतर संस्कृत व प्राकृत यांमध्यें आहे."

गउडवहो या महाकाव्यांतलि वाक्पतिराजाचे प्राकृत भाषेच्या गुणांबद्दलचे उद्‌गार (१ : ९२-९४) उध्दृत करण्याजोगे आहेत :

णवमत्थ-दंसणं संनिवेस-सिसिराओ बन्ध-रिद्धीओ ।
अविरलमिणमो आ भुवन-बन्धमिह णवर पययम्मी ॥
सयलाओ इमं वाया विसन्ति एत्तो य णेन्ति वायाओ ।
एन्ति समुद्दंचिय णेन्ति सायराओच्चिय जलाइं ॥
हरिस विसेसो वियसावओ य मउलावओ य अच्छीण ।
इह बहि-हुजो अन्तो-मुहो य हिययस्स विप्फुरइ ॥

'अभिनव आशय, समृद्ध रचना आणि मृदु शब्दमाधुर्य या बाबतींत प्राकृत सर्व भाषांत श्रेष्ठ आहे. जल हें सागरापासून निर्माण होतें व तें सागरांतच विलीन होतें. त्या प्रमाणें सर्व भाषा प्राकृतांतून निर्माण होतात व प्राकृतांतच विलीन होतात. प्राकृतापासून अंतःकरणाला अनिर्वचनीय आनंद होतो; आनंदानें नेत्र विकसित होतात व तृप्तीनें मुकुलित ही होतात. "

प्राकृत सारस्वत :

प्राकृत साहित्याचा विस्तार अफाट व अथांग आहे; धार्मिक व लौकिकही. पैकीं बौद्धांचें बरेंच वाङ्मय प्रसिद्ध झालेलें आहे; जैनांचें अलीकडेच मोठ्या प्रमाणावर प्रसिद्ध होऊं लागलें आहे. बौद्धांच्या व जैनांच्या देशी व परदेशी देवस्थानांत अद्याप अनेक अज्ञात ग्रंथ आहेत. हें वाङ्मय प्रसिद्ध होईल तेव्हां हिंदुस्थानच्या इतिहासांतील अनेक समस्या उलगडतील असा भरंवसा वाटतो. बौद्ध धर्म नष्टप्राय झाल्यानंतर प्राकृत भाषेचें व वाङ्मयाचें संरक्षण व संवर्धन करण्याचें श्रेय मुख्यत्वेंकरून जैनांचें, यांत संशय नाहीं.

गाथासप्तशती, हरिविजय, दहमुहवहो, गउडवहो व लीलावई हे लौकिक प्राकृत साहित्यांतले मुख्य काव्य व कोश ग्रंथ होत. आख्यानें व माहात्म्यें आणि स्फुट कविता व कथानकें यांची तर गणतीच नाहीं. धार्मिक प्राकृत

साहित्याचें संवर्धन बौद्धांनीं व जैनांनीं केलें; त्याचप्रमाणें लौकिक प्राकृत साहित्याचा पुरस्कार आंध्र सातवाहनांनीं केला त्यांच्या प्राकृत पुरस्कार-विषयीच्या अनेक दंतकथा काव्यमीमांसा, सरस्वतीकण्ठाभरण, बृहत्कथा वगैरे ग्रंथांत नमूद आहेत. जैनांच्या धर्मप्रचारामुळें आणि सातवाहनांच्या साम्राज्य-विस्तारामुळें महाराष्ट्री प्राकृताचा देशभर प्रसार झाला महाराष्ट्री प्राकृताच्या लोकप्रियतेमुळें व महाराष्ट्री प्राकृतांतल्या लोकसाहित्याच्या उच्च दर्जामुळें संस्कृत नाटकांतही महाराष्ट्रीला उत्तरोत्तर वाढत्या प्रमाणांत स्थान मिळूं लागलें. गाण्यांसाठीं प्राकृताची योजना, हा प्रघात तिसऱ्या शतकाच्या सुमारास सुरू झाला असावा असें जेकोबीचें मत आहे. महाराष्ट्री प्राकृताचा समावेश हें संस्कृत नाटकांच्या कालनिश्चितीचें एक साधन मानण्यात येतें. मूळ नाटकें प्राचीन व त्यांत प्राकृत गाण्यांचा समावेश प्रक्षिप्त व उत्तरकालीन, असेंही असण्याचा संभव आहे मृच्छकटिकांत प्राकृत गाणीं पुष्कळ आहेत; त्यांतलीं फार थोडीं महाराष्ट्री प्राकृतांतलीं असून बहुसंख्य मागधी व शौरसेनी प्राकृतांत आहेत; मात्र कालिदासाच्या नाटकातलीं बहुसंख्य प्राकृत गाणीं महाराष्ट्रींत आहेत.

गाथासप्तशती हा कोश हाल सातवाहनाचा, पहिल्या शतकाच्या प्रथमार्धांतला आणि सेतुबंध हें महाकाव्य प्रवरसेन (II) वाकाटकाचें, पांचव्या शतकाच्या प्रथमार्धांतलें, हें आतां बहुतेक संशोधकांना मान्य झालेलें आहे. गाथासप्त-शतीची भाषा महाराष्ट्री असून गाथांत असे अनेक देशी शब्द आलेले आहेत कीं जे मुख्यत्वेंकरून महाराष्ट्रांत व प्रचलित मराठीत आढळतात. या दोन ग्रंथांच्या भाषेची तुलना केली असतां (पहा : श्री. घाटगे : पूर्वोक्त : p 58) दिसून येतें कीं गाथासप्तशतीपेक्षां सेतुबंधात (१) तत्सम शब्दांपेक्षां तद्भव शब्द अधिक आहेत, (२) देशी शब्द कमी आहेत, (३) शब्दचमत्कृति व (४) दीर्घसमास यांचा विशेष प्रादुर्भाव आहे, (५) उपमा व उत्प्रेक्षा श्लेषावर आधारलेल्या आहेत; आणि (६) यमकें व (७) अनुप्रास साधण्याविषयीं लेखक विशेष दक्ष आहे

या वैशिष्ट्यांवरून निष्कर्ष निघतो कीं या दोन ग्रंथांच्या निर्मितीच्या दरम्यानच्या काळांत प्राकृत भाषा व सारस्वत यांवर सुसंस्कृत आलंकारिक, पण्डित, साहित्यिक व वैयाकरण यांच्या उद्योगामुळें अनेक संस्कार झाले असले

पाहिजेत. साहित्यशास्त्रावरील संस्कृत ग्रंथांत प्राकृत गीतांची अनेक उदाहरणें उध्दृत केलेलीं आहेत यावरून निष्कर्ष निघतो कीं या काळांत संस्कृतप्रमाणेंच प्राकृत भाषा हाही विद्यार्थ्यांच्या अध्ययनाचा व पण्डिताच्या अध्यापनाचा विषय झालेला असावा. यामुळें महाराष्ट्री प्राकृताचा भाषिक दर्जा सुधारला, हें खरें; पण यामुळें ही प्राकृत भाषा बहुजनसमाजाच्या बोलभाषेपासून दूर दूर गेली, हेही तितकेंच खरें. बोलभाषांच्या उपेक्षेच्या काळांत व्यावहारिक अपभ्रंशाच्या संस्कारामुळें मध्ययुगांत प्रादेशिक भाषा उत्क्रांत झाल्या. अकराव्या शतकाच्या सुरवातीस इस्लामी आक्रमणें सुरू झालीं व या वावटळींत एतद्देशीय राज्यें एकामागून एक कोलमडलीं. यामुळं पण्डितांचा व साहित्यिकांचा राजाश्रय तुटला आणि संस्कृतिप्रेषणाची परंपरा खुंटली. या अंधःकारयुगांत वैदिक पण्डितांनीं व जैन मुनींनीं मृतप्राय संस्कृत व प्राकृत भाषांच्या अध्ययनाची परंपरा, धुगधुगीत कां होईना, जिवंत ठेवली, याबद्दल त्यांना कितीहि धन्यवाद दिले तरी ते पुरे पडणार नाहींत.

गाथा :

गाथासप्तशतीतील सुभाषितें गाथा वृत्तांत रचलेलीं आहेत. वेदांतील मंत्र मुख्यतः सात वृत्तांत रचलेले आहेत. त्या व्यतिरिक्त गाथा हें वृत्तही वेदकाळीं प्रचारांत होतें. ऋग्वेदात गाथांचे उल्लेख आढळतात. गाथांच्या योगानें ऋत्विज सामाची महति गातात (९.९९.४); सूर्येचे मंगलवस्त्र जणूं गाथांनीं अलंकृत केलेलें होतें (१०.८५.६). ऋचा या दैवी व गाथा या मानुषी असें ऐतरेय ब्राह्मणांत (७.१८) सांगितलेलें आहे. शतपथ ब्राह्मणांत पुष्कळ गाथा आहेत; त्यांत राजाच्या यज्ञांच्या गोष्टी साररूपानें सांगितलेल्या आहेत. मैत्रायणी संहितेत (३.७६) सांगितलें आहे कीं लग्नप्रसंगीं गाथा गात असत. यावरून गाथा हें भावगीतांचें मूळ स्वरूप असावें असें दिसतें. काठकसंहिता (१४.५) व तैत्तिरीय ब्राह्मण (१.३२.६-७) यांत गाथांचा व गाथागायकांकडून दान घेणारांचा निषेध केलेला आढळतो.

छन्दशास्त्रांत (८.१) पिंगलाचार्य सांगतात: 'अत्रानुक्तं गाथा।' या सूत्रावरील टीकेंत हलायुध सांगतो: " अत्र शास्त्रे नामोद्देशेन यन्नोक्तं छन्दः,

प्रयोगे च दृश्यते, तद्गाथेति मंतव्यम्।" रत्नशेखरसूरीनें छन्दकोशांत गाथा-लक्षण सांगितलें आहे:

सामन्नेणं बारस अठ्ठारस बार पनरमत्ताओ।
कमसो पायचउक्के गाहाए हुंति नियमेणं॥
गाहाइ दले चउचउमत्तंसा सत्त; अठ्ठमो दुकलो।
एयं बीयदले वि हु नवरं छठ्ठोइ एकगलो॥

प्रा. कोलब्रुक सांगतात: (A. R: X: 400) कीं प्राकृतांत जी गाथा तीं संस्कृतांत आया डॉ. गोरे यांनीं वज्जालग्गाच्या प्रस्तावनेंत (p. vii) गाथेचें साधारण मांडणी दिली आहे ती अशी:—

प्रथम चरण: ४ + ४ + ४ ४ + ४ + ৩ – ৩ किंवा ৩ ৩ ৩ ৩ + ४ + –
द्वितीय चरण: ४ + ४ + ४ ४ + ४ + ৩ + ४ + –

गाथासप्तशतीच्या उत्तरार्धांत आर्यागीति (७०७) गीति (८०८, ८४५, ८५४, ८७४, ९३०, ९५०, ९५४, ९६५, ९७१), उद्गीति (९३७) व उपगीति ८०६, ९०१, ९०९, ९३९, ९५८) हीं वृत्तेंही आलेलीं आहेत.

वृत्तदर्पणांत या मात्रागणवृत्तांचीं लक्षणें दिलेलीं आहेत तीं अशीं:—

आर्येच्या प्रथमपदीं, द्वादश मात्रा तशाच तिसऱ्याला।
अष्टादश दुसऱ्याला, आणिक चवथ्यास पंचदश॥ ६३॥

गीतीच्या प्रथमपदीं, द्वादश मात्रा तशाच तिसऱ्याला।
दुसऱ्या पादीं अठरा, मात्रा असती तशाच चवथ्याला॥ ६४॥

उपगीतीच्या पहिल्या तिसऱ्याही द्वादशचि मात्रा।
दुसऱ्या आणिक चवथ्या मात्रा पादांत पंध्राची॥ ६५॥

उद्गीतीच्या पहिल्या तिसऱ्याही द्वादशाचि मात्रा।
दुसऱ्या पादीं पंध्रा, चवथ्या पादांत येति अष्टदश॥ ६६॥

पहिल्या चरणीं बारा मात्रा दुसऱ्यांत सात आणि तेरा।
उभयदळीं हे रीती जीस तिला म्हणति सुज्ञ आर्यागीती॥ ६७॥

आर्या : मात्रा : प्रथमचरण : १२·१८ द्वितीय चरण १२·१५

गीति	,,	१२·१८	,,	१२·१८
उपगीति	,,	१२·१५	,,	१२·१५
उद्गीति	,,	१२·१५	,,	१२·१८
आर्यागीति	,,	१२·२०	,,	१२·२०

गाथाप्रशंसा :

प्राकृत काव्याची प्रशंसा करतांना वज्जालग्गांत (क्र.३१) जयवल्लभ सांगतो :

पाइअकव्वस्स नमो पाइअकव्वं च निम्मियं जेण ।
ताहं चिअ पणमामो पढिऊण य जे वियाणन्ति ।।

"प्राकृत कवितेला नमन असो. प्राकृत कवींना नमन असो. त्याचप्रमाणें प्राकृत कवितांचें पठण करणाऱ्या व त्याचें स्वारस्य जाणणाऱ्या मर्मज्ञांना नमन असो."

गाथांच्या सौंदर्याची प्रशंसा करतांना जयवल्लभ सांगतोः--

अद्धक्खरभणियाणं नूणं सविलासमुद्धहसियाइं ।
अद्धच्छिपेच्छियाइं गाहाहि विणा ण णज्जंति ।। ९ ।।

"ओठांतल्या ओठांत लाडिकपणें घोळलेले अर्धस्फुट बोल, विलासोन्मुख मुग्धेचें स्मित आणि अपाङ्गावलोकन यांचें स्वारस्य प्राकृत गाथांच्या परिशीलनानेंच प्रत्ययास येतें."

गाथांचें स्वरूप प्रेयसीसारखेंच असतें : सालंकृत, सुलक्षण व सौरभूपूर्ण (१०); गाथांचें अंतर्याम आणि महिलांचें अंतःकरण यांचें मर्म रसिकांनाच उमजतें (११); वरकामिनीप्रमाणेंच दृढपरिचयावांचून गाथा आपलें अंतर्याम प्रकट करीत नाहींत (१२); गाथा सारेच गातात; मात्र त्यांच्या रसाचा आस्वाद विदग्धांनाच घेतां येतो (१४). संस्कृत काव्य नागरी, तर प्राकृत काव्य, विशेषतः गाथा, या ग्रामीण, हें खरें; पण गाथांचें रसग्रहण ग्राम्य वृत्तीनें करतां कामा नये. विदग्धता हीच ग्राम्य व ग्रामीण यांमधील विभागरेषा. गाथांची भाषा

प्राकृत व विषय शृंगारिक; यामुळें ही सीमारेषा तरल असणार, हें उघड आहे. त्यांचें पठण व ग्रहण संयमानेंच केलें पाहिजे जयवल्लभ (वज्जालग्गः क. १५) सांगतो :

> गाथा रुवइ वराई सिक्खिज्जन्ती गवारलोएहिं ।
> कीरइ लुञ्चपलुञ्चा जह गाई मन्ददोहेहिं ॥

" अडाणी गवळी धार काढूं लागला म्हणजे गाय लाथा झाडते; त्याचप्रमाणें गांवढळ गवई एखादी गाथा ग्राम्यपणें गाऊं लागला म्हणजे बिचारी जणूं रडते ! "

गाथासप्तशतीची प्रतिज्ञा यौवनानें रसरसलेल्या ग्रामतरुणीच्या उद्गारांत सशब्द (क. ७०२) झालेली आहे. जणूं गाथा मूर्तस्वरूप धारण करून म्हणते: " मी खेडेगांवांत जन्मलें व गावठ्यांतच लहानाची मोठी झालें; आतां मी नगरांत आलें आहे; नागरी रीतिरिवाज मला माहीत नाहींत, पण माझ्या अंगीं असलेल्या गुणांची व शक्तींची मला जाणीव आहे. या शहरी स्त्रियांच्या पतींना मी माझ्या नादीं लावीनच लावीन; तरच मी खरी. मग काय व्हावयाचें असेल तें होवो. "

काय होणार ? लावणी आर्येचा पराभव करणार !

गाथांच्या प्रशस्तीनंतर जयवल्लभ विचारतोः—

> ललिते महुरक्खरए जुवईजणवल्लहे ससिंगारे ।
> सते पाइअकव्वे को सक्कइ सक्कयं पढिउं ॥

" ललित व मधुर, शृंगारिक व युवतिजनप्रिय अशा गाथा उपलब्ध असतांना संस्कृत काव्ये कोण पाहणार ? "

गाथासप्तशतींत (क. २) कामशास्त्राची कोरडी चर्चा करणाऱ्या पंडितांना विदग्धा नायिकेनें असाच प्रश्न विचारलेला आहे; पर्यायानें या प्रश्नाचें उत्तरही तेथेंच आलेलें आहे. कोरडी शास्त्र चर्चा कोण करतात ? निर्लज्ज; लब्धप्रतिष्ठित व स्वसंतुष्ट; आत्मवंचित व जीवन-विन्मुख ! अशा अहंमन्य व स्वयंभु पण्डितम्मन्यांना शिक्षा कोणती ? गाथासप्तशतींत या गुन्ह्याला शिक्षाही सांगितलेली (क. ८०९) आहे. कोरडें जीवन जगणें, हीच या अपराधाला शिक्षा ! अन्धकूप अंधारकोठडीहून भयंकर !

(६) गाथासप्तशतीचें साहित्यांतील स्थान :

प्राकृत साहित्यांत गाथासप्तशती अग्रगण्य आहे; भारतीय ललितवाङ्मयांत गाथासप्तशतीला अग्रस्थान देण्यांत येतें : कालक्रमानुसार आद्यस्थान व गुण-क्रमानुसार अग्रस्थान; कोणत्याही गणनेप्रमाणें आणि कोणत्याही परिमाणानें.

गाथासप्तशतीचीं हस्तलिखितें काश्मीर-नेपाळपासून मलबार-तेलंगणापर्यंत जागोजाग विपुल प्रमाणांत उपलब्ध झालेलीं आहेत. प्राकृत जनांप्रमाणें सुसंस्कृतांवरहीं गाथासप्तशतीनें मोहिनी घातलेली आहे. साहित्यशास्त्रावरील कांहीं प्रसिद्ध ग्रंथांव्यतिरिक्त दुसऱ्या कोणत्याही ग्रंथावर गाथासप्तशतीइतक्या टीका झालेल्या नाहींत. दुसऱ्या कोणत्याही ग्रंथांतून गाथासप्तशतींतल्या इतके उतारे अलंकारांचीं उदाहरणें म्हणून साहित्यशास्त्रकारांनी उद्धृत केलेले नाहींत.

महाकवि बाणभट्ट (सातव्या शतकाचा प्रथमार्ध) यानें हर्षचरिताच्या प्रास्ताविक भागांत गाथाकोशाचा उल्लेख केला आहे :

> अविनाशिनमग्राम्यमकरोत्सातवाहनः ।
> विशुद्धजातिभिः कोशं रत्नैरिव सुभाषितैः ।।

या वचनाचें मराठी भाषांतर महामहोपाध्याय प्रा मिराशी यांनीं केलें आहे. (युगवाणी : मार्च १९४६), ते असें : " एखादा राजा अत्यंत शुद्ध जातीच्या रत्नांनीं खेडेगांवांत न होणारा असा अक्षय्य निधि करतो, त्याप्रमाणें सातवाहन राजानें अत्यंत निर्दोष अशा व जातिछंदांत रचलेल्या सुभाषितांनीं अविनाशी व सोज्वळ असा कोश रचला." राजेलोक आपल्या खजिन्यांत निर्दोष व व मौल्यवान रत्नांचा संग्रह करून ठेवतात; असे रत्नकोश नष्ट झाले व होतील; पण सुभाषित-रत्नाचा हा कोश चिरंजीव आहे तसें पाहिलें तर राजाचा खजिना हाही ग्राम्य असतो; कारण गांवोगावच्या रहिवाशांकडून गोळा करण्यात आलेल्या करभारानेंच खजिन्याची भरती होत असते. सात-वाहनानें खेड्यापाड्यात राहणाऱ्या कवींचीं ग्रामीण जीवनाचीं वचनें एकत्रित करून हा कोश संपादिला. यात समाविष्ट झालेल्या गाथा खेड्यापाड्यांत निर्माण झालेल्या असल्या तरी त्या ग्राम्य नाहींत, हीं सुभाषित प्राकृतांत रचलेलीं असलीं तरी तीं ग्राम्य नाहींत, त्यांची जाति विशुद्ध आहे, अशी बाणभट्टाची

ग्वाही आहे. गुप्तकाळांत संस्कृत भाषेला व साहित्याला राजाश्रय मिळाला आणि कवींची व पंडितांची परंपरा प्रस्थापित झाली. संभवनीय आहे की याच सुमारास प्राकृत भाषेचा व साहित्याचा उपहास आणि संस्कृत भाषेच्या अज्ञानाबद्दल प्राकृत जनांची हेटाळणी करण्याची प्रथा राजदरबारांत व पंडित-सभेंत सुरू झालेली असावी. गाथासप्तशतींतलीं वचनें रम्य असलीं तरी ग्राम्य आहेत; कारण तीं प्राकृतांत रचलेलीं व त्यांचे विषय ग्रामीण असल्यामुळें तीं अभिजात नाहींत व त्यांची जाति भ्रष्ट आहे, असे आक्षेप तत्कालीन विद्वानांनीं घेतले असावेत आणि बाणभट्टानें वरील वचनानें त्यांचें खंडन खणखणीत शब्दांत केलेलें असावें असें दिसतें. संस्कृत शृंगार तेवढा शिष्ट आणि प्राकृत शृंगार मात्र ग्राम्य अशी विकृत वृत्ति त्या काळांत प्रादुर्भूत झालेली असावी. देशी भाषा व त्यातील वाङ्मय, विशेषतः जानपद वाङ्मय, यांबद्दल अव्वल इंग्रजींत एतद्देशीय परप्रत्ययनेय विद्वानांची अशीच वृत्ति होती; आतां ती बदलली आहे, कारण बाणभट्टाच्या तोडीच्या विद्वानांनीं त्याचा पुरस्कार केलेला आहे. ही सर्व परिस्थिति विचारांत घेऊन बाणभट्टाच्या वचनाचा मी करतों तो अर्थ असा : "ग्राम्यतेपासून अलिप्त व निर्दोष अशा अभिजात सुभाषितरत्नांचा अविनाशी कोश सातवाहनाने केला."

सम्राट् हर्षवर्धन हा आपल्या कारकीर्दीच्या प्रत्येक पांचव्या वर्षी प्रयाग येथें 'मोक्ष महापरिषद' भरवून आपला सर्व खजिना दानधर्मानें रिकामा करीत असे. हर्षानें बाणाला विपुल संपत्ति दिल्याचा उल्लेख हर्षचरितांत आहे. काव्यप्रकाशावरील सारसमुच्चय या टीकेंत रत्नकंठानें या पुरस्काराची क्षण-भङ्गुरता व बाणभट्टाच्या कृतींची चिरंजीविता वर्णिलेली आहे :

हेम्नो भारशतानि वा मदमुचां वृन्दानि वा दन्तिनां।
श्रीहर्षेण समर्पितानि कवये बाणाय कुत्राद्य तत्॥
या बाणेन तु तस्य सूक्तिनिकरैरुट्टंकिता कीर्तयः।
ताः कल्पप्रलयेऽपि यान्ति न मनाग्मन्ये परिम्लानताम्॥

उद्द्योतनसूरि, ज्योत्स्नासूरि ऊर्फ दाक्षिण्यचिन्हसूरि यानें कुवलयमाला हा ग्रंथ इ. स. ७७८ च्या सुमारास रचला. त्यांत तो सांगतो :

पालित्तयसालाहणछप्पण्णयसीहनाअसद्देण ।
संखुद्धमुद्धसारंगउ व्व कइत्ता पयं देमि ॥
निम्मलगुणेण गुणगुरुयएण परमक्खरयणसारेण ।
पालित्तयेण हालो हारेण व सहइ गोट्ठीसु ॥
चक्कायजुवलसुहया रंमत्तणरायहंसकयहरिसा ।
जस्स कुलपव्वयस्स व वियरइ गंगा तरंगवई ॥
भणियविलासवइत्तणचोक्किले जो करेइ हलिए वि ।
कव्वेण किं पउत्थे हाले हालावियारे व्व ॥
पणईहिं कइयणेण व भमरेहिं व जस्स जायपणएहिं ।
कमलायरो व्व कोसो विलुप्पमाणो वि हु न झीणो ॥

या वचनाचा आशय असा : हालाला महाराष्ट्री, मागधी व शौरसेनी या तीन पाली भाषा प्रिय होत्या; तो प्राकृत कवींचा आश्रयदाता होता; राजसभेंतील कवींच्या सहकार्यानें त्यानें असा अक्षय्य गाथाकोश केला कीं निरंतर उपयोगानेंही तो विलुप्यमान झाला नाहीं.

गौडकवि अभिनन्द यानें रामचरित नांवाचें महाकाव्य लिहिलें आहे. वेबरनें त्याला नवव्या शतकांत मांडलें (Vorwort : p. xxv) आहे. मध्ययुगीन चरित्रकोशकारांनीं अभिनन्द या नांवाच्या दोन व्यक्ति कल्पिल्या आहेत : एक योगवासिष्ठसार व कादंबरीसार या ग्रंथांचा कर्ता आणि दुसरा रामचरिताचा कर्ता; पैकीं पहिला अभिनन्द हा धर्मपालाच्या वंशांतील विक्रमशीलाचा मुलगा हारवर्ष याचा आश्रित होता; त्याला ते नवव्या शतकांत मांडतात आणि रामचरिताच्या कर्त्याला ते अकराव्या शतकांत मांडतात. अभिनन्द या नांवाच्या दोन व्यक्ति होत्या असें कल्पिण्याचें कारण नाहीं; कारण रामचरितांत कर्त्यानें हारवर्षाचीच स्तुति केलेली आहे. या प्रशस्तींत तो सांगतो :

नमः श्री हारवर्षाय येन हालादनन्तरम् ।
स्वकोषः कविकोषानामाविर्भावाय संभृतः ॥ ६।९३ ॥

हाल सातवाहनानंतर हारवर्षानेंच सुभाषितकोश संपादन केला. असें या वचनावरून दिसतें. यापुढें अभिनन्द सांगतो :

हालेनोत्तमपूजया कविवृषः श्रीपालितो लालितः ।
ख्यातिं कामपि कालिदासकृतयो नीताः शकारातिना ।।
श्रीहर्षो विततार गद्यकवये बाणाय वाणीफलम् ।।
सद्यःसत्क्रियायाभिनन्दमपि च श्री हारवर्षो ऽग्रहीत् ॥ २२--१०० ॥

शकारि विक्रम व श्रीहर्ष यांच्याप्रमाणें हाल हाही राजा होता आणि त्याचा आश्रित पालित याची गाथासंपादनाचे कामीं हाल ला मदत होती, ही परंपरा अभिनंदाला अवगत होती या असें वचनावरून दिसतें.

यानंतरचा गाथासप्तशतीचा महत्त्वाचा उल्लेख राजशेखरानें (इ. ८८० ते ९२०) केलेला (भगदत्त जल्हण विरचिता सूक्तिमुक्तावली : Gaekwad's Oriental Series : पृ. ४३) आहे. तो सांगतो :

जगत्यां (पृथिव्यां) प्रथिता गाथा सातवाहनभूभुजा ।
व्यधुर्धृतेस्तु विस्तारमहोचित्रपरंपरा ।।

" सातवाहन राजानें अनेक ठिकाणांहून गाथा जमवून त्यांचा संग्रह केला. यामुळें लोकांचा आनंद संकोच पावला नाहीं, उलट विस्तार पावला. केवढी ही आश्चर्याची परंपरा ! "

ठाण्याच्या शिलाहारांचा आश्रित सोड्ढल या कायस्थ कवीनें (इ. स. १०२५ ते १०५०) ' उदयसुंदरी ' कथेंत हालाचा उल्लेख केलेला आहे. तो असा :

हाले गते गुणिनि शोकभराब्दभूवुरुच्छिन्नवाङ्मजडाः कृतिनस्तथामी ।
यत्रस्य नाम नृपतेरनिशं स्मरन्तो हेत्यक्षरं प्रथममेव परं विदन्ति ।।

मेरुतुंगाचार्यानें (जन्म १३३६ इ.) प्रबन्धचिंतामणींत हाल सातवाहनाच्या गाथासंपादनाबाबतची परंपरा सांगितलेली आहे :

हारो वेणीदण्डो खटटुग्गलियाइं तहय तालु त्ति ।
सालाहणेण गाहिया दहकोडीहिं च चउगाहा ॥

सालाहणानें दहा कोट मुद्रा देऊन कोशासाठीं चार गाथा घेतल्या (Bibliotheca Indica : C. H. Tawney; p. 18) या परंपरेंत सातवाहनकालीन वस्तुस्थाते निवेदन केलेली आहे कीं मेरुतुंगकालीन

अपेक्षा ध्वनित केल्या आहेत हें निश्चित करण्यास साधन नाहीं. कोशरचनेची पूर्वतयारी म्हणून हालानें एक कोटी गाथा जमविल्या व त्यांतून सातशें निवडल्या असा उल्लेख क्र. ३ या गाथेंत आलेला आहे.

अनुकरण ही प्रशंसेची परिसीमा होय. हें जर खरें तर गाथासप्तशती हा ग्रंथ अद्वितीय आहे असें म्हटलें पाहिजे. कारण दुसऱ्या कोणत्याही ग्रंथाचें गाथासप्तशतीइतकें अनुकरण आजवर झालेलें नाहीं.

जयवल्लभाचा वज्जालग्ग हा प्राकृत सुभाषित-संग्रह, गोवर्धनाचार्यांची संस्कृत आर्यासप्तशती आणि बिहारीलाल याची सतसई हे ग्रंथ गाथासप्तशतीच्या नमुन्यावर रचलेले आहेत.

वज्जालग्ग हा प्राकृत सुभाषितांचा संग्रह अलीकडेच संपूर्ण स्वरूपांत (Vajjālaggam : Bibliotheca Indica : Ed : Dr Julius Laber : Fasc I: 1914; II : 1923; III : 1944) प्रसिद्ध झालेला आहे. या संग्रहाचें संपादन जयवल्लभ नांवाच्या श्वेतांबर जैनानें केलेलें असून त्याची संस्कृत छाया रत्नदेवानें वि. सं. १३९३ मध्यें लिहिली असल्याचें एका हस्तलिखितांत नमूद आहे. जयवल्लभाविषयीं कांहींही माहिती उपलब्ध नाहीं. वाक्पतिराजाच्या गउडवहो या महाकाव्यांतील उतारे वज्जालग्गांत घेतलेले आहेत. या काव्याची निर्मिति स. ७०० ते ७२५ च्या सुमारास झाली असली पाहिजे, असें श्री. पंडित (Gaudavaho : Introductino: p. c) यांनी निश्चित केलें आहे. यावरून वज्जालग्ग हा संग्रह त्यानंतरचा असला पाहिजे असें ठरतें. वज्जालग्गाच्या मुद्रित प्रतींत ७९५ सुभाषितें आहेत. कांहीं हस्तलिखितांत 'सत्तसयम्मि समत्तो,' 'सत्तसयम्मि' अशा शब्दयोजना आढळतात; यावरून जयवल्लभाच्या मूळ संग्रहांत गाथासप्तशतीनें घालून दिलेल्या प्रथेनुसार सातशेंच सुभाषितें असलीं पाहिजेत असें दिसतें. वज्जालग्गाचे संपादक सांगतात कीं या संग्रहांतील सुभाषितें मुख्यत्वेंकरून शृंगारिक असलीं तरी जयवल्लभानें मानवी जीवनाच्या इतर अंगांचा परामर्ष हालाहून अधिक घेतला आहे. हें विधान वस्तुस्थितीला धरून नाहीं. उत्तान व अर्थी गाथांचा ही समावेश वज्जालग्गांत झालेला आहे. वज्जालग्गांत सुभाषितांची मांडणी वज्या पद्धतीनें केलेली आहे. गाथासप्तशतींतील सुभाषितांची अशीच वर्गीकरण केलेली आवृत्ति उपलब्ध झालेली आहे. वज्जालग्गांतील सुभाषितें ९५ शीर्षकांखालीं विभागलेलीं आहेत. यांपैकीं ३९

पद्धतींत गाथासप्तशतींतील ८२ गाथा समाविष्ट केलेल्या आहेत. यांपैकीं ६२ प्रथमार्धांतील आहेत.

या संग्रहांत समाविष्ट झालेल्या गाथांचा तपशील येणेंप्रमाणें:--

(१) अनंग ४३०; (२) अवरुग्ण (विरहपीडिता) ५७, १७८, १९४, १९८, २२०, ३७१; (३) असती ९, १९७, ६६७, ८७१, ८७३; (४) इन्दिन्दिर ७४९, ८१३; (५) कुट्टिनीशिक्षा १६३, २८६; (६) गज ३८३; (७) गाथा ८०९; (८) ग्रीष्म ७०; (९) दारिद्य ६७१; (१०) दुर्जनें २५३, ६८६; (११) दूती १८१; (१२) धीर २८४, ७४६; (१३) प्रभु २४३; (१४) प्रवसित ४६, ३९९; (१५) प्रस्तावना २; (१६) प्रावृड् ७२४; (१७) प्रियानुराग ३७१, ६२५; (१८) प्रेम ५३, २३६, ७४०, ८२३; (१९) मान ४५, ३७४, ४३२, ९२९; (२०) मित्र २१७; (२१) यान्त्रिक ५१४; (२२) रुद्र ४५५; (२३) लावण्य २७८, ९६३; (२४) वसंत ३११, ५७४; (२५) व्याध ११९, १२०, १७३, ५९७, ९४५; (२६) विदग्ध ७१५, ८७७; (२७) विन्ध्य ८१४; (२८) विरह ५८, १९०, २०६ २०८, ४७५; (२९) शरद् ५६२; (३०) शिशिर ६९८; (३१) सज्जन २५०, ३१९; (३२) सती ३६, ५९, ८६५; (३३) साहस २८२, (३४) सुगृहिणी ३८, ४७२; (३५) सुरतः २०९, ५४७; (३६) स्तन २६८, ३९५ ६६९; (३७) स्नेह ७४७; (३८) हृदयसंवरण ३८, २०२, ४०१; (३९) हृदयाली ८१०, ९१०.

आर्यासप्तशतीचा कर्ता गोवर्धनाचार्य (इ. स. १०७५ ते ११२५) हा बंगालचा राजा लक्ष्मणसेन याच्या पदरीं कवि होता. आर्यासप्तशती या नांवावरून दिसतें कीं मूळ ग्रंथांत सातशें आर्या असल्या पाहिजेत. श्री. विष्णु-प्रसाद भण्डारी यांनीं संपादिलेल्या व चौखम्बा संस्कृत सीरीजमध्यें प्रसिद्ध झालेल्या प्रतींत ७६३ आर्या आहेत. या सप्तशतींतील आर्या शृंगारिक असून गोवर्धनाचार्यानें स्वतःच लिहिलेल्या आहेत. म्हणजे विषय जवळ जवळ गाथासप्तशतीसारखाच असून कर्तृत्वपद्धति मात्र भिन्न आहे. या ग्रंथांत आर्या अकारानुक्रमानें मांडलेल्या आहेत. हाल सातवाहन व गाथासप्तशती यांबद्दल प्राचीनकविकीर्तनभागांत गोवर्धनाचार्य सांगतो :

हालाम्बुदयितो वाचामनुवासो रसविभेदमधुर इव ।
अभ्यसीकृतमात्रो नावर्तते कस्य परितोषम् ॥
प्राकृतमयं निबन्धं वितन्वता शालिवाहननृपेण ।
काव्यानामितरेषां तद्विकृतित्वं कथितमर्थात् ॥

'सतसई' चा कर्ता बिहारीलाल (इ. स. १६०३ ते १६६३) हा जयपूरच्या जयसिंह राजाच्या दरबारीं कवि होता. सतसईच्या लक्ष्मीवेङ्कटेश्वर प्रतींत ७२३ गाथा आहेत. मूळ ग्रंथांत सातशेंच दोहे असावेत असें नांवावरून दिसतें. शिवाय 'करे सातसै दोहरा सुकवि बिहारीदास,' असा ही दोहरा आहे. हे दोहरे मुख्यत्वेंकरून शृंगारिक आहेत. सतसई हें व्रजभाषेचें भूषण मानण्यांत येतें. सदर आवृत्तीचे संपादक पण्डित ज्वालाप्रसाद मिश्र विचारतात: "ऐसा कौन भाषाका रसिक है जिसको इस सतसईके दो चार दोहे स्मरण न हों ?" हा ग्रंथ प्रचलित भाषेंत असला तरी त्याची रम्यता व्यक्त करण्यासाठीं पण्डितांनीं त्यावर आजवर विसांहून अधिक टीका लिहिल्या आहेत.

७ गाथासप्तशतीचें अलंकार-वाङ्मयांतील स्थान :

संस्कृतांत साहित्यशास्त्रावर असंख्य ग्रंथ आहेत. अभिनव साहित्यसिद्धान्त उत्क्रान्त करण्याचा आणि अलंकारांची निर्मिति, वर्गीकरण व विवेचन करण्याचा साहित्यशास्त्रज्ञांचा उद्योग इस्लामी आक्रमणापर्यंत चालू होता. विख्यात साहित्यिकांना व पाठशाळांना राजाश्रय असे. मुसलमानी आक्रमणामुळें लहानमोठीं स्वराज्यें बुडालीं आणि संस्कृत अध्ययनाची व अध्यापनाची परंपरा तुटली; देशाचें सांस्कृतिक जीवन उध्वस्त झालें आणि सावान्य जनतेचें आपदीकरण झालें. या शापांत वरप्रदानही होतें; कारण या अंदाधुंदींतूनच प्रचलित देशी भाषा व सारस्वत उत्क्रांत झाली.

साहित्यशास्त्रकारांनीं सिद्धान्तांचें व अलंकारांचें विवेचन करतांना प्रचलित वाङ्मयांतील उदाहरणें दिलेलीं आहेत. दण्डी व रुद्रट या आद्य साहित्यशास्त्रज्ञांनीं आपल्या विख्यात ग्रंथांत अलंकारांची संस्कृतच उदाहरणें दिलीं आहेत. प्राकृतोत्तम महाराष्ट्रीशीं दण्डीचा परिचय होता. सेतुबंधाचा उल्लेख त्यांनीं 'सूक्तिरत्नांचा सागर' असा केलेला आहे. आपले ग्रंथ प्राकृतापासून अलिप्त

ठेवावयाचे असा त्यांचा जणूं संकल्पच होता आनन्दवर्धनानें ध्वन्यालोकांत स्वतंत्र सिद्धान्ताची स्थापना केली आणि उदाहरणादाखल प्राकृत गाथा व श्लोक उध्दृत करण्याची प्रथा सुरू केली. या वरून या काळांत प्राकृत हा साहित्यिकांचा अभ्यासविषय झाला असावा असें अनुमान होतें उत्तरकालीन साहित्यशास्त्रकारांनीं त्याचें अनुकरण केलें. या सर्वांनीं गाथासप्तशतीचा मोठ्या प्रमाणावर उपयोग केलेला आहे. सर्वांत अधिक गाथा भोजदेवानें सरस्वतीकण्ठाभरणांत उध्दृत केलेल्या आहेत.

अलंकारशास्त्रावरील ठळक अशा बारा ग्रंथांत उध्दृत केलेल्या गाथासप्तशतींतील गाथांचें कोष्टक परिशिष्टांत दिलें आहे. कोष्टकांत समाविष्ट केलेल्या ग्रंथांची त्रोटक माहिती येथे पुढें दिलेली आहे. या बारा ग्रंथांत मिळून गाथासप्तशतींतील गाथांचे ५९० उल्लेख आलेले आहेत. पैकीं ३३४ उल्लेख प्रथमार्धातील गाथांचे आहेत आणि २५६ उत्तरार्धातील. कोष्टकांत दिलेले किरकोळ उल्लेख या गणनेंत धरलेले नाहींत. या भागातून वज्जालग्गांत अनुक्रमें ६३ व २० गाथा घेतलेल्या आहेत. त्याच गाथा अनेकांनीं उध्दृत केलेल्या असल्यामुळें द्विरुक्ति वगळली असता दिसतें कीं वज्जालग्गासह या तेरा ग्रंथांत प्रथमार्धातील २५८ व उत्तरार्धातील ११० अशा ३६८ गाथा उध्दृत केलेल्या आहेत.

याचा अर्थ असा मात्र नव्हे कीं गाथासप्तशतींतील एवढ्याच गाथा सालंकार असून बाकीच्या सामान्य आहेत. गाथासप्तशतीच्या टीकाकारांनीं इतर अनेक गाथांतील अलंकारांचें दिग्दर्शन केलेलें आहे. त्यांचा समावेश या कोष्टकांत केलेला नाहीं. रसिक वाचकांनाही इतर गाथांतील अलंकारांचा प्रत्यय सहजां येण्यासारखा आहे. संस्कृत आलंकारिकानीं दुसऱ्या कोणत्याही प्राकृत ग्रंथांतून एवढे दाखले घेतलेले नाहींत. गाथासप्तशतींतून घेतले आहेत ते दाखले पाहिले असतां दिसून येतें कीं त्यांतील अलंकार सहजस्फूर्त आहेत. या गाथा अलंकारांच्या स्पष्टीकरणासाठीं सहेतुक घडविलेल्या नाहीत. काश्मीरपासून तेलंगणापर्यंत आणि नवव्या शतकापासून सतराव्या शतकापर्यंत संस्कृत पण्डितांनीं जोपासना केलेल्या अलंकारशास्त्राला गाथासप्तशतीनेंच एवढीं सरस व सुमुर्पक उदाहरणें पुरविलीं आहेत. एवढें भाग्य दुसऱ्या कोणत्याही संस्कृत वा प्राकृत ललित ग्रंथाला लाभलेलें नाहीं.

दुसऱ्या परिशिष्टांत समाविष्ट केलेल्या अलंकारग्रंथांच्या माहितीचें कोष्टक :

क्र.	ग्रंथकार	ग्रंथ	काल शक	देश	उल्लेखसंख्या प्रथमार्ध	उल्लेखसंख्या उत्तरार्ध	
१	आनंदवर्धन	ध्वन्यालोक	८४० ते ८७०	काश्मीर	१५	१३	कारिका, वृत्ति व उदाहरणें असे या ग्रंथाचे तीन भाग आहेत. कालानुक्रमाच्या, स्वतंत्र सिद्धांतस्थापनेच्या दृष्टीनें साहित्यशास्त्रांत ध्वन्यालोकाला अग्रस्थान दिलें जातें.
२	धनंजय	दशरूपक	९७४ ते ९९४	महाराष्ट्र, कर्नाटक	८	७	हा मुञ्ज राजाच्या विद्वत्सभेचा सभासद होता.
३	भोजदेव	सरस्वती-कण्ठाभरण	१००५ - १०५४	माळवा	१२३	२६	ग्रंथांत १५०० उदाहरणें दिलीं आहेत.
४	मम्मट	काव्यप्रकाश	अकरावें	काश्मीर	७	५२	अलंकारसाहित्यांतील अग्रगण्य ग्रंथ. यावर सुमारें ७५ टीका उपलब्ध आहेत. निर्मिति ११०० चे सुमारास.
५	हेमचंद्र	काव्यानुशासन	अकरावें वा बारावें.	सौराष्ट्र	१६	११	ध्वन्यालोक व काव्यप्रकाश यांच्या अनुरोधानें केलेला ग्रंथ.

क्र.	ग्रंथकार	ग्रंथ	काळ शतक	देश	उल्लेखसंख्या प्रथमार्ध	उल्लेखसंख्या उत्तरार्ध	
६	रुय्यक	अलंकारसर्वस्व	बारावें.	काश्मीर	४	४	प्रमाणग्रंथ. यानें अलंकारांचें सर्वमान्य वर्गीकरण केलें.
७	मंखुक	साहित्य-मीमांसा	प्रथमार्ध ,,	,,	२०	१३	रुय्यकाचा शिष्य; याला मंख, मंखक, लंक असेंहि म्हटलेलें आहे.
८	शोभाकर	अलंकार-रत्नाकर	बारावें वा तेरावें.	,,	४५	१५	
९	नरेंद्रप्रभसूरि	अलंकार-महोदधि	१२२६	गुजरात	२२	३१	
१०	विश्वनाथ	साहित्यदर्पण	चवदावें.	ओरिसा	६	७	लेखक कलिंग राजाचे पदरीं अधिकारी असावा.
११	गोविंदठक्कुर	काव्यप्रदीप	पंधरावें, उत्तरार्ध	मिथिला	७	४७	
१२	विश्वेश्वर	अलंकार-कौस्तुभ	सुमारें १७००	५३	१०		

८ गाथासप्तशतीची भौगोलिक पार्श्वभूमि :

गाथासप्तशतींतील भौगोलिक, स्थलद्योतक व दिशावाचक उल्लेख आणि त्यांवरून निघणारे निष्कर्ष यांचा या प्रकरणांत विचार करावयाचा आहे. त्यांपैकीं कांहीं उल्लेख संदर्भानुसार प्रासंगिक, पौराणिक किंवा सांकेतिक स्वरूपाचे असल्यामुळें त्यांबाबत तपशीलांत जाण्याचें कारण नाहीं. इतर उल्लेखांबाबत विषयानुरोधानें जरूरीपुरता तपशील देतों :

१ नद्या :

गिरिनदी : गिरिणई : (३७) : गिरिनदीला पूर आलेला असून भोवऱ्यांत कदम्बाची डहाळी उडत बुडत आहे असें वर्णन क्र.३७ या गाथेंत आलेलें आहे. हा उल्लेख विशिष्ट नदीला अनुलक्षून केलेला आहे कीं केवळ डोंगरांतून झपाट्यानें वाहणारी अनामिका नदी अभिप्रेत आहे? ही नाशिक व खानदेश जिल्ह्यांतून वाहणारी व तापीला मिळणारी गिरणा नदी असावी असें माझें अनुमान आहे. खानदेशांत कदम्ब (Gazetteer of the Bombay Presidency: Khandesh; p. 25) क्वचितच आढळतात; मात्र नाशिक जिल्ह्यांत पेठच्या आसमन्तांत सह्याद्रीच्या जंगलांत हीं झाडें खूप (Gazetteer of the Bombay Presidency: Nasik. p 18) आहेत. गिरणेचा उगम याच जंगलांत हातगडच्या दक्षिणेस झालेला आहे. सटाणा व हातगड यांशीं सातवाहनांचें साहचर्य पूर्वीच कल्पिण्यांत आलेलें आहे. अरणा, तिरणा, दारणा, अशीं 'णा' कारान्त नद्यांचीं नांवें विशेषतः याच भागांत आढळतात. अराणि (दे.) = मार्ग, अर्णस् = प्रवाह, अर्णो (एट्रस्कन) = नदी आणि णई = नदी यांपैकीं कोणत्या मूळाशीं या 'णा'चा संबंध जोडावयाचा?

गोदावरी : (५८, १०३, १०७, १७१, १७५, १८९, १९३, २३१, ३५५, ८७९, ९४९, ९५८) गोआअरी, गोदा, गोला, गोलाई, गोलाणइ, गोलावइ या नांवांनीं गोदावरीचे उल्लेख गाथासप्तशतींत आलेले आहेत. सातवाहनांच्या इतिहासांत गोदावरीचें स्थान विशेष महत्त्वाचें आहे. सातवाहन युगांतील शिलालेखांत गोवर्धन व नाशिक यांचे उल्लेख आलेले आहेत. गोदातीरीं पैठण येथें तर

त्यांची राजधानी होती. गोदावरी त्र्यंबकेश्वरानजीक उगम पावते व सुमारें नऊशें मैलांच्या प्रवासानंतर कोकानाडाजवळ पूर्व सागराला मिळते. नाशिक जिल्ह्यांत ही नदी डोंगराळ भागांतून वाहते आणि मराठवाड्यांत मैदानांतून. डोंगराळ भागांतला तिचा प्रवाह अरुंद आहे. मराठवाड्यांत तिचें पात्र रुंदावतें पण महापूर नसेल तेव्हां उतारांवरून तें ओलांडतां येतें. मांजरेशीं संगम झाल्या-नंतर तिचें पात्र अधिक विस्तृत होतें व त्यांतून तिचा प्रवाह बारमहा वाहत असतो. शबर पर्वतापर्यंतचा तिचा प्रवास सह्याद्रीच्या पठाराच्या उतारावरून होतो. या पर्वताच्या खिंडींतून पार होऊन आन्ध्रदेशांत प्रविष्ट झालेला तिचा प्रवाह फक्त नौकागम्य आहे ही वैशिष्ट्यें लक्षांत घेऊन गाथासप्तशतींत तिचा कोणता भाग उल्लेखिलेला आहे याचा निर्णय घेतला पाहिजे.

क्र. ८७९ या गाथेंतील गोदावरी गिरिवाहिनी आहे. तिच्या कांठावर येथें आणि क्र. १०३, ९४९ व ९५८ या गाथांमध्यें नैसर्गिक कुंज आहेत. क्र. १७५ या गाथेंतील गोदावरीच्या कांठावरील अरण्यांत सिंहांची वस्ती आहे. क्र. १०७ व १९३ या गाथांत गोदावरीचा प्रवाह उतारावरून ओलांडण्याचे उल्लेख आहेत. क्र. २३१ या गाथेची साहमी नायिका भर रात्री गोदावरीचा पूर एकटी तरून गेलेली आहे. या प्रमाणांवरून अनुमान करतां येतें कीं या गाथांतील गोदावरी ही नाशिकच्या डोंगराळ व मराठवाड्याच्या मैदानी भागांतून वाहणारी आहे. क्र. ५८ मधील गोदावरी ही पैठणची आहे. तुलनेसाठीं कोऊहलाच्या लीलावइ (संपादक डॉ. आदिनाथ नेमिनाथ उपाध्ये : भारतीय विद्याभवन : सिंधी जैन ग्रंथमाला: क्र. ३१) या प्राकृत महाकाव्यामधील प्रतिष्ठानवर्णनांतील क्र. ६१ ही गाथा पहा :

मरहट्ठिया-पओहर-हलिद्द-पारिपिंजरंबुवाहीए।
धुव्वंति जत्थ गोला-णईए नाहियसिच पाव

या दोन्ही गाथांतील साम्य लक्षांत घेतलें म्हणजे क्र. ५८ मधील गोदावरी ही पैठणची आहे अशी खात्री पटते. लीलावईत हालाचा संबंध सप्तगोदावरीशीं जोडण्यांत आलेला आहे; पण ही कथा केवळ कल्पित व उघड उत्तरकालीन आहे. हालच्या अर्थात् सारस्वतमंडलाला फार तर पैठणपर्यंतचीच गोदावरी माहीत

होती अर्थो निष्कर्ष या उल्लेखांवरून निघतो. मुद्रा, शिलालेख इत्यादि साधनां-वरून दिसतें कीं शककर्ता गौतमीपुत्र सातकर्णी (इ स. ७६ ते ९१) व वासिष्ठीपुत्र पुळुमावि इ. स. ९१ ते ११९) यांच्या कालापर्यंत सातवाहनांचा आन्ध्र देशाशीं राज्यकर्ते या नात्यानें प्रत्यक्ष संबंध आलेला नव्हता.

तापी : तावी : (२३९) : तापीचाउगम मध्यप्रातांत सातपुड्याच्या पठारा-वर होतो. सुमारें साडेचारशें मैलांचा प्रवास करून ती सुरतेपासून सतरा मैलांवर खंबायतच्या आखाताला मिळते. मध्यप्रातांतील तापीचा प्रवाह दाट जंगलांतून व खोल दरींतून वाहतो. बऱ्हाणपुरानजीक ती मोकळ्या मैदानात येते. खान-देशात तापी खोऱ्याच्या एका बाजूस सातपुडा व दुसऱ्या बाजूस सातमळा या पर्वतश्रेणि आहेत. तापीचा प्रवाह सातपुड्याला खेटून वाहतो. डांगचे डोंगर् ओलांडल्यानंतर तापी गुजराथच्या मैदानांत प्रवेश करते. क. २३९ या गाथेंताल तापीतट तिच्या कोणत्या भागांतील आहे याबद्दल अनुमान करतां येत नाहीं. येथें तापीतटाला 'पवित्र' हें विशेषण जोडलेलें आहे. तें विचारात घेण्याजोगे आहे. कारण गोदातटाला अनुलक्षून असें विशेषण गाथासप्तशतीत कोठेही योजलेलें नाहीं; इतकेच नव्हे, गाथा-सप्तशतीतील गोदावरीचे तट विलासोत्तेजक व शीलखण्डक आहेत. महाभारतां-तील पयोष्णीचच तापी हे मध्ययुगीन नाव आहे असें श्री. पार्जिटर यांचे अनुमान आहे (Ancient Indian Historical Tradition). गोदावरीचें धार्मिक माहात्म्य व पावित्र्य पुराणोत्तरकालीन असावें असे अनुमान करण्यास जागा आहे. पुराणिकांनी प्रचलित दंतकथांचे संकलन व संपादन गुप्त काळांत केलेलं असावे असा संशोधकाचा कयास आहे तो मान्य केला तर गोदावरी व तापी या नद्यांच्या किनाऱ्यावरील प्रदेशांना अनुलक्षून योजलेल्या विशेषणां-वरून गाथासप्तशतीचं संपादन गुप्तपूर्वकालीन आहे हें पर्यायाने सिद्ध होतें.

नर्मदा : गाथासप्तशतीत नर्मदेचे उल्लेख णम्मआ (५४८, ७५४) व रेवा (५७८,५९९) या दोन्हीं नांवांनीं आलेले आहेत. कोकणांतही रेवा नांवाची नदी रेवदंड्याजवळ आहे. तिजवरूनच रेवदंडा हें नांव पडलेलें आहे असें त्या ठिकाणचे लोक सांगतात (भरतस्थलादर्श : श्री. सहस्रबुद्धे; पृ. ७६). गाथासप्तशतीचा

ही रेवा अभिप्रेत असेल असें वाटत नाहीं. नर्मदेचा उगम अमरकंटकच्या पहाडांत होतो. आठशें मैलांच्या प्रवासानंतर ती खंबायतच्या आखाताला मिळते. रेव् = उडी मारणें, या संस्कृत धातूवरून हें नांव पडलेलें असावें असें अनुमान आहे तिच्या प्रवाहांत अनेक धबधबे आहेत; पैकीं कपिलधारा व धुवांधार हे विशेष विख्यात आहेत. नर्मदेचा मेखल पर्वतांतील नागमोडी, निरुंद व जागोजाग उडी घेणारा प्रवाह पाहिला म्हणजे वाटतें कीं ही अवखळ नागकन्या अल्लड व जंगली समवयस्क मैत्रिणींच्या खळखळणाऱ्या चाळांच्या तालावर दऱ्याखोऱ्यांतून गिरक्या घेत घेत, पाणी उडवीत व फुलें उधळीत, ठेंचाळत धांवत आहे. जबलपुराजवळ नर्मदेची संगमरवरी दरी आहे शुभ्र उंच किनारे, अरुंद मध्य आणि अथांग व गडद निळें पाणी; नर्मदेचें हें वैशिष्ट्य आहे व तें अद्वितीय आहे. वाटतें कीं जणूं बाल्य व यौवन यांच्या सीमारेषेवर श्वेतवसनधारिणी श्यामला मुग्धा उभी आहे! सुमारें दोनशें मैल लांबीचें पहिलें मळईचें खोरें समृद्ध करून नर्मदेचा प्रवाह विन्ध्य-सातपुडा यांच्या कैचींतल्या दरींत शिरतो. ओंकारमांधाता या स्थानापासून सुमारें शंभर मैल लांबीचें तिचें दुसरें मळई मैदान सुरू होतें या भागांत कधीं विन्ध्य तर कधीं सातपुडा, केव्हां दूर सरतात तर कोठें तिच्या आंगचटीस जातात. त्यांना अखेरचें झिडकारून नर्मदा आपल्या तिसऱ्या मळई मैदानांत गुजरातेंत प्रविष्ट होते. उत्तर व दक्षिण हिंदुस्थानची भागरेषा आणि लगतच्या प्रदेशांची भाग्यरेषा म्हणून नर्मदा भौगोलिक दृष्ट्या महत्त्वाची आहे. जणूं विधात्यानें अक्षांशाशीं समांतर अशी ही रेषा ओढलेली आहे! त्याहून अधिक महत्त्व तिला धार्मिक दृष्ट्या आहे. नर्मदेचे किनारे शैव मंदिरांनीं गजबजलेले आहेत; कारण नर्मदा ही मध्य हिंदुस्थानला शंकराची देणगी आहे. नर्मदेच्या कांठीं परशुरामानें हैहयांचा, सूर्यवंशी मांधातृनें मौनेय गंधर्वांचा, शालिवाहनानें विक्रमादित्याचा व पुलकेशि चालुक्यानें हर्षवर्धनाचा पराभव केला; यामुळें हिचें ऐतिहासिक माहात्म्यही मोठें आहे. पुराणांतरीं नर्मदेचें धार्मिक माहात्म्य वर्णिलेलें असलें तरी गाथासप्तशतींत त्याचा सुगावा लागत नाहीं. क्र. ५४८ या गाथेंतील नर्मदा ही शीतलजला, सहनशीला स्त्री आहे. सुबंधूनें वासवदत्तेंत (पृ. १०२) रेवेबद्दल अनेक उद्गार काढले आहेत. (रेवया प्रियतमयेव प्रसारित वीचिहस्तयोपगूढः।)

विन्ध्य हा रेवेचा प्रियकर, त्याला ती लाटांच्या रूपानें आवेगानें आलिंगीत आहे. नर्मदेचा प्रवाह जलक्रीडेला विशेष अनुकूल असल्याचें क्र. ५७८ या गाथेंत सूचित केलें आहे. मदनसक्त रेवेच्या सरहस आलिंगनाचें वर्णन बालक दतीत आलेलें आहे. क्र. ५९९ या गाथेंत नर्मदेच्या साहचर्यांतील स्त्रीचें साहस-सांगितलेलें आहे. गोदावरीच्या बाबतींत अशीच क्र. २३१ ही गाथा आहे.

मुरला (८७०) : या गाथेंतलि मुरला ही नदी केरळ प्रांतातली आहे असें वेबरनें सांगितलें आहे. सूक्ष्म तपशील देणाऱ्या सरकारी नकाशांत मला ती सांपडली नाहीं. गाथाकोशसंपादनासाठीं देशोदेशींचे कवि हाल सातवाहनानें आमंत्रून आणले होते अशी कथा आहे. या गाथेचा कवि केरल प्रांतांतील होता म्हणून त्यानें स्वतःला प्रिय असलेल्या या नदीचा उल्लेख केलेला असावा, असें समजावयाचें कीं काय ? वस्तुतः त्या उल्लेखाचे बाबतींत फारसें खोलांत शिरण्याचें कारण नाहीं; कारण तो गाथासप्तशतीच्या प्रक्षिप्त उत्तरार्धांतलि व व तेलंग प्रतींतील आहे. तरीही आपण सर्व बाजूंनीं विचार करीत असल्यामुळें हा उल्लेख डावलतां येणार नाहीं.

रघुवंशांत मरुलेचा उल्लेख (४ : ५४-५५) आलेला आहे:—

> भयोत्सृष्ट विभूषाणां तेन केरलयोषिताम्
> अलकेषु चमूरेणुश्चूर्णप्रतिनिधीकृतः ॥
> मरुला मारुतोध्दूतमगमत्कैतकं रजः
> तद्योधवारबाणानामयत्नपटवासताम् ॥

यावरील टीकेंत मल्लिनाथ सांगतो, ' मरुला नाम केरलदेशेषु काचिन्नदी । ' कालिदासाच्या या नदीचें नांव मरुला आहे, तरीही तें मुरला आहे असें अनेक आधुनिक टीकाकारांनीं गृहीत धरलें आहे; कारण केरल प्रदेशाला मुरल अशी वैकल्पिक संज्ञा आहे. उत्तररामचरिताच्या तिसऱ्या अंकांत विष्कंभकांत तमसा व मुरला या नद्यांच्या देवतांचा प्रवेश आहे. पंचवटींत आलेल्या रामचंद्राच्या रक्षणाविषयीं सावध राहण्याबद्दल अगस्त्य ऋषींची पत्नी लोपामुद्रा हिनें गोदावरीला मुरलेबरोबर निरोप पाठविलेला आहे. तमसेच्या तीरावर वाल्मीकि ऋषींचा आश्रम होता (रामायण: बालकाण्ड: अध्याय २). भवभूति ही

(उत्तररामचरित : २-२-५) असेंच सांगतो. दंतकथांनीं अगस्तीचे आश्रम नगर व नाशिक जिल्ह्यांत जागोजाग मांडलेले आहेत, आणि वाल्मिकीचें मूलस्थान पुणे जिल्ह्यात वाल्हें येथें. तमसा नदीचा उगम पुराणांत ऋष्यवंत (मत्स्य : ११३·१२५), ऋक्ष (मार्कंण्डेय : ५४·२०) पर्वतावर मांडलेला आहे. 'महाराष्ट्राचा वसाहतकाल' या लेखमालेंत (ऐतिहासिक विविध विषयः लेखांक १२) श्री. राजवाडे यांनीं खानदेशांतील तामसवाडी या खेड्याचा संबंध तमसा नदीशीं जोडलेला आहे. पण त्या भागांत या नांवाची नदी नाहीं. हैद्राबाद राज्यांत आदिलाबादनजीक तामसी नांवाचें गांव आहे; पण या नांवाची नदी नाहीं. तमसेची सखी मुरला ही पंचवटीजवळ गोदावरीला मिळणारी एखादी नदी असावी, असें डॉ. बेलवलकर उत्तरराम-चरिताच्या मराठी भाषांतरांत (पृ. १३२) सांगतात. या विवेचनावरून स्पष्ट होतें कीं मुरलेचा शोध खानदेश, नासिक व नगर या भागांतच केला पाहिजे.

महाराष्ट्राच्या प्राचीन इतिहासांत अश्मक व मूलक या प्रदेशांचे उल्लेख वारंवार येतात. अयोध्येंतील राज्यक्रांतीमुळें सूर्यवंशीयांनीं राज्यत्याग करून दक्षिणापथांत अज्ञातवासांत काळ काढला. त्यांपैकीं अश्मक व मूलक राजांच्या नांवावरून या प्रादेशिक संज्ञा पडलेल्या असाव्यात. हे प्रदेश पैठणच्या आसमंतांत असल्याचे अनेक दाखले प्राचीन बौद्ध साहित्यांत आढळतात. अवंतीसुंदरीकथेत प्रेहरा व मुरला यांचा जोड उल्लेख आलेला आहे. या नद्यांत अपरान्तातील हत्ती विहार करीत, असें तेथें सांगितलें आहे. म्हणून या नद्या अपरान्तातील असाव्यात असा श्री. राघवन् (आन्ध्र ओरिएन्टल रिसर्च : मद्रास युनिव्हर्सिटी : भाग ५ : विभाग २) यांनीं कयास केला आहे. अपरान्तांत घाटमाथ्यावरील मावळ भागांचाहि समावेश होत असे. या नद्यांपैकीं प्रेहरा ही घटप्रभा किंवा मलप्रभा असावी असा श्री. सरकार (Select Inscriptions: Vol I : p. 458) यांचा अंदाज आहे. मला वाटतें प्रेहरा ही प्रवरा असावी. प्रवरेच्या कांठचे मराठी लोक तिचा उल्लेख पेहरा असाच करतात या अनुरोधानें मुरला ही प्रवरेला मिळणारी मुळा हीच होय असें ठरतें. मुळा या नांवाच्या नद्या नगर व पुणें जिल्ह्यांत आहेत. पुणें

जिल्ह्यांतली मुळा मुळशी पेठ्यांत उगम पावते व पुण्यानजीक मुठेस मिळते; त्यांचा मुळा-मुठा हा जोडप्रवाह दौंडनजीक भीमेला मिळतो. नगर जिल्ह्यांतली मुळा हरिश्चंद्रगडाजवळ उगम पावते व नेवाशानजीक प्रवरेला मिळते आणि त्यांचा जोडप्रवाह कायगांव टोक्याजवळ गोदावरीला मिळतो. या दोन मुळा नद्यांच्या दरम्यानच्या प्रदेशाला अनुलक्षून मूलक ही संज्ञा असावी असें वाटतें. मुळे, मुळ्ये, मुळीक वगैरे आडनांवें मराठी लोकांत, अनेक पोटजातींत, विशेषतः ह्याच भागांत आढळतात. याचें मूळ कारण हेंच असावें असें वाटतें. कृष्णराज राष्ट्रकूटाच्या ताम्रपटांत (भारत-इतिहास-संशोधक-मंडळ : इतिवृत्त : शके १८३८) मुह्ल नदीचा उल्लेख आलेला असून त्यांत ही नदी पूनक विषयांत मांडलेली आहे. प्रवरा व मुळा या नद्यांच्या खोऱ्यांतील वस्ती फार प्राचीन आहे. श्री. पारखी (आमचा नगर जिल्हा : पृ. ७३) सांगतात : ' मूळ रहिवाशांनी ती मुळा व आर्यांनीं वस्ती केली ती प्रवरा.' पुणें जिल्ह्यांतील मुळा नदीच्या कांठाजवळ असलेल्या माण या गांवीं नांगरट करीत असतांना माझ्या एका पक्षकाराला आढळलेलीं व त्याच्या कृपेमुळें मला मिळालेलीं क्षत्रप नाणीं माझ्या संग्रहीं आहेत. गोदावरी व प्रवरा यांच्या खोऱ्यांतील प्राग्‌ऐतिहासिक व सातवाहनकालीन अवशेष नुकतेच उजेडांत आलेले आहेत. या साधनांच्या अनुरोधानें महाराष्ट्राच्या वसाहतीबाबतच्या व प्राचीन इतिहासाविषयींच्या अनेक सिद्धांताचा फेरविचार करावा लागणार आहे.

मला वाटतें क्र. ८७० या गाथेंतील ' मुरला ' हा पाठ हस्तदोषजन्य असावा. क्र ६९६ या गाथेंत ' मुइल्लओ '= मूलकः असा शब्द आलेला आहे. या शब्दाला ' मुरुल्लिओ ' असा पाठभेद वेबरनें दिलेला आहे. यावरून वाटतें कीं क्र. ८७० या गाथेंतील मूळ उल्लेख ' मुइल्ला '= मुळा असा असावा.

मूळ गाथेंत मुरला नदीच्या वळणांचा उल्लेख केला आहे. नगर जिल्ह्यांतली मुळा अशीच नागमोडी आहे : " Its bed throughout is tortuous and deep and the surface of the vally is cut by vast fissures formed by the mountain torrents that dash into the main stream. Passing the town of Kotul it takes a bend to the south winding between the rocky precipices

at the foot of Baleshwar. It then...persues a mean easterly course between Sangamner and Parner...It then takes a sudden turn to the north-east and enters the plain of Rahuri...and joins the Pravara at the village of Sangam." (Bombay Gazetteer, Ahmednagar; p. 8) वळणांमुळें संकेताला योग्य अशा आडोशांचा मूळ गार्थेत आलेला उल्लेख किती यथार्थ आहे याची या अधिकृत वर्णनावरून खात्री पटते. हा उल्लेख मुळेच्या उगमाच्या आसमंतांतील भागाला अनुलक्षून केलेला असला पाहिजे.

यमुना : (६६९) : हिमालयांत जम्नोत्रीनजीक उगम पावणारी यमुना प्रयाग येथें गंगेला मिळते. गंगेचा वर्ण धवल व यमुनेचा श्यामल. गाथासप्तशतींतील यमुनेचा उल्लेख केवळ सांकेतिक आहे आणि त्यांत तिचा वर्ण नमूद केलेला आहे.

(२) पर्वत

मन्दर:(४७५): महाभारतांत मन्दर पर्वत हिमालयश्रेणींत, मेरूच्या पूर्व दिशेस (अनुशासन पर्वः अ. १९; द्रोणपर्वः अ. ९४; वनपर्वः अ. १६२) असल्याचें सांगितलें आहे. श्री. नन्दलाल दे हे याची ओळख भागलपुरानजीकच्या एका पर्वताशीं **(Geographical Dictionary of Ancient and Medieval India : p. 124)** पटवितात. मन्दर पर्वतावर कुबेराची वस्ती आहे (वनपर्व १६३ : ३६); विष्णूनें कासवाचें रूप धारण केलें, मन्दर पर्वत पाठीवर घेतला व समुद्रांत प्रवेश केला, नंतर देवदानवांनीं मन्दराला वासुकीचे वेढे देऊन समुद्र-मंथन केलें, अशी कथा आहे. क. ४७५ या गार्थेतील मन्दर पर्वताचा उल्लेख केवळ सांकेतिक आहे.

मलय : (४९७, ५४२) : भारतांत सात कुलपर्वत आहेत. त्यापैकीं मलय हा सर्वांत दक्षिणेकडचा. हा सह्याद्रीचा मलबारांतील भाग. तो कावेरीच्या दक्षिणेस कन्याकुमारीपर्यंत पसरलेला आहे. त्याचा आकार प्रौढेच्या स्तनासारखा आहे असें कालिदास (रघुवंशः ४·५१) सांगतो. हत्ती व नाग, चंदन व वेलदोडे यांबद्दल, तसेंच त्यावरून उत्तरेकडे वाहणाऱ्या थंडगार वाऱ्यांबद्दल (कुमारसंभव : ८·२५)

मलयाची प्राचीन काळापासून ख्याति आहे. हे सुगंधि थंडगार वारे भारतांतील प्रेमी जनांना प्रिय वाटतात आणि विरही जनांना दुःसह; जणूं त्यावरील विषारी नागांच्या फूत्कारांसारखे! गाथासप्तशतींतील मलयाचा उल्लेख केवळ सांकेतिक आहे.

विन्ध्य: (७०, ११५, ११६, ११७ ५७७, ६३१, ७८८): येथें विन्ध्य ह्या विषयाचें विवेचन विशेष विस्तारानें केलेलें आहे. कारण गाथासप्तशतींत त्याचे अनेक उल्लेख आलेले आहेत. ग्रंथरचनेच्या स्थलनिर्णयाच्या दृष्टीनें हा विषय विशेष महत्त्वाचा आहे. संदर्भाच्या अनुरोधानें विन्ध्याद्रीची ओळख मी इन्ध्याद्रीशीं पटविलेली आहे.

भारताच्या सप्तकुलाचलांत विन्ध्याद्रीचें स्थान सह्याद्रि इतकें महत्त्वाचें आहे. विन्ध्यश्रेणि पश्चिमेस खंबायतच्या आखातापासून पूर्वेस बंगालच्या उपसागरापर्यंत व उत्तरेस दिल्लीच्या तटबंदीपर्यंत पसरलेली आहे असें कोणी (Asiatic Researches: XIV.382) सांगतात. खुद्द विन्ध्याचल हें स्थान संयुक्त प्रांतांत मिर्झापुरानजिक गंगातीरीं आहे. येथें विन्ध्येश्वरीचें पुरातन मंदिर आहे. शाक्त मताच्या प्रसारामुळें विन्ध्याद्रीच्या मर्यादा एवढ्या विस्तृत मानण्यांत आलेल्या असणें संभवनीय आहे. सामान्यतः विन्ध्याद्रीचा विस्तार अंमरकंटकपासून अलीराजपुरापर्यंत आहे असें मानण्यांत येतें.

वेदकालीन आर्यांना विन्ध्य पर्वताची माहिती नाहीं. गंगा-यमुना दुआबांत त्यांच्या वसाहती फैलावल्यानंतर विन्ध्य ही आर्यावर्ताची दक्षिण सीमा मानण्यांत येऊं लागली (वसिष्ठ धर्मसूत्र: १. ७). दक्षिणापथांत आर्यांच्या वसाहती संहिताकालांत झालेल्या असाव्यात. अपरान्तांत भृगु, मध्यभागांत गौतम व वसिष्ठ आणि विदर्भांत अगस्ति यांच्या नेतृत्वांखालीं आर्यांच्या वसाहती महाराष्ट्रांत झालेल्या आहेत. गोत्रांचा प्रादेशिक प्रादुर्भाव आपणांस निश्चित करतां आला तर या वसाहतींच्या संदर्भाचे धागेदोरे सांपडूं शकतील. आन्ध्र, पुण्ड्र, शबर वगैरे विश्वामित्राच्या बहिष्कृत पुत्रांची कथा ऐतरेय-ब्राह्मणांत आलेली आहे. आर्यावर्तांतून हद्दपार झालेल्या या जमाती विन्ध्य पर्वताच्या परिसरांत स्थायिक झाल्या. विश्वामित्राच्या व अगस्तीच्या कथांत ऐतिहासिक,

भौगोलिक व सामाजिक सत्यें सामावलेलीं आहेत. विश्वामित्राच्या काळापर्यंत आर्यांचा दक्षिणापथांत प्रवेश झालेला नव्हता. उंचीच्या बाबतींत मेरूशीं स्पर्धा करणारा विन्ध्य कुशीवर कलंडला, म्हणजे ज्वालामुखींच्या उद्रेकांत सह्याद्रि जन्मला तेव्हां विन्ध्य भूमींत खचला. ही घटना उत्तरकालीन असणें संभाव्य आहे. भूगोलशास्त्रज्ञ सांगतात कीं विन्ध्य हा स्वतंत्र पर्वत नसून गंगा-यमुना मैदानाची कड आहे, माळव्याच्या पठाराची भिंवई आहे. नर्मदेच्या दक्षिण किनाऱ्यावरून तो उत्तुंग तटबंदीसारखा दिसतो आणि विन्ध्याच्या कडेवरून नर्मदा ही या तटबंदीलगत खडकांत खोदलेल्या खंदकासारखी दिसते! अगस्तीची पत्नी लोपामुद्रा ही विदर्भाची राजकन्या. अगस्ति दक्षिणेंत आला तेव्हां त्याच्याबरोबर संरक्षणासाठीं क्षत्रियांचीं अठरा आणि वसाहतींसाठीं व संवर्धनासाठीं शेतकरी व धनगर यांचीं अनेक कुलें होतीं. या परंपरांवरून अनुमान करतां येतें कीं अगस्तीनें दक्षिणापथांत विदर्भा-तून प्रवेश केला आणि प्रथम तेथें संस्कृतीचें बीजारोपण केलें. पुढें अगस्ति तामीळ प्रांतांत गेला. तेथील प्रदेश अवर्षणापासून मुक्त करण्यासाठीं लोपामुद्रेनें कावेरीचें रूप धारण केलें; म्हणजे आर्यांच्या आघाडीवरल्या या टोळीनें या भागांत जागोजाग बंधारे घालून पाटपाण्याची व्यवस्था केली.

हल्लीं जो पर्वत विन्ध्य या नांवानें ओळखला जातो त्याला पूर्वीही हेंच नांव होतें किंवा कसें, हा प्रश्न वादग्रस्त आहे. विन्ध्य श्रेणींतील वेगवेगळ्या भागांना निरनिराळीं नांवें होतीं : (१) ऋक्ष, ऋक्षपाद, ऋक्षवान् आणि ऋष्यवंत किंवा ऋक्षवंत; (२) पारिपात्र किंवा पारियात्र; आणि (३) विन्ध्य. आतां या तीन्ही पर्वतांची श्रेणी विन्ध्य या एकाच नांवानें ओळखली जाते. या पर्वतांबद्दचे आधारग्रंथातील उल्लेख गोंधळलेले आहेत. वनपर्वातील ऋक्षवान् (६१·२३-२४) हा सातपुडा असावा. प्रा. मिराशी यांचें असेंच मत आहे. श्री. नन्दलाल दे (पूर्वोक्त : Map of Ancient India) हे ऋक्ष पर्वत मगधाच्या पश्चिम-दक्षिण सीमेवर मांडतात आणि विन्ध्य पर्वत हिरण्यवाहा उर्फ शोण नदीच्या उत्तरेस. नर्मदेचा उगम ऋक्ष पर्वतांत होतो असें ब्रह्माण्ड, मार्कण्डेय व वायु या पुराणांत सांगितलेलें आहे; तर विष्णुपुराणांत तिचा उगम विन्ध्य पर्वतांत दिलेला आहे. नर्मदा व तापी यांच्या दरम्यानच्या पर्वतश्रेणीला

ऋक्षवंत आणि माही व वेत्रवती यांच्या मधल्या श्रेणीला पारियात्र अशीं नांवें हिंदुस्थानच्या केंब्रिज इतिहासाच्या प्राचीन भागांत (भाग पहिल्यांतील नकाशामध्यें) दिलेलीं आहेत. दक्षिणापथांत प्रविष्ट होण्यापूर्वी आर्यसंस्कृतीचा विशेष उत्कर्ष संयुक्त प्रांतांत झालेला असल्यामुळें त्या भागाला सोइस्कर अशा प्रदेशांतून आर्यांनीं विदर्भांत प्रवेश केला असला पाहिजे. अर्थात् या काळांत विन्ध्य ही संज्ञा या श्रेणीच्या पूर्वभागाला अनुलक्षून वापरण्यांत येत असली पाहिजे. केंब्रिज इतिहासांत हा या भागांतच मांडलेला आहे. पारियात्र म्हणजे यात्रेची मर्यादा (भरतस्थलादर्शः श्री सहस्रबुद्धेः पृ. १२६); कारण शिष्ट आर्यांनीं दक्षिण भारत हा बहिष्कृत मानलेला प्रदेश ! पारियात्र हें कारुश व मालव यांचें वसतिस्थान असें वायुपुराण (Wilson: II : III. p. 133) सांगतें. या गोंधळांतून निर्णय घेण्याला एकच साधन आहे; तें ही दुबळें आहे. या पर्वतांपासून निघणाऱ्या नद्यांचा तपशील पुराणांत दिलेला आहे; त्यांच्या नांवांपैकीं विश्वसनीय व आद्य कोणतीं या वादांत न शिरतां या नद्यांबद्दलच्या बहु व बुद्धिमान्य अशा उल्लेखाच्या अनुरोधानेंच या संज्ञा निश्चित केल्या पाहिजेत.

पुराणांतील नद्यांच्या प्राचीन संज्ञांची ओळख प्रचलित नांवांशीं अनेक साधनांच्या साह्यानें पटविण्यांत आलेली आहे. श्री. पार्जिटर (Ancient Indian Historical Tradition) सांगतातः पुराणांतील पर्णाशा ही माळव्यांतली बाणस (पृ. २७९) आणि चर्मण्वती, वेत्रवती व शुक्तिमती या अनुक्रमें (पृ. २५९) चंबळ, बेटवा व केन. वेत्रवती व शुक्तिमती यांचे दरम्यानची धसान ही दशार्णा (भारतवर्षीय भूवर्णनः श्री. पंडितः पृ. २५२); तमसा ही तोंस (Wilford : Asiatic Researches : XIV. 396 :). श्री. नन्दलाल दे आणि डॉ. रॉयचौधरी (Political History of Ancient India) यांनीं पुढील ओळखी पटविल्या आहेतः तापीला मिळणारी पूर्णा ही पयोष्णी; पैनगंगा ही निर्विन्ध्या; वैनगंगा ही वेण्वा; वर्धा ही भद्रा. या ओळखी जमेस धरल्या म्हणजे दिसून येतें कीं हल्लीं ज्या पर्वतश्रेणीला विन्ध्य हें नांव देण्यांत येतें त्याच्या पश्चिम भागाला पारियात्र व पूर्व भागाला ऋक्षवान् अशीं नांवें पुराणरचनाकाळांत प्रचलित होतीं आणि अजंठा श्रेणीपासून महादेव श्रेणीपर्यंतच्या पर्वतांना विन्ध्य हें नांव होतें.


पुराण : ऋष्यवंत, ऋक्ष, ऋक्षपाद किंवा ऋक्षवान् पर्वतांत उगम पावणाऱ्या नद्या :

वायुः	करतोया	चित्रकूटा	तमसा	दशार्णा	नर्मदा	शुक्तिमती	शोण	विपाशा	महानदी	
ब्रह्माण्ड	करमोदा	,,		,,	,,	शक्तिमती	,,	विपाप्या	,,	
मार्कण्डेयः	,,	,,	,,	,,	,,	शुक्तिमती	,,	विपाशा		
मत्स्यः		,,	,,	,,		,,				
विष्णुः			×		×	×	×	×	×	तापी, पयोष्णी, निर्विन्ध्या.

पुराण :	पारिपात्र किंवा पारियात्र पर्वतांत उगम पावणाऱ्या नद्या :											
वायुः	वेत्रवती	सिंधु	अवन्ती	शिप्रा	परा	विदिशा	चर्मण्वती	मही	वेदवती	वेदस्मृति	वृत्रघ्नी	
ब्रह्माण्डः	देववती	,,	,,	,,		,,	,,	,,	,,	देवस्मृति	वातघ्नी	
मार्कण्डेयः	वेत्रवती	,,	,,	,,	पारा	,,			,,	वेदस्मृति	वृत्रघ्नी	
मत्स्यः	,,	,,	,,	,,	,,	विपुशा			वेणुमती	,,	,,	नर्मदा
विष्णुः	,, ×	×		×			×	×		,,		

पुराण :	विन्ध्य पर्वतांत उगम पावणाऱ्या नद्या :										
वायुः	तापी	पयोष्णि	मद्रा	निर्विंध्या	तोया	निषधा	वेण्वा	वैतरणी	कुमुद्वती	महागौरी	दुर्गा	
ब्रह्माण्डः	,,	,,	सिप्रा	,,	,,		वेणा	,,	,,	,,	,,	
मार्कण्डेयः	,,	,,	,,	,,		निषधावती	,,	,,	,,	,,		
मत्स्यः	,,	,,	क्षिप्रा	,,	,,	ऋषभावती	,,	,,	,,	,,	दुर्गता	
विष्णुः	×	×	×	×			×					नर्मदा

कोष्टकांसंबंधीं खुलासा : पुराणांत आढळलीं तींच नांवें येथें दिलीं आहेत. अपवादात्मक उल्लेख उभ्या जाड रेषेबाहेर दिले आहेत. यांपैकीं ज्या नद्या सोबतच्या नकाशांत आहेत त्यांवर × चिन्ह केलेलें आहे.


(दशार्ण)
विदर्भ
(भोज)
(निषध)
अवन्ती
उज्जैन

अजंठा श्रेणीलाच चांदोर, इन्ध्याद्रि, इन्ह्याद्रि, सह्याद्रि व सातमाळ अशीं वैकल्पिक स्थानिक नांवें आहेत. इन्ध्याद्रि हें तिचें सर्वांत प्राचीन नांव. ही सह्याद्रीची शाखा असून तिचा विस्तार नाशिक जिल्ह्यांतील मनमाडपासून यवतमाळ जिल्ह्यांतील पेनगंगा व वर्धा यांच्या खोऱ्यापर्यंत आहे. औरंगाबाद जिल्ह्यांत या श्रेणीला अजंठा आणि परभणी व निजामाबाद जिल्ह्यांत सह्याद्रि म्हणतात. नाशिक जिल्ह्यांतला या श्रेणीचा भाग चांदूर श्रेणी या नांवानें ओळखला जातो. गाथासप्तशतींतला विन्ध्याद्रि हा अर्वाचीन इन्ध्याद्रि. ही ओळख पटली म्हणजे गाथासप्तशतीचें रचनास्थान निश्चित होतें. या श्रेणीच्या आरंभानजीक अजंठा येथें व आसपास सातवाहनकालीन लेणीं आहेत व दक्षिणेस गोदातीरीं प्रतिष्ठान उर्फ पैठण ही त्यांची राजधानी आहे; आणि तिच्या अंतानजीकच्या चांदा जिल्ह्यांत सातवाहनांचीं विशिष्ट धर्तीचीं नाणीं मिळालेलीं आहेत. प्राचीन काळापासून विदर्भ हें महाराष्ट्राचें संस्कृति-संवर्धन क्षेत्र आहे. या भागांतले अनेक कवि हाल सातवाहनाच्या सारस्वत-मंडलांत समाविष्ट झाले असले पाहिजेत आणि त्यांनींच आपल्या गाथांत या पर्वताचीं जिव्हाळ्याचीं वर्णनें केलीं असलीं पाहिजेत.

(३) संकीर्ण, सांकेतिक व पौराणिक उल्लेख :

गाथासप्तशतींत संकीर्ण व सांकेतिक स्वरूपाचे आणि पौराणिक असे अनेक भौगोलिक उल्लेख आलेले आहेत. क्र. ४९१ व ९४७ या गाथांमध्यें सरोवरांचे उल्लेख आहेत आणि क्र. ८, ११०, ३९१, ४१४, ४९१, ७१४ व ९४७ यामध्यें ग्रामतडागांचे आहेत. ग्रामतडाग हें कोंकण व मावळ भागांचें वैशिष्ट्य आहे. क्र. ४७१ मध्यें पावसाळ्याच्या आरंभीं हंस मानस सरोवराकडे धांव घेतात असा उल्लेख आहे. हा उल्लेख केवळ सांकेतिक आहे. ब्रह्मदेवानें मनानें हें सरोवर निर्माण केलें म्हणून त्यास मान, मानस हें नांव पडलें (गोडबोले: भारतवर्षीय प्राचीन ऐतिहासिक कोश) अशी परंपरा आहे. हेमाम्भोज नांवाचीं सुवर्णकमलें फक्त मानससरोवरांत फुलतात असें कालिदासानें (रघुः १३·६०) सांगितलें आहे. दर पावसाळ्याच्या आरंभीं हंस मानस-सरोवराकडे जातात असा आपल्या कवींचा संकेत आहे. दक्षिणेकडून मानस

सरोवरावर अनेक हंस आलेले आपण प्रत्यक्ष पाहिले असल्याचें श्री. मूरक्राफ्ट (Asiatic Researches. XII : 466) सांगतो. अर्थात् हा हंसांच्या स्थलांतराचा संकेत केवळ काल्पनिक आहे, निरीक्षणावर आधारलेला नाहीं, असें मानण्याचें कारण नाहीं. क्र. ६७९ या गाथेंत सैन्धव पर्वताचा सांकेतिक उल्लेख आहे. सॉल्ट रेंज ही पर्वतश्रेणि पंजाबांतील झेलम, शाहपूर व मियानवाली या जिल्ह्यांत पसरलेली आहे. सैन्धवाचा हा जगांतला सर्वांत मोठा सांठा आहे. या भागांतले लोक स्वयंपाकासाठीं मिठाऐवजीं सैन्धवच वापरतात. तांबूस पांढुरक्या रंगाच्या ह्या पर्वतांचे उतार नापीक, निर्वृक्ष असले तरी ते उन्हांत चमकतात व चांदण्यांत शीतल भासतात.

कुरु (४४३), दुग्धसागर (३८८, ४७५), नरक (८७२), लङ्का (३१३), व्रज (११२), स्वर्ग (१२५,१६७) व क्षीरोद (११७) हे पौराणिक-भौगोलिक उल्लेख केवळ सांकेतिक स्वरूपाचे आहेत.

गाथासप्तशतींत दुग्ध व क्षीर यांव्यतिरिक्त समुद्राचे ५ उल्लेख आलेले आहेत. गणपतीनें सोंडेनें सागर शोषला (क्र. ४०३) व देव-दानवांनीं समुद्रमंथन केलें (क्र. ५९३), हे दोन उल्लेख पौराणिक आहेत. क्र. ७'१४ व ९७६ हे उल्लेख सांकेतिक आहेत. क्र. ७४० मध्यें समुद्रपर्यटन करणाऱ्या जहाजावरील डोलकाठीचा उल्लेख आलेला आहे. पूर्वसातवाहनांचें राज्य पश्चिम समुद्रालगतच्या अपरान्तांत होतें हें निश्चित. या भागांतील बंदरांतून परदेशांशीं मोठा दर्यावर्दी व्यापार चालू होता हेही निश्चित. हा उल्लेख महत्त्वाचा आहे. हालानंतर गोतमीपुत्र सातकर्णीच्या कारकीर्दींत सातवाहनांचें साम्राज्य पश्चिम समुद्रापासून पूर्व समुद्रापर्यंत पसरलेलें होतें हें पाण्डव लेण्यांतील त्याच्या लेखांवरून निश्चित ठरतें. डोलकाठ्या असलेल्या जहाजांच्या प्रतिमा पूर्व किनाऱ्यालगतच्या भागांत आढळणाऱ्या सातवाहन-मुद्रांवर मिळालेल्या आहेत. सातवाहनांचा सामुद्री संबंध या उल्लेखावरून स्पष्टपणें सिद्ध होतो.

दिशांपैकीं फक्त दक्षिण दिशेचे उल्लेख (क्र. ९७ दक्खिण, क्र. ४४३ दाहिण, क्र. ७७१ दाहिण) आहेत. क्र. ४७१ मध्यें हंस मानससरोवराकडे जातात त्याचप्रमाणें राजाचे शत्रु त्यांचें अनुकरण करतात, असा उल्लेख आहे. हंसांचा

हा प्रवास दक्षिणेकडून उत्तरेकडे आहे हें स्पष्ट आहे. हा राजा दाक्षिणात्य असून त्याचे शत्रु उत्तरेकडे पलायन करते झाले, असा निष्कर्ष या उल्लेखांत सूचित आहे असें मानावयास प्रत्यवाय नाहीं.

निष्कर्ष :

गाथासप्तशतींतील भौगोलिक उल्लेखांवरून कांहीं निष्कर्ष निघतात :

गाथासप्तशतींत दक्षिण भारतांतील नद्यांचे व पर्वतांचे उल्लेख आढळत असले तरी यमुना, विन्ध्याचल व व्याधजीवन यांविषयींच्या उल्लेखांवरून या ग्रंथाची रचना उत्तर भारतांत झाली असली पाहिजे असें निश्चित ठरतें, असा श्री. माथुर (नागरी प्रचारिणी पत्रिका : वर्ष ५६: अंक ३-४ : संवत २००८ : केशव-स्मृति अंकः 'गाथासप्तशती–उसका रचनाकाल और रचयिता', पृ. २७७) यांचा सिद्धान्त आहे. ते सांगतात कीं गाथासप्तशतींत उत्तर हिंदुस्थानांतील "पर्वतीय भूभाग, सिंचाई और खेती के तरीकों, वहां उत्पन्न होनेवाली फसलों और वनस्पतियों, झीलों और व्याधों, अनार्य जाति की युवतियों के प्रसंग, विन्ध्याचल और अरवल्ली पर्वत की घाटियों तथा उनमें बसनेवाली भील और व्याध जातियों के जीवन के यथार्थ चित्र प्रस्तुत" होत असल्यामुळें हा सिद्धान्त निश्चितपणें प्रस्थापित होतो, असें त्यांचें विधान आहे. हा सिद्धान्त किती फोल आहे हें वरील विवेचनावरून लक्षांत आलें असेलच असा भरंवसा वाटतो.

गाथसप्तशतींतील निर्दिष्टांपैकीं बहुतेक स्थानें महाराष्ट्रांतलि आहेत. अन्य स्थानांचे आहेत तसे हे उल्लेख सांकेतिक नाहींत. गाथासप्तशतींतला विन्ध्याद्रि हा इन्ध्याद्रि; गिरिणई ही गिरणा आणि मुरला ही मुळा. नगर व पुणें या जिल्ह्यांतील मुळांच्या दरम्यानचा प्रदेश तो प्राचीन मूळक देश. नद्यांपैकीं बहुसंख्य उल्लेख गोदावरीचे आहेत. गाथासप्तशतीच्या काळांत गोदावरीपेक्षां तापीला धार्मिक माहात्म्य अधिक असावें. गोदावरीच्या खोऱ्यांतल्या व इन्ध्याद्रीच्या परिसरांतल्या कवींनीं गाथासप्तशतीच्या रचनेंत विशेष आस्थेनें व प्रामुख्यानें भाग घेतलेला असावा. गाथासप्तशती हा दाक्षिणात्यांचा, महाराष्ट्री-यांचा सुभाषित कोश आहे हें यावरून निश्चित ठरतें. गाथासप्तशतीच्या

उत्तरार्धात हिमाचे उल्लेख आलेले (क. ७६८ व क. ८९३) आहेत. दक्षिणेंत जन्मलेल्या या गाथांतील हिमाचे उल्लेख वेबरला विलक्षण वाटले आहेत. रामायणकाळी या भागांत दण्डकारण्य होतें आणि मध्ययुगांतही येथें दाट जंगल होतें. सह्याद्रीच्या घाटमाथ्यालगतच्या भागांत हल्लींही अधून मधून पाण्याच्या पृष्ठभागावर बर्फाचा तवंग जमण्याइतकी कडक थंडी पडते. अणकाईचा डोंगर हा इन्ध्याद्रीचाच एक भाग आहे. या डोंगरावर धुक्याचें हिमकणांत रूपांतर होऊन डोंगर हिमवर्षावानें आच्छादून गेल्याचें वृत्त नुकतेंच प्रसिध्द (सकाळ : ता. १३।१।१९५४) झालेलें आहे. यावरून या उल्लेखांत अनैसर्गिक अगर अवास्तव असें कांहीं नाहीं असें दिसून येईल. अर्थात् गाथासप्तशतींतील भौगोलिक उल्लेख तिच्या महाराष्ट्रीयत्वाला पोषक असेच आहेत.

९ गाथासप्तशतींतील वन आणि उपवन श्री :

गाथासप्तशतींत फुलांफळांचें, वृक्षलतांचे व शेतीवाडीचे अनेक उल्लेख आलेले आहेत. साहजिक आहे. कारण रानांवनांत प्रत्यहीं हिंडणाऱ्या, त्यांच्या आसामंतांत राहणाऱ्या व शेतवाडींत जातीनें काम करणाऱ्या श्रमिकांचीं व ग्रामीणांची या गाथा हीं भावगीतें आहेत. उल्लेखित वनस्पतींपैकीं बहुतेक स्थूलमानानें आपल्या परिचयाच्या आहेत; पण आपली माहिती उडती असते; शिवाय तेव्हां प्रचलित असलेल्या कांहीं संज्ञांचे अर्थ आतां बदलले आहेत, हवामानांतल्या बदलांमुळें कांहीं वनस्पति नामशेष झालेल्या आहेत. गाथांतील अभिप्रेत मर्म उमजण्यासाठीं त्यांची निश्चित माहिती असणें अवश्य आहे. शिवाय या चर्चेतून कांहीं निष्कर्ष निघण्याचाही संभव आहे. या प्रकरणांत उल्लेखित वनस्पतींची माहिती संकलित करून दिली आहे; शास्त्रोक्त वर्गीकरणानुसार नव्हे, अकारवारीनें.

अङ्कोल्ल (अङ्कोट ३१३; अङ्कोल्ल ४९७, ७७१, ७७२, ७७३) : **Alangium Decaptalum (Lamrokii); Alangium-hexapetalum; Eryoibe panioulata**) : अमरकोशांत व देशीनाममालेंत हा शब्द नाहीं. अङ्कोल्लि व कङ्कोल्लि या देशी शब्दांचा अर्थ अशोक; तो या गाथांना अभिप्रेत नाहीं; फार तर क. ३१३ मधील उल्लेख अशोकाचा असेल; इतरत्र कङ्कोल्लि

ह्याच शब्द मूळ स्वरूपांत आलेला असल्यामुळें हस्तदोषानें हें स्वरूप आलेलें असणें संभवत नाहीं. टीकेंत गंगाधर सांगतो, अङ्कोल्ल म्हणजे अङ्कोट. अमरकोशांत याचा अर्थ निकोचक (अक्षोट कर्पराली द्वौ अङ्कोटे तु निकोचकः।) असा दिलेला आहे. अक्षोट म्हणजे अक्रोड. निकोचक म्हणजे पिस्ता. अंकोट व अक्षोट हे एकच असें वेबर सांगतो. तें बरोबर नाहीं. शिवाय त्यांची अंकोल्लाशीं ओळख पटत नाहीं. हिंदुस्थानांत अक्रोडाचीं झाडें फक्त हिमालयाच्या उतारांवर वाढतात व पिस्त्याचीं झाडें कोठेंही आढळत नाहींत. जायफळालाही अक्रोड हें वैकल्पिक नांव असल्याचें संशोधकांनीं (Talbot : Forest Flora of the Bombay Presidency: Vol.II:p 489) नमूद केलेलें आहे. अङ्कोल्लाचीं झाडें घरोघर, अंगणांत (क्र. ४९७) व परसांत (क्र. ३१३) असल्याचें गाथा सांगतात. गंगाधर सांगतोः "अङ्कोटो गृहवाटिकायामेव प्रायशो भवतीति प्रसिद्धिः।" गाथासप्तशतीचें संपादन झालें त्या भागांत व काळांत शीतप्रदेशांतले हे वृक्ष उपलब्ध असणें अशक्य आहे. सबब गाथांतील अङ्को-ल्लाची ओळख परिचित अंकोटाशींच पटविली पाहिजे. हीं झाडें हिंदुस्थानांतील बहुतेक प्रांतांत (वनौषधि-गुणादर्श : १·२) विशेषतः दक्षिणापथांत (Barnett : Cyclopaedia) आढळतात. अंकोल किंवा अंकोट हें झाड कंटकयुक्त किंवा कंटकरहितही असतें. त्याचीं पानें दोन बोटें रुंद व कण्हेरीच्या पानांसारखीं ५ ते ६ इंच लांबीचीं असतात. फुलें पांढरीं किंवा पिवळीं (Talbot,Forest Flora: Vol. II : p. 281) असतात. कोंकणांत, घाटांलगतच्या पावसाळी जंगलांत उगवणाऱ्या झाडांचीं फुलें सुवासिक असतात (पूर्वोक्त : Wightiana variety). इतरत्र अङ्कोलाचीं झाडें आढळत नाहींत. मार्च, एप्रिल व मे या महिन्यांत हीं फुलें फुलतात व फुलांच्या हंगामांत झाड पर्णहीन असतें (Descriptive Botanical List : Witt: p. 129). अक्रोडाला किंवा पिस्त्याला सुगंधी कळ्या व फुलें येत नाहींत, अंकोटाला येतात. या सुगंधी कळ्यांचे व फुलांचे उल्लेख क्र. ४७९, ७७२ व ७७३ या गाथांत आलेले आहेत. क्र. ७७१ या गाथेंत वसंतांत रस्तोरस्तीं उडणाऱ्या पानांचा उल्लेख आहे. तो महत्वाचा आहे. श्री. विट् यांनीं या झाडाचें हे वैशिष्ट्य नमूद केलेलें आहे. या

प्रमाणांवरून गाथांतील अक्कोल हा अक्रोड किंवा पिस्ता नव्हे, अंकोट होय, असें निश्चित होतें. याला शृंगारवेल असेंही वैकल्पिक अभिधान आहे.

अशोक : (असोअ : ७,४०५; कङ्केली : २७९, ४०४, ७४८ व वञ्जुल ४२२; पैकीं वञ्जुल याचा अर्थ बोरू किंवा अशोक असा आहे.) Jonesia: Asoca, Polyalthia longifolia; श्री. टाल्बट यांनीं (Forest Flora : Vol I.p 457) अशोकाला Saraca, Linn ही संज्ञा दिलेली असून त्याची देशी नांवें अशोक व जासंद अशीं दिलेलीं आहेत. देशीनाममालेंत अंकेल्लि (१·७) व कङ्केल्लि (२·१२) या देशी शब्दांचा अर्थ अशोक असा दिलेला आहे. श्री. आपटे सांगतात (महाराष्ट्र-साहित्य-पत्रिका : वर्ष २१ अंक २): " कंकेल्लि म्हणजे अशोक असा समज आहे, पण तो योग्य आहे असें दिसत नाहीं. कंकेलि म्हणजे संकेश्वर असें असावें. यांचें नांव कोणी संकासूर किंवा शंकासूर असेंही सांगतात." गाथासप्तशतीला अभिप्रेत असलेला कङ्केल्लि म्हणजे अशोकच. शंकासुराचीं पानें तोकडीं असतात आणि अशोकाचीं लांब व अणकुचीदार आणि शोभिवंत, कुरळीं व नाजूक असतात. अशोकाच्या पानांचें सौंदर्य अद्वितीय (क्र. २७९) असतें, म्हणूनच सुंदरीच्या बोटांना कङ्केल्लि-पल्लवांची उपमा (क्र. ४०४) देण्यांत येते. अशी उपमा संकासुराच्या बाबतींत संभवत नाहीं. अशोकाचा बांधा उंच, रेखीव व डबदार असतो. तो सर्व ऋतूंत भरदार व हिरवागार असतो. त्याची छाया गर्द असते. उन्हाळ्यांत त्याला भगवीं, नारिंगी, पिवळीं व लाल फुलें येतात. मोसमाच्या भरांत तो बुडक्यापासून शेंड्यापर्यंत फुलांनीं डंवरलेला असतो. अशोक हें हिंदुस्थानचें वैशिष्ट्य व वनस्पतिसृष्टीचें भूषण आहे. सर विल्यम जोन्स सांगतो, फुललेल्या अशोकाचें मनोहारित्व वनस्पतिसृष्टींत अद्वितीय आहे. याच्या फुलांच्या दर्शनानें स्त्रिया उत्तेजित होतात असें अशोककल्पांत सांगितलेलें आहे. या स्वरूपसुंदराला दोहद-संकेतानुसार तरुणींचे लत्ताप्रहार सहन करावे लागतात. किंबहुना, अशा पादपूजेशिवाय हा शुंभ फुलतच नाहीं ! अशोक एवढा विदग्ध व समयज्ञ कीं अशा प्रहारांनीं चिडण्याऐवजीं तो बहरून येतो; कारण, या तरुणी त्याला पीडा द्यावयास उद्युक्त झालेल्या नसतात, त्या क्रीडेच्या

भरांत उत्तेजित झालेल्या असतात ! अशोकदोहदाला लायक व सज्ज अशा तरुणी क्रीडेसाठीं कधींही फिरकत नाहीं अशा गद्य आचारांतल्या अशोकांना कधीं फुलें आलेलीं आपण पाहिलीं नाहींत असें त्या भागांत हयात व्यतीत केलेले वृद्ध सांगतात. प्राचीन व मध्ययुगीन वाङ्मयांत व जीवनांत अशोकाला महत्त्वाचें स्थान होतें. त्याच्या मोहिनीचा प्रत्यय ऋग्वेदांतील ऋचांपासून आढळतो. अशोकाचें फूल शंकराचें विशेष आवडतें. अशोकाच्या नांवाशीं संबद्ध असलेले अनेक उत्सव हिंदू समाज पाळतो. गौतमबुद्धाचा जन्म अशोक वृक्षाखालीं झाला अशी आख्यायिका असल्यामुळें बौद्धहि त्याला पवित्र मानीत. अशा या सुंदर वृक्षाला आपण अलिकडे पारखे झालों आहोंत, हें मात्र खरें.

आम्र : (१९, ६२, ९७, १४३, ३३१, ३९६, ४९९, ५४२, ५४३, ५८५, ५९५, ६६६, ७७७, ८२०, ९९४) : **Magnifera Indica** : उल्लेखांच्या संख्येवरून दिसतें कीं आम्रवृक्ष हा गाथाकवींचा अत्यंत आवडीचा वृक्ष आहे. साहजिक आहे. अशोकाचें अंगीं असलेलें बहुतेक सर्व गुण आम्रवृक्षाचे अंगीं आहेत; शिवाय याचे अंगीं असे कांहीं गुण आहेत कीं ते त्याचे अंगीं नाहींत. अशोक हा फक्त शोभिवंत वृक्ष आहे आणि आम्र हा उपयुक्त. अशोकाचें सौंदर्य केवळ निसर्गसिद्ध आहे. सहेतुक संवर्धन, संगोपन व सांनिवेश करून मनुष्यानें आम्राच्या नैसर्गिक गुणांची अभिवृद्धि केलेली आहे. अशोकाप्रमाणेंच आम्र हेंही हिंदुस्थानचें वैशिष्ट्य आहे; कारण, हिंदुस्थानांत आहे तितकी आंबराई दुसऱ्या कोणत्याही देशांत नाहीं; विशेषतः महाराष्ट्राचें व अपरान्ताचें; कारण, येथें होतो तसा आंबा इतरत्र कोठेंहि पैदा होत नाहीं. संस्कृत वाङ्मयांत आम्रवृक्षाचे अनेक उल्लेख आढळतात आणि अनेक धार्मिक विधींमध्यें आंब्यांचीं पानें व मंजिऱ्या आवश्यक मानलीं जातात. आंब्याच्या मुख्य जाती तीन : जंगली रायवळ, बागायती इरसाल आणि कलमी. जंगलांत अवघड जागीं असलेल्या झाडावरील आंब्याचा मुलानें धरलेला हट्ट (क्र. ५९५) हा उल्लेख रायवळ आंब्याचा आहे आणि क्र. ५४३ या गाथेंतील उल्लेख इरसाल आंब्याचा. आम्रश्चूतो रसालोऽसौ सहकारोऽतिसौरभः । या अमर-

कोशांतील वचनाच्या आधारानें श्री. आपटे (म. सा. प : वर्ष २१ अंक २) सांगतात कीं चूत हा रसाचा आंबा आणि सहकार हा कलमी. दोन झाडांचा जोड करून झालेला तो सहकार, ही कल्पना आकर्षक आहे पण निराधार आहे. कलमी आंब्यांची पैदास फार उत्तरकालीन आहे. गाथाकवींनीं चूत [क्र. ९७, १४३, ५४२, ५८५, ८२०] व सहकार [क्र. ३३१, ७७७, ७७९, ९९४] हे शब्द समानार्थी म्हणून वापरलेले आहेत. त्यांत कांहीं भेदभाव केलेला दिसत नाहीं. आंब्याची नवी पालवी तांबूस व सुवासिक असते. ती विरही प्रवाशांना कामदेवाच्या भाल्यासारखी [क्र. ५८५] भासते. कालिदासानें आम्राङ्कुरांची तुलना वसंताच्या बाणांशीं [ऋतु : ६ : १] केलेली आहे. आंब्याच्या मोहोराचा सुगंध गर्द असतो; हंगामांत त्याचा घमघमाट रानावनांत दरवळतो; भ्रमर त्यामुळें उन्मत्त होऊन भ्रमण करतात, कोणी सहकारमंजिरी धारण केली तर त्याच्या भोंवतींहि; आणि कोकिळा कूजन करतात. आम्र-मंजरीच्या दर्शनानें व सुगंधानें स्त्रीपुरुषांच्या अंगीं उन्माद संचारतो, म्हणूनच मदनाच्या पंचबाणांत आम्रमंजरीला स्थान मिळालेलें आहे. गाथांतील नायक व नायिका अवतंस म्हणून सहकारमंजिरी धारण करतात. गुप्तकालांत मद्य सुगंधित करण्यासाठीं आम्रमंजिरीचा उपयोग करण्यांत येत असे. आंब्याचीं कोंवळीं पानें व मोहोर कलशांत घालून शुभ-शकुनासाठीं समोर ठेवावयाची प्रथा गाथासप्तशतीच्या रचनाकालांतही प्रचलित [क्र. १४३] होती. अजूनही मंगलकार्यांत त्यांची योजना केलेली असते.

एरण्ड : (२५७) : Ricinus Communis: एरण्डाचें झाड असतें व झुडूपही. याची लागवड तेलासाठीं व पेंडीसाठीं, मुख्यत्वेंकरून मळई जमीनींत करण्यांत येते. गाथासप्तशतींतील एरण्ड जंगली जातीचा, कुंपणालगत यदृच्छया वाढलेला आहे. एरंडाचा व्यावहारिक उपयोग इतका व असा आहे कीं कोणी कधीं काव्यांत त्याची योजना करील अशी कल्पनाही होत नाहीं ! नाहीं म्हणावयास हितोपदेशांत (१.६९) ' यत्र विद्वज्जनो नास्ति श्लाघ्यस्तत्राल्प-धीरपि । निरस्तपादपे देशे एरंडोऽपि द्रुमायते ।। असा तिरस्कार व्यक्त करण्या-साठीं एरण्डाचा उपयोग केलेला आढळतो; आणि ' उंच वाढला एरण्ड, तरी

'काय होईल इक्षुदण्ड ! ' या वाक्प्रचारांत. पण गाथाकवीची दृष्टि अशी दूषित नाहीं एरंडाच्या विस्तीर्ण पानांची तुलना कवीनें हालिकवधूच्या विशाल स्तनांशीं केलेली आहे. हाताचीं बोटें जराशीं तळव्याच्या बाजूला वांकविलीं म्हणजे होतो तसाच एरण्डाच्या पानांच्या आकार असल्यामुळें या उपमेंत आवाहनाचीही सूचना आहे असें टीकाकार सांगतात. तें कसेंही असो, एरण्डाचा येथील उल्लेख अपूर्व व अद्वितीय आहे यांत शंका नाहीं.

कदम्ब : (३७, १७७, ३१४, ५६५, ६३६, ७०६): Anthocephalus, Nauclea purpursa, Stephegyne: कदम्ब, कद्दम, कलंब, कलंव: सौंदर्याच्या दृष्टीनें कदम्बाचा क्रम अशोकाच्या खालोखाल लागतो. अशोकांत जसा रक्ताशोक (मेघदूत : २. १९) तसा कदम्बांत रक्तकदम्ब (विक्रमोर्वशीय : ४. ६०) हीं झाडें हिंदुस्थानांत सर्वत्र आढळतात. त्यांची वाढ फार झपाट्यानें होते. अस्सल कदम्बाचें झाड साठ ते ऐशीं फूट उंच वाढतें. मेघांचीं पहिली गर्जना ऐकली कीं कदम्बांना कळ्या येतात आणि पावसाची पहिली सर पडली कीं त्या फुलू लागतात (मेघदूत : १.२५; विक्रमोर्वशीय : ४. ३०). श्री. आपटे सांगतात (म. सा. प : वर्ष २१ अंक २) : " कदम्बाचीं फुलें बारीक असून गोटीवजा शाखाग्रांवर अनेक अशीं उगवतात; एकंदर दृश्य टांचण्या टोंचलेल्या गोटीसारखें दिसतें. " कुसुमात्र या गाथेची (क. १७७) कवियत्री असुलद्धी सांगते, कदम्बाचीं फुलें कामदेवाच्या गलोलांतील गोंळ्यासारखीं दिसतात ! या फुलांचा रंग नारंगी असतो. सफरचंदाएवढ्या गेंदांनीं सारें झाड भरून जातें तेव्हां त्याची शोभा अवर्णनीय असते. ताज्या मद्याच्या सुगंधाशीं या गेंदांच्या सुवासाची तुलना झालेली आहे. या फुलांपासून पूर्वी मद्यार्क काढीत असत ही. मेरु पर्वतावर फुलणाऱ्या चार मुख्य छायावृक्षांत कदम्बाला स्थान आहे. कृष्णलीलांशीं याचा निकट संबंध आहे. बलराम हा विख्यात मद्यपी. त्याच्या आवडत्या अस्त्रावरून त्याला हलधर असें नांव होतें. यावरून कदम्बाला हलिप्रिय असेंही नांव मिळालेलें आहे. प्रसन्न झाल्या असतां तान्ह्या मुलांचें संरक्षण व अप्रसन्न झाल्या त्यांचा असतां घात करणाऱ्या मातृकांपैकीं एकीची वस्ती कदम्बावर असते. या देवतेचें पूजन व प्रशमन करण्यासाठीं कदम्बाकडे स्त्रियांची ये जा असते; आणि अभिसरणासाठीं संकेतस्थान म्हणूनही. कदम्ब पुष्पें कामी जनांना

उत्तेजित करतात, म्हणून तो मुमुक्षूंना वर्ज्य आहे. दक्षिण महाराष्ट्रांतील कदम्ब या प्राचीन व मध्ययुगीन आणि कदम या अर्वाचीन ऐतिहासिक कुलाचा संबंध कदम्ब वृक्षाशीं असल्याचें दंतकथा सांगते.

कमल : Nelumbium (Coerulem : नील; Speciosum: आरक्त व श्वेत; Louts); अरविन्द (५७४) : आरक्त वा नील, सूर्यविकासी; इंदीवरः (८४४) नील, सूक्ष्म (इन्दोर्लक्ष्मीस्तस्यां वरं वरणीयं); उत्पल (१४०, १५०, १७६, ५३४, ७१९) : नील (उत्क्रान्त : पलं मांसम्); कंदोट्ट (६२२) नील; कमल (७८, ११०, २०९, २५६, २६९, ३४३ (आरक्त), ४०५, ४७१, ४९५, ६०४, ६४१, ७२९, ७६७, ८१०, ८२०, ८८०, ९७७, ९८३, ९८४); कमल-तंतु (९४६); कमलदल (८५८, ९८४); कमल व सूर्य (३४३,४९५ ६०४, ७४७, ९८३); कुमुद (५६१) शुभ्र, हिंवाळयांत बहर, चंद्रविकासी (कौ मोदते); कुमुद व चंद्र (७४७); कुवलयः (५, ३२३) नील, (कु = कुटिल; वलय = वर्तुल : कमळाच्या पाकळया त्याच्या अक्षावर वाटोळ्या, पायऱ्यांप्रमाणें रचलेल्या असतात; ही रचना हें कमळाचें वैशिष्ट्य. तिला अनुलक्षून कु शब्द योजलेला (श्री. आपटे : म. सा. प : वर्ष २१ अंक ३) दिसतो.) तामरस (३४३) आरक्त; नलिनी (६१९); पङ्कज (१, ६, ३१७); पुण्डरीक (६२४) शुभ्र, नक्षत्रविकासी (पंचविंश ब्राह्मण : १८. ९. ६); बिसनी (४ (शुभ्र), ८); बिसनीपत्र (४); मृणाल (३८३, ८४४); सरोरुह (७२५).

कमलाला आहेत तेवढीं नांवें हिंदुस्थानांतल्या दुसऱ्या कोणत्याही फुलाला नाहींत. साहजिक आहे; कारण कमलाच्या आहेत तेवढ्या जाती दुसऱ्या कोणत्याही फुलाच्या नाहींत कमलाचें सारेच विलक्षण. इतर फुलें जमिनीवर उगवणाऱ्या वृक्षवेलींवर फुलतात; कमल हें उगवतें पङ्कांत, पण तें स्वतः पङ्कापासून अलिप्त असतें; कोरडें दिसले तरी सरस असतें पाण्यावर उमलतें, पण कधींही ओलेतें नसतें! गाथासप्तशतींत कमलाइतके उल्लेख दुसऱ्या कोणत्याही फुलाच्या वांट्याला आलेले नाहींत. साहजिक आहे. कारण संस्कृतप्रमाणेंच प्राकृत कवींनाही हें अत्यंत आवडतें फूल. कमळाचें मूळ कधीं नष्ट होत नाहीं, म्हणून हें सृष्टीचें

प्रतीक असें प्राचीन भारतीय मानीत; म्हणूनच जगदुत्पत्तिकर्ता ब्रह्मदेव याचें आसन विष्णूच्या नाभिकमलाचे ठायीं (क्र. ८१०) ठेवलेलें आहे. असल्या पौराणिक गोष्टी भाकड वाटत; पण सुमारें दोन हजार वर्षांपूर्वी भूमिगत झालेल्या कमलाच्या बीजाला अलीकडेच एका शास्त्रज्ञानें फुलविल्याचा वृत्तान्त नुकताच प्रसिध्द झालेला आहे. देवदानवांनीं समुद्रमंथन केलें तेव्हां लक्ष्मी निघाली, तीही कमलांतून. म्हणून जेवढीं नांवें कमलाला तेवढीं कमलेला ! म्हणून कमल हें समृद्ध जीवनाचें प्रतीक. ब्रह्मदेवाप्रमाणें बुध्द व महावीर यांचींही आसनें कमलावर आहेत. सूर्य, गणपति वगैरे हिंदू देवदेवतांच्या हातीं कमल असतें. अवलोकितेश्वराला पद्मपाणी असें नांव आहे. म्हणून कमल हें पावित्र्याचें प्रतीक. आरक्त कमल हें लक्ष्मीचें आसन आणि शुभ्र कमल हें सरस्वतीचें. म्हणून कमल हें संस्कृतीचें प्रतीक. प्राचीन व मध्ययुगीन भारतीय शिल्पकृत्यांतील कमलांची योजना पाहिली म्हणजे हें पटतें. कमलाच्या मुख्य जाती दोन : स्थलकमल व जलकमल. स्थलकमल म्हणजे कल्हार. गाथासप्तशतींत यांचा उल्लेख नाहीं. जलकमलाच्या जाती दोनः सूर्यविकासी व चंद्रविकासी. सामान्यतः कमल हें सूर्यविकासी व कुमुद हें चंद्रविकासी. पुण्डरीक हें नक्षत्रविकासी असल्याचें पंचविंश ब्राह्मणांत सांगितलेलें आहे. खरें असो, खोटें असो, कल्पना किती रम्य आहे ? अगदीं कल्पनेसारखी तरल आहे ! वर्णपरत्वें कमलाच्या जाती चार : नील, पीत, रक्त, श्वेत. पिंवळया किंवा सुवर्णवर्ण कमलाचा उल्लेख गाथाशप्तशतींत आलेला नाहीं. महाराष्ट्राच्या जन्म-दारिद्र्याचें हेंही एक प्रमाण ! सामान्यतः सूर्यविकासी कमलें आरक्त, नील किंवा शुभ्र भरदार असतात आणि चंद्रविकासी कमलें पांढरीं व नाजूक असतात. सांगतात कीं प्रारंभीं सारींच कमलें शुभ्र होतीं; कामदेवाच्या शरानें विद्ध झालेल्या शंकराच्या रक्ताचे बिंदु ज्यांवर पडले तीं आरक्त झालीं ! कामशर सुगंधित असतात, म्हणूनच जणूं आरक्त कमलेंही विशेष सुवासिक असतात ! नीलोत्पलही सुगंधी असतें. हा नीलवर्ण त्याला गौरीच्या दृष्टिक्षेपानें प्राप्त झाला कीं काय ? नील उत्पलानें मद्य (क्र. ५३४) व नील कन्दोट्टानें जल (क्र. ६२२) सुगंधित होतें. कमळाचीं पानें वाटोळीं असतात व त्यांना थाळीसारख्या कडा असतात. या पानांच्या फांसळ्यांमध्यें हवेसाठीं पोकळी असते. म्हणून तीं पुष्कळ वजन तोलून धरूं शकतात. काश्मीरांतल्या

सरोवरांत कमळांचीं पानें एवढीं मोठीं होतात आणि तीं इतकीं दाट असतात कीं त्यांच्या सपाटीवरून पाणकोंबड्या या तीरापासून त्या तीरापर्यंत खुशाल वावरत असतात. कमल हें जसें सौंदर्याचें प्रतीक तसें कमलदल हें कोमलतेचें प्रतीक. कमलाच्या देंठांत हवेकरितां पोकळी व पाण्याकरितां वाहिन्या असतात. दांडा पाण्याबाहेर काढला कीं त्यांतील पाणी झिरपून जातें व तो लगोलग सुकून जातो (क्र. ३८३). कमळाच्या तळ्याच्या निळ्या पृष्ठभागावर पहांटे तरंगणाऱ्या धुक्याच्या तवंगांतून हिरव्यागार पानांमधून उमलतें मुख उचलणारी कमळाची डेरेदार कळी पाहिली म्हणजे वाटतें कीं दूरवरच्या निळ्या डोंगरावरल्या गर्द झाडीच्या झुपक्यांतून जणूं मानवी भक्तिभावाचें प्रतीक अशा मंदिराच्या शुभ्र शिखराचें दर्शन होत आहे ! थोड्या वेळानंतर फुलांचे रंग स्पष्ट होतात. वाऱ्याच्या तरंगांबरोबर डोलणारीं भरदार पण सुकुमार आणि टवटवीत व बहुरंगी कमळें पाहिलीं म्हणजे वाटतें कीं या कोणी जल वा पाताल देवता, नागकन्या वा अप्सरा आम्हां मर्त्यांना मोहिनी घालावयाला आलेल्या असून आवाहन करीत आहेत ! डेरा घेऊन पाण्याच्या किंवा परडी घेऊन फुलांच्या निमित्तानें, पण वस्तुतः संकेतासाठीं, तळ्याच्या पाळीं अवेळीं घुटमळणाऱ्या ग्रामतरुणी तडागांतील कमलांच्या सौंदर्यानें स्तिमित होतात आणि त्यांची नजर कशी चुकवावयाची या विचारानें विस्मित होतात. वाटतें, कमलाच्या विकासाचा सूर्यचंद्रांशीं असलेला संबंध विचारांत घेऊन त्या आपल्या संकेताची वेळ ठरवीत असाव्यात !

करंज:—(१२१, १६७, ५५३) Pongamia Glabra : हें मध्यम आकाराचें रानझाड आहे. हीं झाडें छायेसाठीं रस्त्यांच्या कडांवर आणि जमीनीला धर रहावा म्हणून शेतांच्या बांधांवर किंवा नदीकांठीं लावतात. समुद्रकिनाऱ्यालगतही हीं झाडें पुष्कळच असतात. मे ते जुलईपर्यंत करंजाला फुलें येतात. करंजाच्या काड्यांचा उपयोग दंतधावनासाठीं (क्र. ५५३) करण्यांत येत असे. हा उपाय अष्टांग-हृदयांत (सूत्रस्थान : अ. २.१) प्रशंसिलेला आहे. विशेषतः नदीकांठच्या करंजाची छाया सर्व ऋतूंत गर्द व गार असल्यामुळें आणि त्याच्या फांद्या खालवर लोंबत्या असल्यामुळें स्वैरिणींना हें संकेतस्थान दिवसा उजेडीं विशेष सोयीचें वाटत असे. करंजाचे व्यावहारिक

उपयोगही अनेक आहेत. त्यांच्या बियांचें तेल निघतें व उरल्या भुसकटापासून पेंड पैदा होते. डॉ. एडवर्ड जॉन वॉरिंग सांगतो कीं देशी वैद्यकांत या तेलाला फार महत्त्वाचें स्थान (Pharmacopœia of India : p. 79) आहे. करञ्जवृक्षावर उद्भिज-सृष्टीच्या मातेचा निवास असतो. संततीच्या प्राप्तीसाठीं व रक्षणासाठीं (Sexual Life in Ancient India: Dr. Meyer: Vol II: p 560) स्त्रिया या देवतेचें पूजन करतात. ही सबब स्वैरिणींना मोठी सोयीची वाटे. त्यांच्या रहदारीमुळें भोंदू धार्मिकांची करंजांभोंवतीं लुडबुड असे !

कवठः—(५७९, ६४१) : Feronia Elephantum : कवठाचीं झाडें दक्षिणेंत व गुजराथेंत फार. झाड कांटेरी असतें. कवठाचें कवच कठीण असतें आणि पिकलेल्या फळाचा वास उग्र असतो. कमलाचा मंद सुगंध व मार्दव आणि कवठाचा गर्द दर्प व खरखरीत त्वचा यांची तुलना करतांना कवीनें सुसंस्कृत व उत्तम आणि ग्रामीण व अधम नायिकांमधील भेद व्यक्त केला आहे; आणि त्यांमधील फरक रसिकाला अंतर्ज्ञानानें व अरसिकाला अनुभवानें प्रत्ययास येतो असें सूचित केलें आहे.

काशः—(४३४) Saccharum Spontaneum : काश म्हणजे कांसें गवत. सर्द व सखल किंवा खोल व काळ्या जमिनींत अगर नदीकांठीं तें उगवतें. तें हरळीसारखें जिवट असतें. तराईच्या पाणथळ जमिनी भरून काढण्यासाठीं आर्यांनीं हिमालयाच्या पायथ्याशीं या गवताची लागवड केली असे उल्लेख आढळतात. याच्या फुलांना चामरपुष्प म्हणतात. तीं पांढरी असतात. पावसाळ्यानंतर लगेच तीं फुलूं लागतात. या फुलेरी गवताचे दांडे दीड दोन पुरुष उंच वाढतात आणि त्याचे तुरे हातभर उंचीचे असतात. त्यांवरून वाऱ्याची लकेर वाहूं लागली कीं दूरवरून व उंचावरून पहाणाराला नदीच्या खळखळत्या पाण्यासारखी शोभा दिसते. हिंदी वाङ्मयांत ही उपमा प्रसिद्ध (Commercial Products of India: Watt: p. 929) आहे. गाथा-सप्तशतींत उल्लेखिलेलीं काशपुष्पें तुऱ्यासारखीं नसावींत असें वाटतें. पाव-

साल्याचे अखेरीस माळावर उमलणाऱ्या दुधाणीच्या सूक्ष्म व शुभ्र बकुळी फुलांचा तर हा उल्लेख नसेल ?

कुटजः— (५३९) : Jasminum sambac : हलायुध सांगतो, कुटज म्हणजे गिरिमल्लिका. शब्दार्णवांत अर्जुन व गीर्वाण कोशांत कुडा असे अर्थ दिलेले आहेत. हें एक डोंगरी झुडूप आहे. फुलें पावसाच्या आरंभीं फुलतात. तीं रंगानें पांढरीं, सुवासिक व घाटानें कण्हेरीसारखीं असतात. यक्षानें आषाढांत मेघाची पूजा कुटज पुष्पांनीं केली असा उल्लेख मेघदूतांत (१·४) आढळतो. कोंकणांतले लोक मात्र या फुलाची भाजी करतात. याच्या शेंगांत जवाएवढ्या बिया असतात. त्यांना इंद्रजव म्हणतात. गुजराथेंत हें झुडूप याच नांवानें ओळखलें जातें.

कुन्दः (४९६, ५९०): Jasminum hirsutum—pubescens कुन्दाचा वेल चमेलीसारखा असतो आणि फूल रानमोगरीसारखें त्याहून किंचित लांबट असतें. त्याचा वास उग्र असतो. मालती व मोगरी यांच्या मानानें कुंद अगदींच सुमार वाटतो. कालिदास कुन्दाच्या सौंदर्याचा निर्देश करतो, पण त्यांच्या गंधाबद्दल (ऋतुसंहारः ६, २३) शब्दही काढीत नाहीं. वसंतांत या फुलांना भर असतो असें वनौषधि-गुणादर्शांत सांगितलेलें आहे. कवियत्रि मृगाङ्कलक्ष्मी (क. ४९६) मात्र सांगते कीं शिशिरांत गंधरहित कुन्दांची वृद्धि होते. मध्यप्रांतांत फेब्रुवारी, मार्च व एप्रिल या महिन्यांत कुन्दाला फुलें येतात (Descriptive Botanical List of C. P. : Witt : p 143) आणि कोंकणांत डिसेंबर, जानेवारी व फेब्रुवारी या महिन्यांत (Forest Flora : Talbot : Vol II; p. 189) येतात. या आधारावरून या गाथेची लेखिका कोंकण भागांतली असावी असें अनुमान करण्यास प्रत्यवाय दिसत नाहीं.

कुरबकः (६.२१९): Baleria (Buxiflora, Longiflora, montana, Prionitis वगैरे :कुरबक म्हणजे कोरांटी कुटकी कोरांटी दक्षिणेंत सर्वत्र आढळते. कोंकणांत व घाटमाथ्यावर हें झुडूप बरेंच मोठें होतें (Forest Flora : II:335).

कोरांटीला गुलाबी, निळीं, पांढरीं, भगवीं फुलें येतात. कोरांटीचें सर्वांग कांटेरी असतें. मेघदूतांत यक्षाच्या बागेंत माधवीच्या मण्डपाभोंवतीं कुरबकाचें कुंपण (१ : ७५) आहे. कोरांटीचीं फुलें वसंतांत बहरतात. रंगीबेरंगी व शोभिवंत असलीं तरी तीं गंधहीन असतात; मात्र खुडल्यानंतर तीं लवकर कोमेजत नाहींत; म्हणून वेणींत माळण्यासाठीं स्त्रियांना तीं फार आवडतात. अलकेंतल्या स्त्रिया कुरबकाचीं फुलें वेणींत गुंफीत (मेघः १.१६). इतकी ही आवड प्राचीन आहे. दोहद संकेतानुसार ही फुलें तरुण स्त्रियांनीं फुलवावयाचीं असतात. ऋतुसंहारांत (६ : १८) कालिदास सांगतो:

कांतामुखद्युतिजुषामपिबोद्गतानां
शोभा परां कुरबकद्रुममंजरीणाम् ।
दृष्ट्वा प्रिये सहृदयस्य भवेन्न कस्य
कंदर्पबाणपतनव्यथितं हि चेतः ॥

हें वचन उध्दृत करून श्री. आपटे सांगतात (म. सा. पः वर्ष २१ अंक २) : " कोरांटीचें फूल पंचप्रदेली असतें. त्याच्या पाकळया अंशतः जुळलेल्या असतात. शेवटचा सुटा भाग नीट उमलल्यावर ओठासारखा दिसतो. फुलाच्या मध्यावरचे केसर ओंठालगतच्या दातांसारखे दिसतात याच कल्पनेनें शास्त्रज्ञही या फुलाला ' ओष्टपुष्प ' म्हणतात. " पुरुषांनाही हें फूल आवडतें याचें हेंच तर कारण नसेल ? क. ६ या गाथेंतील कुरबक हौसेनें लावलेला आहे. या गाथेंत कुरबक-दोहद सूचित आहे. लाडक्या पण कांटेरी झाडाला फुलें यावींत म्हणून प्रियेनें त्याला आलिंगन द्यावें, ही प्रियकराची इच्छा किती निर्दय आहे !

• **कुसुम्भः** (१४५, ३३२, ५४५): Carthamus tinctorius; Sapindaceol – Schleichera trijuga: कुसुम्बाचा जंगली वृक्ष खुजट व कांटेरी असतो आणि ढोंपराएवढें कांटेरी झुडूपही असतें; मैदानी वृक्ष साठ ते सत्तर फूट उंच वाढतो. हा वृक्ष मूळचा चीन व जपान (Commercial Products of India: Watt: P. 979) देशांतला. तेथें त्याची लागवड

तेलासाठीं करतात. येथून त्याची आयात उत्तर हिंदुस्थानांत झाली असावी. त्यांच्या पानांपासून काळसर रंग तयार होतो आणि बियांपासून तेल निघते. क्र. ३९६ या गाथेंतील कुसुम्म हा वृक्ष आहे आणि तो काटेरी आहे हें त्यांतील वर्णनावरून स्पष्ट दिसतें. कुसुम्भाचें झुडूप आपले शेतकरी करडई या नांवानें ओळखतात. याचें फूल रंगानें तांबूस पिंवळें व आकारानें झेंडूएवढें असतें. त्यांत केशरासारखे तंतु असतात वाळविलेल्या फुलांपासून कापड रंगविण्यासाठीं कुसुंबी रंग तयार करतात आणि बियांपासून तेल काढतात. मध्यप्रांतांत रायपूर, छिंदवाडा भागांत आणि मुंबई प्रांतांत खेडा व कर्नाटक भागांत करडईची लागवड मुख्यतः रंगासाठीं करण्यांत येते; आणि पुणें, नगर, सातारा, बेळगांव, विजापूर व धारवाड या जिल्ह्यांत तेलाकरितां. कुसुम्भपुष्पं या गाथेंत (क्र. १४५) फुलांचा आणि कुंचुकी या गाथेंत (क्र. ५४५) कुसुंबी रंगाचा उल्लेख आहे. कुसुम्भारुण दुकुलाचा उल्लेख कालिदासानें (ऋतुसंहार: ६.४) व जगन्नाथ पण्डितानेंही केलेला आहे. कार्तिकी पौर्णिमेच्या रथोत्सवासाठीं प्राचीन भारतीय स्त्रिया आपली तलम वस्त्रें या रंगांत रंगवून घेत असत (Cultural History of India: Chandra Chakraberty: p. 364). गाथासप्तशतींतील कुसुम्बाचा रजपूत कुसुंब्याशीं कांहींही संबंध नाहीं. कुसुंब्याचा रंग कुसुंबी असतो, मात्र तो अफूच्या बोंडांचा मादक अर्क असतो.

केतकी : (७७९) Pandanus Odoratissimus : केवडा पाणथळ जागेंत उगवतो. त्याची लांबच लांब व दाट बेटें असतात. कोंकणांत केवड्याचीं कुंपणें असतात. यांत पांढरा व पिंवळा, अशा दोन जाती असतात. पांढऱ्या जातीला केतक म्हणतात व पिवळया जातीला केतकी. केतकाचा भर श्रावणांत आणि केतकीचा माघ फाल्गुनात. श्री. आपटे सांगतात (म. सा. पः वर्ष २१ अंक २) केतकींत नर व मादी फुलें वेगवेगळ्या झाडांवर येतात; नर-फुलांचा सुगंध विशेष असतो. केवड्याच्या तुऱ्याभोंवतीं हिरवी कांटेरी पाती असते. तुऱ्याच्या पोटांतल्या कांजिणींत परागांचे गुच्छ असतात. केवडा उमलला म्हणजे वाऱ्याच्या झुळकीबरोबर हे पराग इतस्ततः उडतात. केवड्याचा सुगंध गर्द व मस्त असतो. केतकीच्या बनांत नागांची वस्ती असते, अशी समजूत आहे.

कोसम्ब : (१९) ' कोशाम्रो वृक्षविशेषः ' असें गाथासप्तशतीचा एक टीकाकार (Weber; p. 9) सांगतो. कोशांभ म्हणजे कुसुम्भ आणि कोशाम्र म्हणजे लाल रान आंबा असें निघंटरत्नाकरांत (भाग १, पृष्ठ ८२; सांगितलें आहे. श्री. पदे यांनीं कोशाम्राची ओळख कोशिंबाशी पटविलेली आहे (वनौषधि गुणादर्श : भाग २, पृष्ठ ७०). ते सांगतात, हीं झाडें डोंगराळ प्रदेशांत होतात, विशेषतः कोंकणांत. महाराष्ट्र शब्दकोशांत कोशिंबाची व्युत्पत्ति दिलेली आहे, ती अशी : सं. कोशी + आम्र, कोशाम्र; प्रा. कोसंबः मराठी. कोशी + आंबा. सुलभ विश्वकोशांत सांगितलें आहे कीं हें लाखेचें झाड आहे. याच्या बियांचें तेल निघतें. जंगली लोक याचीं फळें खाण्याकरितां गोळा करतात. याच्या कोंवळ्या फांद्यांवर लाखेचे किडे पोसतात. क. १९ या गाथेंत उंडारलेल्या वांसराचा वर्ण वर्णन करण्यासाठीं कोशाम्राच्या कोंवळ्या कोंबाची उपमा दिलेली आहे. रुजलेल्या आम्रकोशांतून निघालेल्या कोंवळ्या पानांचा रंग असाच तांबडा असतो. भाषांतरांत मी हाच अर्थ स्वीकारलेला आहे कोकम, रातांम्बा (Guttiferae Indica) या डौलदार व शेलाट्या वृक्षाशीं ही कोसम्बाची ओळख पटविणें शक्य आहे. याचीं पानें कोंवळीं असतांना लाल असतात (Forest Flora : I. 90).

खाजरी : (५३२) : Cowhage, Cowitch, Mucuna pruritus. मूळ शब्द कइकच्छु = कपिकच्छु असा आहे. गंगाधरानें प्रतिशब्द शूकशिम्बि दिलेला आहे. निघंटरत्नाकरांत कुहिली आणि वनस्पतिगुणादर्शांत कुहिरी = मर्कटि. मृगाचा पाऊस सुरू झाला कीं हीं रोपें रानांत उगवतात, पुढें त्यांचे वेल मोठे होऊन झाडावर किंवा कुंपणावर चढतात. वेलाला पानाच्या बाजूस लांब देठ फुटून त्यास फुलांचा तुरा येतो. एका तुऱ्यांत वीस पंचवीस फुलें असतात. या फुलांना बोटाएवढे शेंगांचे घोस लागतात. दर घोसांत पांच ते दहा शेंगा असतात. शेंगांवर कांटे असतात. ते अंगाला लागले कीं आग होते, जागा सुजते. मेढेकुहिरीच्या शेंगांची भाजी करतात. खाजकोलती-धूम्रपुष्पा हीं झुडपें पावसाळ्यांत उगवतात. त्यांचे पानांवर कुसें असतात. तीं अंगाला लागलीं तर आग होते. गाथाकवीला कुहिरीच अभिप्रेत आहे हें गाथेंतील व वनस्पतीच्या वर्णनावरून स्पष्ट दिसतें.

गुंज : (३१०) : **Abrus precatorius** : गुंजेचें क्षुप असतें आणि वेलहि असतो. गुंजा तीन रंगांच्या असतात. लाल व शुभ्र गुंजांचा डोळा काळाभोर व फूल गुलाबी असतें; काळ्या गुंजेचा डोळा पांढरा व फूल शुभ्र असतें; लाल गुंजा (रति = १.७५ ग्रेन) वजनासाठीं वापरतात. गुंजा विषारी असतात. त्यांच्या चूर्णाच्या सूक्ष्म सुया करतात. त्या शरीरांत टोंचल्या म्हणजे मनुष्य किंवा जनावरही दगावतें. त्याची प्रतिक्रिया सर्पविषासारखी असते. जंगली जमाती गुंजांच्या माळा गळ्यांत घालतात; गाथासप्तशतीच्या काळांत घालीत होते, आजही घालतात. भडक रंगांच्या आकर्षणामुळें त्यांना मोत्याची काय किंमत? शिवाय मोतीं त्यांना निसर्गतः प्राप्त होण्यासारखीं नसतातही.

चन्दन : (२८८, ८८५, ९२०) **Sandal** : **Santalum album** : चन्दनाचीं झाडें मुख्यत्वेंकरून हिंदुस्थानांत, त्यांतल्यात्यांत विशेषेंकरून नाशिकच्या दक्षिणेचा महाराष्ट्राचा कृष्णप्रस्तरप्रदेश, कर्नाटक, म्हैसूर व कूर्ग या भागांत आढळतात. नीलगिरींवर प्रचण्ड चन्दनाचीं जंगलें आहेत; म्हणूनच प्राचीन वाङ्मयांत मलयगिरी व चन्दन यांचें साहचर्य आढळतें. हिंदुस्थानांतून चन्दनाची निर्यात प्राचीन काळापासून, मोठ्या प्रमाणावर होत आहे. युरोपांत उत्कृष्ट चन्दन चीनमधून येतं असे प्राचीन उल्लेख आढळतात; वस्तुतः तें चंदन हिंदुस्थानांतलें असे व येथेंच तें जहाजांवर चढविण्यांत येत असे; त्यांची वाहतुक चिनी जहाजांतून होत असे म्हणून हा प्रवाद सुरू झाला (**Commercial Products of India : Watt; p. 976**). खुष्कीच्या मार्गानेंहि गांधार प्रांतांतून हिंदी चन्दनाची निर्यात होत असे असें सर ओरेल स्टेन यांनीं (**Ancient Khotan : pp.447, 452**) सिद्ध केलें आहे. चंदन व लिंब यांची जात एकच, गुणदोष वेगळे. चन्दनाचें झाड उंच व सडपातळ असतें व त्याच्या फांद्या अवनतमुखी असतात. हिंदुस्थानांत देवपूजेसाठीं आणि उन्हाळ्यांत व विरहांत शीतलतेसाठीं चन्दनाचें गंध अंगाला लावीत, असे अनेक उल्लेख प्राचीन वाङ्मयांत आढळतात. गाथासप्तशतींतही असा उल्लेख (क्र. २८८) आहे. मध्ययुगीन वाङ्मयांतील विरहसंतापशमनार्थ होणारे चंदनाच्या योजनेचे उल्लेख काल्पनिक व सांकेतिक वाटतात. चन्दनाच्या वृक्षाभोंवतीं लपेटलेल्या लतेत सर्पांचें आश्रयस्थान असतें. हा संकेत 'भुजंग'

(क. ९२०) या गाथेंत आढळतो. ' निलाजरी ' (क. ८८५) या गाथेंतील ओंडका चन्दनाचा असावा. पूजेसाठी उगाळलेलें चन्दन आतां आपण थाळींत किंवा कचोळयांत ठेवतों. गाथाकाळांत तें शंखशुक्तींत ठेवण्यांत येत असावें असें ' मङ्गल ' (क. १) या गाथेंतील उल्लेखावरून दिसतें.

जांभूळः—(१८०, १८९, ५३१) Black plum : Eugenia Caryophylla:a, Jambolana : हिंदुस्थानांत जांभळाचे वृक्ष सर्वत्र आढळतात. प्राचीन भारतीयांनीं भूपृष्ठाची वांटणी सात महाद्वीपांत केली होती. जम्बुद्वीप हें त्यांतलि आद्य व केंद्रवर्ती. पुराणांनुसार भरतखंड जम्बुद्वीपांत आहे; जम्बुद्वीप म्हणजेच भरतखंड असें बौद्ध मानतात; हिंदुस्थानच्या पांच विभागांपैकीं जम्बुद्वीप हा एक भाग मात्र आहे असें जैन मानतात. मेरु पर्वताच्या दक्षिणेस व निषध पर्वताच्या उत्तरेस सुदर्शन नांवाचा एक प्रचंड जम्बुवृक्ष असून त्यावरूनच 'जम्बुद्वीप' हें नांव सिद्ध झालें आहे असें पुराणांचें विधान आहे (Cultural History from the Vayu-Purana : Patil : p. 305). नर्मदा नदी जम्बुवनांतून वाहते आणि परिणत जम्बूफलांमुळें दशार्ण देशाची कांति श्यामल भासते असें कालिदास (मेघ : १·२३) सांगतो. जांभळाचा वृक्ष फार मोठा वाढतो. रानजांभळें बारीक व जांभुळकीं असतात आणि रायजांभळें मोठीं व काळींभोर, भुंग्यासारखीं (क. ५३१). पावसाळ्याच्या सुरुवातीस जांभळें परिपक्व होतात. जांभळीच्या झाडांत पाणी शुद्ध करण्याचा गुण आहे जांभळाचा शिरका औषधि आहे. गोव्याकडे जांभळाचें रुचकर मद्य तयार करतात. 'उच्छिष्टग्रहण' या गाथेंत (क. १८९) जांभळाच्या उटण्याचा उल्लेख आहे. हें उटणें जांभळाच्या रसाचें, कढवून केलेलें असावें, असें वाटतें. हा कषाय प्रयोग मला उपलब्ध झाला नाहीं. रतिरहस्यांत (१५,८५) गात्रगंधदुरीकरणोपाय दिलेला आहे :

> कुकुभकुसुमजम्बूदललोध्रैरुद्वर्तनं च समभागैः ।
> हरति निदाघे विहितं घर्मादिजदेहदौर्गन्धम् ।।

'कुकुभाचीं (अर्जुन) फुलें आणि जांभळाचीं व लोध्राचीं पानें यांचें चूर्ण समभाग घेऊन त्यांचें उटणें अंगास लावलें असतां घामामुळें येणारी दुर्गंधि नष्ट

होते. घाम फार येऊं नये म्हणून अक्रोडाचें अगलित फूल व आंभूळ समभाग वाटून उष्णकालीं अंगास लावावें, असा उपाय अनङ्गरङ्गांत (७·४६) सांगितलेला आहे. जांभळाची बीं अंगाला लावली असतां घामोळ्या नाहींशा होतात व अंग स्वच्छ होतें असें वनौषधि-गुणादर्शनांत सांगितलें आहे. जांभळाचे हे गुण फार प्राचीन काळापासून आपल्याला माहीत आहेत असें वरील गाथेवरून दिसतें.

ताल: (३९८) Palmyra : ताल म्हणजे ताड. हीं झाडें डोंगरांवर व रानांत आपोआप वाढतात. आपल्याकडील ताडाचा सोट चाळीस ते पन्नास हात सरळ वाढतो. सिंहलद्वीपांतले सोट शंभर सवाशें हात उंच वाढतात. ताडाचीं पानें दुधांत उकळून वाळवतात व तीं सुकल्यावर नीट कापून त्यांचा उपयोग लिहावयासाठीं करतात. हिंदुस्थानांत जें कांहीं प्राचीन वाङ्मय उपलब्ध झालें आहे तें ताडपत्रावरच कोरून लिहिलेलें आहे. ताडाचीं पिकलेलीं फळें पिवळींधमक सोनेरी असतात, निबर झाल्यावर तीं काळीं पडतात. एकेका ताडफळांत तीन ताडगोळे असतात. कोंवळ्या ताडगोळ्यांचा गर लोण्यासारखा मृदु व शुभ्र आणि शहाळ्यासारखा चवदार असतो. त्यांतलें पाणी आचमनाइतकेंच असलें तरी फार मधुर असतें. रामायणांत सीतेच्या स्तनांची ताडगोळ्यांशीं तुलना केलेली आहे ! ताडापासून ताडी निघते. ताजी ताडी मधुर व माफक मादक असते, आंबलेली ताडी कडक असते. ताडाचीं झाडें मूळचीं मध्य पश्चिम आशियांतलीं, असीरिया व बाबिलोन देशांतलीं. ताडी हें असुरांचे (Assyrians) आवडतें पेय; मात्र सुरांच्या पुरस्कारामुळें तिला सुरा हें नांव प्राप्त झालें ! उज्जयिनीनजीक प्रद्योत राजाचें तालद्रुमांचें सोनेरी वन होतें, असें मेघदूतांत (१·३३) सांगितलें आहे. खात्रीनें, हें वन ताडगोळ्यांसाठीं लावलेलें नव्हतें. गाथासप्तशतींत तालमद्याचा उल्लेख नाहीं. तालवृंतांचा आहे. ताडाचे कोंब फुलांसारखे नाजूक व सुंदर असतात.

दारु : (१०५) : दारु म्हणजे देवदार किंवा ओंडका. रघुवंशात व कुमारसंभवांत देवदाराचे अनेक उल्लेख आलेले आहे हीं झाडें मुख्यत्वेंकरून हिमालयाच्या उतारांवर वाढतात. महाराष्ट्रांत देवदार नाहींत. ' अस्थिर हृदय ' (क्र. १०५) या गाथेंतील ओंडका देवदाराचा नाहीं, मामुली आहे.

नवमालिका (२८१) Jasminum:—नवमालिका म्हणजे नव-मल्लिका. मोगरा, बेलमोगरी. नवमालिका हीच सप्तदला असें अमरकोशाचे कांहीं टीकाकार सांगतात. एकेरी मोगऱ्याला [मोतिया] पांच पाकळ्या असतात; बटमोगऱ्याला पाकळ्यांचे थर असतात. मोगऱ्याला कामदेवाच्या पंचबाणांत स्थान मिळालेले आहे. मोगरीचें फूल देखणें व भरदार असतें; त्याचा सुगंध गर्द व मांसल [क्र. २८१] असतो. सदृश फुलांच्या माळेंत गुंफलें तरी तें अद्वितीय दिसतें, इतरांना हताश करतें !

निंब (३०, २४८, ८७२) Margosa; Melia Azadirachta:—हीं झाडें हिंदुस्थानांत सर्वत्र वाढतात; विशेषतः महाराष्ट्र व कर्नाटकच्या जंगलांत. झाडें ४० ते ५० फूट उंच असतात. याची पानें कात्रीदार असतात; पांढरीं, बारीक फुलें व पिंवळीं धमक फळें येतात. फळांना लिंबोणी म्हणतात. हीं फळें फक्त सर्वभक्षक कावळे [क्र. २४८] खातात. निंबामुळें आजूबाजूची जागा निरोगी होते. त्याची छाया दाट असते. जुनाट निंबाला चन्दनासारखा वास येतो. हा वृक्ष एवढा जिवट असतो कीं तोडला तरी पुन्हां आपोआप वाढतो. निंब सर्वरोगपरिहारकारक असल्यामुळें वैद्य त्याला कल्पतरु म्हणतात. पिंपळ व लिंब यांची मैत्री असते. जेथें एक तेथें बहुधा दुसरा असतोच. वनौषधि-गुणादर्श-कर्ते सांगतात कीं लिंब कडु असल्यामुळें त्याला कीड लागत नाहीं. मात्र क्र. ३० या गाथेंत लिंबावरील किड्याचा उल्लेख आढळतो. अरसिक अधमतेची व अहंकारी तिरस्काराची परिसीमा व्यक्त करण्यासाठीं हा प्रयोग केलेला असावा.

पलाश (३०८, ३११, ५८८, ७७५) Butea Frondosa:—पलाश किंवा किंशुक [क्र. ६८८] म्हणजे पळस. हीं झाडें हिंदुस्थानांत सर्वत्र आढळतात; जंगलांत व मैदानांतही. जमीन कितीही निकस असली तरी तेथें पळस रुजतो व वाढतो वैदिक वाङ्मयापासून पळसांचे उल्लेख आढळतात. धार्मिक व याज्ञिक विधींमध्यें पळसाच्या समिधा असतात. पळसाला वसंतांत कोंवळी पालवी फुटते. हीं पानें मुंगसाच्या कानांसारखी लालसर [क्र. ७७५] असतात 'पळसाला पानें तीन' अशी म्हण आहे हीं पानें ब्रह्मा, विष्णु व महेश यांची प्रतीकें आहेत. पळसाचीं फुलें लाल नारंगी असतात. तीं पोपटाच्या

चोंचीसारखीं दिसतात; म्हणून पोपटाला किंशुक हें वैकल्पिक नांव आहे. [किंचित् शुक इव शुकतुंडसदृशपुष्पत्वात्सभात्वं]. फुलें दिसतात सुंदर, पण त्यांना वास नसतो. क्वचित् पांढऱ्या फुलांचाही पळस दिसतो. पळसाच्या फुलांचा बहर वसंतांत मार्च एप्रिल या महिन्यांत असतो. पाश्चिमात्यांनीं पळसाला जंगलाची ज्वाला (Flame of the forest) अशी संज्ञा दिलेली आढळते. एकाद्या जंगलांत पळस पुष्कळ असले व ते उन्हाळ्यांत फुलले म्हणजे रानाला जणूं वणवा लागला आहे असें वाटतें. जंगलांत वणवा पेटला होता, बिचाऱ्या हरणाला मात्र वाटलें कीं पळसांचें रान फुललें [क्र. ५८८] आहे ! पळसाच्या फुलांपासून पिंवळा धमक रंग तयार होतो. मात्र तो कच्चा असतो, म्हणूनच हा रंग उत्सवप्रसंगीं, विशेषतः कामदेवाच्या उत्सवांत, एकमेकांच्या अंगावर उडविण्यासाठीं वापरण्यांत येत असे. पळसाच्या लाखेपासून तयार केलेलें रंगीत रोगण प्राचीन भारतांतील स्त्रिया नखलेपन [Nail-polish] म्हणून वापरीत असत [Cultural History of India: Chakraberty: p. 362]. पळस शुभ समजतात; पतिगृहीं जातांना वधूच्या रथाच्या खांबांना पळसाच्या खांद्या बांधण्याचा रिवाज होता [Racial History of India: Chakraberty p. 82]; आणि अशुभही; क्र. ३०८ या गाथेंत कीरमुखसदृश फुलांनीं डंवरलेल्या पळसाची तुलना समर्पकपणें बौद्ध भिक्षुसंघाशीं केलेली आहे. प्रवासाला निघतेसमयीं बौद्ध भिक्षूंचें दर्शन अशुभ होय, असें टीकाकार सांगतात; पण ही समजूत गाथाकालीन कीं टीकाकालीन हें समजण्यास साधन नाहीं.

पाटल :—(१४, ४६८, ४६९, ६१९) : Bignonia Suaveolens: प्रस्तावनेसाठीं पाटल वृक्षाबद्दल माहिती मिळवीत असतां दिसून आलें कीं अर्वाचीन आधारग्रंथांत ही संज्ञा फार ढिलाईनें वापरण्यांत येते. प्राकृत व संस्कृत वाङ्मयांत पाटल वृक्षाचे अनेक उल्लेख आढळतात. त्या काळांत कोणता वृक्ष निश्चितपणें अभिप्रेत होता हें समजण्यास साधन नाहीं. डॉ. विल्यम रॉक्सबर (Botanical Observations on Select Indian Plants: p. 182) यांनीं पाटलीची प्रचलित नांवें दिलीं आहेत : संस्कृत-अमोघा, श्रीस्थानवृन्त; प्राकृत—पारला, पारलि, पारूल. बङ्गाला भाषार अभिधान (संपादकः

श्रीज्ञानेंद्रमोहन दास) या कोशांत पाटल याचा अर्थ पुन्नागपुष्पः पाटला म्हणजे पारूल, गाछ = पुष्पवृक्षविशेष; पाटलि म्हणजे पारूलगाछः Bignonia Suaveolens; याच्या जाति दोन-श्वेत व पीतः असा दिलेला आहे. श्री. एडवर्ड बाल्फर यांच्या Cyclopaedia of India and of Eastern and Southern Asia या कोशांत संदर्भ पाहिला असतां दिसतें कीं Bignonia या सदरांत विशिष्ट वनस्पतिवर्गांतील वृक्षांच्या सात जातींचा हिंदी-मराठी नांवांसह तपशील दिलेला आहे. (पैकीं ज्या मराठी नांवांचा तपशील हातीं असलेल्या कोशांत आढळला नाहीं त्यांवर फुली केली आहे.) त्यांपैकीं सहा जाती आपल्याकडे आढळतात, त्या अशा : (१) हिंदी-Padal, Sammi; मराठी-×Keersel ×Tuatuka : हीं झाडें दक्षिणेंत गोदाकांठीं आणि खंडाळा व पारघाटांत मुबलक आहेत. वृक्ष पवित्र मानतात. उन्हाळ्यांत व पावसाळ्यांत सुवासिक फुलें येतात. (२) हिंदी Mulin, Sori; मराठी Tetoo. (निघंटरत्नाकरांत टेंटू = लोध्र या कोंकणी झाडाचा उल्लेख आहे.) हीं झाडें मुंबई इलाख्यांत घाटाखालीं आढळतात. पावसाळ्याच्या सुरवातीस फुलें येतात. (३) मराठी : ×Wurrus: हीं झाडें कोंकणांतील डोंगराळ भागांत, घारापुरी बेटांत व पाच्छापूरच्या जंगलांत आढळतात. उन्हाळ्याच्या सुरुवातीस सुंदर फुलें येतात. (४) Bignonia Suaveolens बंगाली-पारूल; हिंदी Sammi : मराठी Parul : संस्कृत-कालागरु, कृष्णवृंत, पाटलि. निघंटरत्नाकरांत कृष्णवृंताचा अर्थ लोध्र असा दिलेला Descriptive Botanical List मध्यें Stereospermum च्या Chelonoides या जातीला पिंवळसर लाल, Suaveolens या जातीला किरमिजी व Xylocarpum या जातीला पिंवळसर पांढरी फुलें येतात असें सांगितलेलं आहे आणि सर्व जातींना पदल, पदर, परळ हे मराठी प्रतिशब्द दिलेले आहेत हीं, झाडें सह्याद्रीच्या घाटांवर वाढतात; विशेषतः कानडा जिल्ह्यांत. या झाडाची उंची सुमारें वीस फूट असते व बुंध्याचा परीघ सुमारें दीड फूट असतो. याच्या फांद्या जमीनीपासून बारा फुटांवर असतात. याला मोठीं किरमिजी फुलें येतात. (५) हिंदी Bohira Reora; मराठी Rukt Reora (रक्तरोडा, रोहडा, रोहिडा). हें झाड विशेषतः खानदेशमध्यें बागलाणांत

आढळतें. फुलें मोठीं, नारिंगी, निर्गंध असतात. (६) मराठी-Khurseng: (महाराष्ट्र शब्दकोशांत सुरशिंग-शिंगीचा उल्लेख आहे.) आतां निघंटरत्नाकरांतील अर्थ देतों : पाटल = पुन्नाग, सुरपुन्नाग = सुरंगी, साष्टी प्रांतांत उंडी या नांवानें प्रसिद्ध; पाटला = पाडळ, किन्हई, ताम्रपुष्पी, रक्तपाडळ, रक्तलोध्र. पाटलिका = रक्तकण्हेर. वनौषधिगुणादर्शकर्ते सांगतात (भाग ४ पृ. ५२) : "हें झाड फार दुर्मिळ आहे. धारवाड जिल्ह्यांत सिरटी येथें पाटलीचें झाड आहे. हें झाड लावल्यापासून यास सहा-सात वर्षांनीं फुलें येऊं लागतात. हें फूल फार सुकुमार असून सुवासिक आहे. हें लाखी रंगाचें असतें. पारिजातकाप्रमाणें दाट फुलें येतात." श्री आपटे सांगतात, (म. सा. प; वर्ष २१ अंक, २): पाटलाला अनेकदली पानें व तुतारीच्या आकाराचीं फुलें येतात. वनौषधिगुणादर्शांत पाडळाची माहिती दिलेली आहे. पाटलि, पाटला, मोघा, मधुदूति, फुलेरुहा, कृष्णवृन्ता, कुबेराक्षि, कालस्थाली, काचस्थाली, अतिवल्लभा, ताम्रपुष्पी हीं वेलपाडळींचीं संस्कृत नांवें आणि पाटला, सिता, मुष्कक, मोक्षक, घंटापाटलि, काष्ठपाटला हीं वृक्षपाडळीचीं अथवा श्वेतपाडळीचीं नांवें आहेत. या संकलित उल्लेखांवरून आणखी घोटाळा होतो हें खरें पण अखेरीस पाटल वृक्षाची ओळख डॉ. बाल्फर यांच्या यादींतील क्र. ४ या वृक्षाशीं पटविण्यास हरकत नाहीं. कारण या झाडाच्या फांद्या जमिनीपासून बऱ्याच उंचावर असल्यामुळें त्यावर चढणे अवघड असतें: चढेल तो पडेल (क्र. ४:८) या गाथेंत पाटलाचें वर्णन "निष्काण्डदुरारोह" असें आलेले आहे. गाथासप्तशतींत पाटलाचे चार उल्लेख असले तरी हें झाड त्या काळांतही दुर्मिळ असावें. 'संधान' (क्र. ८६९) या गाथेंत ग्रामणीच्या परसांतील पाटलाचा उल्लेख आलेला आहे; त्या गांवांत हें एकच झाड असावें असें संदर्भावरून दिसतें. डॉ. रोक्सबर सांगतात कीं पाटलपुष्पें उपलब्ध असलीं कीं गन्ध व मधु लुब्ध भ्रमर इतरत्र भ्रमत नाहींत. हा गुण पाटलपुष्पांचे अंगीं आहे किंवा कसें या बद्दल मला माहिती नाहीं. सुरङ्गीचे अंगीं हा गुण आहे हें मात्र निश्चित. मद्यांत सुगंधासाठीं आम्रमंजिरी व पाटलपुष्पें घालीत असत (रघुवंश : १९.४६). भ्रमणशील भ्रमराचें व भिन्नमहिलासक्त नायकाचें चांचल्य पाटलाच नष्ट करूं

शकेल अशी ग्वाही शालिवाहनानें दिलेली आहे [क्र. ६१९]. या सर्व उल्लेखां-वरून त्या काळींही हें फूल दुर्मिळ असावें असें वाटतें.

फलिणी : (९३७) Aglaia Roxburghiana : फलिणी म्हणजे प्रियङ्गु (देशीनाममाला : १. ३२) : प्रियङ्गु या शब्दाचे कोशांत अनेक अर्थ दिलेले आहेत. प्रियङ्गु हा वृक्ष आहे व लताही आहे. सह्याद्रींत हीं झाडें पुष्कळ आहेत. त्यांना वसंतांत फुलें येतात. लतेला पिंवळीं फुलें येतात. त्यांच्या पाकळ्या सुट्या असतात. केसर संयुक्त असून त्यांची नळी बनलेली असते. फुलें लहान, सुबक व सुवासिक असतात [श्री. आपटे : म. सा. प : वर्ष २१ अंक २] . गाथासप्तशतींतील उल्लेख वृक्षाचा नसून लतेचा आहे.

बकुल : (६३) : Mimusops Elengi : हा वृक्ष हिंदुस्थानांत सर्वत्र आढळतो. स्वर्गलोकींच्या पुष्पवृक्षांत पुराणांनीं बकुलाला स्थान दिलें आहे. गोपींना आकर्षित करण्यासाठीं श्रीकृष्ण बकुळीच्या झाडाखालीं बसून मुरली वाजवी; नादमुग्ध गोपी बकुलाच्या कक्षेंत आल्या कीं गंधमुग्ध होऊन आत्मार्पणाला सज्ज होत ! बकुलवृक्ष विस्तीर्ण व चिरश्यामल, म्हणून तो बागेंत शोभतो. वृक्ष प्रचंड आणि पुष्पें सूक्ष्म व सुकुमार, पिंवळसर पांढुरकीं, तारकां-सारखीं चक्राकार; त्यांचा गंध मधुर व गर्द; त्यांच्या मधोमध छिद्र असतें. यामुळें त्यांच्या माळा लगोलग गुंफतां येतात. आणि त्या पुष्कळ दिवस टिकतातही; हाताळल्या तरी चुरगळत नाहींत, कोमेजत नाहींत; निर्गंध होत नाहींत. म्हणून सुगंधलुब्धांना त्या फार आवडतात. वाऱ्याच्या प्रत्येक झुळकी-बरोबर बकुळ फुलें ढाळतो व त्यांचा सुगंध आसमंतांत दरवळतो. बकुळीचीं फुलें मोकळ्यावर आहेत तोंवर विगलित होत नाहींत; कोंदटलीं कीं कुबट होतात, एवढेंच. बकुळी [क्र. ६३] या गाथेंत कवीनें सूक्ष्म धाग्यांत ओंवलेल्या बकुळीच्या फुलाची तुलना धाग्याला लटकलेल्या कोळ्याशीं केलेली आहे, ती किती समर्पक आहे !

बेल (७९) : Ægle marmelos : मूळ गाथेंत मालूर हा शब्द आहे. या देशी शब्दाचा अर्थ कवठः गंगाधरानें बिल्व असा अर्थ दिलेला आहे. वर्ण्य विषयाला दोन्ही अनुकूल आहेत. बेलफळाचीं झाडें हिंदुस्थानांत सर्वत्र होतात.

या वृक्षाची छाया शीतल व आरोग्यकारक असते. विष्णूला जशीं तुळसीपत्रें तशीं शंकराला बिल्वदळें. बिल्व-त्रिदल हें योनीचें प्रतीक असल्यामुळें लिंग-पूजेंत त्याचा उपयोग करण्यांत येतो (Racial History of India : Chandra Chakraberty : p. 84). बेलाला उन्हाळ्यांत फुलें येतात आणि बेलफळें पावसाळ्यांत पक्व होतात. उर्ध्वपातनक्रियेनें सिद्ध केलेलें बिल्वजल गुलाबपाण्यासारखें वापरतात. बिल्वपात्र वापरलें तर धन प्राप्त होतें असें वायु-पुराणांत (७५ : ३–४) सांगितलेलें आहे.

बोर : (२००. २४०. ४१९) : Zyzyphus jujuba : बोरीचीं झाडें हिंदुस्थानांत सर्वत्र आढळतात. बोरें आंबटगोड असल्यामुळें पोरांना फार आवडतात. बोरें सेवन केल्यानें नष्ट झालेली कांती पुन्हां प्राप्त होते (वायु-पुराण : ९२. ९२) कोनाड्यांतल्या टोपलींतून घरंगळलेल्या बोराला नुकत्याच रांगू लागलेल्या मुलानें कोंवळ्या दांतांनीं वण केल्याचा उल्लेख [क्र २००] अत्यंत रम्य आहे.

मधूक : (१०३, १०४, १५९, ६३९. ८७१,९५८) : Bassia latiflora : मधूक म्हणजे महुआ, मोह. मोहाचीं जंगली झाडें हिंदुस्थानांत सर्वत्र होतात; क्वचित् जिरायती जमिनींत त्यांची लागवडही करतात. महाराष्ट्राच्या कृष्णप्रस्तर-प्रदेशांतही तो वाढतो. मार्च व एप्रिल आणि नोव्हेंबर व डिसेंबर या महिन्यांत त्याला फुलें येतात. मोहाच्या फळांचें तेल काढतात. दिव्यांत जाळण्यासाठीं व खाण्यासाठीं या तेलाचा उपयोग होतो. या तेलाला कणी असल्यामुळें लबाड व्यापारी तुपांत भेसळ करण्यासाठीं त्याचा मोठ्या प्रमाणावर उपयोग करतात. वसंतांत मधुकाच्या झाडांना बहर येतो. खमंग तापवलेल्या दुधावरल्या सायी-सारखा त्यांचा रंग असतो. प्रत्येक फांदीच्या शेंड्याला [illegible]ांचे झुपके लागतात. प्रत्येक झाडाला दोन ते चार मण फुलें येतात. [illegible] मधुर रस असतो. कोणी ताजीं फुलें तशींच खातात. [illegible] वाळविलेलीं फुलें शिजवून इतर अन्नाबरोबर खातात; गूळ-साखरेऐवजी [illegible]ाला गोडी आणण्यासाठीं त्यांचा उपयोग करण्यांत येतो. वाळवलेल्या फुलांच्या पिठाच्या भाकरी करतात. इब्न बतूता सांगतो, मोहाचीं वाळविलेली फुलें सुकविलेल्या अंजीरां-

सारखीं लागतात. बाबर आत्मचरित्रांत सांगतो कीं हिंदू लोक हीं फळें बेदाण्यांसारखीं खातात. याच्या फुलांपासून साखर सहज तयार होते. खेडूतांच्या व जंगली जमातींच्या निष्काळजीपणामुळें आणि शेती व जंगल-खात्यांच्या दुर्लक्षामुळें मोहांच्या झाडांची संख्या सालोसाल कमी होत आहे. यामुळें गरीबांचें अन्न व दुय्यम उत्पन्न कमी होत आहे. मोहाची लागवड वाढवली तर जंगली जमातींना तीस ते चाळीस टक्के अधिक अन्न मिळेल असा एका शास्त्रज्ञाचा अंदाज आहे. मोहाच्या फुलांपासून मद्य तयार होतें. तें फार त्वरेनें तयार होऊं शकतें व विशेष कडक असतें. सुश्रुतांत या मद्याचा उल्लेख आहे. मध्यहिंदुस्थानांत मोहाचीं झाडें विपुल असल्यामुळें तेथें या मद्याचा प्रसार विशेष आहे. वन्य जमातींमध्यें हातभट्टीचें मोहाचें मद्य विशेष प्रिय आहे. त्याचा कडकपणा पुरत नाहीं म्हणूनच कीं काय कोण जाणे, हे लोक त्यांत धोतऱ्याचें मिश्रण करतात ! गाथासप्तशतींत नदीकांठच्या मधूकाच्या सौंदर्याचीं अनेक वर्णनें आहेत; आणि हीं फुलें वेंचण्याचें काम बहुधा स्त्रियाच करीत असत असें दिसतें. हीं फुलें देवपूजेसाठीं वेंचलीं जात नव्हतीं हें खास; मग तीं अन्नासाठीं गोळा केलीं जात असोत किंवा घरगुती मद्यनिर्मिती-साठीं ! अगर संकेतस्थानाभोंवतीं घोटाळण्यासाठीं सबब म्हणून !

मरुवक : (६७७) : Artemisia Indica : मरुवक म्हणजे मरवा. हें झुडूप फार तर वीत दीड वीत उंच वाढतें. याचीं पानें मेथीसारखीं असतात. तीं फार सुगंधीं असतात. याला तुरेही येतात. देखण्या फुलांच्या गुच्छांत किंवा गजऱ्यांत सुगंधासाठीं मरव्याची डिकशी गुंफतात. मरव्याच्या अंगप्रत्यंगाला सुगंध येतो, हें कवीचें विधान [क. ६७७] अगदीं यथार्थ आहे.

माधवी : [३२२] : ही लता आहे. उद्यानांत माधवीचे मांडव असतात. पानांचे कांठ नागमोडी असतात; फुलें पांढरीं, पांच सुट्या पाकळयांचीं असतात; प्रत्येक पाकळीवर पिवळा ठिपका असतो. चैत्रांत फुलांचा भर असतो. तो वैशाखांत ओसरतो.

मालती: [९२,४२६,४४२,४४४,६१९,७४८,७४९,७५५,९७९] मालतीचा वेल असतो. लावल्यापासून दोन अडीच वर्षांनीं फुलें येतात. तीं सूक्ष्म व शुभ्र आणि नाजूक व सुवासिक असतात. उन्हाळयांत फुलांना भर येतो. मालतीच्या

सुकुमार कळीच्या सुगंधानें व सौंदर्यानें भ्रमराला संभ्रम होतो [क्र. ७४९]; तो तिला हलुवारपणें उमलवतो [क्र. ४४२] आणि तिच्यांतील मकरन्दाचें सेवन करतो. मालतीविषयीं मधुकराची आसक्ति इतकी कीं तिच्या अंगीं मधु आहे तोंवर तो तिला सोडीत नाहीं [क्र. ६१९, ७४८, ९७९]; पण मालतीचा प्रियकर एवढा कृतघ्न कीं तिनें फलधारण केलें कीं लगेच तो तिचा त्याग करतो [क्र. ९२] आणि चंचलपणें इतरांमागें [क्र. ६१९] भ्रमण करूं लागतो!

वडः (९४, १६६, २६३, २९४, २९५, ३७२, ५५६, ६७०): Ficus Indica : वड हिंदुस्थानांत सर्वत्र आढळतात. वड व पिंपळ हे दोन्ही छायावृक्ष. वडाला दरसाल नव्या पारंब्या फुटतात, त्या जमिनींत शिरतात व रुजतात. यामुळें वडाचा विस्तार सारखा वाढत असतो; मूळचा बुंधा नष्ट झाला तरी पारंब्यांच्या आधारावर व पोषणावर वटवृक्ष जिवंत राहतो. हिंदुस्थानांतील सर्व वृक्षांमध्यें वडाचाच विस्तार व आयुष्य फार असतें. नर्मदेच्या मुखा-जवळचा कबीरवड सुमारें साडेतीनशें वर्षांचा आहे. वांईजवळच्या वडानें सुमारें चार एकर जागा व्यापलेली आहे. हिंदू लोक वटवृक्ष पवित्र मानतात, कधींही पाडीत नाहींत. वड व पिंपळ यांचीं झाडें देवळांजवळ स्थापून त्यांभोंवतीं पार बांधतात या पारांवर बुंध्याला व भूमिगत पारंब्यांना टेंकून ग्रामदेवतांच्या शिला ठेवलेल्या असतात. ही प्रथा सातवाहनकाळांत प्रचालित होती असें गणपती (क्र. ३७२) या गाथेंतील वटयक्षाच्या वैकल्पिक उल्लेखावरून दिसतें. ग्रामसीमेवरील वटवृक्षांवर मुंजा, वेताळ वगैरे क्षुद्रदेवतांची वस्ती असते. या दैवतांच्या व वृक्षाच्या पूजेच्या निमित्तानें स्वैरिणींना त्याकडे जा ये करतां येत असे. पारंब्या पुष्कळ असल्यामुळें जागोजाग व एकामेकांपासून अलिप्त, एकान्ताला सोईस्कर अशीं पुष्कळ स्थळें त्यांना येथें उपलब्ध असत. पार हें खेडेगांवांतलें एक सार्वजनिक सभास्थान असतें; वटवृक्षाच्या आधारानें मांडलेल्या दुष्ट दैवतांच्या शिलांप्रमाणेंच पारावर गांवच्या गुंडांचीही बैठक असते. परके प्रवासी वडाखालीं मुकाम करीत. त्यांनाही स्वैरिणी हातोहात चकवीत असत असें गाथांतील उल्लेखांवरून दिसतें.

विषकन्दकीः (८१०): Randia dumetorum : निघंट रत्नाकरांत विषकंद याचा अर्थ हिंगणबेट (भाग १ : पृ. ३३६) असा दिलेला आहे. हीं

झुडपें दक्षिणेंतील रानांत, विशेषतः पुणें व नगर जिल्ह्यांतील नद्यांच्या कांठीं: (Forest Flora. I. 211) बोरीबाभळीच्या सान्निध्यांत सर्वत्र आढळतात. कधीं कधीं हीं झाडें तीस फुटांइतकीं उंच होतात. वसंतांत पानेंफळें फुटतात; कोळी लोक मासे मारण्यासाठीं हिंगणीचीं कच्चीं फळें वापरतात. (Descriptive Botanical List; p. 134) हीं फळें कांटेरी असतात. पक्कीं हिंगणें कोरून त्यांत दारू भरून उडवतात. दुष्काळांत जंगली लोक यांचा गर भाकरींत मिसळून खातात.

वेळू (वंसः ६७४; वाणीरः ३१८,५९९, ८६८; : वेणु ६३५; वेडस : ८७० वेडिसः७५४): Bambusa Arundinacea: Dendrocalamus strictus डोंगराळ भागांत नद्यानाल्यांच्या कांठीं व पाणथळींत आणि डोंगरांच्या उतारांवर बांबूंचीं बेटें आढळतात. जमिनीच्या कसाच्या व पावसाच्या मानानें बांबू ३० ते १०० फुटांपर्यंत उंच वाढतात. मावळांत व कोंकणांत तर घरोघर अंगणापरसांत बांबूचीं बेटें असतात. महाबळेश्वर व गोकर्ण या भागांत वेतांचीं बेटें आढळतात. बांबूला क्वचितच (Forest Flora.II. 568) फुलें येतात. उत्तर कानड्यांतल्या बांबूच्या जंगलांत १८६६ सालीं फुलें आलीं होतीं; तेव्हांपासून आजवर आलेलीं नाहींत. मलबारांत बांबूंना दर तीस वर्षांनीं फुलें येतात. फुलांच्या हंगामांतलें अंतर जेवढें जास्त तेवढी त्यांची वाढ अधिक. बांबूंचीं पानें कांटेरी असतात. तीं वस्त्राला चिकटलीं कीं ओढून काढीपर्यंत तशींच राहतात. *गाथासप्तशतींतलीं बांबूंचीं बेटें मावळांतलीं वा कोंकणांतलीं* असावींत. हीं दाट (क्र.३१८), कृष्णवर्ण व घनपर्ण (क्र. ५९९) बेटें कोठें गिरिग्रामीं (क्र. ६३५) आहेत तर कोठें नदीतीरीं (क्र.८७०) आहेत. क्र. ६७४ या गाथेवरून तर घरोघर परसांत बांबूंचीं बेटें असावींत असें दिसतें. याच गाथेंत बांबूच्या पानांचा प्रताप वर्णिलेला आहे.

शिरीष : (५६·८३३) Albizzia Lebbeok; Mimosa Birisso; शिरीषाला मराठींत ढांढोणी (निघंटरत्नाकर) असेंही नांव आहे. मराठांच्या रांगडेपणाचा हाही एक पुरावा ! हा वृक्ष हिंदुस्थानांत सर्वत्र आढळतो. याच्या फांद्यांमधून वारा घुमला कीं होतो त्या आवाजावरून याला शिरीष हें नांव मिळालेलें आहे असें सांगतात. शिरीषाचा वृक्ष आकारानें मोठा असतो.

उंची सुमारें साठ फूट व बुंध्याचा परीघ आठ ते दहा फूट असतो. याचीं पानें आंवळीसारखीं असतात. पालवी हिरवीगार, दाट असते. उन्हाळ्यांत फुलतो. फुलें पिंवळसर किंवा गुलबट रंगाचीं असतात. त्यांच्या पाकळ्या अगदीं लहान व पातळ असतात. मध्यभागीं पिंवळसर व हिरवट आणि लांब व विपुल केसरांचा झुपका असतो. शिरीषाचें फूल मूळचें नाजूक, केसरांमुळें तें अधिकच सुकुमार दिसतें. भारतीय पुष्पसृष्टींत शिरीष हें सर्वांत नाजूक फूल; शरीरानें व सुगंधानेंही; नुसता हात लागला कीं घडी विस्कटावी व कोमेजावें इतकें सुकुमार; कामिनीच्या कानावरून ढळलें तरी गालावरील स्वेदबिंदूच्या आधारानें तरंगत राहील (रघुवंशः १६·४८) इतकें हलकें; विदग्ध प्रियकराच्या निःश्वासानेंही कोमेजावें इतकें हळवें ! मग दुर्विग्धानें तें हाताळलें तर त्याची अवकळा (क. ५६) होणारच !

शेफालिका : (४१२, ९५३) Vitex Negundo : शेफालिका हा वृक्ष कीं वेल? त्याचीं फुलें नील कीं शुभ्र? " शेफालिका तु सुवहा निर्गुण्डी नालिका च सा। सितासौ श्वेतसुरसा भूतवेशी..." असें अमरकोशांत (वनौषधिवर्ग : ७०) सांगितलेलें आहे. निर्गुण्डीच्या मुख्य जाती दोन : कृष्ण व शुभ्र. शेफालिका, सुवहा, निर्गुण्डी व नालिका हीं चार नांवें काळ्या निर्गुण्डीचीं आणि श्वेतसुरसा व भूतवेशी हीं पांढऱ्या निर्गुण्डीचीं. अमरकोशांत निर्गुण्डीबद्दल आणखी एक (वनौषधिवर्ग : ६८) वचन आहे....' अथ सिन्दुकः। सिन्दुवारेंद्र सुरसा निर्गुण्डीन्द्राणिकेत्यपि।' सिन्दुक, सिन्दुवार, इंद्रसुरस, निर्गुण्डी व इंद्राणिका हीं पांच नांवें निर्गुण्डीचीं; पैकीं पहिलीं तीन पुल्लिंगी व शेवटचीं स्त्रीलिंगी. अमरकोशाच्या व्याख्यासुधा टीकेंत (निर्णयसागर : पृ. १७२) ' सिन्दुवारः श्वेतपुष्पः सिन्दुकः सिन्दुवारितः। नीलपुष्पः शीतसहो निर्गुण्डी नीलसिन्धुकः ' हें अनामिक आणि ' निर्गुण्डी नीलशेफाल्यां सिन्दुवारद्रुमेऽपि च।' हें मेदिनीकोशांतील, अशीं वचनें उदाहृत केलेलीं आहेत. यावरून दिसतें कीं सिन्धुवार हा वृक्ष असून त्याचीं फुलें पांढरीं असतात. डॉ. रॉक्सबर्ग सांगतात (Botanical Observations on Select Indian Plants : p 72) कीं शेफालिकेचीं फुलें पांढरीं असून त्यांचे देंठ गडद नारिंगी असतात. सायंकाळ झाली कीं त्याचा गर्द सुगंध आसमंतांत लांबवरही पसरतो. रात्रीं उमललेलीं फुलें सकाळीं गळून पडतात. कोणी

सांगतात कीं पारिजातक म्हणजेच शेफालिका. पण हीं फुलें वेगवेगळीं आहेत. वनौषधिगुणादर्शांत शेफालिकेचें वर्णन नाहीं, निर्गुण्डीचें आहे. " निर्गुडीचें झाड सुमारें दीड दोन पुरुष उंच वाढतें. हीं झाडें सर्वत्र प्रसिद्ध आहेत. निर्गुडींत साधी व कात्री अशा दोन जाति आहेत. कात्री निर्गुडीचीं फुलें निळ्या रंगाचीं असून पानें कातरल्यासारखीं असतात. साध्या निर्गुडीस पांढऱ्या रंगाचीं बारीक फुलें येतात ..फुलें काळीं येतात ती काळी निर्गुण्डी." रानटी लोक निर्गुण्डीस वणई म्हणतात. श्री. विट् सांगतात, (Descriptive Botanical List : p. 185) कीं निर्गुड, निर्गुडीचें झुडूप ५ ते १० फूट उंचीचें असतें; फुलें निळसर असतात, बारीक फळेंही येतात; जून ते डिसेंबर पर्यंत झुडपावर फुलें असतात; पानेंही सुवासिक व औषधि असतात. श्री. टालबट (Forest Flora: II: 353) सांगतात : हीं झुडपें मुंबई इलाख्यांत सर्वत्र आढळतात; तीं पड जमिनींत, नदीनाल्यांकांठीं वाढतात व कुंपणासाठीं लावतात; त्यांवर वर्षभर फुलें असतात. श्री. आपटे सांगतात (म. सा. प : २१ : २) : " शेफालिका ही जाई-जुई किंवा त्याच गणगोत्रांतली दुसरी एकादी वेली आहे.... शेफालिका म्हणजे निर्गुण्डी असें कोणी म्हणतात तें योग्य नव्हे ." निघंटरत्नाकरांत (भाग १ पृ. ३६२) शेफालिकेला (काळी, रान, श्वेत) निर्गुण्डी प्रतिशब्द दिलेला आहे. गाथा कवींना अभिप्रेत असलेलीं फुलें मात्र झुडपाचींच असलीं पाहिजेत; हीं झुडपें कुंपणाचीं असावींत असें दिसतें.

षट्पर्ण : (८८१): Alstonia : निघण्टरत्नाकरांत षट्पर्ण हा शब्द नाहीं; सप्तपर्णाला सातवीण हा अर्थ दिलेला आहे. घाटमाथ्यावर व कोंकणांत हीं झाडें पुष्कळ आहेत. वनौषधिगुणादर्शांत सांगितलें आहे : वृक्ष मोठमोठे होतात; हे कोंकण प्रांतीं पुष्कळ आहेत; एका डेंखास सात पानें असतात; या पानांचा आकार सांवरीच्या पानांसारखा लांबट असतो. मुळांतील उल्लेख अस्पष्ट आहे.

सप्तला : (६१९) : Jasminum arborescens· सप्तला म्हणजे (वनमालिनी),नेवाळी (रानमोगरी). ही जुईसारखीच एक वेल आहे. हिचीं पानें-फुलें जुईपेक्षां मोठीं असतात. फुलें एप्रिल व मे महिन्यांत येतात. देशी नाममालेंत (८.४) सत्तली म्हणजे शेफालिका असें सांगितलेलें आहे. नवमालिका पहा.

हरिद्रा : [८५७]:**Erinocarpus Nimmonii; Guttiferoe Spicata**: हीं झाडें सह्याद्रीच्या जंगलांत व कोंकणपट्टींत आढळतात. भीमाशंकरच्या जंगलांत हीं झाडें पुष्कळ आहेत (Forest Flora : I: 96). झाड साधारणतः मध्यम उंचीचें असतें. कधीं तें सत्तर फुटांपर्यंत वाढतें. यांचीं फुलें पिंवळीं असतात व फळांत पिंवळसर रस असतो. ऑगस्ट ते सप्टेंबरपर्यंत फुलांचा बहर असतो. याच्या हल्दू (Adina cordifolia) आणि हळदबेर (Chloroxylon Swietenia) या जातींचें लाकूड ही पिंवळें धमक असतें (Descriptive Botanical List : p. 43 ,139) . हळदबेराचीं झाडें सातपुड्याच्या जंगलांत पुष्कळ आहेत.

हलाहल : (६२) : हलाहल हा सर्पविशेष, त्याचप्रमाणें वनस्पतिविशेष आहे. वैद्यकीय शब्दकोशांत या विषारी वनस्पतीचें वर्णन आढळतें तें असें : " विषविशेष. ज्याचीं फळें व कंद गोस्तनांसारखीं व वर्णेकरून काळीं असतात व ज्याचे आसपास वृक्षादिक उत्पन्न होत नाहींत व ज्याचा वास घेतला असतां प्राणी मरतो. " गाथेंत किंवा शब्दकोशांत अधिक तपशील मिळता तर अभिप्रेत हलाहल वनस्पतिविशेष आहे कीं सर्पविशेष आहे, हें निश्चित करतां आलें असतें; सकृद्दर्शनीं मात्र सर्पविशेष अभिप्रेत असावा असें दिसतें.

निष्कर्ष : गाथासप्तशतींत उल्लेखिलेल्या बहुतेक सर्व वनस्पति हिंदुस्थानांत सर्वत्र आढळतात; मात्र त्यांत बऱ्याच अशा आहेत कीं ज्या केवळ दक्षिणापथांत आणि त्यांतही इकडील डोंगराळ भागातच आढळतात.

गाथासप्तशतींत उल्लेखिलेले बहुतेक सर्व वृक्ष वन्य आहेत. आम्र, कदम्ब, करञ्ज, मधूकादि वृक्षांच्या राया फळांफुलांसाठीं वस्तीलगत व नदीकांठीं जमीन धुपणी थोपविण्यासाठीं लावीत असत. अंकोल व पाटल अंगणांत आणि वेळूचीं बेटें परसांत लावीत असत. एरण्ड, शेफालिका इत्यादि झुडपांचीं कुंपणें अंगणांभोंवतीं असत. घरालगतच्या मोकळया आवारांत पुष्पलता व मरुबकादि झुडपें लावीत असत. फक्त कुरबक हौसेसाठीं लावलेला दिसतो.

सह्याद्रीच्या उतारावरल्या पूर्व-पश्चिम भागांत, मावळांत व कोंकणांत, वैशिष्टयानें आढळणाऱ्या वनस्पतींचे अनेक उल्लेख गाथांत आलेले आहेत. कमळांचीं तळीं, तालवृक्ष आणि केतकाचीं व वेळूचीं बेटें हें तर या भागाचें

वैशिष्ट्य आहे. यावरून अनुमान करतां येतें कीं असे उल्लेख ज्या गाथांत आलेले आहेत त्यांचे कर्ते या भागांतील रहिवासी असावेत. ज्या अर्थी स्थानिक वैशिष्ट्य दर्शविणाऱ्या अशा गाथांचा या सुभाषितकोशांत समावेश झालेला आहे त्या अर्थी अनुमान करतां येतें कीं या कोशाच्या संपादकाचाही या प्रदेशाशीं प्रत्यक्ष संबंध असला पाहिजे.

(१०) गाथासप्तशतींतील पशु, पक्षी व प्राणी

संस्कृत व प्राकृत साहित्यिकांना पशुपक्ष्यांचीं ऋतुमानानुसार वर्णनें करण्याची व त्यांचे दाखले देण्याची मोठी हौस. गाथासप्तशतींतील गाथा हीं ग्रामीण गीतें असल्यामुळें त्यांत पशुपक्ष्यांचे अनेक उल्लेख यावेत हें साहजिक आहे. यांपैकीं क्वचित् कांहीं उल्लेख साहित्यांतील तत्कालीन प्रवृत्तींच्या अनुरोधानें सांकेतिक असले तरी बहुसंख्य उल्लेख नैसर्गिक व वास्तविक आहेत. हे उल्लेख ग्रामीण वातावरणाचा आभास उत्पन्न करण्यासाठीं अर्वाचीन कवि करतात तसे कृत्रिम नाहींत; दृढ परिचय व सूक्ष्म निरीक्षण यांमुळें निश्चितपणें माहीत असलेलीं स्थानिक पशुपक्ष्यांचीं नैसर्गिक वैशिष्ट्यें गाथाकवींनीं मार्मिकपणें, सहृदयतेनें व साहजिकपणें दिग्दर्शित वा सूचित केलेलीं आहेत. त्यांची थोडीबहुत माहिती येथें देतों.

(१) पशु

अस्वल : अच्छभल्ल : (देशीनाममाला : १·३७) १०९ : रिक्ख (रिच्छोः देशी नाममाला ७·६ ऋक्ष): ७३६ : अच्छभल्ल ह्या देशी शब्दापासून अस्वल हा मराठी शब्द सिद्ध झाला असावा. विन्ध्य पर्वताच्या ऋक्ष या वैकल्पिक नांवावरून अनुमान होतें कीं या भागांत अस्वलें पुष्कळ असावीत. सातपुड्याच्या जंगलांत अजूनही अस्वलें पुष्कळ आहेत. अस्वलें पिकांच्या फार नास करतात. मोहाची मादक फुलें खाऊन उन्मत्त झालीं कीं तीं माणसावरही हल्ला चढवितात. हिंदुस्थानांतील अस्वलें करड्या काळ्या रंगाचीं असतात. अस्वलाचें मांस व चरबी हीं खाण्याला फार चांगलीं असतात असें सांगतात. क्र. १०९ मधील अस्वलाची हत्या त्याच्या चरबीसाठीं किंवा पिकांचा विध्वंसक म्हणून झालेली असावी. जळून गेलेला पेंढा अस्वलाच्या बाह्यांगासारखा काळाभोर आणि शेकोटीचा पेटता भाग त्याच्या

अंतर्भागासारखा लालभडक असल्याचें येथें विधान आहे. क्र. ७३६ मधील अस्वलाचा उल्लेख केवळ सांकेतिक आहे.

कमठ : (४१४)= कांसव. विहिरींचें व तळ्यांचें पाणी स्वच्छ रहावें म्हणून त्यांत कांसवें सोडतात. दुष्काळांत तळीं आटतात तेव्हां त्यांच्या तळाला तडकल्यासारख्या भेगा पडतात, अगदीं कांसवाच्या पाठीसारख्या. तळीं कोरडीं पडलीं कीं मासे मरतात व कांसवें तडफडतात. या लक्षणांवरून हीं तळीं पठारालगतच्या भागांतलीं असावींत असें वाटतें.

कण्हसार : कृष्णसार=काळवीटः (२५) : मृग सदराखालीं पहा.

कुत्रा : (मण्डल : ६६२, ६८७; सुणअ, शुनकः १३८, १७५, ५४९,६८६, ७५९) : कुत्रा व मनुष्य यांची मैत्री फार प्राचीन आहे. तरीही वागणूक गलिच्छ असल्यामुळें कुत्रें अपवित्र मानण्यांत येतें. क्र. १७५ या गाथेंतील कुत्रें सिंहानें मारलेलें आहे, हें कुत्रें शिकारी नसून भुंकरें असावें. क्र. १७५ मधील कुत्रें हुंगरें आहे. क्र. ७५९ मधील कुत्रें गोंडा घोळणारें आहे. कुत्र्याची जात इमानी खरी, पण त्याचें इमान त्याला खायला प्यायला घालील त्याच्यापुरतेंच मर्यादित असतें, मग तो घरधनी असो किंवा चोरकामुक (क्र. ६६२) असो. क्र.६८६ व ६८७ मध्यें श्वानांच्या हुंडाचे उल्लेख आलेले आहेत. ते जेवढ्या धिटाईचे आहेत तेवढेच उपरोधिक आहेत. या गाथा वाचतांना कांहीं लब्धप्रतिष्ठितांना नाक मुरडण्याचा मोह होईल, पण तो त्यांनीं आवरावा. यांत अश्लील असें कांहींही नाहीं. हा प्रकार हर हंगामीं हरएकाच्या दृष्टीस पडतो. येथें केवळ कामसाधू लोचट वृत्तीच्या दाखल्यासाठीं हा समर्पक दृष्टांत दिलेला आहे.

गवा : (७३६) : संदर्भानुसार हा उल्लेख सांकेतिक आहे. गवा म्हणजे रानटी बैल. दाट जंगल असेल तेथेंच गवे आढळतात. मध्यप्रांत व म्हैसूर या भागांतील जंगलांत आजही गव्यांचे थवे भेटतात. सातपुड्यांत व पूर्वेच्या खोऱ्यांत गवे पुष्कळ आहेत. गोदावरीचा तृतीय चतुष्कांतला प्रवाह ' बिसन हिल्स ' मधून गेलेला आहे. त्या भागांत असलेल्या गव्यांवरूनच या पर्वतांनी हें नांव मिळालेलें आहे.

गाढव=रासह : (८१) : अल्पमोली, इमानी, कामसू, भारवाहक म्हणून अत्यंत उपयुक्त असलेलें हें जनावर बेडौल व बुद्धिहीन आणि शांत व प्रतिकार-

शून्य म्हणून बिचारें सदैव सर्वांच्या तिरस्कारास पात्र झालेलें आहे. कुंभार, परीट, बेलदार व भटक्या जमाती भारवाहनासाठीं गाढवांचा भरपूर उपयोग करतात आणि काम झालें कीं उकिरड्यावर सोडून देतात.

गाय व बैल : (गाय : २७१, ४६०, ४६२, ६०९, ६३७, ६३८, ७९५, ८०६; तर्णक : १९; बैल : २३८, २७५, ४६०, ६३८, ८०६, ८१४, ९५२; वछआ : ७२६): मनुष्यानें माणसाळविलेल्या जनावरांत गाय व बैल यांना अग्रस्थान आहे. दूध व त्यापासून होणारे पदार्थ, मांस आणि शेतकाम यांसाठीं त्यांचें संवर्धन फार प्राचीन काळापासून होत आहे. वेदांत जागोजाग गाईची महति वर्णिलेली आहे. तरीही त्या काळांत उच्च दर्जाच्या पाहुणचारासाठीं गोमांस वापरण्यांत येत असे. उच्चवर्णीयांमधील प्रसंगविशेषीं गोमांसभक्षणाची प्रथा भागवत धर्माच्या प्रसारानंतर लुप्त झाली असावी. ख्रि. पू. दुसऱ्या शतकांत महाराष्ट्रांत भागवत धर्माचा प्रवेश झालेला होता असें नाणेंघाटांतील नायनिकेच्या लेखावरून दिसतें. गाथासप्तशतींतील कृष्ण व गाई यांबद्दलचे उल्लेख या निष्कर्षाला पोषक आहेत. महाराष्ट्रांतील अनेक शिवमंदिरांच्या प्रस्थापनेच्या दंतकथा गोपूजेशीं संबद्ध आहेत आणि महाराष्ट्रमाता गोदावरी हिचें नांव गाईंच्या समृद्धीशीं; म्हणूनच कीं काय कोण जाणे, गाथासप्तशतींत रेडे व म्हशी यांच्या अनुषंगानें खाटकांचा उल्लेख आलेला असला तरी गोमांसाचा उल्लेख आलेला नाहीं क्र. २३८ मध्यें हिंवाळ्यांत वस्तुविनिमय-पद्धतीनें बैल खरेदी केल्याचा उल्लेख आहे. यावरून असे व्यवहार हिंवाळ्यांत होत असत असा निष्कर्ष काढावयास प्रत्यवाय नाहीं. या दिवसांत बैलांना शेतांत काम नसतें आणि शेतकऱ्यांपाशीं खरेदीचीं साधनें भरपूर असतात. चार पुष्ट बैल व पांच घागरी दूध देणारी गाय संग्रहीं असणें हें शेतकऱ्यांच्या संपन्नतेचें लक्षण मानण्यांत येत (क्र. ८०६) असे. शेतकरी लोक आपलें गोधन उघड्यावर (क्र. ८१४) किंवा गोठ्यांत (क्र. ४६०, ६०९, ६३८) बांधीत असत. जनावरांचा गोठा घरापासून स्वतंत्र (क्र. ५६०) असावा. क्र. २७५ मधील बैल ओझ्याचा आहे. क्र. ९५२ या गाथेंत बैलाची कोणाच्याही शेतांत चोरून घुसण्याची खोड चोरकामुकांच्या अनुरोधानें व्यक्त केलेली आहे. चांगल्या बैलाला चांगली गाय मिळेल अशी तरतूद तत्परतेनें (क्र. ६३८)

करण्यांत येत असे. गाई दुधासाठीं पाळण्यांत येत (क्र. ४६२, ६३७, ८०६). त्यांच्या दुधाचें परिमाण दोहन करणाऱ्या गवळ्याच्या कौशल्यावर अवलंबून (क्र. ४६२, ६३७) असतें. रोजच्या परिचयामुळें गाई, बैल व खोंड यांच्या खोडी गाथाकवींना तपशीलानें माहीत आहेत. बैल मारका असला तरी गाय त्याच्या शिंगावर आपली खाजरी पापणी निर्भयपणें घांसते (क्र. ४६०), गवताच्या कोंवळया व तोटक्या कोंबांना दांत लागत नसला तरी त्यावरून गाईबैल जीभ फिरवतात (क्र. ७९५) आणि उंडारलेलें वासरूं कान उभारून मन मानेल तेथें घुसतें (क्र. १९), हे उल्लेख मार्मिक व सूक्ष्म निरीक्षणाचे द्योतक आहेत.

गेंडा : (७३६): संदर्भानुसार हा उल्लेख सांकेतिक आहे. हिमालयाच्या पायथ्याच्या दलदलीच्या प्रदेशांत हल्लींही गेंडे वावरतांना दिसतात सातपुड्याच्या जंगलांत गेंडे पाहिलेले लोक अजून आहेत. बंदुका प्रचारांत येण्यापूर्वी गेंड्याची शिकार फार साहसाची असे. त्याच्या कातड्यावर तरवार चालत नाहीं, म्हणून त्याच्या ढाली करतात. रसविन्मुखतेचें प्रतीक म्हणून एका शीर्षकासाठीं मी गेंड्याची योजना (क्र. ८९४) केलेली आहे.

चितळ : ६२९ : मृग सदराखालीं पहा.

चित्ता : (७५५) : दीवि म्हणजे चित्ता. हें जनावर हिंदुस्थानांत आणि सह्याद्रीच्या जंगलांत सर्वत्र आढळतें. मराठी लोक चित्त्याला बिबळ्या म्हणतात. त्याचे अंगीं वर्णनीय अशीं वैशिष्ट्यें अनेक आहेत आणि शेतकऱ्यांना त्याचा उपद्रव पुष्कळ होतो. असें असूनही गाथासप्तशतींत त्याचा एकच उल्लेख यावा आणि तोही उत्तरार्धांत असावा, याचें आश्चर्य वाटतें. हा चित्ता शिकारी तर नसेल ?

पाठीण : पाठीनः (४१४) : मत्स्यविशेष. तळीं आटलीं कीं हे मासे फक्त तडफडतात. हा मासा प्रचण्ड असल्याचा उल्लेख कथासरित्सागरांत आहे. मत्स्याहाराचा उल्लेख गाथासप्तशतींत नाहीं.

माकडः (कई ५३१; मक्कड १७१; वाणरी ५३२; हरी ९) : नर व वानर या शब्दांत आहे त्याहून अधिक सादृश्य कपि व कवि या अर्थांच्या कइ या प्राकृत शब्दांत आहे ! माकडें मोठीं धूर्त असतात अशा लोककथा

आहेत; मराठी म्हणी मात्र त्यांच्या अविवेकाच्या द्योतक आहेत. गाथासप्तशतींत वर्णिलेल्या माकडचेष्टा अधीर प्रियकरांच्या बाबतींत प्रेयसींना वारंवार अनुभवावयास मिळतात! हीं वर्णनें गाथाकवींच्या सूक्ष्म निरीक्षणाचीं द्योतक आहेत.

मांजरः (२८६) : धान्याची नासधूस करणाऱ्या उंदरांच्या नाशासाठीं मांजरें घरोघर पाळतात. एका घरीं पाळलेलें मांजर सहसा दुसऱ्या घरीं जात नाहीं, पण त्याच्या अंगीं कुत्र्याचें इमान नसतें. त्याचें घ्राणेंद्रिय फार तीव्र असतें. मांजराची नजर, दिवसा दुधावर, रात्रीं उंदरावर. यामुळें दुधाच्या बाबतींत मांजर अश्वत्थाम्यासारखें कधींही फसत नाहीं.

मुंगूसः (७७५) : ॲरिस्टॉटल, प्लिनी, स्ट्राबो वगैरे प्राचीन शास्त्रज्ञांनीं व प्रवाशांनीं मुंगसांचें उल्लेख केलेले आहेत. इजिप्त व हिंदुस्थान या देशांत सर्पांचे शत्रु म्हणून मुंगसें पाळण्यांत येतात. तीं सापांचीं, तशींच कोंबड्यांचीं व कबूतरांचीं अंडीं खातात. सापाचें विष त्यांना बाधत नाहीं अशी समजूत आहे, ती खरी नाहीं. सापावर हल्ला चढवितात तेव्हांच्या त्यांच्या हालचाली इतक्या चपळ व आवेशी असतात आणि तीं सापाला अशा जागीं धरतात कीं त्यांना साप सहसा डसूं शकत नाहीं; डसला तर तींही वांचत नाहींत.

मृग : (कण्हसार = काळवीट : २५; कुरङ्ग : ६०१; पुंसिअ : ६२९; मृग : २८०, २८७, ४६६, ६१८, ९८०; मृगाक्षि : ४६६; मृगी : २८७, ६१८, ७५७; हरिण : ५८८, ५९४, ६२९) : यांपैकीं क्र. २८०, ४६६ व ९८० हे उल्लेख मृगलांछन चंद्राला अनुलक्षून आहेत. चापल्य, सौंदर्य व युग्मनिष्ठा हीं मृगांचीं वैशिष्ट्यें आहेत. श्री. बाल्फर (सायक्लोपीडिया. I. 116) सांगतात कीं मृग निष्ठेनें एकपत्नीव्रती असतात. गंगायमुनांच्या खोऱ्यांव्यतिरिक्त हरणें हिंदुस्थानांत सर्वत्र आढळतात; विशेषतः विन्ध्याद्रि व सह्याद्रि यांच्या पठारांवर. सुमारें पन्नास वर्षांपूर्वी हरणांचे कळपच्या कळप माळरानावर जागोजाग भेटत. महायुद्धांच्या काळांत कातडीं व मांस यांसाठीं शिकाऱ्यांनीं त्यांचा जवळ जवळ उच्छेद केलेला आहे. गोंडी भाषेंत मृगाला भिरकुरु व मृगीला भीर म्हणतात. मराठवाड्यांतील भीर हें ग्रामनाम यावरून तर पडलें नसेल? हरणें मोकळ्या जंगलांत वस्तीला असतात आणि पोटापाण्यासाठीं माळरानांवरून कळपा-

कळपांनीं भटकतात. चितळ दिवसा जंगलांत पाण्यानजीक वस्तीला असतें आणि रात्रीं आजूबाजूला चरतें. नगर जिल्ह्यांतील चितळी हें ग्रामनाम यांच्या त्या भागांतील समृद्धीवरून तर पडलें नसेल? हरणांची गति इतकी शीघ्र असते कीं शरीर शाबूत आहे तोंवर शिकारी कुत्रेही त्यांना पकडूं शकत नाहींत. यासाठीं दक्षिण महाराष्ट्रांतले शिकारी लोक शिकविलेल्या चित्त्यांची योजना करतात. जसें चापल्याचें तसेंच प्रीतीच्या एकनिष्ठेचें हरण हें प्रतीक आहे. क्र. २८७, ५९४ व ७५७ या गाथांत मृग व मृगी यांची परस्परांवरील प्रीति व्यक्त झालेली आहे; आणि क्र. ५८८ मध्यें हरिणाचा भोळेपणा. काळवीटाची ऐट अवर्णनीय असते. गाथासप्तशतीच्या काळांत काळवीट उजवीकडून आडवा गेला तर कार्यसिद्धि होणार नाहीं असें मानून प्रवासी घराकडे परत (क्र. २५) जात असत. त्या काळांत जातिवंत शिकारी हरणांची, विशेषतः चितळांची शिकार करणें कमीपणाचें (क्र. ६२९) मानीत. क्र. ६०१ या गाथेंत क्रौंचवधाच्या तोडीचा करुण प्रसंग वर्णिलेला असून संदर्भानुरोधानें त्या काळीं प्रचलित असलेल्या अहिंसा तत्त्वाचा पुरस्कार केलेला आहे.

मेस : (मेंढा : ८१४) लोकर, कातडें व मांस यांसाठीं व खतासाठीं मेंढरें पाळतात. महाराष्ट्राचें वातावरण समशीतोष्ण असलें तरी उष्णतेकडे झुकणारें असल्यामुळें येथें उत्कृष्ट मेंढरांची पैदास होत नाहीं. मेंढरांचें निवासस्थान उघड्यावरच असतें. या गाथेंतील उल्लेख केवळ सांकेतिक आहे.

रण्णुंदुर = रानउंदीर : (७६३) : रानांत, शेतांच्या बांधांत रानउंदीर बिळें करून राहतात. ते उभीं पिकें कुरतडतात आणि पीक तयार झाल्यानंतर लोंब्या कुरतडून गोळा केलेल्या धान्याचा सांठा हिंवाळ्यासाठीं आपल्या बिळांत करून ठेवतात. दुष्काळ पडला किंवा पडावयाचा असला म्हणजे ते माजतात. हा शेतकऱ्यांचा मोठा शत्रु, आणि सर्प हा या उंदरांचा शत्रु.

रानडुक्कर : (४०२) : भोण्डी : (भुंडीरो, भुंडो = सूकर : देशीनाममाला : ६.१०६): रानडुक्कर हा शेतकऱ्यांचा फार मोठा शत्रु. शरीरानें ओबडधोबड असला तरी त्याची चव मोठी चोखंदळ असते. शेतांतले उत्तम, मधुर, कोवळें लुसलुशीत तेवढेंच तो खातो; रात्रीं बेरात्रीं शेतांत घुसतो आणि खातो त्याहून नासधूस जास्त करतो. भुकेनें व्याकुळ झाला असतां दिवसां उजेडीं राखणदारांना न

जुमानतां उसासारख्या दाट पिकांत तो बेधडक घुसतो. याचें मांस फार चवदार असतें व मादक असतें. म्हणून मुसंडीचा धोका पत्करून याची शिकार करण्यांत येते. वसंतपूजेच्या दिवशीं रानडुकराची शिकार करणें हें धार्मिक कर्तव्य होय असें रजपूत मानतात. ही प्रथा शकांच्या संसर्गानें राजस्थानांत सुरू झालेली असावी असें कांहीं संशोधकांचें मत आहे.

रेडा व पाडी : (महिस = रेडा : ५४९, ५५१, ५६०, ५८४, ६८०, ८१४; पाडी= महिषीवत्सः ६५; सैरह = रानरेडाः १७२, ७३६) : दूध, वाहतूक व शेतकाम यांसाठीं खेडूत व शेतकरी लोक रेडे व म्हशी पाळतात. गाईपेक्षां म्हैस जास्त व दाट दूध देते आणि बैलापेक्षां रेडा जास्त वजन ओढूं शकतो; शिवाय खूर पसरट असल्यामुळे त्याचे पाय चिखलांत रुतत नाहींत; म्हणून भातशेतीच्या भागांत रेडयांचा वापर जास्त होतो. या जातीला पाणी (क्र. ५८०), चिखल (क्र. ५६०) व दमट छाया (क्र. ५८०) फार आवडतात. चिखलामुळें त्यांच्या शरीरावर चिलटें सारखीं घोंगावत (क्र. ५६०) असतात. उन्हांत त्यांच्या तोंडांतून सारखी लाळ गळत (क्र. ५५१) असते खेडूत आपल्या आवडत्या रेडयांच्या गळ्यांत घंटांच्या माळा (क्र. १७२) बांधीत. क्र. ५८४ या गाथेंत रेडयाच्या उदराचा भेद केलेला आहे व क्र. ५८० या गाथेंत कसायांचा उल्लेख आलेला आहे. यावरून गाथासप्तशतीच्या काळांत महिष-मांससेवनाचा प्रघात असावा असें वाटतें.

वाघ : (वग्घ = व्याघ्र : ९४५; सद्दूल = शार्दूल ७३६): चित्त्याप्रमाणें वाघांचेही उल्लेख थोडे आहेत. साहसी व्याध वाघांची शिकार त्यांच्या आकर्षक कातडयांसाठीं करीत असावेत आणि तीं त्यांच्यापासून खरेदी करण्याकरितां वाणी त्यांच्या घरोघर जात असावेत असें क्र. ९४५ या गाथेवरून दिसतें.

शरभ : (सरभ : ७४२) : हा प्राणी काल्पनिक आहे व हा उल्लेख सांकेतिक आहे. याचें शरीर सिंहासारखें असून त्याला हत्तीसारखी सोंड व सुळे असतात आणि पाठीच्या कण्याला तरवारीसारखी धार असते, असें त्याचें वर्णन आढळतें. दक्षिण हिंदुस्थानांतील मंदिरांतील शिल्पांत याच्या प्रतिमा वारंवार दृष्टीस पडतात.

सिंह : (पंचानन : १००५; सिंह : १७१, ९७०) : एका काळीं हिंदुस्थानांतील सर्व जंगलांत सिंह होते; आतां ते फक्त गीरच्या जंगलांत राहिले आहेत. वाघ हा जसा जंगलचा राजा तसा सिंह हा माळरानाचा राजा. गोदावरीच्या परिसरांत असे माळ पुष्कळ आहेत. क्र. १७१ या गाथेंत सांगितल्याप्रमाणें या भागांत सिंहांची वस्ती असणें अशक्य नाहीं. म्हणूनच अजंठ्याच्या लेण्यांत सिंहाचीं अनेक चित्रें रंगविण्यांत आलेलीं आहेत. सिंहाला पंचानन (पंचं आननं यस्य) म्हणतात, कारण त्याचा जबडा नेहमीं उघडा असतो. अशा विक्राळ प्राण्याच्या अयाळाला स्पर्श (क्र. ९७०) करण्याला कोण धजावणार ?

हत्ती—(११६, १२१, १७३, २५८, २६०, ३८३, ४५४, ५२६, ५४८, ६३०, ६४०, ७३६, ७८२, ७८३, ७८४, ७८५, ७८६, ८१४, ९१९, ९४५): गाथासप्तशतींत पशूंपैकीं सर्वांत अधिक उल्लेख हत्तींचे आलेले आहेत. दक्षिण आशिया व आफ्रिका या भागांतच हत्ती आढळतात. विशिष्ट प्रदेशांत विशिष्ट पशु विशेष उपयुक्त असतात : घोडा हें वाहन मैदानचें आणि गाढव हें खडकाळ डोंगराचें; उंट हें वाहन रणाचें आणि हत्ती हें अरण्याचें. दण्डकारण्यांत दाट अरण्य होतें, म्हणूनच गाथासप्तशतींत हत्तींचे पुष्कळ उल्लेख आलेले आहेत. क्र. ११६ या गाथेंत विन्ध्य पर्वतांत वावरणाऱ्या हत्तींच्या कळपांचा उल्लेख पुलिंदांच्या साहचर्यांत आलेला आहे; क्र. ७८२ या गाथेंतील हत्ती विन्ध्य पर्वताचा त्याग करून भातशेतीच्या भागांत गेल्याचा उल्लेख आलेला आहे; आणि क्र. ५४८ या गाथेंत हत्तींचा कळप नर्मदेच्या डोहांत उन्मत्तक्रीडा करीत असल्याचें वर्णन आलेलें आहे. विन्ध्याद्रीचें इन्ध्याद्रीशीं समीकरण केलें असतां हीं वर्णनें गाथासप्तशतीच्या जन्मभूमीशीं जुळतात. नर्मदेच्या खोऱ्यांत हत्तींचे अश्मीभूत सांगाडे (श्री. बाल्फर : सायक्लोपीडिया: I. 1040.) सांपडलेले आहेत. खानदेश गॅझेटीयर कर्ते (p 29) सांगतात "सतराव्या शतकापर्यंत खानदेशच्या उत्तर भागांतील अरण्यांत जंगली हत्तींची निपज मोठ्या प्रमाणावर होत असे. मोंगलांच्या स्वाऱ्या, तापी खोऱ्यांतली वर्दळ आणि नांगराखालीं येणाऱ्या जमीनींचा विस्तार या कारणांमुळें या भागांतील हत्ती नष्टप्राय झालेले आहेत." बौद्ध शिल्पांत व अजंठ्याच्या

चित्रपटांत हत्तीला प्रमुख स्थान आहे. प्राचीन हिंदी व ग्रीक आणि मध्ययुगीन हिंदी सैन्यांत हत्तींचा उपयोग मोठ्या प्रमाणावर झालेला आहेः नेत्याच्या वाहनासाठीं आणि झेंड्याच्या व डंक्याच्या (क्र. ५२६) धारणासाठीं, शत्रूवर चालून जाण्यासाठीं आणि अवजड युद्धास्त्रें ओढण्यासाठीं. हत्ती रानांत (क्र. ६४०, ७८२) राहतात किंवा राजवाड्यांत (क्र. ८१४). हत्ती नेहमीं कळप (क्र. ११६, ५४८, ७८२, ७८४, ७८५, ७८६) करून राहतात. लहान कळपांत आठ ते दहा आणि मोठ्या कळपांत सत्तर ते ऐंशीं हत्ती असतात. सर्वांत बलिष्ठ व हुषार असतो तो कळपाचा पुढारी होतो. कळपावर संकट आलें कीं त्याला स्वतःचा मद आवरून सर्वांचें संरक्षण (क्र. ७८५) करावें लागतें. जिव्हालौल्याच्या आहारीं जाणाराला नेतृत्व (क्र. ७८२) मिळत नाहीं. पुढाऱ्याच्या नेतृत्वाखालीं कळप क्रीडा (क्र. ५४८) करतो. हत्तीचें गंडस्थळ धडक देण्याएवढें मजबूत व विशाल (क्र. १२३, ९३३) असतें. निरंतर व पृथुल स्तनयुग्माशीं गजकुंभाची तुलना (क्र. २५८, २६०) नेहमीं करण्यांत येते. हत्तीच्या कपाळाला दोहों बाजूंना छिद्रें असतात. त्यांतून मद (क्र. ७८५, ७८६) स्रवतो. इतका, कीं त्यामुळें त्याचें गंडस्थळ ओलें होतें (क्र. ६४०). हा मद सुगंधी असतो. संभोगेच्छा जागृत आहे तोंवरच हत्तीला मदस्राव (क्र. ७८६) होतो. मद आला कीं हत्ती धुंद होतो व झाडांना टकरा (क्र. ११६) मारतो. हत्तीच्या गंडस्थळांत मोतीं असतात अशी समजूत (क्र. १७३, २६०) आहे. ती निराधार आहे. हत्तीला पाण्यांत डुंबणें (क्र. ५४८) आणि गवतानें, चिखलानें व धुळीनें सर्वांग माखणें (क्र. ५२६) फार आवडतें. यामुळें हत्ती चिखलांत फसतात (क्र. ४५४). हत्तीला ऊन सहन होत नसल्यामुळें शक्य तेव्हां तो आपलें गंडस्थळ ओलें ठेवण्याचा प्रयत्न करतो (क्र. ६४०). हत्ती सोंडेचा उपयोग हातांसारखा (क्र ४५४) करतात. पृथुलनितंबिनींच्या मांड्यांची सोंडेशीं तुलना (क्र. ९१९) करण्यांत येते. वनगज एवढा अजस्र व सशक्त, पण तो केवळ शाकाहारी (गवत : क्र. ५२६; भात : क्र. ७८२ व मृणाल : क्र. ३८३) असतो. हत्तीचें हत्तिणीवर फार प्रेम (क्र. ३८३, ४५४) असतें. हत्तींची शिकार हस्तिदंतासाठीं होते. व्याधांपासून वाणी हस्तिदंत खरेदी

करतात आणि विक्रीसाठीं संग्रहीं (क्र. ९४५) ठेवतात. पुलिंद हत्तींची शिकार धनुष्यबाणांनीं (क्र. ११६) करतात. रानांत वणवे पेटवून शिकारी हत्तींना घेरतात (क्र. ७८४). क्र. ७८१ या गाथेंत हत्ती पकडण्याची एक तत्कालीन पद्धत सांगितलेली आहे. एक खड्डा खणावयाचा, इतका खोल कीं त्यांतून हत्तीला बाहेर पडतां येऊं नये; त्यांत एक गवती हत्ता उभा करावयाची, इतका हुबेहूब कीं तेथें छावा रुतलेला आहे असें जवळपास येणाऱ्या हत्तीला वाटावें; त्या खड्डयावरची पोकळी काटक्यांनीं व गवतानें आच्छादून टाकावयाची; नंतर हत्ती तिकडे वळवावयाचे आणि खड्डयांत हत्ती अडकला कीं त्याला पकडावयाचें. म्हैसूर-कर्डील जंगलांतील हत्तींना शिकविलेल्या हत्तींच्या साह्यानें फसवून लांकडी तट-बंदीच्या खड्डयांत आणवून पकडण्यांत येतें. गाथासप्तशतींतील उपरोक्त युक्तीचीच ही सुधारलेली व विस्तारलेली आवृत्ति आहे, हें स्पष्ट आहे. असे फसवे उपाय योजण्यांत येतात, म्हणूनच अनुभवी हत्तिणीनें छाव्याला उपदेश केला आहे (क्र. ७८३) कीं तुझें कुल उच्च व शरीर सशक्त असलें तरी आणि म्हणूनच विश्वासघातकी मानव तुला कधीं बंधनांत अडकवतील याचा नेम नाहीं, म्हणून सावध रहा, केवळ दैवावर विसंबूं नकोस.

(२) पक्षी :

कावळा : (१०२, १३४, १६२, २०५, २४८, ५६३, ७०५, ७४०): हिंदुस्थानांतील पक्ष्यांमध्यें कावळ्यांची जात बहुसंख्य असून अत्युच्च पर्वत-शिखरांव्यतिरिक्त इतरत्र सर्वत्र ते आढळतात, विशेषतः मनुष्यवस्तीच्या आसपास. त्यक्तान्नावर ताव मारणारे, क्षतांवर चोंच मारणारे, कृष्णवर्ण व लोचट, म्हणून त्यांची तुलना दुर्जनांशीं करण्यांत येते, आणि हंसांची सज्जनांशीं. हंस व सज्जन हे अल्पसंख्य आणि काक व दुर्जन हे बहुसंख्य असा, रहाटीचा रिवाजच (क्र. ७०५) आहे. श्री सलीम अली (The Book of Indian Birds) यांनीं केलेलें कावळ्यांच्या गुणदोषांचें वर्णन नमूद करण्यासारखें आहे: "His intelligence & boldness, coupled with an infinite capacity for scenting and avoiding danger carry him triumphantly through a life of sin ano wrong doing. His thieving propensities are in a great measure redeemed by his effecient

service as a scavenger." गाथाकवींनीं हे गुणदोष मार्मिकपणें दिग्दर्शित केलेले आहेत. गृहिणीनें ठेवलेला बळी आपल्यासाठींच आहे व तो ग्रहण करण्यांत कांहीं धोका नाहीं हें संवयीनें माहीत असलें तरी त्याभोंवतीं बांगडी पडलेली पहातांच कावळ्याची सावधगिरी जागृत (क्र. २०५) होते. प्रियकर व प्रेयसी यांची प्रेमसमाधि लागलेली पाहून त्याच्या हातांतील भिक्षापात्रांवर झडप घालण्याचा हुशारी व हिंमत (क्र. १६२) त्याचें अंगीं असते. या सर्वभक्षकाला वारंवार तिरस्कारपूर्वक हांकून लावलें तरी तो लोंचटपणें घिरट्या घालीत (क्र. १३४) राहतो व प्रसंगविशेषीं झडप घालून जेवत्या ताटांतलें अन्न उडवतो; कुण्टिणीचें जिणें असेंच असतें, हें या गाथेंत मोठ्या मार्मिकपणें सांगितलेलें आहे. दारोदार व स्मशानांत बळी खाणारा कावळा चिरकाल जगतो असें हीं तेथें विधान आहे. कावळा चिरंजीव असतो अशी सामान्य समजूत आहे, पण ती खरी नाहीं. कावळ्याचें दर्शन व स्पर्श अशुभ मानण्यांत येतात.

कुक्कुड : कोंबडा : (५८२, ६९८) : अगदीं अलीकडेपर्यंत गांवगाड्यांतल्या फक्त हलक्या जाती कोंबड्या पाळीत असत. इतका किफायतशीर धंदा दुसरा नाहीं. पहांट झाली कीं कोंबडा आरवतोच गाढ झोपेंत असणारांनाही जागविण्याइतक्या तीव्र स्वरांत.

जलरङ्कुण : पाणकोंबडी : (५७८): नद्या व तळीं यांच्या कांठांवरल्या व लगतच्या झुडपांच्या जाळींत यांची वस्ती असते. परक्याची चाहूल लागतांच त्या आडोशाला लपतात. या सामान्यतः स्तब्ध असतात; पण संगमाच्या हंगामांत मात्र (कुवाक् कुवाक् कु कु कु कु) सशब्द होतात.

पारवा : (पारावअ : ६८.) : Dove व Pigeon या दोन्ही शब्दांना कपोत व पारावत हे संस्कृत (कबूतर व पारवा) प्रतिशब्द आढळतात. पारवा म्हणजे निळे कबूतर. हेंच येथें अभिप्रेत आहे असें दिसतें. संकरामुळें त्यांच्यांतही बहुरंग आढळतात. हिंदुस्थानांत पारवा हा कावळ्याइतकाच परिचित आहे. त्याच्या अंगीं असतात ते दुर्गुण मात्र याच्या अंगीं नसतात. माणसाळलेले पारवे मनुष्यवस्तीत घरांच्या छपरांनजीकच्या कानाकोंपऱ्यांत घरटीं घालतात आणि भर बाजारांतही थव्यानें निर्भयपणें दाणे टिपतात. श्री. सलीम अली

सांगतात (पूर्वोक्त : पृ. २९२) : जुनाट विहिरी, पडक्या इमारती, डोंगरी किल्ले व तुटलेले कडे हीं पारव्यांचीं आवडतीं वसतिस्थानें होत; येथें पारवे दिवसां उजेडां सारखे घुमत असतात; कोणाची चाहूल लागतांच ते स्तब्ध होतात. क्र. ९४ मध्यें पडक्या देवळांत पारवा घुमत आहे आणि त्याचें घुमणें हेंच निर्विघ्न एकांताचें आश्वासन आहे. वरील वर्णनाच्या अनुरोधानें पाहिलें असतां हें चित्र किती वास्तविक आहे तें प्रत्ययास येतें.

पोपट : (कीर : ७५, ३०८, ६६६, ८१५; पुंसुअ (नर) ५६२; सूअ : (शुक) : २६३) : हिरवे पोपट हिंदुस्थानांत सर्वत्र आढळतात. नराच्या गळ्याभोंवतीं (क्र. ५६२) गळेसरासारखी लाल पट्टी असते. पोपट लहान लहान थव्याथव्यानें राहतात. पोपटांचा थवा पारव्यांपेक्षां लहान असतो. राईत त्यांचे सांघिक वसतिस्थान असतें. संध्याकाळ झाली कीं चोहींकडून त्यांचे थवेच्या थवे संघस्थानाकडे रात्रींच्या विश्रांतीसाठीं लोटतात. एकेका झाडावर जणूं पानांगणिक पोपट (क्र. २६३) असतात. पोपटांचा चीत्कार स्वरांत पारव्यापेक्षां तार असतो. तयार होत आलेलें पीक (भातः क्र. ८१५) व पाडाला आलेलीं फळें यांवर पोपट निर्वाह करतात ; खातात त्यापेक्षां नासधूस (क्र ८१५, १००३) जास्त करतात. त्यांचे उड्डाण आकर्षक व डौलदार असतें. झाडांच्या ढोलीत बांधलेल्या घरट्यांत माद्या अंडीं घालतात व नर घरट्यांचें रक्षण करतात (क्र. ५६२); घरट्यावर किंवा पिलांवर घाला आला असतां त्या कर्कश चीत्कार करतात. क्र. ७५ व २६३ या गाथांत त्यांच्या उड्डाणाचें मार्मिक वर्णन केलेलें आहे.

बलाआ : बलाका, बगळा-बगळी : (४. ४३५) : बलाका या शब्दाचा प्रेयसी असाही अर्थ आहे. बगळ्यांच्या कांहीं जाती आतां हिंदुस्थानांत स्थायिक झालेल्या आहेत. येथें दिसतात त्यांपैकीं बहुसंख्य बगळे लडक, तिबेट वगैरे भागांतून हिंवाळ्याच्या सुरवातीस थव्याथव्यांनीं हिंदुस्थानांत येतात आणि उत्तर हिंदुस्थानांत आसामपर्यंत व दक्षिण हिंदुस्थानांत म्हैसूरपर्यंत पसरतात आणि उन्हाळ्याच्या सुरुवातीस थव्याथव्यांनी उत्तरेकडे जातात. पक्ष्यांचें हंगामी पर्यटन हें प्राणिशास्त्रांतलें मोठें कोडें आहे. नद्यांच्या किनाऱ्यांवर किंवा तळ्यांच्या कांठांनजीक बगळे दिवसभर डुलक्या घेतात (क्र. ४) ; मात्र

कोणाची चाहूल लागली कीं स्थलांतर करतात ; किंवा उथळ पाण्यावर आळसांत तरंगत राहतात आणि संध्याकाळ झाली कीं जागे होऊन अन्नाच्या शोधाला निघतात. आभाळांतून उडतांना त्यांचे थवे त्रिकोणव्यूह (क्र. ४३५) रचून (बाल्फर : सायक्लोपीडिया. I. 836) किंवा सरळ रेषेंत उडतात.

भ्रमर : (अलि (Black-bee) ४९५, ५७४; छप्पय (हेम : १·२६५) ८१३; भ्रमर : (Large black-bee) ७८, ३३१, ३६६, ३८७, ४२२, ४४४, ५३१, ५४३, ५९०, ५९१, ६१३, ६६६, ७४८, ७४९, ७८६, ७९०, ८८०, ९७९; मधुकर : (Large black-bee) ३७, ९२, १२८, १३९, ४४२, ५६१, ६१९, ६४१, ७५५) : अलि ह्या जातीचा भ्रमर हा भ्रमर व मधुकर यांहून आकारानें लहान असावा असें कोशांतील अर्थावरून दिसतें. अलि, भ्रमर व मधुकर यांचा अर्थ lover = प्रियकर, libertine = लंपट असाही दिलेला आहे. भ्रमर या शब्दाला 'तरुण पुरुष' असाही अर्थ आहे. म्हणजे हे सारे नर आहेत ! क्र. ९२, १३९ व ३३६ आणि क्र. ३३१ व ६६९ यांमधील भ्रमर हे छेलबटाऊ असणें संभवनीय आहे. क्र. ४४२, ४४४, ५९०, ६१३, ६१९, ७४९ व ७५५ यांमध्यें भ्रमरांचें लंपट पुरुषांशीं असलेलें साम्य सूचित केलेलें आहे. प्राकृत व संस्कृत कवींनीं भ्रमर हें चांचल्याचें प्रतीक मानलेलें आहे. आणि त्याचें चांचल्य हा दोष त्याचा नसून त्याचें कारण फुलांची नीरसता, असें सांगण्यांत (क्र. १३९) आलें आहे. वस्तुतः एका फुलाचे केसर दुसऱ्याच्या कोशांत प्रस्थापित करीत राहणें हें त्याचे नैसर्गिक कार्य; यामुळें फुलांच्या वंशांचें वर्धन होतें; पण यामुळेंच बिचाऱ्यावर लंपटतेचा आरोप आलेला आहे ! पुष्पधारी वृक्षवेलींनीं फलधारण केलें कीं त्याचें नियोजित कार्य संपतें आणि म्हणून तो त्यांकडे पुन्हां फिरकत नाहीं; यामुळें बिचाऱ्यावर कृतघ्नतेचाही आरोप आलेला (क्र. ९२) आहे, इतकेंच नव्हे, प्रेयसीच्या मातेविषयींही कामुक अभिलाषेचा (क्र. ७४९) ! फक्त एकाच कवीनें त्याला स्थिर प्रीतीचें श्रेय (क्र. ३७) दिलेलें आहे. भ्रमराचा वर्ण निळा (क्र. ४२२) व काळा (क्र. ५६१). अलिकुलाची तुलना सुंदरीच्या मुखावर डोलणाऱ्या केसांशीं (क्र. ७८) व कृष्णमणिमेखलेशीं (क्र. ५७४) केलेली आहे. क्र. ५६१ मधील 'अंधाराची गांठ' हा प्रयोग व नवकवींनाही अकल्पित वाटेल ! सौंदर्यबटा

या अलीकडे रूढ झालेल्या डौलाला व शब्दाला 'भ्रमरालक' असा यथार्थ शब्द प्राचीनांनीं योजलेला आहे! भ्रमर वसंतांत झंकार करूं लागतात (क्र. १२८, ५४३) आणि हिंवाळ्यांत मिटलेल्या कमळांत छपून (क्र. ८१३) राहतात असें गाथाकवी सांगतात. ज्या अर्थी भ्रमर कमलाला सोडून कवठा-भोंवतीं घोगावतो त्या अर्थी त्याला नैसर्गिक गंधज्ञान असतें, पण अनुभवाचे अभावीं स्पर्शज्ञान मात्र नसतें असा कवींचा निष्कर्ष (क्र. ६४१) आहे. भ्रमराला कोणतीं फुलें आवडतात? अशोक (क्र. ४२२, ७४८), कदम्ब (क्र. ३७), कमल (क्र. ७८, ३८७, ४९५, ५६१, ६४१, ८१३, ८८०), केतकी (क्र. ९७९), पाटला (क्र. ६१९), मालती (क्र. ९२, ४४२, ४४४, ७४८ ७४९) व मोहोर (क्र. ३३१, ५४३, ६६६, ७८६, ९७९). स्त्रियांच्या सुगंधी निःश्वासावर (क्र. ३३६) आणि हत्तींच्या मदावरही (क्र. ७८६) तो लुब्ध असतो. मंजरी, कमल व मालती या त्याच्या विशेष लाडक्या दिसतात. मधुकर हा लंपट खरा. पण त्याची लंपटता सामान्य नाहीं; कलिकास्वादाविषयीं तो विशेष उत्सुक (क्र. ९२, ४४२, ४४४, ५९०, ६१३, ७४९, ७५५) आहे! यासाठीं तो कलिकेचें संगोपनही (क्र. ७५५) करतो. कलिकेशीं पहिल्या समागमाचे वेळीं कधीं तो प्रशंसनीय कौशल्य (क्र. ४४२) दाखवितो आणि कधीं निंद्य ग्राम्यता (६१३)! कोण सुखावलें व कोण दुखावलें, हें सारें कामौत्सुक्याच्या तपोमानावरच अवलंबून नसतें काय? कारणपरत्वें भ्रमराला त्वेषानें दंशही करतां येतो. क्र. ५३१ मधील भ्रमर माकडाला चावला आहे आणि क्र. ८८० मधील भ्रमर कमलाचा वास घेणाऱ्या सुंदरीच्या ओंठाला! प्रेम विलासांत मग्न असतांना कोणी व्यत्यय आणला तर प्रेमी संतप्त होणारच; आणि अशा परिस्थितींत व्यवधान कोण व कसें सांभाळणार? जो प्रेम करतो तो कांट्याकुट्यांतून जाण्याला सिद्ध (क्र. ९७९) असतोच. इतकेंच नव्हे, प्रेमभंग झाला असतां आत्मार्पणालाही (क्र. ७४८). कोणी बलात्कारानें स्त्रीचें (मंजिरीचें) अपहरण केलें तर तें भ्रमराला सहन होत नाहीं. मग तो एका पामर (क्र. ३३१) असो किंवा पोपट (छेलबटाउ) असो, त्याचा पाठलाग करून भ्रमर त्याला हैराण करील! असे 'गाथासप्तशतींतील भ्रमरांचे गुणदोष आहेत.

मधमाशी : (महुमाच्छिआ : ६३४) : मधमाशी मध गोळा करते; कोणी यत्किंचितही उपद्रव दिला तर त्याला कडकडून चावते. जाणते सांगतात कीं ज्या चावत नाहींत त्या मधही गोळा करीत नाहींत. त्यांना मधाची चवच नसते कीं काय कोण जाणे ! क्र. ८८० मधील भ्रमर सुंदरीच्या ओंठाला चावलेला आहे आणि क्र. ६३४ मधील मधमाशी तरुण भिल्लाच्या ओंठाला. त्याचा तिच्या दंशामुळें ओंठ सुजला आणि हें पाहून त्याची मत्सरग्रस्त प्रेयसी रुसून फुगली ! भ्रमर व मधुमक्षिका यांना असा पङ्क्तिप्रपंच करण्याची प्रेरणा निसर्गानेंच दिलेली आहे कीं काय ? मात्र तशी प्रेरणा आहे असें गृहीत धरून स्त्रियांनीं मधमाशांच्या आंगचटीस जाण्याचें साहस करूं नये !

मोर : (मोर, मयूर) : ३९४, ५५९, ६३६; सिहि (शिखिन् = शिरावर तुरा असलेला) ५२, १७३, : साहेबाला पांखरांची पारख इतकी कीं तें कोंबड्याला कॉक् म्हणतात आणि मोराला पीकॉक् ! सुकृद्दर्शनीं हें अनभिज्ञतेचें लक्षण वाटतें, पण हा निष्कर्ष बरोबर नाहीं. सिंध, सरहद्द व आसाम यांशिवाय हिंदुस्थानच्या सर्व प्रदेशांत मोर आढळतात. त्यांची वस्ती सामान्यतः खुरटीं झाडें व पुष्कळ नद्यानाले असलेल्या जंगलांत असते. त्यांच्या थव्यांत एका मोराला चार लांडोरी असतात; एका कोंबड्याला मात्र दहा माद्या लागतात; एवढें या जातींत बहुपत्नीकत्व आहे ! मोराला सुंदर तुरा व पिसारा असतो. बिचारी लांडोरी मात्र भुंडी असते; कोंबडा व कोंबडी यांत असाच फरक असतो; एवढें या जातींत साम्य आहे. मोर आपल्या पिसाऱ्याचा उपयोग प्रियाराधनासाठीं करतो. मनुष्य जातींत मात्र सारेंच उलटें ! मोर हा सर्पांचा शत्रु आणि मोर हें कार्तिकेयाचें वाहन. आभाळांत ढग जमले व पाऊस सुरू झाला कीं मोराला अतिशय हर्ष होतो व तो नाचूं लागतो. समर्थ व्याध मोराची शिकार करीत नाहीं; लंपटतेमुळें दुबळ्या झालेल्या व्याधाला मात्र हीच शिकार मिळते आणि त्याची अल्लड नववधू मोरपिसांचे अलंकार धारण करण्यांतच फुशारकी (क्र. १७३) मिरवते. क्र. ६३६ मधील मोर नदीकांठच्या रम्य वातावरणामुळें आनंदित होऊन नाचत आहेत आणि क्र. ५५९ मधील मोर मेघगर्जनेमुळें क्र. ३९४ मधील मोर मान उंच करून गवतावर लटकलेले पावसाचे थेंब टिपून घेत आहे ! मोरपिसांचा झुपका जादूटोण्यासाठीं वापरतात (श्री. बाल्फर: सायक्लो-

पीडिया. III. 167). क्र. ५७२ मधील 'मोहनपिच्छिका' या उल्लेखावरून गाथासप्तशतीच्या काळांतही ही समजूत प्रचलित होती असें स्पष्ट दिसतें. या गाथेच्या नायिकेच्या कुरळ्या व भुरळ्या केसांत रंगीबेरंगी फुलें माळलेलीं असावींत, म्हणूनच त्यांना मोरपिसांच्या गजऱ्याची शोभा प्राप्त झाली !

सउण, सउणि=शकुन, शकुनिः (२२०,२८५,८०४): शकुन म्हणजे सामान्य पक्षी; किंवा गिधाड, घार यांसारखा मांसभक्षक पक्षी. क्र. २२० व ८०४ मधील पांखरें पंजरस्थ आहेत. यावरून तीं सारिका जातींतील असावींत असें वाटतें. क्र. २२० या गाथेंत छिद्रांतून डोकावणाऱ्या पांखरांची दीनवाणी अवस्था वर्णिलेली आहे आणि क्र. ८०४ मधील पांखरूं तर चांडालाच्या हातीं पडलेलें आहे. वस्तुतः तेच त्याचे लालनपालन जास्त जिव्हाळ्यानें करतात. क्र. २८५ मधील सउण हा मांसभक्षक असावा. जें प्राप्त होईल तें ज्यांना चालतें व नेहमीं मिळतें त्यांना चिंता कशाची ?

सारिका : सारिआ : (५५२,५८९): सारिका म्हणजे मैना, साळुंकी. यांच्या अनेक जाती आहेत. पैकीं पहाडी मैना ही सह्याद्रीचा घाटमाथा, छोटा नागपूर व हिमालयाच्या पायथ्यालगतच्या टेकड्या या भागांत विशेषेंकरून आढळते. त्या मैनेचें वर्णन करतांना श्री सलीम अली (पूर्वोक्त : पृ. ११६) सांगतात. " This Myna is much prized as a cage bird. It is a mimic of exceptional merit, becomes very tame, and soon learns to reproduce the human voice & speech with astonishing clarity." क्र. ५५२ व ५८९ या गाथांतील सारिकांच्या या गुणांमुळेंच नायिकेवर लज्जेचा प्रसंग ओढवलेला आहे. क्र. ५५२ मधील सारिका जें ऐकलें तें बोलते. क्र. ५८९ मधील सारिका विलक्षण आहे, ही तर जें पाहिलें तेंही सांगते ! सारिकांचे हे गुण माहीत असूनही त्यांना रतिगृहांत ठेवाव्याच कशाला ? वात्स्यायन (कामसूत्रम्ः अधिकरण १ अध्याय ४ सूत्र १३) सांगतोः "तस्य (रतिगृहस्य) बहिः क्रीडाशकुनिपिञ्जराणि ।" शकुनिपञ्जर वासगृहाच्या बाहेर टांगावेत असें त्यानें सांगितलें आहे तें स्वच्छतेच्या दृष्टीनें. या गाथांच्या नायिकांवर आलेल्या प्रसंगाची वात्स्यायनालाही कल्पना आलेली दिसत नाहीं !

हंस हंसी-राजहंसः-राजहंसी : (मराल ७१४; राजहंसः ६२४; राजहंसी : ६७६; हंसः ११०, ४७१, ६२४, ६७६, ७७५, ९४६, ९४७; हंसीः ९४७) :

मराळ, हंस व राजहंस या पक्ष्यांविषयीं प्राकृत व संस्कृत साहित्यिकांच्या कल्पना अतिरंजित आहेत. हे हंस सज्जनांप्रमाणें अल्पसंख्य (क. ७०५) असून सौजन्याप्रमाणें वर्णानें शुभ्र असतात, ते कमलांचे तंतु भक्षण करतात (क. ९४६), आकाशांत जसा चंद्र (क. ७१४) तसे हे ग्रामतडागांत (क. ११०) व सरोवरांत (क. ९४७) तरंगतात आणि त्यांना नीरक्षीरविवेक (कं. ६७६) असतो. हीं वर्णनें केवळ काल्पनिक व सांकेतिक आहेत. हंस व राजहंस (Swan, Royal Swan,) हे पक्षी हिंदुस्थानांत आढळत नाहींत. श्री. बाल्फर (पूर्वोक्त: III. 787) सांगतात कीं हंसांच्या अनेक जातींपैकीं Cygnus musicus, Hooper Swan या एकाच जातींतले हंस क्वचित् दक्षिण आशियापर्यंत येतात; फक्त नेपाळांत व तेथेंही एकदांच तो पहाण्यांत आलेला आहे. श्री. आपटे यांनीं आपल्या संस्कृत-इंग्रजी कोशांत हंस या शब्दाला Swan, Goose, Duck, Flamingo हे इंग्रजी प्रतिशब्द दिले आहेत; आणि राजहंस याला Falmingo, White Goose with red legs and bill; आणि इंग्रजी-संस्कृत कोशांत Duck व Goose यांना कलहंस, कादंब, चक्रवाक, हंस वगैरे प्रतिशब्द दिले आहेत. मृच्छकटिकाच्या काळांतही (५·६) हंस अदृश्य झालेले होते. फ्लॅमिंगो हे पक्षी हिंदुस्थानांत सर्वत्र, विशेषतः खारट पाण्याच्या तळ्यांच्या आसपास आढळतात; विशेषतः राजस्थानांत, सांभर सरोवराच्या आसपास आणि कच्छच्या रणांत. या रणांतच ते अंडीं घालतात. अर्थात् क. ४७१ या गाथेंत वर्णिल्याप्रमाणें ते पावसाळ्याचे सुरवातीस मेघगर्जनेनें विव्हल होऊन उत्तरेस मानससरोवराकडे धांव घेत नाहींत. Bar-headed Goose हा पक्षी हिंवाळ्यांत हिंदुस्थानांत येतो आणि मार्चच्या सुमारास उत्तरेकडे लडाक व तिबेटकडे परतूं लागतो. आपल्याकडले वळीवाचे ढग गडगडूं लागले कीं त्यांचे स्थलांतर (क. ४७१) सुरू होतें. हे तिकडेच अंडीं घालतात. त्यांचे थवे त्रिकोण व्यूहांत किंवा सरळ रेषेंत उडतात.

(३) क्षुद्र प्राणी व सर्पः

कोळीः (मक्कड [देशीनाममालाः ६.११९:] २३७): स्वतः निर्माण केलेल्या धाग्याला लटकणारा सूक्ष्म कोळी बकुळीच्या फुलासारखा दिसतो. **चिलट** :

(मसअ = मशकः ५६०), झिल्ली : (४९४) रातकिडा, रानकिडा, झिंगुर (कान्य-कुब्ज), निंबकीटः णिम्बईड (८७२): हा किडा कडु लिंबावरला आहे. त्यानें दुसरा रस कधीं चाखलेलाच नसतो, म्हणून जो उपलब्ध व ज्याची संवय त्यांतच त्याला स्वारस्य वाटतें. विंचू : विच्छुअ [हेम १.१२८] : (२३७): सर्व उष्ण प्रदेशांत विंचू असतात. विंचू चावला असता दंडाला झटके देणें ही प्रतिक्रिया अत्यंत नैसर्गिक आहे. सर्प : (अहि : ५७६, णाअ : नाग = ९७०; फणमणि : ९७०; फणा. २४०; भुअंग : भुजंग=५५१, ६४०, ८०३, ९२०; हलाहल : ६२): सारेच सर्प विषारी नसतात. क्र ५५१ मधील भुजंग हा निर्विष असावा. येथें नमूद केले-ल्यांपैकीं अहि, नाग व हलाहल हे निःसंशय विषारी आहेत. ज्यांना फणा असते ते सारे विषारी असतात. हलाहल हा सर्प आकारानें क्षुद्र पण विषारानें भयंकर असतो. नागाच्या शेंपटीला फणा फुटणें ही कल्पना फारच भयप्रद आहे. पूर्वजांनीं भूमींत पुरून ठेवलेल्या संपत्तीचें सर्प संरक्षण करतात ही समजूत सर्वत्र आढळते. कारण अशा आख्यायिका जुनाट व ओसाड वाड्यांबाबत असतात आणि सर्पांचें वास्तव्यही अशाच ठिकाणीं असतें. चंदनाच्या वृक्षा-भोंवतीं नागाचा विळखा असतोच आणि नागाच्या फणींत मणी असतो, या समजुती सार्वत्रिक असल्या तरी तेवढ्या विश्वसनीय नाहींत. छेलबटाऊ, परदारासक्त किंवा विषयी पुरुषालाही भुजंग अशी संज्ञा आहे. सालूरी : (शालूरी= बेडकी : ३९१) : पावसाळ्यांत सांचलेल्या पाण्याभोंवतीं बेडूक दिसतातच. या गाथेंतील बेडकीचें आसन यथार्थ आहे. हरिआल = (९) : मुंग्या खाणारा प्राणीः झाडांच्या व यथ्याशीं असलेल्या झुडपांच्या जाळींत याचें वास्तव्य असतें.

निष्कर्ष : उत्तरेकडील पर्वतश्रेणींनीं हिंदुस्थानचा प्रदेश आशियापासून अलग केलेला आहे. पशुपक्ष्यांच्या हालचालींना अडचण होईल असे नैसर्गिक अंतर्गत अडथळे असले तरी सर्वस्वीं प्रतिबंधक होईल अशी परिस्थिति नाहीं. काश्मीरचें थंडगार पठार, हिमालयाच्या पायथ्यालगतची दमट दलदल व राजस्थानचें कोरडें वाळवंट इत्यादि अपवादात्मक प्रदेशांव्यतिरिक्त हिंदुस्थानांतील सर्व प्रदेशांना साधारणतः सर्व पशुपक्षी सामान्य आहेत; फरक आहे तो त्यांच्या पोटजातींत व संख्येंत.

वातावरणाच्या बाबतींत हिम, पर्वताच्या बाबतींत विन्ध्य, नद्यांच्या बाबतींत मुरला वगैरे उल्लेखांवरून गाथासप्तशतीच्या महाराष्ट्रीयत्वाबद्दल आक्षेप घेण्यांत

आलेले आहेत. पशुपक्ष्यांच्या उल्लेखांच्या पुराव्यावरून असा आक्षेप अद्याप घेण्यांत आलेला नाहीं; पण असा वाद कोणीं उपस्थित केलाच तर त्याचें परस्पर निरसन होईल अशी माहिती या प्रकरणांत संकलित केलेली आहे.

गाथासप्तशतींत नमूद झालेली परिस्थिति कमींत कमी पंधराशें व जास्तींत जास्त दोन हजार वर्षांपूर्वीची आहे. त्या काळांत येथें घनदाट अरण्यें होतीं; अर्थात् पशुपक्षांच्या अधिक जाती येथें अस्तित्वांत होत्या आणि त्यांची संख्या-ही जास्त होती. गाथासप्तशतींत अशा कोणत्याही पशुपक्ष्यांचे उल्लेख नाहींत कीं ज्यांवरून तिच्या महाराष्ट्रीयत्वाला बाध येईल. आश्चर्य वाटतें तें फक्त अश्वाच्या अनुल्लेखाबद्दल.

गाथासप्तशतीच्या निर्मितीचें श्रेय कोणी काश्मीरला देतात; पण महाराष्ट्रा-प्रमाणें तेथलीं तळीं कधींही कोरडीं पडत नाहींत आणि तेथें हत्ती अजिबात नाहींत. हें श्रेय राजस्तानचें, असा दावा अलीकडेच कांहीं संशोधकांनीं मांडलेला आहे; तेथेंही हत्ती नाहींत. महाराष्ट्रांतील माळरानांत व जंगलांत आतां सिंह व हत्ती नाहींत, हें खरें, पण त्या वेळीं ते येथेंही होते व असले पाहिजेत असा निष्कर्ष काढण्यास भरपूर पुरावा आहे. गाथासप्तशतीच्या संपादकाचा जन्म ज्या कुलांत झाला त्याच्या नाण्यांवर क्वचित् सिंह व आरंभापासून अखेर-पर्यंत हत्ती याच पशूंच्या प्रतिमा आहेत.

११ गाथासप्तशतींतील ग्रामीण व नागरी जीवन :

ग्राम : (८, ४३, ६७, ७७, ९४, १०९, ११०, १२९, १३८, १६४, १६८, २२९, २४१, २९४, २९५, ३१६, ४०२, ५०१, ५१७, ५३५, ५४५, ५५३, ५५६, ६००, ६३५, ६३६, ६४८, ७०२, ७०९, ७४५, ७५०, ७७१, ८०३, ८२०; ८७०. ८७१, ८७३. ८७८, ८८१, ९५१; **पल्ली :** ३९; **नगर :** ७७, १६३, १९४, ७०२, ७३५)

•खेडें (Village), ग्राम (Town) व शहर (City) हें आधुनिक वर्गीकरण मुख्यत्वेंकरून लोकसंख्या व व्यवसाय यांच्या अनुरोधानें करण्यांत येतें. •पल्ली, ग्राम व नगर या संज्ञा गाथासप्तशतींत आढळत असल्या तरी उल्लेखांच्या संदर्भावरून या वर्गांत मूलभूत भिन्नता आहे असें दिसत

नाहीं. त्यांच्या लोकसंख्येबद्दल अनुमान करण्याजोगाही पुरावा नाहीं. आर्थिक, नैसर्गिक व सांस्कृतिक परिस्थितीच्या आणि आधुनिक प्रमाणांच्या आधारानें जीं लक्षणें नगरांचीं म्हणून निश्चित करावीं तीं क्वचित् ग्रामांच्याही बाबतींत योजलेलीं दिसतात. कांहीं अपवाद सोडले तर मध्ययुगीन राजकीय व गेल्या शतकांतील आर्थिक क्रान्तींच्या पूर्वी सामान्यतः सर्वत्र अशीच परिस्थिति होती.

गाथासप्तशतींतील व्याधादि वन्य जमाती जंगलांत (क्र. १२१) अगर स्थानिक रस्त्यांलगत स्वतंत्र झोपड्यांत (क्र. ११९) रहात. शेतीवर अवलंबून असणारे जमीन-मालक व जमीन-मजूर खेड्यांपाड्यांतून रहात आणि हंगामाच्या दिवसांत ओवंड्यांत (क्र. ७६४) किंवा खळयावर (क्र. ६८९) रहात. आर्य (क्र. २२७) व वैश्य (क्र. ६०३), विट (क्र. ९३९) व वेश्या (क्र. ९६४), कलाल (क्र. २२७) व कलावन्त (क्र. ७३२) आणि पण्डित (क्र. २) व श्रीमंत (क्र. ७३३) इत्यादि उच्चवर्णीय व परोपजीवी लोक सामान्यतः शहरांत रहात.

गाथासप्तशतींतील ग्रामांच्या विस्ताराबद्दल अनुमान करण्याजोगा थोडा बहुत पुरावा मिळतो. क्र. ३१ मधील पल्ली हें छोटें व बंदिस्त लढाऊ डोंगरगांव असावें क्र. ७०४ मध्यें उल्लेखिलेलें ग्राम बरेंच मोठें असावें. कारण येथील रस्त्यावरून विमनस्कपणें चाललेला ग्रामस्थ आपलें घर चुकला आहे. क्र. ६३५ व ६३६ मधील ग्रामें हीं रम्य गिरिग्रामें आहेत. त्यां शेजारून निर्झर खळखळ वहात आहेत, गर्द राईतले कदम्ब फुलांनीं डंवरले आहेत, गांव जणूं बांबूंच्या दाट बेटांत लपलें आहे आणि त्यांतील छोटीं गवती घरें गर्द पालवीच्या कुंपणाआड. क्र ८७० मधील ग्राम हेंही डोंगरगांवच असावें; कारण येथें गांवानजीक वळणदार नदी आहे आणि वळणावळणावर बांबूंचीं बेटें आहेत. हें वर्णन मावळांतल्या खेड्यांनाच लागू पडतें. क्र. ६३५ या गाथेंत सांगितल्याप्रमाणें आणि तेथें सांगितलेल्या कारणासाठींच नव्हे, डोंगरगांवचे रहिवासी खरोखरीच धन्य आहेत.

वेदकालीन ग्रामांप्रमाणें गाथासप्तशतीच्या काळांतलीं गांवेंही बंदिस्त असावींत. क्र. ७०५ या गाथेत ग्रामसीमेवरील तृणपुरुषाचा उल्लेख आहे. रात्रीं अपरात्रीं गांवांभोंवतीं घोटाळणाऱ्या अनोळखी चोरांचिलटांसाठीं हें

बुजगावणें असावें. निदान धामधुमीच्या काळांत ग्रामसीमांवर पहारेकरी असावेत असें यावरून अनुमान होतें. ग्रामसीमेपर्यंत शेतें (क्र. १६८, ४०२) असत. ग्रामसीमेलगत ग्रामांगण (क्र. ५५६) असे आणि तेथेंही पहारेकरी (क्र. ५५५) असत. ग्रामांगणालगत ग्रामतडाग (क्र. ८, ११०, ३९१) ४१४, ४९१, ७१४, ९४७) व पाणवठे (क्र. ८७४), देवकुलें (क्र. १०९) व वटवृक्ष (क्र. २९४, २९५, ५५६) आणि वटवृक्षाखालीं विहिरी (क्र. २९४) असत.

ग्रामांगण ही ग्रामोत्सवाची जागा आणि मल्लयुद्धांची (क्र. ६८५); प्रसंगविशेषीं शत्रूला तोंड देण्यासाठीं गांवकऱ्यांनीं एकत्र होण्याची. गांवांतले तालीमखाने जवळपासच असले पाहिजेत. ग्रामसीमेवरील महावटांभोंवतीं पार बांधलेले असावेत असें क्र. ९४ मधील उल्लेखावरून दिसतें. देवकुल हें सुसंस्कृत आर्यांचें आणि वटवृक्ष हें प्राकृत जनांचें पूजास्थान. अर्थात वडाच्या पारावर टवाळ कुटाळांची वर्दळ असावयाचीच. परक्या प्रवाशांचा मुक्कामही वडाखालीं (क्र. २६३) पडत असे. ग्रामतडागांत बहुधा कमळें असत. क्र. ८ मधील तळें हें ग्रामाचें मंडन आहे. तळ्यावर व पाणवठ्यावर आणि असेल तेथें नदीवर, सकाळ-संध्याकाळ स्त्रीपुरुषांची वर्दळ असावयाचीच. क्र. २९४ या गाथेंतील वडाखालच्या विहिरीवर पाण्यासाठीं रांग लागलेली आहे; आणि आपण अशी कल्पना करून बसलों आहोंत कीं रांग लावण्याची प्रथा साहेबानें दुसऱ्या महायुद्धांत सुरू केलेली आहे! तळीं आटण्याच्या (क्र. ४१४, ६२६) आणि गांवांत एकादीच विहीर असण्याच्या उल्लेखांवरून वाटतें कीं हीं खेडीं घाटमाथ्यालगचीं असावींत. त्या काळांत मद्यपानावर राजकीय निर्बंध नव्हते, तरीही क्र. २२७ या गाथेंतील दारूचा पिठा गांवाबाहेर, चांडालांच्या वस्तींत मांडलेला आहे. पानकुटीप्रमाणेंच स्मशानेंही (क्र. ४०८, ५३६) ग्रामांगणांच्या आसपास अगर नदीतीरीं असावींत.

खेड्यांतले रस्ते अरुंद (क्र. २४१), खडकाळ (क्र. ३१), व नागमोडी (क्र. ८०३) आहेत. गांवांतलें सांडपाणी रस्त्यांवरूनच वहात असावें आणि त्यांनी निचऱ्याची व्यवस्था नसावी. यामुळें हे रस्ते चिखली (क्र. ६२३, ७६०, ७६१) आहेत. पावसाळ्यांत जिकडे तिकडे पाणीच पाणी होतें तेव्हां मार्गाचा

माग (क. ६७३) लागणें किंवा रस्त्यावरून घसरल्याशिवाय चालणें अशक्य होतें. उन्हाळ्यांत या रस्त्यावरून पानपाचोळा उडतो (क. ७७१) आणि पावसाळ्यांत त्यांवर गवत (क. ७२४) उगवतें. गाथासप्तशतींत रथाचा उल्लेख (क. ३४) आहे, पण हा रथ सूर्याचा आहे; वाहनांचा किंवा राजरस्त्यांचा उल्लेख नाहीं. शहरांतले रस्ते रुंद (क. ७५०) आहेत आणि त्यांना जागोजाग चौक (क. ३६, १६०, १९०) आहेत. श्रीमंतांचीं घरें चौकांत (क. ३६) आहेत. गांवांत काय, शहरांत काय, रस्ते कितीही रुंद असले तरी उत्सवप्रसंगीं (क. ५३५) किंवा धांवपळीच्या वेळीं ते वाहतुकीला अपुरे पडतात.

गाथासप्तशतींतील घरांना पुढें अंगण (क. १२०, ३२२, ४४०, ५८०, ७९८, ८०१) व मागें परसूं (क. ३१३, ६८३, ९५७) आहे. त्यांभोंवतीं कुंपणें (क. ९६, २२०, २२१, २५७, ५६३, ६३५, ७६२, ७९६) आहेत. हीं कुंपणें कांटेरी (क. ९६), फुलेरी (निर्गुण्डी: क. ४१२, ९५३, प्रियंगु : क. ९५७) किंवा दाट पानें (क. २२०, २२१, ६३५) असलेल्या झुडपांचीं आहेत. कधीं त्यांलागत एरंडासारखीं (क. २५७) झाडें असत आणि कधीं त्यांवर वेल (कोहाळा : क. ७६०, ७९६) सोडलेले असत. बाहेरून जाणाराला आंतलें दिसूं नये पण आंतून छिद्रांतून पाहाणाराला बाहेरचें दिसावें, अशी त्यांची उभारणी असे. अंगणांत फळझाडें (आम्र : क. ४९९), फुलझाडें (अंकोल : क. ४९७) व फुलझुडुपें (कुरबक : क. ६; माधवी : क. ३२२) लावीत. अंगणांचा उपयोग दिवसां रिकामपणच्या कामगिरीसाठीं (क.१२०), रात्रीं घरचीं मुलें (क. ७९८) व पाहुणे (क ८०१) यांच्या झोंपण्यासाठीं होत असे. घराच्या मागच्या बाजूला परसूं (पडोहर : क. ३१३; पलोहर : क. ६८३) असे. परसांत अंकोल (क. ३१३), पाटल (क. ४६९) वगैरे फुलझाडें, प्रियंगुलतेचे मांडव (क. ९५७) व बांबूचीं बेटें (क. ३१३) असत. घरांतल्या स्त्रिया या भागांत उघड्यावर न्हातधूत (क. ६८३) असत.

तिरक्या सोटांचे टेकू दिलेल्या लांकडी खांबांवर जखडलेलें बांबूचें तिरकें अगर अर्धवर्तुलाकार आढें, भोंवतीं वेताच्या भिंती आणि वर पेंढ्यांची शाकारणी, अशी वेदकालीन घरांची उभारणी असे. ब्राह्मणक्षत्रियांच्या घरांत हविर्द्रव्यां-

साठीं आणि अग्निशालेसाठीं स्वतंत्र खोली असे. गाथासप्तशतींतील घरें यांहून विस्तृत आहेत, पण त्यांची उभारणी जवळ जवळ अशीच आहे.

सुस्थितींतल्या लोकांच्या घरांत निरनिराळ्या उपयोगांसाठीं स्वतंत्र खोल्या आहेत. घरांच्या भिंती (कुड्ड : क्र. ३५, १७०, २०६, २०८, ७३२, ७४१; भित्ती क्र. २१७) कुडाच्या (कुड्डक = लतागृह : [देशी : २·३७]) आहेत. क्र. १३५ मधील भिंतींत कोनाडा आहे. यावरून ती विटांची असावी असें वाटतें. इट = घराभोंवतालचा वेतागवताचा तट्टया, यावरून वीट हा शब्द सिद्ध झाला असावा. या भिंती सारवून आंतून बाहेरून गिलावा केलेल्या असत. क्र. ३५ मधील भिंतीवर कुलवधूनें लक्ष्मणाचें चरित्र लिहिलें किंवा रंगविलें आहे क्र. १७०, २०६ व २०८ मधील भिंतींवर विरहिणींनीं पतीच्या प्रवासाचे दिवस मोजण्यासाठीं चिन्हें काढलेलीं आहेत. क्र. २१७ व ७३२ मधील भिंतींवर चित्रें काढलेलीं किंवा काढावयाचीं आहेत. क्र ७४१ मधील भिंतीला स्वागतोत्सवार्थ सफेती दिलेली आहे. भिंतींत दारें (क्र. १४०, २६२, ७९४, ९५४) आहेत. या दरवाजांना अडसर (क्र. ३२२) व कड्या (क्र. ९५९) आहेत. उन्हाच्या झळा घरांत येऊं नयेत म्हणून दारें दावून (क्र. ७९४) घेण्यांत येत असत. हीं दारें बुटकीं व अरुंद असावींत. क्र. ९५४ मधील पाण्याचा घडा दारावर आपटून फुटलेला आहे. या दारांना (क्र. ५२५) उंबरा (देहली : [देशी : १.९५] = द्वार के नीचे की लकडी: पा. स. म.) असे. उंबराचें लांकूड अतिशय चिवट असतें. त्याच्या तक्त्यांवर कुऱ्हाडीचे घाव घातले तरी ते एकाएकीं फुटत नाहींत (वनौषधि-गुणादर्श : भाग १ पृ ६७), म्हणून उंबराचा तक्ता वापरण्यांत येत असल्यामुळें उंबरा हा शब्द सिद्ध झाला असावा. क्र. २६२ या गाथेंतील द्वारावर तोरण आहे. तोरण म्हणजे, "द्वार का अवयव विशेष, बहिर्द्वार, फूल या पत्तों की माला जो उत्सव में लटकाई जाती है" (पा. स. म.). याच गाथेंत वंदनमालिकेचाही उल्लेख आहे. हल्ली आपण वंदनमालिकेलाच तोरण म्हणतों. येथें हा अर्थ घेतां येणार नाहीं. तोरण हें भारतीय शिल्प-पद्धतीचें एक वैशिष्ट्य आहे. तोरणांचे उत्कृष्ट नमुने सांची येथील स्तूपाच्या भोंवतालच्या वेदिकेंत चारी दिशांनीं अभिमुख असे आहेत. अशा तोरणा-वरूनच द्वारप्रकोष्ठांची (porch) प्रथा सुरू झाली. लेण्यांच्या व घरांच्या

किंवा घरांसमोरच्या अंगणाच्या दरवाजावर तोरणासारखी उभारणी असलेला भाग असून त्यामध्यें गवाक्षें व त्यालगत आंतील अंगास गच्ची असे. रस्त्यावरील रहदारीची मौज पहाण्यासाठीं घरांतले स्त्रीपुरुष येथें बसत असत. प्रसंगविशेषीं त्यांचा नगारखान्यासाठींही उपयोग होत असे. उत्सवप्रसंगीं तीं माळांनीं अलंकृत करण्यांत येत असत. मराठी खेड्यांतल्या व जुनी वस्ती असलेल्या गांवांतल्या वाड्यांमध्यें ही व्यवस्था दिसून येते. या गाथेंतील तोरणाचा असाच अर्थ घेतला पाहिजे. कांहीं गाथांत घरांच्या वेगवेगळ्या भागांचे उल्लेख आलेले आहेत. ओलिन्दक (अलिन्दक = ओसरी, देवडी : क्र. २५४): येथें परक्या पाहुण्यांचा (क्र. २५४, ६६७) मुक्काम असे. घरधन्याच्या बैठकीची जागा घराच्या आघाडीला, देवडीनजीक, चौकानजीक असे आणि अन्तेउर (क्र.९७४) = अन्तःपुर घराच्या अंतर्भागांत असे. क्र. ५५२ या गाथेंतील रतिगृहांत मैनेचा पिंजरा टांगलेला आहे. अग्निप्रज्वलनाचे वेळीं खोलींत धूर कोंडल्यामुळें झालेल्या अंधाराचा उल्लेख क्र. ७२८ व ७२९ या गाथांत आलेला आहे. यावरून या खोलीला खिडकी किंवा धुराडें नसावें असें दिसतें. ओवालअ=ओवंडा: ओवांडा या गृहप्रकाराचा उल्लेख क्र. ७६४ या गाथेंत आलेला आहे. ओवंडा म्हणजे गांवाबाहेर शेतांत धन्याची राहण्याची जागा. गाथासप्तशतींत गोठ्यांचे अनेक उल्लेख आलेले आहेत. (गिट्ठि: क्र. ६३८; गोट्ठ: क्र. ४४७, ६०९) हे गोठे घरांलगत पण स्वतंत्र असावेत. खेड्यांतल्या क्षुद्र शेतकऱ्यांच्या घरांतले गोठे ओसरी लगत गुडघ्याएवढ्या खालच्या पातळीवर असतात. शेतकरी थोडा बहुत सुधारला म्हणजे त्याच्या घराच्या मांडणींत स्वतंत्र गोठा हा पहिला महत्त्वाचा फरक होतो. अर्थात् गाथासप्तशतींतील गोठे हे पामरगृहांतले नाहींत. रेड्यानें शिंग हलविल्यामुळें चाळवलेल्या चिलटांचा झंकार क्र. ५६० या गाथेंत वर्णिलेला आहे. क्र. ४४७ मधील गोट्ठ याचा अर्थ ' गाई चरण्याची जागा ' (ऐतरेय ब्राह्मण ३.१८.१४) किंवा 'सामाजिक मिश्र संमेलन' (आचारांग सूत्र: २.१.३.२४५) असाही होऊ शकेल. गाथासप्तशतींतील घरांवरील छपरें (ओच्छअ= ओच्छोअअं: क्र. ६२१; पडल क्र. ६३, ३१५, ५४०) गवताच्या पेंढ्यांनीं (क्र. १०९: पलाल = पेंढा; क्र. ३३०: सिप्पिर = तृणविशेष) किंवा कवलांनीं शाकारलेलीं असत. सिप्पिर यावरूनच छप्पर हा शब्द सिद्ध झालेला असावा

पाइअसद्दमहण्णवांत पडल (देशीः ६.५) या शब्दाचा अर्थ ' मिट्टी का बना हुआ एक प्रकार का खपडा जिससे मकान छाये जाते हैं' असा दिलेला आहे; अर्थात् पडल म्हणजे कउल. पडळ = शेतांतली कौलारू झोंपडी, हा शब्द यावरूनच सिद्ध झाला असला पाहिजे. देशीनाममालेच्या शब्दार्थकोशांत मात्र पडल याचा अर्थ edge of thatch असा दिलेला आहे. गाथासप्तशतीच्या काळांत घरें कवलांनीं शाकारलीं जात, हें निश्चित. हीं कवलें चपटीं व लांबट असून त्यांच्या पृष्ठभागावर दोन भोकें व खालच्या अंगास कडा असत. आढ्याच्या लांकडांत तीं मेखा मारून बसविलेलीं असत. कऱ्हाड वगैरे ठिकाणीं झालेल्या उत्खननांत अशीं कवलें मिळालेलीं आहेत. मंगलोरी कवलांचें हें मूळ स्वरूप आहे. क्र. १७०, ५४० व ६२१ मधील छपरें पावसाळयांत गळत आहेत. क्र. १७० मधील छप्पर झंझावातानें उडालेलें आहे. क्र. ६२१ मध्यें कवलें ढळल्यामुळें गळत्या लागल्या आहेत. या घरांची ही अवस्था घर-धन्याच्या गैरहजेरींत झालेली असल्यामुळें शाकारणीसारखीं कामें घरच्या पुरुषमाणसांनीं करावयाचीं असत असें दिसतें. ग्रामांतील घरांपेक्षां नगरांतील घरें प्रशस्त (क्र ७७) आहेत. श्रीमंतांचीं घरें हमरस्त्यावर चौकांत (क्र. ३६) आहेत. व्यापाऱ्यांचीं घरें चित्रांनीं अलंकृत (क्र. ७३२) केलेलीं असत. ग्रामांप्रमाणेंच नगरांतही भरवस्तींतलीं घरें एकमेकांना खेटून आहेत. यामुळें ग्रामदाहाप्रमाणें च (क्र. १६३, २२९, ५३५, ७०९) नगरदाहाचेही प्रसंग ओढवत असत. ग्रामदाह किंवा परचक्र अशा प्रसंगीं गांवकरी परस्परांशीं सहकार्य करीत आणि पुरुषांच्या बरोबरीनें स्त्रिया काम (क्र. २२९) करीत.

गाथासप्तशतींतल्या घरांत सामानसुमान मात्र फारसें दिसत नाहीं.

बैठकीसाठीं आसन्दिका (क्र. ६९७) आणि चितळ हरणाचें (क्र. ६२९) वा वाघाचें कातडें (क्र. ९४५) वापरीत. राजाचें यज्ञसमयींचें आसन या अर्थानें आसन्दिका हा शब्द शतपथ (३. ३५. १०५) ब्राह्मणांत वापरलेला आहे. अथर्वांतल्या आसन्दिकेची उंची एक वीत आणि लांबी रुंदी एक एक हात असे; तिची बैठक मुंज गवताची विणलेली असे. यज्ञासारख्या प्रसंगीं बैठकीवर व्याघ्रासन पसरीत. वेत्रासनालाही आसन्दिका हेंच नांव होतें. जातकांतील आसन्दिका झोंपण्यासाठीं (जातकः १. २०८) व बैठकीसाठीं (विनयः १.

१९२; २. १४२) वापरलेली आहे; श्रीमंतांच्या घरीं झोंपण्यासाठीं नवीनार पलंग (पलंक=पर्यंक : विनय : २. १६३; संयुक्त : १. ९५) असत. क. ९०४ मधील शय्या मंचकावर आहे. गाथासप्तशतींतील स्त्रीपुरुष गाद्यांवर (सअभ : क. १३३, ६६७, ९०५) झोंपतात. क. ९०४ मधील शय्या पतीच्या हाल-चालीमुळें उंचसखल झालेली आहे. यावरून या गादीला मध्यें फारसे टांके नसावेत असें वाटतें. श्रीमंतांच्या घरीं अनोळखी पाहुण्यांना अंगणांत गवताच्या शय्येवर झोंपावें (क. ३७९) लागे. क. ९६६ मधील बिछान्याभोंवतीं गब्भहरण-मच्छरदाणी आहे. चुल्लवग्गांत (S.B.E. Vol XX : p. 102) मच्छरदाणीचा उल्लेख आलेला असल्याचें श्री. गोडे यांनीं (Mosquito-Net in Egypt & Mosquito Curtain in India : Bharatiya-Vidya : Dec. 1947) दाखवून दिलेलें आहे. धान्य भरडण्यासाठीं घिरीट (क. ७९४), कांडण्यासाठीं मुसळ (क. ५०१) व पाखडण्यासाठीं सुपें (क. ५५७) घरोघर आहेत. पाणी आणण्यासाठीं व सांठवण्यासाठीं मातीचे घडे (कुडः क. २२९, २६०, ८७४; कुम्भ : क. ६५४, ८७५; घट : क. ९५४) आहेत. यांचा आकार चालू घड्यासारखा वाटोळा (क. २६०) किंवा रांजणांसारखा उभट (क. ६५४) असावा. पाणी आणतांना घडा खांद्यावर (क. ९५४) ठेवीत. गाथासप्तशतींतले कलश (क. १४०, १४३, २५६, २८०, ५०७, ५७५, ५७६, ८०७) हे मात्र धातूचे असावेत. क. ५०७, ५७५, ५७६, ८०७ मधील कलश हे निधान-कलश असून क. १४० व १४३ हे शकुनासाठीं दारांत ठेवलेले मंगलकलश आहेत. क. ८७ मधील कलश सुवर्णाचा असून त्यांत रत्नें आहेत व त्याच्या तोंडावर काळी मोहोर केलेली आहे.क. ८३१ मध्यें मंगलवासणांतून तीर्थग्रहण केल्याचा उल्लेख आहे. मराठींत व गुजरातींत वासण हा शब्द आजही भांडें या अर्थानें प्रचारांत आहे. सातवाहनकालीन लोक पूजेसाठीं मौल्यवान उपकरणीं वापरतात. क. ४ या गाथेंत मरकतभाजन व शंखशुक्ति (क. ३००) यांचा उल्लेख आहे. मरकतभाजन हें पाचू जडवलेलें तबक असावें. शंखशुक्ति म्हणजे शंखाची डबी. क. ३०० मधील शंखशुक्तींत सिंदूर ठेवलेला आहे. कर्पूरमंजरी-वरील टीपांत डॉ.मनमोहन घोष (कलकत्ता युनिव्हर्सिटी प्रत : पृ.१४२) सांगतात:

Sippi is a boat shaped vessel used in Puja for offering water. क्र.४ मधील शंखसिप्पीचा आकार अर्घ्यासारखा असावा. मद्य ठेवण्यासाठीं स्फटिकपात्र (क्र. ९२७) व पिण्यासाठीं चषक (क्र. ७१०, ९११, ९२७) या पात्रांचा उपयोग झालेला आहे. वेदकालांत मद्यपानासाठीं कारोतर नांवाचें कातडी भांडें वापरीत. लोखंडी पत्र्यावर घण मारून पेल्यासारखा आकार दिलेलें भांडें पुढें वापरांत (ज्ञानकोश: प्रस्ता. पृ. ४६६) आलें. गाथासप्तशतींतील चषक कांचेचे असणें संभवनीय आहे. भिक्षा वाढण्यासाठीं चटुक (क्र.१६२) व घेण्यासाठीं करंक या पात्रांचा उल्लेख आलेला आहे. चटुक (देशी : चट्टू : ३.१; दारुहस्त: Wooden Spoon) हें भांडें लांकडी असून त्याचा आकार थाळीसारखा किंवा पळीसारखा असावा. पाइअसद्दमहण्णवांत करंक या शब्दाचे अर्थ 'हड्डी, पानदान, छोटी पेटी' असे दिलेले आहेत; आणि देशीनाममालेंत (२.५१) याचा अर्थ भिक्षापात्र=begging bowl असा दिलेला आहे. हें ही लांकडाचें असावें असें याच शब्दाच्या ' अशोक ' या अर्थावरून दिसतें.

गाथासप्तशतींतील घरांत प्रकाशासाठीं दिवे (दीअ, दीव, क्र. १३५, २२२, २६४, ३३३, ४१५, ५४७, ७५६, ८३०)लावीत. हे दिवे पणतीसारखे भाजलेल्या मातीचे किंवा लामणदिवा अगर समई यांसारखे उघड्या ज्योतीचे असावेत; कारण क्र. २२२ मधील दिव्याची ज्योत विरहिणीच्या अश्रूंनीं व क्र. ८३० मध्यें तिच्या निःश्वासांनीं विझलेली आहे. या दिव्यांसाठीं तेल (तेल्ल : क्र. १३५, ५४७) वापरीत. तेल – तैल म्हणजे तिळाचें तेल. दिव्यांसाठीं व अभ्यंगस्नानासाठीं तिळाचें तेल घटांत ठेवीत, असे उल्लेख अनुक्रमें अथर्ववेदांत व शांखायन आरण्यकांत आलेले आहेत. या दिव्यांना वाती (वत्ति : क्र. २६४) असत. पेटत्या वातींचीं मुखें काळीं (क्र. ७५६) असत, त्यांच्या काजळीनें कोनाड्याला काळिमा (क्र. १३५) येई आणि प्रकाश वाढविण्यासाठीं वात पुढें पुढें सरकविण्यांत (क्र. २६४) येत असे. दिवा विझवावयाचा तो हाताच्या झटक्यानें, पण अपवादप्रसंगीं उदा. चौर्यरतगोपनार्थ ज्योत फुंकर (क्र.३३३) घालूनही विझवण्यांत येत असे. सुरत-रसिक मात्र अनुनयप्रसंगीं किंवा सुरतसमयीं दिवा तेवता (क्र. २६४, ५४७) ठेवीत. क्र. ५४७ मधील दिव्याची रसिकता अद्वितीय आहे. तरुण-सुरत पाहतांना तो इतका तल्लीन झालेला आहे

कीं तो तेलाचा असूनही तें संपलें तरी त्याची ज्योत तेवत आहे ! मेघदूतांतील रत्नदीपाहून हा अधिक रसिक आहे. संस्कृत व प्राकृत साहित्यांत त्याला तोड नाहीं.

ग्राम व नगर यांमधील राहणींत क्वचित् थोडाबहुत फरक असलेला दृष्टीस येतो. नगरांत बाजार भरत आणि त्यांसाठीं आजूबाजूच्या प्रदेशांतले वन्य लोक (क्र. ७८८) तेथें जमत असत. बन्दिशाला (क्र. ५४) व यज्ञशाला (क्र. २२७) यांसारखीं राजकीय व सांस्कृतिक स्थानें बहुशः नगरांतच असत. ग्रामांप्रमाणेंच नगरांनाही चोरांची धास्ती (क्र. ५८) असे. नागरकांना ग्रामतरुणींबद्दल विशेष आकर्षण (क्र. ७०२) वाटे. नागरकांची लैंगिक वृत्ति विकृत (क्र. ७३५) असावी असें वाटतें. ग्रामांतील गैरसोयी व दारिद्र्य आणि तेथील रेंखीव लावण्याचा व शिक्षित शृंगाराचा अभाव यांमुळें नागरी राहणीला चटावलेल्या चोखंदळांना ग्रामीण जीवन रुचत नाहीं. बहुधा अशांनींच त्यांना कुग्राम (क्र. ७७, १०९, ३१६), दग्धग्राम (क्र. ६००) व हतग्राम (क्र. १६४, ८०३) या नांवांनी आणि तेथील रहिवाश्यांना लबाड (छइलः क्र. ८७८), पामर (दरिद्रीः क्र. १६५), लुब्रे (शुनकप्रचुरः क्र. १३८) व हलिकनन्दन (नागरगट्टैः क्र: ६००) या विशेषणांनीं शापपूर्वक तिरस्कारलें आहे ; कारण येथील जेवणांत तूपमीठ (क्र. ३१६) मिळत नाहीं आणि झोंपण्याला बिछाना (क्र. ८७३) नाहीं ; कारण येथें आजाऱ्यांना वैद्य (क्र. ६००), भिकाऱ्यांना भिक्षा (क्र. ५५३) आणि व्यभिचारिणींना परपुरुष (क्र. ४६८, ८८१) मिळत नाहीं ! पण येथें जें मिळतें तें काय कमी आहे ? गाथाकवि सांगतात, येथें चित्तवेधक निसर्गसौंदय (क्र. ६३६, ८३०) आहे, ज्यांचे पयोधर उत्तुंग आहेत अशा गांवरान तरुणी उपलभ्य (क्र. ८७३) आहेत आणि सोइस्कर अशीं अनेक संकेतस्थानें (क्र. ६३५) ही आहेत !

निष्कर्ष :

गाथासप्तशतीच्या निर्मितीच्या काळांत महाराष्ट्रांत व अन्यत्र विस्तीर्ण शहरें व संपन्न बंदरें आणि कारभारी व लष्करी ठाणीं अस्तित्वांत होतीं. जनतेचें सहकार्य, व्यापाऱ्यांची संपन्नता आणि राजसत्तेचें सामर्थ्य ; शिल्पशास्त्रज्ञांची

योजकता, कारागिरांचें कौशल्य आणि आश्रयाचें सातत्य यांची द्योतक अशीं लोणावळें गटांतील लेण्यांसारखीं सांस्कृतिक महत्कार्यें पूर्वी झालेलीं होतीं व त्या काळांत चालू होतीं ; पण गाथासप्तशतींत त्यांचा मागमूसही लागत नाहीं. कारण हीं गीतें ग्रामीण आहेत, तीं ग्रामीण कवींनीं ग्रामीणांसाठीं रचलेलीं आहेत.

गाथासप्तशतींतील ग्रामीण व नागरी जीवनाच्या बाह्यांगाच्या निरीक्षणावरून दिसतें कीं तत्कालीन बहुसंख्य जनता वन्य व ग्रामीण आहे; कीं ग्रामस्थांचा परिचय नागरकापेक्षां वन्यांशीं अधिक आहे. ग्राम व नगर यांमधील फरक दर्शविणाऱ्या आधुनिक लक्षणांचा येथें मागमूसही लागत नाहीं. नागरी जीवनाचा जमाती व व्यवसाय यांशीं समन्वय होत नाहीं.

गाथासप्तशतींतील ग्रामांची मांडणी व त्यांभोंवतालची वनश्री, त्यांतील नागमोडी व चिखली रस्ते, येथील घरांची मांडणी व घाकारणी, त्यांभोंवतालचीं अंगणें व कुंपणें आणि त्यांतील वृक्षलता, ग्रामांतील पाणवठ्यांची मांडणी व उन्हाळ्यांतील पाण्याची टंचाई या व इतर लक्षणांवरून दिसते कीं हीं ग्रामें आहेत तो भाग डोंगरी व पावसाळी असला पाहिजे. मी महाराष्ट्राचा जो भाग पाहिलेला आहे त्यावरून वाटतें कीं हीं खेडीं, ग्रामें व नगरें मावळांतील असावींत.

१२ गाथासप्तशतींतील कौटुम्बिक जीवन :

गाथासप्तशतींतील कुटुम्बांतील घटकांचा वंशवेल येणेंप्रमाणें :

गहवइ : घरसामि × घरसामिणी :

पिउच्छा = अत्ता   = पिता × माता = सासरा × सासू = अत्ता.   (मामा) × मामी   माउच्छा

पुत्त × सोण्हा = जाया; सवती.   देवर × देवरजाया   पुत्ति × जामात

गृहपतिः

(गहवइः क्र. १०७, १७२, २९७, ६००, ७८७; गेहवइः क्र. ९५२; घरवइ : क्र. ९५१; घरसामि: क्र.१३०, २५४, ६६२; घरिल्लः क्र.७३१)

देशीनाममालेंत (२·१००) गहवइ या शब्दाचा अर्थ ग्रामीण villager असा दिलेला आहे. पाइअसद्दमहण्णवांत याचा अर्थ गृहस्थ, गृही, संसारी असाही दिलेला आहे. प्राकृतांत वइ या शब्दाचे अर्थ पति (क्र. ६६) आणि वृति = कुंपण (क्र. ९६) असे आढळतात. गहवइ हा शब्द दोन्ही अर्थांनीं अन्वर्थक आहे. हा कुटुंबाचा धनी (क्र. २९०) व रक्षणकर्ताही (क्र. ९५२). घरधनी हा शब्द ग्रामीण मराठींत नवरा व सासरा या दोन्ही अर्थांनीं रूढ आहे. क्र. १३० या गाथेंत घरिणीच्या व क्र. २५४ मध्यें सुनेच्या साहचर्यांत आलेल्या गृहस्वामीचे अर्थ अनुक्रमें नवरा व सासरा असेच घ्यावे लागतात. क्र. ६६२* मधील गृहस्वामी इतका बुळा आहे कीं घरच्या जारिणीनें पोसलेला कुत्रा त्याच्याच अंगावर भुंकतो; आणि क्र. २९७ मधील गृहस्वामी इतका खुळा कीं त्याची व्यभिचारिणी जाया आपल्या प्रियकराशीं त्याची गळाभेट करविते; क्र. १७२ मधील गृहपति हातीं घंटा घेऊन लायक रेडा शोधीत आहे आणि क्र. २५४ मधील गृहपतीनें मनाई केली तरी सुनेच्या इषाऱ्यानें अंगीं धिटाई आलेला परका पाहुणा ओसरीवर दडपून पथारी पसरीत आहे. क्र. ९५२ मधील गृहपतीची घरादारावर व शेतवाडीवर करडी नजर आहे. त्याच्या मालमत्तेवर उघड आक्रमण करावयास कोणी धजावत नाहीं आणि चोरटें आक्रमण करणाराचाही थरकांप होतो. क्र ७८७ मधील गृहपति असा जबरदस्त आहे आणि गांवांत व आसमंतात त्याचा इतका दरारा आहे कीं त्याच्या नुसत्या नामोच्चारानें गांवकऱ्यांचा थरकांप होतो व त्यानें तरवार उपसली कीं चोराचिलटांची दाणादाण होते. गृहपति स्वतः शेतीवाडीवर अंगमेहनत करीत नाहीं. हीं कामें तो हलिकांकडून करून घेतो. जातकुळींत व व्यवसायांत साम्य असल्यामुळे सामान्य हलिकांशीं त्याचे नात्याचे संबंध आहेत. क्र. ६०७ या गाथेची नायिका नागरी गृहपतीची कन्या व ग्रामीण हलिकनंदनाची पत्नी आहे. दरिद्री हलिकाला कन्या देण्यांत त्याला कमीपणा वाटत असावा; सासरीं मुलीची कुचंबणा होऊं नये म्हणून तिच्या दिमतीला माहेरची पाठराखीण

आलेली दिसते. गृहपतीचा उनाड मुलगा (क्र. १०७) बिचाऱ्या हलिक-स्नुषांच्या अंगचटीस जातो आणि क्र. ९५१ मधील गृहपतिसुतेला कोणी आवरूं शकत नाहीं.

गाथासप्तशतींत ससुर ही संज्ञा एकदांच (क्र ९५३) आलेली आहे. हा नायिकेचा सख्खा सासरा असणें संभवनीय आहे. अथर्ववेदांत श्वशुर हा शब्द अनेक वचनांत (१४·१·४४) आलेला आहे. यावरून डॉ. इरावती कर्वे निष्कर्ष काढतात कीं पतीचा पिता, चुलता, आजा इत्यादि वडील-धाऱ्यांना अनुलक्षून ही संज्ञा वापरण्यांत येत असावी. गाथासप्तशतींत **गुरुजन** (क्र ३६७, ३७०, ३९३, ४८४, ५८९, ६१६, ८१६, ८४५, ९८१) ही संज्ञा अनेक वेळां आलेली आहे. या उल्लेखांपैकीं क्र. ५८९, ६१६ व ८१६ यांमध्यें त्यांना फक्त गुरु म्हटलेलें आहे. हे गुरु व गुरुजन अथर्वांतील ससुरांसारखे दिसतात. कुटुंबीयांशीं त्यांचें नातें कोणतें तें निश्चित करतां येत नाहीं. गुरुजनांच्या आधीन असलेला पति (क्र. ८४५) नायिकेच्या मर्जीनुसार वागत नाहीं; त्यांच्या उपस्थितींत नायिकेला नवऱ्याकडे (क्र.३६७) किंवा प्रियकराकडे (क्र. ९८१) मान वर करून पाहण्याची सोय नसते, किंवा अश्रु ढाळण्याचीही सवलत (क्र ४८४) नसते. प्रत्येक कुटुंबांत अशीं ठाकुरकी गाजवणारीं जुनाट खोडें व बांडगुळें असतातच.

गाथासप्तशतींत पिता (पिइ, पिउ) ही संज्ञा आलेली नाहीं. पतीचे अनेक उल्लेख आलेले आहेत. **दइअ**-दयितः (क्र.७, १५, ४८,५९, ७४, १००, १८८, २७०, २९२, ३०२, ३९७, ४३३, ४३७, ४५३, ४६७, ६२२, ६५०, ८२८, ८३४, ८३९, ९१०, ९२७, ९२८, ९२९); **पइ** पतिः (क्र.१, ११, १३, ३६, ५४, ५५, ६९, १५९, १९७, २००, २३७, २४०, २९३, २९७, २९९, ३०१, ३२४, ३३५, ३४६, ३६७, ४७२, ४९८, ५२८, ५४९, ५९७, ६०५, ६६३, ६८६, ७०२, ७२४, ७३९, ७६१, ८०२, ८२४, ८४३, ८५७, ८६२, ८६७, ८८६). पिअः प्रिय या नांवानें आलेल्या उल्लेखांचे क्रमांक मुद्दामच दिलेले नाहींत. **भत्तार** (क्र ३९०) ही संज्ञा एकदांच आलेली आहे. क्र. १९७ मधील तरुणीचा पति वृद्ध आहे आणि क्र. ५९७ मधील मध्यम वयस्क व्याधानें नवतरणी बायको केलेली आहे. विषमवयस्कांच्या

विवाहाबद्दल तत्कालीनांना वैषम्य वाटत नसावें असें दिसतें. पति प्रवासाला गेल्यामुळें मी घरांत एकटीच आहें, असें निवेदन क्र. ३३५ या गाथेंत आहे. या व क्र १५९,२९७,६२१ वगैरे गाथांवरून निष्कर्ष निघतो की गाथासप्तशतींतील कुटुंबाचा विस्तार सामान्यतः मर्यादित होता. नवराबायकोच्या सुटसुटीत संसाराचीं उदाहरणें किती तरी गाथांतून दाखवितां येतील.

गाथासप्तशतींत देवर=दीर मात्र बहुत ठिकाणीं आलेले आहेतः (दिअरः क्र. ३१३, ७२९, ८७०; देअरः ७६५, ९९७; देवरः क्र. २८, ३५, ५९ ४६९, ५७०, ६८८, ८६६). देवर म्हणजे नवऱ्याचा धाकटा भाऊ. दीरभावजयांच्या अनुरक्तीचे अनेक उल्लेख गाथांत आलेले आहेत. क्र. ७२९ व ८७० येथें त्यांचा अनुनय नुकताच सुरू झालेला आहे. क्र. ७२९ मधील देवराला सखीचें साह्य आहे. क्र. ८७० ची नायिका स्वतःच देवराला प्रोत्साहन देत आहे. क्र. २८, ३१३, ५७०, ६८८ मधील भावजयींचा दिरांशीं प्रेमसंबंध चालू आहे. क्र. २८ मधील त्यांच्या प्रीतींत विकृतीही आहे. क्र. ३५ व ५९ मधील नायिका देवराच्या अनुनयाला प्रतिकूल आहेत. क्र. ३५ ची नायिका त्याला सन्मार्गावर आणण्याचा यत्न करीत आहे आणि क्र. ५९ ची नायिका केवळ कुटुंब-विघटन टाळण्यासाठीं देवराच्या दुर्वर्तनाचा परिस्फोट करीत नाहीं. या दोन्ही नायिका त्या त्या कुटुंबांत नव्यानेंच आलेल्या दिसतात. क्र. ६८८ मधील नायक कार्यसिद्धीनंतर नायिकेला पराङ्मुख झालेला असला तरी त्याला टोंचून बोलण्याइतकी व तें ऐकून घेण्याइतकी अनुरक्ति अद्याप उभयतांमध्यें अवशिष्ट आहे. क्र. ७६५ मधील देवरानें उपभुक्त भावजयीची आबाळ मांडलेली आहे व तिच्या अन्नवस्त्राची तरतूद करण्यासाठीं त्रयस्थाला मध्यस्थी करावी लागत आहे.

गाथासप्तशतींतील कुटुंबव्यवस्था पितृप्रधान असल्यामुळें येथें जांवयाचें प्रस्थ फारसें दिसत नाहीं. क्र. ६८३ व ८१६ या गाथांतलि जामात अकस्मात व भर दुपारीं सासुरवाडीला आलेले आहेत. क्र.६८३ या गाथेवरील टीकेनुसार त्याची पत्नीशीं भेट सायंकाळपर्यंत व्हावयाची नाहीं. क्र. ८१६ मधील नायिकेला तर पतीकडे मान वर करून पाहण्याची सवलत नाहीं. क्र. ६०० मधील हलिकनन्दन जामाताला त्याच्या पत्नीची पाठराखीण कस्पटासमान लेखते. क्र. ७७७ मधील तुपाचा रतीब लावलेला असूनही न पोसणारा

खुजाम्बा हा गृहपतीचा घरजांवई असावा असें वाटतें. पुत्राच्या विषयासक्तीचा माता निषेध करते (क्र. ६३०, ६६३), पण जांवयाच्या विषयासक्तीचें मात्र सासू कौतुक (क्र. ५०७) करते ! मुलगा व जांवई यांच्याविषयींच्या तिच्या वृत्तींत एवढा फरक होण्याचें कारण एकच; आपल्या पुत्रावर कुटुंबाच्या पोषणाची जबाबदारी आहे याची मातेला जाणीव असते आणि जांवयाच्या बाबतींत तशी काळजी करण्याचें सासूला प्रयोजन नसतें. शिवाय मुलगा आईला सांगूं शकत नाहीं अशीं रहस्यें देहधर्मांच्या साम्यामुळें आई व मुलगी यांमध्यें चर्चिलीं जातात.

क्र. ६९७ या गाथेंत लेह्डा या शब्दाला लम्हडा असा पाठभेद आहे. मध्य-हिंदुस्थानांतील वन्य जमातींत घरजांवयाला लम्हड ऊर्फ लामसेन अशी संज्ञा आहे. श्री. व्हेरियर एल्विन यांनीं आपल्या ग्रंथांत या प्रथेचा उल्लेख केलेला आहे; पैकीं Myths of Middle India (पृ. ४७६-७) मधील या प्रथेच्या उद्गमाबद्दलची गोंड लोककथा येथें देतों. " मदनगड येथें तोण्ह देवर आपल्या स्त्रीसह रहात असे. त्यांना एक कन्या होती. मुलगी वयांत आली तेव्हां आईबाप म्हातारे झाले होते. त्यांनीं विचार केला, मुलीला कोणाला तरी विकावी व मिळतील त्या पैशांतून संसार चालवावा. तोण्ह देवर जांवयाच्या शोधाला लागला. कोसमगड येथें महकासुर देव नांवाचा इसम रहात होता. त्याला एक मुलगा होता. त्याचें नांव लामसेन. देवरानें सारी हकीकत महकासुराला सांगितली. त्यावर महकासूर म्हणाला, तूं मुलीला विकूं नको, माझा मुलगा लामसेन तुझ्या घरीं बारा वर्षें राहील व काम करून घर चालवील; मुलीबद्दल मी तुला पैका देणार नाहीं आणि मुलामुलीला सासरीं आणणार नाहीं; त्यांचें लग्न लावून दे, म्हणजे दोघेही काम करून तुम्हां उभयतांना पोटाला घालतील. देवरानें हें कबूल केलें व लामसेनाचें आपल्या मुलीशीं लग्न लावलें. तेव्हांपासून घरांत लामसेन ठेवण्याची प्रथा सुरू झाली. " पूर्वी त्याला सासुरवाडीस बारा वर्षें काम करावें लागे. आतां तीनच वर्षें करावें लागतें. या मुदतीनंतर त्याला बापाच्या घरीं सपत्नीक जातां येतें. वन्य जमातींत जातरिवाजानुसार घरजांवयाला सासरीं मजुरी करावी लागते आणि नागरिक घरजांवई हा लाडक्या कन्येच्या हौसेसाठीं किंवा एकुलत्या कन्येचा

नवरा या नात्यानें मालमत्तेचा भावी धनी म्हणून सासरीं येतो. दाँवही थोडे बहुत लाडावलेले असतातच. घरजांवई सासऱ्याच्या जीवावर उंडारतो तरी किंवा झुरणीस लागतो. "बायकांत पुरुष लांबोडा, भाजून खातो कोंबोडा," ही म्हण आतां स्त्रियांच्या घोळक्याभोंवतीं घोंटाळणाऱ्या पुरुषाला किंवा मुलग्याला अनुलक्षून वापरण्यांत येते. या म्हणींतील लांबोडा हा लम्हडा याचा अपभ्रंश असावा असें वाटतें. घरजांवयानें दडपून सासरचा कोंबडा भाजून खाल्लाच तर कोण त्याचें काय करणार ?

गाथासप्तशतींत पुत्र व पुत्रि हीं नातीं अनुक्रमें उत्त (क. ८४,१ ८०, ३७३, ४५६, ६०३, ७४५, ८५९); डिम्भ (क.२९१,५३८ णन्दण (क.५००, ६०८, ६२८); पुत्त (क. ११, ११३, ४००, ४०९, ५६७, ६२९, ६३०, ६३२); पुत्तअ (क. १५४, १७४, २३६, २५९, २६६, ३३१, ३३२, ३५५, ४६२, ४६८, ५१२, ६२१, ७२०, ७८३, ९०१); सुअ (क. १०७, २००, ३३६, ३५९, ४०२) आणि धूआ (क. ३७०, ३८८, ४०७, ४०९, ५९२, ७७९, ८५८, ५१); कुमरि (क २९८); पुत्तालि (क. ८७९, ८८९); पुत्ति (क. २१, ४५, १४३, १५२, १५६, ३४०, ४१५, ६०५, ६८१, ७१०, ७२७, ७२८, ७३५, ७४१, ७४८, ७७८, ७९८. ८२०, ८७७, ८८१, ८९०, ९२०, ९२३); पुत्तिअ (क. ३३२); सुआ (क. ४१०, ६००, ८५७) या संज्ञांत आलेलीं आहेत. सामान्यतः डिम्भ व पुत्त हे शब्द औरस पुत्रवाचक अहेत आणि पुत्तअ हा शब्द अज्ञ, बालक या अर्थाने वापरलेला आहे. पुत्ति हा शब्द तर फारच ढिलाईनें वापरलला आहे. क. ७३५ मधील पुत्ति ही निश्चितपणें कन्या आहे. क. ७३५ व ७९८ मधील पुत्ति अविवाहित आहेत. क. ७७८ मधील पुत्ति हें संबोधन सासूनें सुनेला अनुलक्षून योजलेलें आहे. असा प्रयोग हल्लींही कोठें कोठें प्रचारांत आहे.

गाथासप्तशतींत सासू (क. ३३६, ४९३, ७७८) व सोण्हा (क. ५९, १०७, २४१, ३३६. ४८३, ४९३, ६३०, ९४५, ९५३) या संज्ञा आलेल्या आहेत. एखादी सासू इतकी प्रेमळ असते कीं ती सुनेला पुत्ति (क. ७७८) म्हणते. स्वभावतः कोपिष्ट असली तरी पतिविरहामुळें सुनेची दुर्दशा झालेली पाहून ती स्वतः अश्रु (क. ४९३) ढाळते. पुत्राची संजीवनौषधी म्हणून त्याच्या

विरहकालात ती सुनेचें रक्षण करते (क्र. ३३६) आणि वसंतांत दरवळणाऱ्या सुगंधांनीं तिच्या चित्ताची चलबिचल होऊं नये म्हणून (क्र. ४९७,) तिला घराबाहेर पडूं देत नाहीं. क्र. ८६९ मधील सासू खाष्ट आहे. ती सुनेकडून दिवसभर इतकें काम करून घेते कीं बिचारीला क्षणाचीही उसंत मिळत नाहीं; पण या सुनेला ज्या कारणासाठीं मोकळीक हवी होती तें विचारांत घेतलें म्हणजे सासूची करणी योग्य होती असेंच दिसून येतें. तरुण सुनेच्या आहारीं गेलेला विषयासक्त पुत्र कृश व कुटुंबाचा भार पेलण्यास असमर्थ झालेला पाहून तिला विषाद व भवितव्याबद्दल काळजी (क्र. ६३०) वाटते आणि भुऱ्या बटा सैल सोडणाऱ्या नाचऱ्या सुनेबद्दल तिऱ्हाइताजवळही उपालम्भोद्गार (क्र. ९४५) काढावयास ती कमी करीत नाहीं. एकूण गाथासप्तशतींत उपासमार, कटुवचनें, मारहाण वगैरे सासुरवासाचीं जीं कुप्रसिद्ध लक्षणें त्यांचा मागमूसही आढळत नाहीं.

गाथासप्तशतींत अत्ता (क्र. ८, ११०, २९५, ४६९, ४९७, ५४२, ५४९, ५४२, ५५७, ६५१, ६६३, ६६७, ६७४, ८०५, ८६९), पिउच्छा (क्र. ११०, २९५, ५९८, ५३७), माउच्छा (क्र. ६४८, ७७९) आणि मामि (क्र. ९३, ९७, १२४, २०४, २४६, २६४, २९४, ३४४, ४३१, ४५०, ५०६, ५५२, ५९१, ६०८, ८४२) हे प्राकृत शब्द अनेक वेळां आलेले आहेत. छायेंत व टीकाकारांनीं अत्ताचा प्रतिशब्द व अर्थ सासू असाच सामान्यतः दिलेला आहे. देशीनाममालेंत (१. ५१) अत्ताचे अर्थ माता, सखी, सासू असे दिलेले आहेत. श्रीधर–भाषा–कोशांत हिंदी अत्ताचा अर्थ स्वतःची मोठी बहीण किंवा आईची बहीण असा दिलेला आहे. मराठी आते ही बापाची बहीण. क्र. ४९७, ५४९, ५५७, ६६३ व ८६९ या गाथांतील अत्ता ही निश्चितपणें सासू आहे. पिउच्छा ही बापाची आणि माउच्छा ही आईची बहीण. पिउच्छा ही संज्ञा गाथासप्तशतींत अनेक वेळां आलेली असल्यामुळें अत्ता या संज्ञेचा अर्थ भिन्न असलाच पाहिजे. वस्तुतः माउआ म्हणजे माता किंवा सखी, सहेली (देशी नाममाला: ६, १४७); तरीही क्र. ४२३ मधील माउआलो छायेंत मातृष्वसा असा प्रतिशब्द दिलेला आहे. मामि (मम्मि, मल्लाणि) या शब्दाचा अर्थ देशी नाममालेंत (६. ११२) आईच्या भावाची

नायको असा दिलेला आहे. छायेंत मामीला मातुलानि हा प्रतिशब्द दिलेला आहे. क्र. १२४, २०४, ४३१, ४५० व ५०६ : मधील मामि ही प्रत्यक्ष मातुलानि, निदान नायिकेच्या नात्यांतली असणें शक्य आहे. इतरत्र ती नायिकेची दूती किंवा सखी आहे. गाथासप्तशतींत माआ (क्र. ४००, ५०७, ७३५), माइआ (क्र. ८१९), माउआ (क्र. २४०, २८५, ४२३) व माए (क्र. ४३, १५९, १९५, ५४८, ५८९, ७८५, ८०१, ८८३) हे मातृवाचक शब्द आलेले आहेत. क्र. २४०, ४००, ५०७, ७३५ व ८८३ मधील माआ व माउआ या निश्चितपणे माताच आहेत; अन्य माता या मानलेल्या माता आहेत.

गाथासप्तशतींत आतोबा, मामा व मावसा यांचे उल्लेख नाहींत. शिवाय अत्ता, पिउच्छा, माआ, माउआ व मामि या संज्ञा ढिलाईनें वापरलेल्या आहेत. यावरून वाटतें कीं या संज्ञा सामान्यतः सांकेतिक असाव्यात. साऱ्या जणी संगमोत्सुक नायक-नायिकांचें दूतीकार्य करणाऱ्या मध्यस्थ. त्यांना कोण-त्याही नांवानें संबोधिलें तरी अर्थ एकच. व्यभिचाराचे तंत्र जाणणारे सांग-तात कीं या संज्ञा त्या जगांत आजही वापरांत आहेत ! त्यांमध्यें भेद एवढाच कीं अत्ता पिउच्छा, व माआ या वयस्क असाव्यात आणि माउच्छा व मामि या समवयस्क !

गाथासप्तशतींत गृहिणीवाचक संज्ञा अनेक आहेत. गेहिणी (क्र. ८२५); घरसामिणी (क्र.७३१); घरिणी (क्र ११, १३, ३६, ३८ १२२, १३०, २०५, २६१, २९१, ३८२, ४०९, ४७२, ५३८, ५६५, ५९५, ६२१, ८६२); जाया (क्र. ६, ३१, ४७, ८४, १६९, २००, २२२, २२८, २८३, ३१३, ३३७, ३७३, ३८६, ३९९, ४१७, ५००, ५७०, ६३९, ७६६, ७६८, ८२६, ८३०, ९५७, ९६१); णववहू = नववधू (क्र. ४७९, ५६९, ६४६, ६४७, ७२६, ९८४); बाला (क्र. २३७. ९२७); मुद्धा = मुग्धा (क्र. १५, ३०७, ३८२, ४३३, ४६५, ५०४, ५३३, ६७८). क्र. ७३१ मधील घरसामिणी ही कांहीं खरी गृहस्वामिनी नाहीं, मालकिणीचा आव आणणारी पाहुणी आहे. त्याचप्रमाणे क्र. ३६ मधील घरिणी हा शब्द नायिकेच्या राहत्या घराला अनुलक्षून योजलेला आहे. जाया व घरिणी यांमध्यें फरक करावयाचाच झाला

तर सांगतां येईल कीं सामान्यतः जाया ही मध्या, तरुणी आहे आणि घरिणी ही प्रौढा; जाया ही दोहदिनी व विलासिनी आणि घरिणी ही पुत्रवती व गृहकार्यव्यापृता. या विधानाला अपवादही आहेत. क्र. २०० मधील जाया पुत्रवती आहे. अपत्यांना जन्म देते ती जाया, असाच या शब्दाचा अर्थ आहे. त्याचप्रमाणें क्र. ११ व २९१ मधील घरिणींना अद्याप गांभीर्य आलेलें नाहीं.

गाथासप्तशतींत सवती (क्र ७०, १०६, १७३, २१२, २७५, ४४९, ५२८, ५५७, ५८६, ७१२, ९२१, ९७४, ९७५) जागोजाग आढळतात. वर कंसांत उल्लेखिलेल्या क्रमांकांत त्यांचे नामपूर्वक उल्लेख आलेले आहेत; इतर अनेक गाथांत त्यांचा संदर्भ आलेला आहे. या उल्लेखांवरून या काळांत बहु-पत्नीकत्व रूढ होतें असें दिसतें. साधारणतः सवतींची नांदणूक असणारीं कुटुम्बें आर्थिक सुस्थितींत असावींत असें वाटतें. सामान्यतः या सवती सजातीय आहेत. क्र. ७९ मधलि सवतींपैकीं ज्येष्ठ जाया आर्या असूनि तिच्या सवती अन्य व सामान्य जातीय असाव्यात असें वाटतें. त्यांमध्यें आर्या आपलें वर्चस्व सांभाळून आहे. क्र. २४ या गाथेच्या नायकानें अगोदरपासून अन्यत्र बिन्हाड थाटलेलें असून केवळ लोकाचारासाठीं किंवा आवश्यक धर्मकार्य म्हणून त्यानें सजातीयतेशीं निष्प्रेम विवाह केलेला दिसतो. सवतींपैकीं कांहीं विवाहित आहेत (क्र. २४) व कांहीं ठेवलेल्या (क्र. ३३७) आहेत. क्र. ४७९ मध्यें नायकाच्या द्वितीय विवाहाचा उल्लेख आलेला आहे; नववधूविषयीं वाट-णाऱ्या औत्सुक्यामुळें त्याला प्रथम गृहिणीच्या संगतींत सुख लागत नाहीं. कोठें या सवती एका घरांत नांदतात (क्र. ११२) तर कोठें त्यांचीं बिन्हाडें वेगळीं (क्र. २४, ४३, १३०) आहेत. सवतींपैकीं कोणी आवडत्या असतात व कोणी नावडत्या (क्र. ५२३). एखाद्या पत्नीला एखाद्या दुसऱ्या सवतीचा भार सोसावा लागतो आणि कोठें बिचारीला अनेकींचा (क्र. २७५); प्रथम गृहिणी नावडती झाली (क्र. ५२३) किंवा सुकली (क्र. ३८२) अगर शरीरानें अवजड झाली म्हणजे तिचा पति तरुण (क्र. ५९८), भरदार (क्र.५९८) वा लवचिक (क्र. ११२) नववधूशीं विवाह (क्र. ४७९) करी. नववधूसंग नायकाला आरंभीं सुखकर वाटतो. पण त्यामुळें त्याला दौर्बल्य (क्र. १२०, १२१, १७३) येतें व यामुळें सवती तिच्यावर रुष्ट असतात

आणि त्या नवऱ्याजवळ तिच्या नाचरेपणाबद्दल व अन्यासक्तीबद्दल गाऱ्हाणीं व चुगल्या करतात. सवतींच्या प्रादुर्भावामुळें पत्नीला पतीचें दर्शन क्वचित् (क. ७२), आजारपणीं समाचारासाठीं म्हणून (क. ५०, ५१), केवळ दाक्षिण्य म्हणून (क. ८५), दिवसां उजेडीं, पहांटेस (क. ६५३) किंवा अस्तमानींच (क. १३०) व्हावयाचें. यामुळें अनायासें घरीं परतलेला पति फिरून बाहेर पडणार नाहीं याविषयीं दूरदर्शी गृहिणी विशेष दक्ष (क.१३०) असत. बहुवल्लभांच्या स्त्रियांची दुर्दशा काय सांगावी? त्यांना अश्रु ढाळीत (क. ५२८), उसासे टाकीत (क.१४७), एकीमेकींच्या उखाळ्या पाखाळ्या काढीत (क. १७९, ७१२), दुःखभाण्डारांत (क. ९२५) आयुष्य कंठावें लागतें. सपत्नीरोष हें संसारी स्त्रियांचें महद्दुःख होय, असें भूरिदत्त जातकांत (जातक : भाग ६. पृ. १६०) नागीनें सांगितलें आहे तें अगदीं खरें आहे. याचा ताप त्यांना होतो, तसाच तो त्यांच्या यजमानालाही सोसावा लागतो. या जंजाळांत गुरफटलेल्या बिचाऱ्याला जागोजाग चहाड्या (क. ५५७), टोमणे (क. ६५३) व दुर्वचनें (क. १७९) ऐकून घ्यावीं लागतात. हें भोगावें लागत असूनही पुरुष जणूं काचत्या व कांटेरी पायबंदांच्याच शोधांत असतो!

गाथासप्तशतीच्या क. ९५२ या गाथेंत क्षेत्रसंकेत आलेला आहे. स्त्री हें क्षेत्र आहे असें येथें सांगितलेलें आहे. हा क्षेत्रसंकेत सकृद्दर्शनीं भासतो तितका हास्यास्पद किंवा घृणास्पद नाहीं. असा कोण बुळा शेतकरी आहे कीं जो दुसऱ्याला आपल्या शेतांत नांगरणी पेरणी करूं देईल? दुसऱ्याच्या शेतांत पेरणी करणाराची तुलना व गणना प्राचीनांनीं वाऱ्याला ठोसे मारणाऱ्या महामूर्खांत केलेली आहे. वंशवृद्धि करावयाची ती कुलपरंपरेंत खंड पडूं नये म्हणून, स्त्रीक्षेत्रांत बीजारोपण करावयाचें तें धर्मकार्य म्हणून, पुत्रोत्पादनामुळें गृहस्वामीला व गृहस्वामिनीला सद्गति प्राप्त व्हावी म्हणून; अशी या क्षेत्र-संकेताची भूमिका आहे. या क्षेत्रावर आक्रमण होऊं द्यावयाचें नाहीं, झालेंच तर त्याचें निवारण करावयाचें व प्रसंगविशेषीं शुद्धीकरण करावयाचें, हा संकेत प्रसरणशील व युद्धशाली भारतीयांना प्राचीन काळापासून माहीत आहे. दुर्वर्तनामुळें संसारांत नांदावयाला नालायक झालेल्या गृहिणीला हद्दपार करावयास

(क्र. ७६) जे डरले नाहींत ते युद्धाचा अवलंब करून आपल्या अपहृत स्त्रियांना चोरांच्या (क्र. ५२७) व शत्रूंच्या (क्र. ५४, ५५) तावडीतून सोडवतील, यांत नवल कसलें? आणि सोडवतील कशासाठीं? कुटाळांच्या दुर्वचनांवर विसंबून त्यांचा त्याग करण्यासाठीं? नव्हे, क्षेत्र रक्षणासाठीं, संवर्धनासाठीं!

गाथासप्तशतींतील गृहिणीचें जीवन व दिनचर्या हीं पाहाण्यासारखीं आहेत. लग्नाच्या वेळीं तिचें वय जाणतें (क्र. ६४२, ६४३) असतें. क्र. २९८ ची नायिका विवाहासाठीं आतुर झालेली आहे. ही सुशिक्षित (क्र. २७, ३५, २४४, ८२७, ८३५) आहे. ती पतीला पत्रें लिहिते व त्याचीं पत्रे वाचते. निःशंकपणें खिदळणाऱ्या कुमारींच्या वागणुकींत लग्नानंतर संसाराच्या जबाबदारीची जाणीव झाल्यामुळें गांभीर्य (क्र. ६०६) येतें. रात्रीं जागरण झालेलें असलें तरी कुलवधू सकाळीं उठून कामाला (क्र. २३) लागते. उजाडण्यापूर्वी उठणार नाहीं ती नवऱ्याची लाडकी असली तरी निंदेला पात्र (क्र. ७१२) होते. झाडलोट झाल्यानंतर ती स्नान (क्र. ७९, ८०) करते व स्वयंपाकाला (क्र. १३) लागते. माहेरवासिनी मात्र उशीरां आंघोळ (क्र, ६८३) करतात. ती रन्धनकर्मांत निपुण (क्र. १४) आहे. ती आल्यागेल्याला भिक्षा (क्र. १६२) वाढते, पाकसिद्धीनंतर काकबली (क्र. २०५) देते. घरधनी शेतावर गेलेला असला तर त्याला व कामगारांना न्याहारी (क्र ६९२) पोंचविते. मुहूर्ताच्या दिवशीं ती नांगराची पूजा (क्र. १६५) करते आणि जरूरीप्रमाणें शेतांत काम (क्र. ६९०) व राखण (क्र. ६९०, ६९१, ८१५) करते. तिला दळण (क्र. ३८८, ७९४), कांडण (क्र. ५५७) करावें लागतें; पाणवठ्यावरून पाणी आणावें (क्र. ८७४, ८७५) लागतें. दिवसभर ती कामाधामांत (क्र. ८६८, ८६९) गुरफटलेली असते. असें असूनही दुपारीं जरा आडवी झाली तर ती आक्षेपाला व निंदेला (क्र. ६५, ६६) पात्र होते. पति बाहेर गेलेला असला तर त्याची मार्गप्रतीक्षा करीत ती दारांत उभी (क्र. १४०, २५६, २६२) राहते व तो घरीं येतांच त्याचें स्वागत (क्र. ३१२) करते, त्याचें पादप्रक्षालन (क्र. १३०) करते. पति वृद्ध असला तरी ती त्याचा संसार आनंदानें व आपखुषीनें (क्र. २९३) चालविते,

स्वतःच्या सुखदुःखांची उपेक्षा करून त्याच्या यशानें आनंदित (क. ६८५) होते. पतीचें चित्त अन्यत्र गुंतलेलें असलें तरी ती आपला क्रोध मनांत जिरवते, तो अश्रूंनींही (क. ८६३) व्यक्त करीत नाहीं, त्याला संतुष्ट करून त्याची अन्यासक्ति (क. १३०) आवरते, इतकेंच नव्हे, त्याच्या जिवासाठीं दौत्यही (क. ८४) करण्यास सिद्ध असते. त्याच्या विपरीत हौसाही (क. २२, ८४) ती पुरविते. असह्य परिस्थितींतही ती पातिव्रत्य (क. ३५) सांभाळते. स्वतःच्याच नव्हे, शेजारणीच्याही शीलाचीही ती काळजी (क. ३६, ३९) वाहते. आपल्या कुटुंबाची विपन्नावस्था (क. ४७२) ती प्रकट होऊं देत नाहीं. कुटुम्बाची दुर्गति असेल तर खर्च टाळण्यासाठीं ती गरोदरपणीं आपले डोहाळेही मनांतल्या मनांत (क. २९०, ४७२) जिरवते. कुटुम्बाचा भार धारण करण्यासाठीं ती आपल्या हौसांवर जलाञ्जलि (क. ६०६) देते आणि कुटुंबीयांशीं सहकार्य करते व स्वतः धोका पत्करून कुटुम्बविघटन (क. ५९) होऊं देत नाहीं. अधून मधून माहेरची ओढ लागत असली (क. ८७०) तरी ती सासरच्या जीवनाशीं इतकी समरस होते कीं सासरची दुर्गति असतांना माहेरचीं माणसें सणावाराचे दिवशीं थाटमाट करून भेटावयास आलीं तर तीं सहेतुकपणें आपल्याला हिणवण्याला आलीं आहेत असें मानून (क. ३८) ती त्याच्यावर रागावते. पति प्रवासांत असतांना ती वेणीफणी करीत नाहीं. (क. ३९), डोळ्यांत अंजन घालीत नाहीं. (क. ८६४). अशा प्रकारें ती कौटुम्बिक कर्तव्यांचे पालन करते व सहनशीलतेनें सुखदुःखांचा समन्वय (क. १४२, ५१२, ८३०, ८६३) करते, म्हणून संसार सुखाचा होतो. एकत्र कुटुम्बांतील स्त्रियांनीं अविनयाच्या मूर्खपणापासून अलिप्त असावें एवढीच गृहपतीची मागणी (क. ८३०) असे. संसाराचें सुख सुकलत्रावर अवलंबून असल्याची (क. ९३९) गाथाकवींना जाणीव होती. या संसारांत स्त्रियांना इष्ट तेवढें स्वातंत्र्य नव्हतें असेंही म्हणतां येणार नाहीं. क. ८६१ या गाथेंत सांगितलें आहे कीं ज्या कुटुम्बांतील स्त्रिया मोकळ्या मनानें बोलतात, अकृत्रिमपणें वागतात, निर्विकारपणें हंसतात व निष्पापपणें वावरतात तीं कुटुम्बें धन्य होत !

गाथासप्तशतींतील कौटुम्बिक जीवनांत वात्सल्याचीं अनेक उदाहरणें

आढळतात. क्र. ११ मधील छोटा मुलगा बापाच्या पाठीवर बसून घोडा घोडा खेळत आहे; क्र २०० मधील चिरंजीवांना नुकतेच दोन दांत आलेले आहेत व त्यांनीं ते बोरावर उमटवले आहेत आणि आईबाप त्यांचें कौतुक करीत आहेत. क्र. २०० मधील वर्णन कवीच्या सूक्ष्म व मार्मिक निरीक्षणाचें द्योतक आहे. या प्रसंगांच्या अनुरोधानें गाथाकवींनीं केलेलें मनोविश्लेषण आजच्या नवकवींनाही चकित करील. क्र. ४०९ मधील प्रसंग असाच आहे; पुत्राच्या स्पर्शानें मातेचा एक स्तन पान्हवतो आणि पतीच्या स्पर्शानें दुसरा रोमांचित होतो; वात्सल्य व शृंगार यांचें असें संमिश्रण इतरत्र क्वचितच आढळेल. कौतुक चाललें आहे तोंवर ठीक आहे, पण ऐन वेळीं लाडक्या पुत्रानें भोंकाड पसरलें तर मात्र तो आणखी एका धपाट्यांतून (क्र.४००) सुटत नाहीं. जणूं असा धपाटा खाल्ल्याशिवाय त्याला सुखाची झोंपच येत नाहीं! आईबापांना अशीं हैराण करीत नाहींत तीं मुलें कसचीं? शेतकऱ्याला खरा आनंद केव्हां व कशानें होतो? पाण्यानं भरलेल्या खाचरांतलें साळीचें पीक गुढघ्याएवढें वाढलेलें दिसतें तेव्हां; कारण यापुढें तें अवर्षणामुळें सुकणार नाहीं अशी त्याची खात्री होते. क्र. ५६७ या गाथेंत अशा शेताची अत्यंत अन्वर्थक अशी तुलना घरच्या दुधावर पोसलेल्या, गुडघ्याएवढ्या वाढलेल्या आणि चिखलानें माखलेल्या हलिकपुत्राशीं केलेली आहे. पित्याच्या गैरहजेरींत व विपन्नावस्थेंत माता पुत्राचें रक्षण करते. (क्र. ५३८, ६२१) आणि यासाठीं स्वनाशाचीही पर्वा (क्र. १०२) करीत नाहीं. क्र ५९५ मध्यें मुलानें आईजवळ घेतलेला जंगली आंब्याचा हट्ट हा प्रसंग अत्यंत हृदयद्रावक आहे.

वर नमूद केलेल्या नातेवाइकांच्या उल्लेखांवरून गाथासप्तशतींतील कुटुंबसंस्थेबद्दल अनेक महत्त्वाचे निष्कर्ष निघतात.

गाथासप्तशतींतील गृहपति हा सामान्य ग्रामीण किंवा हलिक नाहीं. समाजांत त्याला विशिष्ट दर्जा आहे. त्याचा हा दर्जा प्राचीनांनाही मान्य आहे. गृहपति ही संज्ञा वेदकालापासून रूढ आहे आणि ती तेथें व इतरत्र वेळोवेळीं विशिष्ट वेगवेगळ्या अर्थांनीं वापरण्यांत आली आहे. गृहपति (Master of the Household : ऋ ६. ५३. २; अथर्व १९. ३१. १३), जनपति (Chieftain of Families : ऋ : १. १८५. ८), विश्पति (Lord of the Clan :

ऋ : ७. ५५. ५) या संज्ञा वेदांत आढळतात. डॉ. इरावती कर्वे सांगतात, गृहपति हा कुटुंबाचा पति, शास्ता, कुटुंबांतील सर्वांत वडील पुरुष (Kinship Terminology & Kinship Usage in Rgveda & Atharva Veda : Annals: XX. 126). अर्थशास्त्रांत (अधि. २. अध्याय ३५) कौटिल्य सांगतो : "समाहर्तुप्रदिष्टाश्च गृहपतिकव्यञ्जना येषु ग्रामेषु अणि-हितास्तेषां ग्रामाणां क्षेत्रगृहकुलाग्रं विदुः। मानसञ्जाताभ्यां क्षेत्राणि भोगपरि-हाराभ्यां गृहाणि वर्णकर्मभ्यां कुलानि च। तेषां जङ्घाग्रामायव्ययौ च विदुः। प्रस्थितागतानां च प्रवासावासकारणमनर्थ्यानां च स्त्रीपुरुषाणां चारप्रचारं च विदुः।" = " शेतें व घरें यांच्या मर्यादा आणि त्यांवरील मालकीहक्क, सरकारी कर व त्यांत देण्यांत आलेली सूट, गांवांतील माणसें व गुरेंढोरें यांची संख्या आणि कुटुम्बांच्या जाति व व्यवसाय आणि त्यांचें उत्पन्न व खर्च, यांच्या स्थानिक दप्तरांत नमूद केलेला तपशील बरोबर आहे किंवा कसें हें बातमीदारानें गृहपतीचा वेष धारण करून पडताळून पहावें. गांवात नव्यानें आलेल्या व गांव सोडून जाणाऱ्या लोकांवर नजर ठेवावी आणि त्यांच्या येण्याजाण्याचीं कारणें शोधून काढावींत; त्याचप्रमाणें आलेल्यांपैकीं अनिष्ट व अनर्थकारक कोण आणि परसत्तेचे हेर कोण याची बित्तंबातमी काढावी. " त्या अर्थी खरेखुरे गृहपति असेच उद्योग करीत असावेत असा श्री. बखले यांचा कयास (पूर्वोक्तः २.५०) आहे.

अर्थशास्त्रांत नमूद असलेलीं लक्षणें गाथासप्तशतींतील सर्वच गृहपतींच्या ठायीं आढळत नाहींत. येथें गृहपति ही संज्ञा थोडी ढिलाईनें वापरलेली आहे. तरी आहेत त्या उल्लेखांचा सारासार विचार करतां दिसून येतें कीं गाथासप्तशतींतील गृहपति हा अर्थशास्त्रांतील व्यवस्था अमलात येण्याच्या पूर्वीचा असावा. या गृहपतीचा आर्थिक व सामाजिक दर्जा सामान्य घरिल्लांहून व घरधन्याहून श्रेष्ठ असावा. ग्रामव्यवस्थेंतील त्याचा दर्जा ग्रामणीच्या खालो-खाल असावा. गृहपति हा गबर जमीनदार व जबर जरबेदार असावा. महाराष्ट्रांत जातकुळीच्या श्रेणींत विशिष्ट कुलांना उच्च दर्जा देण्यात येतो. त्याचें गृहपति हें मूळ स्वरूप असावे. अर्थशास्त्रांतले गृहपति करतात तसे उद्योग व उचापती हल्लीही गांवकऱ्याचे स्वयंभू पुढारी या नात्यानें स्थायिक

मातबर शेतकरी करीत असतात. यांचींही मुलें कांहीं काळपर्यंत उंडारतात आणि जातीनें शेती किंवा शेतकाम करणाऱ्या स्त्रीपुरुषांना व सामान्य हलिकांना उपद्रव देतात. उदीम-उद्योग करून, लष्करांत किंवा सरकारांत नोकरी करून अथवा स्वार्थासाठीं किंवा प्रतिष्ठेसाठीं अधिकाऱ्यांकडे वळण बांधून सामान्य कुणबी गबर व जबर झाला म्हणजे त्याचें घराणें प्रथम श्रेष्ठ कुळींतील कन्येचें ग्रहण व नंतर उच्च कुळांत कन्येचें दान या साधनांनीं कालांतरानें श्रेष्ठ जातकुळींत समाविष्ट होऊं लागतें. असा प्रकार आजही घडत असलेला दिसतो. या श्रेष्ठ-कनिष्ठ भावाचें मूल स्वरूप या गृहपतींत पहावयास मिळतें.

गाथासप्तशतींतील कुटुंबाचा विस्तार मर्यादित असला तरी या कुटुंबव्यवस्थेंत हिंदु एकत्रकुटुंबसंस्थेचीं लक्षणें निश्चितपणें आढळून येतात. गाथासप्तशतींतील कुटुंबावर गृहपतीची सत्ता आहे. पतीच्या मागून कुटुम्बाचा चरितार्थ चालविण्याची जबाबदारी कुटुंबांतील कर्ता पुरुष या नात्यानें आतां पुत्रावर आहे अशी त्याच्या मातेची अपेक्षा [क्र. ६३०, ९४५] आहे. ग्रामणीचीं कामें त्याच्या अनुपस्थितींत व त्याच्यानंतर त्याचा पुत्र [क्र. ३१, ६२८] चालवतो. भावांभावांमध्यें भांडणें झाल्यास त्यांचें पर्यवसान कुटुम्बविघटनांत होईल अशी जाणीव क्र. ५९ या गाथेच्या नायिकेला आहे. कुटुम्बें मोडतात तीं स्त्रियांच्या कागाळयांमुळें, याचीही गाथाकारांना जाणीव आहे. क्र. ११३ या गाथेंत पित्याच्या कर्जाचा वारसा पुत्राकडे आलेला आहे. अर्थात् हें कुटुंब पितृप्रधान असलेंच पाहिजे. हिंदु एकत्र कुटुंबाचीं हीं वैशिष्ट्यें लोकगीतांत समाविष्ट झालेलीं आहेत, यावरून तीं तत्कालीन समाजाच्या अंतर्मनांत अनुस्यूत झालेलीं होतीं, याचा प्रत्यय येतो.

गाथासप्तशतींतल्या अनेक तरुणी स्वैरिणी असल्या तरी त्यांच्या उल्लेखांच्या संख्येवरून तत्कालीन कुटुंबसंस्था व्यभिचारानें बरबटलेली होती, अगर समाजाला शुचिर्भूत व सुखी संसाराची जाणीव नव्हती असा निष्कर्ष काढतां येणार नाहीं. सामान्यतः गाणीं होतात तीं असामान्यांचींच होतात आणि जीं गाणीं रंगतात व रुचतात तीं प्रेमाचींच असतात. त्यांतलें प्रेम वैवाहिक आहे कीं विवाहबाह्य आहे याचा विचारही रसिकांच्या मनांत साधारणतः येत नाहीं. म्हणून अशी उल्लेखांवरून, विशेषतः जानपद व स्फुट गीतांतील रंगी-

बेरंगी वचनांवरून समाजस्थितीबद्दल सामान्य विधानें करणें साहसाचें ठरण्याचा संभव आहे. गाथांत वर्णिलेली गृहिणीची दिनचर्या, पतिपत्नींची परस्परांवरील प्रीति, कौटुम्बिक जीवन आणि वात्सल्य यांचे उल्लेख विचारांत घेतले असतां खात्री पटते कीं तत्कालीन कुटुंबसंस्था जिवट व शुचिर्भूत होती. या कुटुंबांतील स्त्रियांचें स्थान भोगदासींचें नव्हतें. ज्या कुटुंबांतील स्त्रियांना मोलकरिणीसारखें किंवा भोगदासांसारखें वागविण्यांत येतें तेथें गाथाकवींनीं वंदनपूर्वक वर्णिलेलें कौटुम्बिक सौख्य अशक्य आहे. त्यांनीं वर्णिलं आहे तशी परिस्थिति असेल तें कुटुम्ब आज व उद्यांही सुखीच गणलें जाईल.

आर्यांच्या वसाहतींचें क्षेत्र विस्तृत होऊं लागलें तसतशा आपल्या अल्पसंख्याकत्वाच्या अडचणी त्यांना अधिकाधिक जाणवूं लागल्या. वसाहतींच्या प्रदेशांत ते अल्पसंख्य असले तरी ते संघटित व सुसंस्कृत आणि शस्त्रास्त्रांनीं सज्ज होते; म्हणूनच प्रथम बहुसंख्य आदिवासींचा विरोध मोडून किंवा शमवून आणि नंतर त्यांना समाजव्यवस्थेंत समाविष्ट करून घेऊन ते वसाहती प्रस्थापित व प्रसृत करूं शकले. जेते हे नेहमींच अल्पसंख्य असतात. त्यांच्या आक्रमक व भ्रमणशील जुटींत पुरुषांपेक्षां स्त्रिया कमी असतात. यामुळें स्थायिक झाल्यानंतर अन्य वर्गांतील स्त्रियांशीं विवाहबद्ध होणें किंवा विवाहबाह्य संबंध ठेवणें त्यांना भाग झालें. वर्णसंकरामुळें आर्यांचें अस्तित्व व व्यक्तिमत्व अजिबात नष्ट होऊं नये म्हणून त्यांनीं अशी प्रथा प्रस्थापित केली असावी कीं ज्येष्ठानें आर्येशीं विवाह करावा आणि कनिष्ठांनीं अनार्येशीं. नम्बुद्रि ब्राह्मणांत ही प्रथा अद्यापि अस्तित्वांत आहे. आर्यांची प्रतिष्ठा कायम रहावी म्हणून प्राचीन आर्यांनीं कुटुंबांतील विधवांना देवरांबरोबर लैङ्गिक संबंध ठेवण्याची मुभा दिली असावी. देवराला विधवा रात्रीं आपल्या शयनावर बोलावते असा उल्लेख ऋग्वेदांत (१०·४०·२) आहे. त्याचप्रमाणें दिरानें भावजयीला सती जाण्यापासून परावृत्त करावें व पुनर्विवाहाचें आश्वासन द्यावें असे उल्लेख ऋग्वेदांत (१०·१८·८) व अथर्ववेदांत (१८·३·२) आढळतात.

सजातीय स्त्रियांच्या तुटवड्यामुळें बहुभर्तृकता (polyandry : एका स्त्रीवर अनेक पुरुषांना वैवाहिक हक्क असणें) ही पद्धत अस्तित्वांत आली असावी. एका स्त्रीचा अनेक भावांशीं विवाह होणें ही भ्रातीय बहुभर्तृकता. द्रौपदीचा

पांच पाण्डवांशीं विवाह हें भ्रात्रीय बहुभर्तृकतेचें ठळक उदाहरण आहे. मातेच्या आज्ञेची सबब निर्माण करून उत्तरकालीन इतिहासकारांनीं या बहुभर्तृकतेला मुरड घातली आहे. महाभारतांत वारंवार उल्लेखिलेली नियोगाची प्रथा ही आर्यांच्या प्रतिष्ठेच्या अहंकारावर व भ्रात्रीय बहुभर्तृकतेच्या रिवाजावर आधारलेली असावी. वधूचा विवाह विशिष्ट वराशीं होतो, हें खरें; त्याचप्रमाणें ती वराच्या कुळांत दिली जाते (गौतम-धर्म सूत्र : २·१०·२७) हेंही तितकेंच खरें. कुटुंबाची मालमत्ता कुटुंबाबाहेर जाऊं द्यावयाची नाहीं, त्याचप्रमाणें कुटुंबांतील विवाहित स्त्री परक्या घरीं जाऊं द्यावयाची नाहीं, अशी कुटुंबप्रमुखाची भावना असे. प्रजोत्पादनाविषयीं पति असमर्थ असला किंवा पुत्रप्राप्तीपूर्वी मृत झाला तर त्याच्या पत्नीनें किंवा विधवेनें नियोगाच्या मार्गानें संतति निर्माण करावी, जास्तींत जास्त तीन पुत्र प्राप्त होईपर्यंत नियोगाचा अवलंब करावा आणि नियोग करावयाचा तो पतीच्या बंधूंकडून किंवा पतीच्या कुटुंबांतील इतर नातेवाईकांकडून करवावा, असे नियोगाचे नियम महाभारतकालांत अस्तित्वांत होते; "नारी तु पत्यभावे वै देवरं वृणुते पतिम्" (महाभारत : १३·१२·१०). महाभारतांतील अनेक योद्धे नियोगपद्धतीनें जन्मलेले आहेत. नियोग पद्धतीचा एक परिणाम असा झाला कीं दीर आपल्या भावजयींकडे आणि भावजया दिरांकडे संभाव्य संभोगदृष्टीनें पाहूं लागल्या आणि या वृत्तीचीं आगाऊ प्रात्यक्षिकें कौटुम्बिक व्यभिचारांत दिसूं लागलीं. हे दुष्परिणाम स्पष्ट दिसूं लागले तेव्हां समाजसुधारक या प्रथेचा विरोध करूं लागले. आपस्तंब व बौधायन यांनीं या बाबतींत पुढाकार घेतला. मनूनें या आचाराला पशुधर्म (९·६६) म्हटलें. ख्रि. पू. चवथ्या शतकापासून ख्रिस्तोत्तर दुसऱ्या शतकापर्यंत नियोग पद्धतीच्या पुरस्कर्त्यांनीं सुधारक स्मृतिकारांच्या निषेधाला दाद दिली नाहीं. पुढें ही पद्धत मागें पडूं लागली आणि सहाव्या शतकाच्या सुमारास (The Position of Woman in: Hindu: Civilization: Dr. Altekar: p. 173) ती लुप्तप्राय झाली.

नियोगाचा रिवाज मोडला व त्याची जागा 'दियेरवटूं'नें घेतली. डॉ. इरावती कर्वे (मराठी लोकांची संस्कृति : पृ. १६५) सांगतात. जेठाणी ही ज्येष्ठ भ्रात्याची पत्नी; ती विधवा झाली कीं तिचा पुनर्विवाह धाकट्या दिरा-

शींच व्हावयाचा; गुजरातेंत प्रचलित असलेल्या या प्रथेचें नांव दियेरवटूं. महाराष्ट्रांतील अनेक वन्य व नागरी जमातींत ही प्रथा चालू आहे. त्यांचें कोष्टक मीं 'सह्याद्रीं'त (पृ. ४६९) दिलें आहे. दीर्घकालीन परंपरा व आनुवंशिक संस्कार यांमुळें देवरानुरक्तीची भावना जणूं समाजाच्या रक्तांत उतरली आहे असें वाटतें. दीरभावजयामधील प्रेमसंबंध फार प्राचीन काळापासून देशोदेशीं विख्यात आहेत. बंगाल्यांत त्यांचेमध्यें चालणारे हास्यविनोद, नर्मशृंगार व प्रेमविभ्रम हे प्रेक्षकाच्या. वाचकाच्या किंवा श्रोत्याच्या चित्तवृत्ति प्रक्षुब्ध करतील इतके उत्तेजक असल्याचें एका बंगाली लेखकानेंच (Racial History of India : Chandra Chakraverty : p.350) नमूद केलेलें आहे. मराठी समाजांत व जानपद वाङ्मयांत जवळ जवळ अशीच परिस्थिति आहे; वास्तव जीवनाला पराङ्मुख असलेल्या आधुनिक वाङ्मयांत तें तसें आहे म्हणून या प्रथेचे पडसाद उमटलेले आढळत नाहींत. मराठी लावण्यांतील 'भाऊजी' हा शब्द स्त्रीच्या तोंडीं असतो तेव्हां तो नवऱ्याच्या धाकट्या भावाला, बहिणीच्या नवऱ्याला अगर आतेमामे भावंडांना अनुलक्षून भावी वर किंवा भूतपूर्व प्रियकर या नात्यानें किंवा संबंधानें योजलेला असतो. त्याचप्रमाणें वहिनी हा पुरुषानें वापरलेला शब्द भावाची बायको, बायकोच्या भावाची बायको आणि आते-मामे बहिणी यांना अनुलक्षून आपल्या व त्यांच्या प्रेमसंबंधाच्या अनुरोधानें योजलेला असतो. पुरुषाला मेहुणी म्हणजे (देशीनाममाला : ६·१४८) बायकोची बहीण, बायकोच्या भावाची बायको किंवा मामाची मुलगी आणि स्त्रीला मेहुणा म्हणजे मामाचा किंवा आतोबाचा मुलगा अगर नवऱ्याच्या बहिणीचा नवरा. मेहुण हा शब्द मैथुन यापासूनच सिद्ध झालेला आहे. मेहुणा व मेहुणी यांचा प्रेमसंबंध हा भागिनेय बहुभर्तृकतेचा अवशेष आहे. एका कुटुंबांतील एकाचा दुसऱ्या कुटुंबांतील एकीशीं विवाह झाल्यामुळें तिच्या बहिणींवरही त्याला वैवाहिक हक्क प्राप्त होणें ही भागिनेय-बहुभर्तृकता; कधीं त्याचे भाऊ व तिच्या बहिणी यांनाही एकमेकांवर वैवाहिक हक्क प्राप्त होत. दक्षिणेंतील रेड्डी जमातींत नवऱ्याच्या सर्व नातेवाइकांना, विशेषतः त्याच्या सर्व प्रकारच्या बंधूंना वधूवर वैवाहिक हक्क मिळत असत. दक्षिणेंतील मुंडा या जमातींत एका कुटुंबातील सर्व बंधूंचे विवाह दुसऱ्या कुटुंबांतील सर्व

भगिनींबरोबर होत असत; विशेषतः वडील भावाची पत्नी त्याच्या धाकट्या भावांना उपलभ्य असे आणि वधूच्या कनिष्ठ भगिनी मेहुण्यांना. वराची मिरवणूक मांडवासमोर येईल त्या वेळीं त्याचा भाऊ वधूबरोबर खोलींत कोंडलेला असला पाहिजे व त्यानेंच तिला विवाहमण्डपांत आणली पाहिजे असा रिवाज खोंड जमातींत आहे. पश्चिम सातपुड्यांतील कोर्कु या जमातींत रिवाज आहे कीं लग्नापूर्वी दीरानें वधूला एकांतीं सात वेळां आलिंगिलें पाहिजे. लग्नापूर्वी दिरानें एकांतांत वधूशीं अश्लील गोष्टी केल्या पाहिजेत असा रिवाज शबर या वन्य जमातींत प्रचलित आहे. या व अशा अनेक वन्य परंपरांचे संस्कार मराठी मनावर झालेले आहेत. प्राचीन गाथासप्तशतींतील आणि अर्वाचीन लावण्यांतील दीरभावजय आणि मेहुणामेहुणी यांच्या प्रेमाचीं गाणीं या संस्कारांना व वृत्तीला आणि अनुनयप्रथेला साक्षी आहेत.

सामान्यतः आपले विवाह हे मातापित्यांनीं घडवून आणलेले असतात. कोठला वर व कोठली वधू ? परस्परांचाही विवाहपूर्व परिचय नाहीं, मग माहेर-सासरच्या मंडळींची ओळखदेख कशी असणार ? यामुळें नव्या नवरीला सासरच्या अपरिचित वातावरणांत आरंभीं कोंदटल्यासारखें वाटतें. सासूसासरा, गुरुजन, थोरले व धाकटे दीर आणि जावानणंदा वगैरे मानाच्या नातेवाइकांबरोबर नववधूनें किती आदबीनें वागलें पाहिजे याबाबत प्रत्येक कुटुंबांत प्रचलित असलेल्या अनेक अलिखित निर्बंधाच्या काटेकोर अंमलबजावणीमुळें तिला बुजल्यासारखें वाटणें अपरिहार्य आहे. दिवसांउजेडीं नवऱ्याबरोबर उघडपणें बोलण्याची तिला मनाई असे, एवढेंच नव्हे, त्याच्याकडे मान वर करून पाहण्याचीही तिला चोरी असे. अशा परिस्थितींत नव्या नवरीशीं कोण हंसणार, खेळणार ? एखादी चुणचुणीत छोटी नणंद ! त्या तर अव्वल चहाडखोर ! अजून अल्लड असलेले धाकटे भाऊजी ! होय. शेण्डेफळ म्हणून ते तर सर्वांचे लाडके. या भाऊजींचे आणखी लाड तीच करणार, त्यांचे हट्ट हीच पुरविणार; त्यांना कुरवाळणार व विश्वासांत घेणार. त्यांची मर्जी सांभाळणें हिला भाग, कारण त्यांच्या भलावणीमुळेंच हिला सासरच्या मंडळींची सहानुभूति संपादन करतां येणार. समवयस्क असल्यामुळें दीरभावजयांना हंसतां हुंदडतांना एकमेकांच्या आंगचटीस जाण्यास सबबी व सवड मिळणार;

यामुळें स्नेहाचें पर्यवसान सलगींत आणि वात्सल्याचें पर्यवसान व्याभिचारांत होत असावें असें वाटतें.

अत्ता या शब्दाला छायेंत जवळ जवळ सर्वत्र श्वश्रू हा प्रतिशब्द दिलेला आहे. अत्ता हें संबोधन सामान्यत: सांकेतिक अर्थानें वापरलेलें असलें तरी हा उद्गार सर्वस्वीं निरर्थक आहे असें मानतां येणार नाहीं. मला वाटतें, यावरून महाराष्ट्रांत प्रचलित असलेल्या मातुलकन्यापरिणयप्रथेचा सुगावा लागतो.

महाराष्ट्रीय ब्राह्मणांमध्यें सातपुड्याच्या परिसरांत शुक्ल यजुर्वेदी माध्यंदिन बहुसंख्य आहेत आणि सह्याद्रीच्या परिसरांत ऋग्वेदी देशस्थ. आत्या, मामा व मावशी यांच्या अपत्यांचे विवाह माध्यंदिनांत होत नाहींत. ऋग्वेदी देशस्थांत मामाच्या मुलीशीं लग्न होतें, इतकेंच नव्हे, दक्षिण महाराष्ट्रांत व कर्नाटकांत आतेच्या व बहिणीच्या मुलीशींही लग्न करण्याचा रिवाज आहे. मातृप्रधान कुटुंबपद्धतीचा हा अवशेष असणें शक्य आहे. महाराष्ट्रांतील बहुसंख्य जमातींत मामाच्या मुलीशीं लग्न करण्याचा प्रघात जवळ जवळ सार्वत्रिक आहे. वालखिल्य सूत्रांत व बौधायन स्मृतीत मातुलकन्या विवाहाचे उल्लेख आहेत. दाक्षिणापथांत ही प्रथा सार्वत्रिक असल्याचा उल्लेख दसवेयालियचूर्णीत (१·१७) आहे. महाराष्ट्रांतल्या ज्या जमातींवर यजुर्वेद्यांची छाप आहे तेथें आतेबहीण व मामेबहीण यांच्याशीं विवाह होत नाहींत, जेथे मराठी ऋग्वेदी देशस्थांचें वर्चस्व आहे तेथें मामे बहिणीशीं विवाह होतात आणि कर्नाटकी ऋग्वेदी देशस्थांचा प्रभाव आहे त्यांमध्यें आतेबहिणीशींही. कारण बहुजन समाजाचा धर्म हा बव्हंशीं पुरोहितानुसारी असतो.

पितृप्रधान व मातृप्रधान कुटुंबपद्धतींच्या समन्वयाचें मातुलकन्यापरिणय हें प्रतीक आहे. या प्रथांकित विवाहांमध्यें सासू ही बापाची बहीण असल्यामुळें सून सासूला अत्ता म्हणते. या उल्लेखांवरून दिसतें कीं गाथासप्तशतीच्या काळांत सातपुड्याच्या परिसरांतही महाराष्ट्राच्या कुटुंबसंस्थेवर यजुर्वेदी माध्यंदिनांची छाप पडलेली नव्हती.

निष्कर्ष:

गाथासप्तशतीतील गृहपति हा मराठी बहुजनसमाजांतील जातकुळीच्या श्रेणींतील श्रेष्ठ कनिष्ठ भावाचा आद्य प्रणेता असावा. ह्या गृहपतीच्या लक्षणां-

वरून तो अर्थशास्त्राच्या अगोदरचा असावा असें दिसतें. अर्थशास्त्राची अलीकडची कालमर्यादा खिस्तोत्तर ३०० च्या सुमाराची आहे असें अनेक प्रमाणांवरून डॉ कीथ सांगतात (Classical Sanskrit Literature: p. 105). अर्थात् गाथासप्तशती हा ग्रंथ त्या पूर्वीचा असला पाहिजे असें या प्रमाणावरून ठरतें.

गाथासप्तशतींतील एकत्र कुटुंबाचा विस्तार मर्यादित आहे. सुपीक व मैदानी भागांतील शेतें विस्तीर्ण असतात; मोठ्या प्रमाणावरला व्यापार व भांडवली उद्योगधंदे शहरांत चालतात. मोठी शेती, मोठा व्यापार व मोठे धंदे चालतात तेथील एकत्र कुटुंबांचा विस्तारही मोठा असतो. अशी परिस्थिति महाराष्ट्रात त्या काळांत नव्हती किंवा ज्या भागांत नव्हती तेथें गाथासप्तशतीची निर्मिति झाली असली पाहिजे.

गाथासप्तशतींतली वधू विवाहाच्या वेळीं जाणती झालेली आहे. गौतम (१८·२०) सांगतो कीं ऋतुप्राप्तीनंतर तीन महिन्यांचे आंत कुमारीचा विवाह केलाच पाहिजे. बौधायन (४·१·१४) व वसिष्ठ (१७·५९) हे ही मर्यादा आणखी तीन वर्षांपर्यंत वाढवतात. कन्येचा विवाह ऋतुप्राप्तीनंतर फार दिवस लांबणीवर टाकूं नये असा धर्मसूत्रकारांचा आग्रह आहे. मला वाटतें परकीयांच्या आक्रमणामुळें ही मर्यादा हळू हळू कमी कमी होऊं लागली असावी. खि. पू. पहिल्या शतकांत भारतावर शकांचीं आक्रमणें सुरू झालीं. हेरोडोटस् सांगतो (४·१०४), शक जमातींतल्या सर्व स्त्रिया सर्व पुरुषांना उपलभ्य असत. त्यांनीं भारतांतही याच आचाराचा अवलंब केल्यामुळें त्यांचा ज्या ज्या प्रांतांत प्रवेश झाला त्या त्या भागांत कन्यांची लग्नाची वयोमर्यादा कमी कमी होऊं लागली. इ. स. १०० च्या सुमारास कुमारिकांचे विवाह ऋतुप्राप्तीपूर्वी करण्याची प्रथा भारतांत रूढ होऊं लागली (डॉ. अळतेकरः पूर्वोक्तः पृ. ६६) आणि इ. स. २०० च्या सुमारास बालविवाह सर्वत्र प्रचारांत आले (पूर्वोक्त पृ. ८२). अर्थात् गाथासप्तशतींत नमूद झालेली परिस्थिति यापूर्वीची आहे.

१३ गाथासप्तशतींतील धार्मिक जीवनः

हा विषय अनेक दृष्टींनीं महत्त्वाचा आहे. एतद्विषयक उल्लेखांवरून आपणांस हिंदू देवदेवतागणाच्या उत्क्रान्तीविषयीं आणि गाथासप्तशतीच्या काळाविषयीं

काही अनुमानें काढतां येतील, तत्कालीन धार्मिक आचार व प्रचलित समजुती समजतील. सामाजिक व वैवाहिक जीवनाशीं संबद्ध असलेले आचार व उत्सव यांचा येथें ओझरताही उल्लेख केलेला नाहीं, त्यांची चर्चा प्रस्तावनेच्या त्या त्या विभागांत करीत आहे. प्रथम गाथाकवींनीं उल्लिखिलेल्या देवदेवतांची संकलित माहिती अकारविल्हेनें देतों आणि अखेरीस तत्कालीन धार्मिक जीवनाची चर्चा.

(१) देवः

अग्गिः अग्गीः अग्नि (क. १६३, ३२१); **अमित्तदहणः** अमित्रदहन (क. ७२१); **वडवग्गी** : वडवाग्नि (क. ४०३); **सिहीः** शिखिन् (क. १४); **हुअवहः** हुतवह (क. २११ २२७).

अग्नि हा आद्य वैदिक देव आहे. ऋग्वेदाचा आरंभच अग्निसूक्तानें झालेला आहे; कारण आद्य वैदिक संस्कृति ही प्राधान्येंकरून यज्ञसंस्कृति आहे. अग्नि हा देवांनीं सामान्य मानवांसाठीं (ऋः १.३६.१०) म्हणून निर्मिलेला असला व त्याला त्यांनीं मानवाचें चक्रवर्तित्व (ऋः ६.७.१) दिलेलें असलें तरी तो विशेषतः आर्यांचा पुरस्कर्ता आहे, तो आर्यांचा मार्गदर्शक (ऋ. १.५९.२) आहे व त्यांच्या उत्कर्षाचें प्रतीक (ऋ. ८.९२.१) आहे. तरीही आर्यांच्या वसाहतीचें क्षेत्र विस्तृत होत गेलें तसतसें अग्नीचें महत्त्व कमी कमी होत गेलें आणि इन्द्राचें महात्म्य वृद्धिंगत होऊं लागलें. अग्नि हा गृहस्थांचा व वसाहतींचल देव आणि इंद्र हा योद्धयांचा व आक्रमकांचा देव, हें याचें कारण असावें असें वाटतें. खुद्द ऋग्वेदाच्या उत्तर भागांत अग्नीचें माहात्म्य ओसरलेलें दिसतें. इतर देवदेवतांहून मानवी जीवनाशीं अग्नीचा संबंध विशेष निकटचा. मनुष्यानें अग्नीला माणसाळवलें आणि अग्नीनें माणसाला. त्याने कुटुंबसंस्था स्थिर केली, म्हणून अग्नि हा आद्य गृहपति (ऋ. १.६०.४) व मानवाचा मित्र (ऋ. १. १४३.४) म्हणून क १६३ या गाथेंत अग्नीला वल्लभ म्हटलेलें आहे. अग्नि हा भक्तांचा रक्षणकर्ता (ऋ. ६.८.७) व अमित्रांचा संहारकर्ता (ऋ. ६-८-५). क. ७२१ या गाथेंत अग्नीला अमित्रदहन म्हटलेलें आहे. देवांसाठीं यज्ञांतील हवींचें हा ग्रहण करतो (१.१४०.२), म्हणून त्याला हुतवह म्हणतात.

अग्नीचें हें अभिधान क्र. २११ या गाथेंत आलेलें आहे. हा मृत देहांचें दहन करतो (१०.१६.१-१४), म्हणून त्याला यमराजाचा मित्र म्हणतात. क्र.३२१ या गाथेंत अग्नीच्या या कार्याचा उल्लेख आलेला आहे. अग्नि हा ब्रह्मदेवाचा मानसपुत्र आणि समुद्रांतला अग्नि वडवाग्नि हा बृहस्पतीचा पुत्र. वडवाग्नि समुद्रांत राहून त्याचें जल शोषून घेतो. जलांत प्रज्वलित होणाऱ्या अग्नीचे उल्लेख वेदांत (ऋ. १०.४५.१; अथर्व: १३.१.५०) अनेक आलेले आहेत. अग्नीला वार्धक्य कधींही प्राप्त होत नाहीं. (१.५८.२): तो वयस्क, मन्दप्रकाश झाला असें दिसतें न दिसतें तोंच तो फिरून तरुण तेजःपुञ्ज (२.४.५) होतो. अग्नीची कांति उज्वल आणि आसक्ति अनिवार; सदैव अतृप्त, जों जों भक्ष्य द्यावें तों तों तो अधिकाधिक प्रज्वलित होतो; म्हणून कामविकाराला कामाग्नि (क्र. ७९३) म्हटलेलें आहे आणि अग्नीला पारदारिक कल्पिलेलें आहे. ऋग्वेदांत वधूचें चतुष्पतिकत्व (१०.८५.४०-४१) सांगितलेलें आहे: प्रथम सोम, नंतर गंधर्व, पुढें अग्नि आणि अखेरीस मानव; पैकी सोम व गंधर्व यांच्या पाळ्या शैशवांत येत असल्यामुळें अग्नि हाच कुमारिकांचा पहिला भोक्ता. वैवाहिक विधींमध्यें वधू अग्नीभोंवतीं प्रदक्षिणा घालते, त्यावरून ही कल्पना निघालेली असावी (ज्ञानकोश: प्रस्तावनाखण्ड: २: वेदविद्या. पृ. ३५). अग्नीच्या कल्पित पारदारिकत्वाचा पुराणांनीं परिपोष केलेला आहे. एकदां यज्ञप्रसंगीं सप्तर्षींच्या स्त्रिया दृष्टीस पडतांच हा मोहित झाला. त्या याच्या वाऱ्यालाही उभ्या राहीनात. म्हणून हा निराश होऊन देहत्याग करण्यासाठीं अरण्यांत गेला. दक्षकन्या स्वाहा हिची त्याजवर प्रीति होती ती त्याच्या मागोमाग वनांत गेली आणि सप्तर्षींच्या स्त्रियांचीं रूपें क्रमाक्रमानें धारण करून तिनें अग्नीला संतुष्ट केलें. अग्नीला आहुती देतांना 'स्वाहा' अशी घोषणा करावी लागते, ती हिच्याच साठीं. मात्र वसिष्ठपत्नी अरुंधतीचें रूप तिला धारण करतां आलें नाहीं, कारण ती तपस्विनी व महापतिव्रता होती. मार्कण्डेय पुराणांत सांगितलें आहे कीं माहिष्मती नगरीचा राजा नीलध्वज याची कन्या स्वाहा, ही यज्ञप्रसंगीं अग्नि फुलविण्याला मंडपांत येत असे; तिजवर अग्नि आसक्त झाला, इतका कीं इतरांना पंखे वारूनही तो प्रज्वलित करतां येईनासा झाला, तिच्या लालबुंद ओठांतून निघणाऱ्या सुगंधित

निःश्वासाशिवाय तो फुलेनासा झाला; म्हणून आपली कन्या त्याला अर्पण करणें राजाला भाग झालें; याचा मोबदला म्हणून अग्नीनें राजाला अजिंक्य केलें आणि नागरिकांना लैङ्गिक स्वातंत्र्य दिलें (Sexual Life in Ancient India: Dr. Myer: p. 118) क्र. १४ या गाथेंत अग्नीच्या पारदारिकत्वाचा उल्लेख आलेला आहे; सप्तर्षींच्या स्त्रिया व नीलध्वजाची कन्या यांभोंवतीं तो असाच घोंगावलेला आहे.

क्र. २११ या गाथेंत हुतवह व वरुण यांचा उल्लेख जोडीनें आलेला आहे. वरुणाचा हा उल्लेख सांकेतिक आहे. वरुण हा सुवर्णाशीं संबद्ध असावा असें दिसतें. हा सुवर्णाच्या निवासस्थानांत राहतो (१.१३६.२) व सुवर्णाची वस्त्रे परिधान करून (१.२५.१३) सुवर्णाच्या सिंहासनावर (५.६७.२) आरोहण करतो. वरुण हा जलांचा स्वामी (२.२८.४). त्याचा भाऊ अग्नि (४.१.२) हा पारदारिक व तरुणींचा स्वामी. म्हणून त्या उभयतांच्या कृपेनें सोन्याच्या कडदोऱ्याला नायिकेच्या जघनांवर आरोहण करण्याचें भाग्य लाधलेलें आहे. अग्नि व वरुण यांविषयींचे हे वैदिक संकेत गाथाकवींना माहीत आहेत. गाथा-सप्तशतींत त्यांची कोठें पूजा झालेली नाहीं.

जैनांनीं दिक्पाल म्हणून ब्राह्मणी अग्नि स्वीकारलेला (Jain Iconography : Bhattacharya. p. 149). आहे. बौद्धांची उठावणी प्राधान्यें-करून वैदिकांच्या यज्ञसंस्कृतीविरुद्ध असल्यामुळें त्यांनीं बहुजनसमाजासाठीं निर्मिलेल्या जातकादि ग्रंथांत अग्नीची भरपूर मस्करी केलेली आहे. एक जातक-कथा सांगते : एकदां एका ब्राह्मणानें अग्नींत तूप ओतलें, यामुळें आग भडकली व बिचाऱ्याची झोंपडी जळून गेली; आणि विचारते, अशा या अग्नीच्या आराधनेनें स्वर्गप्राप्ति कशी होणार ? जो स्वतः पापी आहे व जो घरोघर पाकसिद्धि करतो त्याला देव म्हणून कसें भजावयाचें ? (Pre-Buddhist India—Ratilal Mehta : p. 182) बौद्धांच्या अशा प्रचारामुळें निर्माण झालेली अग्नीच्या विषयींची उपहासवृत्ति क्र. २११ या गाथेंत प्रगट झालेली आहे. वर नमूद केलेल्या जातककथेला अनुलक्षून उत्तरादाखल क्र. १५३ ही गाथा रचलेली असावी; कारण तेथें ग्रामदाहक अग्नीलाही वल्लभ म्हटलेलें आहे. वैदिक दैवतांमध्यें वरुणाचें स्थान अग्नि व इन्द्र यांच्या तोडीचें आहे. बौद्धांनींहि

वरुणाला उचलून धरलें आहे; पण जातकांत त्याचा दर्जा (जातक : भाग ४ : पृ. ८) वृक्षदेवतेएवढाच राहिलेला आहे. वरुण हा समुद्राधिपति असल्यामुळें त्याला नौकानयनाचे मार्ग अवगत (१.२५.७) आहेत. नौकानयनावर अवलंबून असलेल्या परदेशी व्यापाराची बुद्धयुगांत भरभराट होती. असें असूनही या कालांत वरुणाला स्थानभ्रष्ट व्हावें लागावें याचे आश्चर्य वाटतें.

इन्द : सुरनाह = सुरनाथ = इन्द्र : क्र. ८५८; (इंद्रधनुष्य : क्र. ५८४, ७०७, ८०२; इंद्रनील : क्र ३०२)

अंतरिक्षांतील वैदिक दैवतांमध्यें इन्द्राला अग्रस्थान आहे. ऋग्वेदांत इंद्राला अडीचशें सूक्तें दिलेलीं आहेत. हा अग्नीचा जुळा भाऊ (६.५९.२) आणि विजिगीषु आर्यांचा युद्धाचा देव; असुरांचा (६.२२.४), दस्यूंचा (८.२०.१७) व त्यांच्या दुर्गांचा विध्वंसक (१.१३०.७; ४.२६.३). वज्र हें त्याचें विशिष्ट आयुध (१.१००.२२); क्र. ५४ व ९२९ या गाथांतील वज्ज = वज्र हा शब्द विजेला अनुलक्षून योजलेला आहे त्याचा इंद्राच्या वज्राशीं कांहीं संबंध नाहीं. तथापि तो धनुष्य बाणांचाहि उपयोग (१.१६९.३; ८ ५४.४; ८.६६.६; १०.१०३.२ ३) करतो इन्द्र हा आकाशाचा देव सबब त्याचा वर्ण निळा; म्हणून नील मण्याला इन्द्राचें उपपद लाभलें व देवांचा राजा, म्हणून त्याला सुरनाथ म्हटलेलें आहे. इन्द्र हा वादळांचा व पर्जन्याचा (८.१२.६) देव. वर्षाकालांत वादळानंतर पाऊस पडतो आणि आकाशांत सप्तरंगी धनुष्य प्रकट होतें; म्हणून त्याला इंद्राचें उपपद लाधले. क्र. ५८४ या गाथेंत इंद्रानें आपल्या धनुष्यानें मेघरूपी महिषाच्या उदराचा भेद केलेला आहे. ही कल्पना पूर्णतया वैदिक आहे.

यज्ञसंस्थेच्या उत्कर्षापकर्षाच्या अनुरोधानें वेगवेगळ्या कालखण्डांत वैदिक दैवतांचें माहात्म्य कमीअधिक झालेलें दिसतें. आरंभीं, केवळ धार्मिक व पारमार्थिक हेतूंनीं प्रेरित अशा यज्ञांमध्यें अग्नि व प्रजापति यांना विशेष महत्त्व होतें; आणि उत्तर कालांत, प्रसरण व संघटना या उद्दिष्टांनीं प्रेरित अशा यज्ञांमध्यें इन्द्र व वरुण यांना ऋग्वेदाच्या दहाव्या मण्डलाच्या एकशें चोवीसाव्या सूक्तांत या क्रांतीचा उल्लेख आलेला आहे. या सूक्तांत आरंभीं अग्नीला यज्ञाला येण्याचें आवाहन आहे. या वेळीं तो भीतिग्रस्त होऊन गुहेंत लपला होता. अग्नि सांगतो, " मी

यज्ञांत पुष्कळ वर्षे राहिलों आहे; राष्ट्र बदलतें हें मला आतां पटलें आहे; अग्नि, सोम, वरुण हे सुद्धां अंतःकरणांतून ढळतात, म्हणून मी इन्द्राचा स्वीकार करतों." आर्यांनीं मिळविलेल्या विजयाचा आनंद व्यक्त करण्यासाठीं किंवा आर्यांच्या वसाहतींची प्रस्थापना जाहीर करण्यासाठीं यज्ञसमारंभ साजरे करण्यांत येत असत. आर्यांच्या वसाहती चोहींकडे झाल्यानंतर यज्ञांचें प्रयोजनच नाहींसें झालें. पुढें बुद्धयुगांत ब्राह्मण व क्षत्रिय यांच्या पीछेहाटीमुळें यज्ञसंस्था आणखी मागसली आणि यज्ञदेवतें अनाथ झालीं. पैकीं इन्द्राला जैनांनीं व बौद्धांनीं दत्तक घेतलें, त्याच्या गंधर्व अप्सरांसह. जैनांच्या दैवतायतनांत व शिल्पांत इन्द्र व इन्द्राणी यांना महत्त्वाचें स्थान आहे. बौद्धांच्या स्वर्गांतील देवांचा सक्क-शक्र-इन्द्र हा अग्रणी आहे; या स्वर्गांत संपन्न प्रासाद आहेत, रम्य उपवनें व त्यांत स्वच्छन्दानें क्रीडा करणाऱ्या सुंदर अप्सरा आहेत, इतकेंच नव्हे, पौराणिकांच्या इन्द्राप्रमाणें बौद्धांचा इन्द्रही श्रमण ब्राह्मणांच्या तपश्चर्येनें स्थानभ्रष्ट होऊं शकतो! अशोकानंतर राजाश्रयाच्या अभावीं बौद्धांची भरभराट कांहीं काळपर्यंत ओसरली आणि पतंजलीच्या नेतृत्वाखालीं शुंगसातवाहनांनीं यज्ञसंस्थेचें पुनरुज्जीवन केलें. नाणेघाटांतील सातवाहनांच्या देवकुलांतील शिलालेखांत (ल्युडर्स : क्र. ११९२) प्रजापति, इन्द्र, वरुण इत्यादि वैदिक दैवतांना अभिवादन केलेलें आहे. त्याचप्रमाणें सातवाहन कालांत इंद्रध्वज-महोत्सवही होत असत. असें असलें तरी या दैवताचें माहात्म्य एकदां जें ओसरलें तें हळूं हळूं अजिबात नष्ट झालें.

ऋग्वेदांतील सर्व दैवतांमध्यें इन्द्रालाच स्पष्ट, साकार स्वरूप प्राप्त झालेलें आहे. त्याचें शरीर व आयुधें, सवयी व व्यसनें, दिनचर्या व पराक्रम यांचीं तपशीलावर वर्णनें ऋग्वेदांत आढळतात; एवढेंच नव्हे, इन्द्राच्या मूर्तीचे ही उल्लेख आढळतात. पहाः "हा माझ्या इन्द्राला दहा गाई देऊन कोणी विकत घेईल? हे विकत घेणारांना, जेव्हां तो तुमचे शत्रु ठार कराल तेव्हां हा तुम्ही मला परत द्या" (४.२४.१०) "हे वज्रयुक्त इन्द्रा, कितीही मोठी किंमत मिळाली तरी मी तुला कोणालाही देणार नाहीं; हजाराला नाहीं, दहा हजाराला नाही, अपरिमित संपत्ति दिली तरी मी तुला कोणालाही देणार नाहीं". (८.१.५). मोहिमेवर निघालेल्या हिंदी सैन्याच्या आघाडीला उंच काठीवर

उभी केलेली कृष्ण किंवा इन्द्र यांची लांकडी मूर्ति असें असे, असें प्राचीन पाश्चात्य प्रवासी (Cambridge History of India Vol. I : p. 366) सांगतात.

क. ८५८ या गाथेंत इन्द्राच्या लांकडी मूर्तीचा उल्लेख आहे. या गाथेचें मर्म समजण्यासाठीं इन्द्राचें चारित्र पाहिलें पाहिजे. इन्द्र हा अग्नीसारखाच पारदारिक. पुलोमा या दैत्यकन्येचे अंगीं अद्वितीय लैङ्गिक आकर्षण होतें, म्हणून इन्द्रानें तिच्याशीं विवाह केला. लग्नापूर्वी यानें तिचा उपभोग घेतला होता असें तैत्तिरीय ब्राह्मणांत सांगितलेलें आहे. स्कन्द पुराणांत सांगितलें आहे को इन्द्र एकदां बलिराजास जिंकून उतथ्याचे आश्रमांत गेला असतां त्याच्या सुंदर स्त्रीवर यानें बलात्कार केला. हा वेष धारणांत प्रवीण होता. गौतमाचा वेष घेऊन यानें अहिल्येचा उपभोग घेतला. वाचक्नवि मुनीची स्त्री मुकुंदा ही रुक्मांगद राजावर मोहित झाली होती, हें समजतांच यानें रुक्मांगदाच्या वेषानें तिच्याशीं संभोग केला, अशी कथा गणेशपुराणांत आहे. यानें गुरुपत्नीलाही सोडलें नाहीं. इन्द्रलोकांतील व स्वर्गातील अप्सरा सदैव सेवेला असूनही मर्त्य लोकांतील स्त्रियांच्या उपभोगाविषयीं इन्द्र उत्सुक असतो. याची ही अशी कीर्ति असल्यामुळें या गाथेच्या लेखकाला वाटलें कीं ह्लिक सुंदरीच्या स्पर्शानें त्यांच्या लांकडी मूर्तीलाही अंकुर फुटतील ! पण नाहीं. इन्द्राची असली तरी ही मूर्ति अगदीं लांकडी ठरली !

कृष्ण : कृष्णाच्या व त्याच्याशीं संबद्ध असलेल्या व्यक्तींच्या व प्रसंगांच्या उल्लेखांचे चार वर्ग पडतात : (१) खुद्द कृष्ण व त्याचीं अन्य अभिधानें : कण्ह = कृष्ण (क. ८९. ११२. ११४. ४४७. ९६८), दामोअर = दामोदर (क. ११२*), माहव = माधव (क. ४४३); (२) विष्णूशीं सदृश असें कृष्णाचें अभिधान : महुमहण = मधुमथन (क. ४२५, ६५५), पैकीं फक्त क. ६५५ हा उल्लेख कृष्णाचा आहे; (३) कृष्णाचा गोतवळा : जसोआ = यशोदा (क. ११२. ६५५, ९६८); राहिआ = राधिका (क. ८९); (४) कृष्णाचे परिजन : गोवी : = गोपी : (क. ११४, १२८, ६५५) : वअवहू : व्रजवधू : (क. ११२); वल्लवी : बल्लवी : (क. ८९)

* कृष्णकथा मराठी वाचकांच्या चांगल्या परिचयाची आहे. तरी जरूरीपुरता कांहीं तपशील येथें दिला पाहिजे.

माधवाच्या सूचकाचोनें भीम प्रबळ झाला व त्यानें कुरुनाथाला उजव्या पायानें लाथ मारली, असा उल्लेख क्र. ४४३ या गाथेंत आलेला आहे. द्रौपदीवस्त्रहरण प्रसंगीं दुर्योधनानें आपलें डावें अंग उघडें केलें होतें, तेव्हां भीमानें त्याची डावी मांडी फोडण्याची प्रतिज्ञा केली होती. कौरवपाण्डव महायुद्धात दुर्योधनाशीं भीमाचें गदायुद्ध झालें ते वेळीं भीमाचा पाडाव होण्याचा प्रसंग आला असतां कृष्णाच्या सूचनेवरून अर्जुनानें डावी मांडी थोपटून भीमाला त्याच्या प्रतिज्ञेची आठवण करून दिली. भीमाने ती खूण ओळखली आणि गदेच्या प्रहारानें दुर्योधनाच्या दोन्ही मांड्या फोडल्या व त्यास लोळविलें आणि नंतर त्याच्या मस्तकावर डाव्या पायानें लाथ हाणली व त्याचें मस्तक डाव्या पायानें तुडविलें महाभारताच्या शल्यपर्वातील याबद्दलचा उल्लेख स्पष्ट आहे. क्र. ४४३ येथें मात्र भीमानें कुरुनाथाला उजव्या पायानें लाथ मारलेली आहे. या विसंगतीचा उलगडा होत नाहीं महाभारतात असा पाठ कोठेंही नाहीं.

दक्षिण या शब्दाच्या अर्थाबद्दल संशय नाहीं. ज्यांच्या परिभ्रमणांचा प्रवाह प्रथम पश्चिमेकडून पूर्वेकडे वहात होता त्यानीं दक्षिण दिशा व उजवी बाजू यांचा समन्वय करावा हें साहजिक आहे. उजव्या पायाची लाथ डाव्यापेक्षां जास्त जोरकस, ही वस्तुस्थिति आणि डाव्या पायाची लाथ जास्त अपमानकारक, ही समजूत. माझे मित्र श्री. अनंतराव करंदीकर या बाबतींत एक पर्याय सुचवितात : मूळ गाथेत किंवा छायेंत पाद हा शब्द नाहीं; भीम हा वायूच्या प्रसादानें कुंताला प्राप्त झालेला पुत्र; त्यानें कुरुनाथाला झपाटलें; भीमाचे दाक्षिणवाताशीं सादृश्य दाखविणें हा या गाथेचा उद्देश आहे; शिवाय दक्षिण ही यमाची दिशा; सबब येथें उत्तर कीं दक्षिण, उजवी कीं डावी हा प्रश्नच उपस्थित होत नाहीं.

क्र. ६५५ मध्यें कृष्णाला महुमहण = मधुमथन म्हटलेलें आहे. वस्तुतः हें अभिधान विष्णूचें आहे. या बाबतची कथा अशी : मधु व कैटभ हे असुर ब्रह्मदेवाच्या तमोगुणापासून उत्पन्न झाले. तपश्चर्येच्या सामर्थ्यानें ते देवांनाही अजिंक्य झाले. या दैत्यांशीं विष्णूनें पांच हजार वर्षे युद्ध केलें व शेवटीं त्यांना मांडीवर घेऊन त्यांचा वध केला मधुमथनाची कथा हरिवंशांत (भविष्यपर्व: अध्याय २९) आलेली आहे. कृष्ण व विष्णु यांचें ऐक्य या काळांत प्रस्थापित झालेलें होतें असें या उल्लेखावरून दिसतें.

क्र १६८ मध्ये पांचजन्य शंखाचा उल्लेख आलेला आहे. सांदीपनीनें कृष्णाला वेदविद्या शिकविल्या व गायत्री मंत्राचा उपदेश दिला. गुरुदक्षिणा म्हणून सांदीपनीला त्याचा समुद्रांत गडप झालेला मृत पुत्र दत्त हा कृष्णानें परत आणून दिला. शंखरूप धारण करून समुद्रांत राहणाऱ्या संह्लाद दैत्याचा पुत्र पचजन ह्याचा या वेळीं वध करून कृष्णान त्याच्या अस्थींपासून पांचजन्य शंख बनविला व तो बरोबर आणला अशी कथा आहे.

कृष्णकथा मराठी वाचकांच्या चांगल्या परिचयाची असली तरी कृष्ण आणि गोपी व राधा, तसेच कृष्ण व भागवत धर्म अगर संप्रदाय यांविषयींच्या आपल्या कल्पना अस्पष्ट असल्यामुळें या उपांगांची चर्चा थोड्याबहुत विस्तारानें केली पाहिजे. कृष्णाचा गोपींबरोबरचा प्रेमसंबंध जातकांत व महाभारतांत आलेला नाहीं, उत्तरकालीन पुराणांत व हरिवंशांत आलेला आहे. राधेचें नांव प्रथम नवव्या शतकांत (श्री. चतर्जी: Bulletin of theSchool of Oriental Studies : Vol VIII. pp. 457–466) ऐकूं येते. असे उल्लेख गाथासप्तशतींत आलेले आहेत. सबब असे उल्लेख असलेल्या गाथा प्रक्षिप्त असल्या पाहिजेत, तसे नसेल तर संपूर्ण ग्रंथ उत्तरकालीन असला पाहिजे असा काहीं संशोधकाचा निष्कर्ष आहे. या आक्षेपाचें निराकरण करण्यासाठींही याबाबतचा तपशील पाहिला पाहिजे.

गाथासप्तशतीच्या वेगवेगळ्या अकरा हस्तलिखितांचे वर्गीकरण करून श्री. वेबर यांनीं गाथाच्या उल्लेखानुल्लेखांचे एक कोष्टक (पृ. ३५६ ते ३७१) तयार केलें आहे. गोपी व राधा यांचे उल्लेख असलेल्या गाथांपैकीं क्र, ८९, ११२ व ११४ या गाथा नऊ आणि क्र. ४४७ व ६५५ या चार हस्तलिखितांत आलेल्या आहेत असे या कोष्टकावरून दिसून येते. पहिल्या तीन गाथा नाहींत तीं हस्तलिखितें क्षुद्र आहेत. या सर्व गाथा गंगाधरानें दिलेल्या आहेत. सबब या पांच गाथा प्रक्षिप्त आहेत असा उत्तर पक्ष करून विवाद्य मुद्याला बगल देता येत नाहीं.

कृष्ण व वासुदेव आणि भागवत धर्म यांची परंपरा फार पुरातन आहे. ऋग्वेदांत (८ ७४ ३ ४) आंगिरस कृष्णाच्या सूक्तात कृष्णाचा उल्लेख आलेला आहे कौशातक ब्राह्मणांत (३०·६) आणि छांदोग्य उपनिषदांत

(३.१७.६) देवकीपुत्र कृष्णाचा उल्लेख आहे.* ऋग्वेदाच्या सहाव्या मंडलांतील ३५ व ३६ हीं सूक्तें नर या ऋषीचीं आणि पुरुषसूक्त हें नारायणाचें. उत्तरकालांत नर ऋषीचा समन्वय अर्जुनाशीं व नारायणाचा वासुदेव कृष्णाशीं केलेला आहे. यज्ञादि बाह्य साधनांनीं परमेश्वराचें ज्ञान होणें अशक्य आहे, या विचारक्रान्तींतून औपनिषदिक ज्ञानमार्ग निर्माण झाला आणि निर्गुणोपासक ज्ञानमार्ग हा बहुजनसमाजाच्या आटोक्याबाहेरचा आहे असें प्रत्ययास आल्यामुळें त्यांच्यासाठीं सगुणोपासक भक्तिमार्ग वासुदेव कृष्णानें स्थापन केला. भागवत धर्म हें यज्ञसंस्थेविरुद्ध व वैदिक दैवतांविरुद्ध बंड आहे. भागवतांत व पुराणांत कृष्णाच्या इंद्राबरोबर झालेल्या युद्धाचे उल्लेख आहेत. भगवान् कृष्णाचा भागवत धर्म ख्रि. पू. पंधराव्या शतकाच्या सुमारास उदयास आला असावा असा डा केतकरांचा अभिप्राय आहे. ख्रि. पू. आठव्या शतकाच्या सुमारास पाणिनीनें अष्टाध्यायींत (४.३ ९५-९९) वासुदेवाच्या भक्तिसंप्रदायाचा उल्लेख केलेला आहे. त्या अर्थी यापूर्वीच कृष्णाला दैवताचें स्वरूप प्राप्त झालें असलें पाहिजे असें श्री. ग्रीयर्सन (I. A : 1908 p, 258) यांचें मत आहे. बाविसावा तीर्थंकर अरिष्टनेमि याचा कृष्ण वासुदेव हा पुतण्या होय, असा उल्लेख उत्तराध्ययन सूत्रात आलेला आहे. ख्रि. पू. चवथ्या शतकांत प्रचलित असलेल्या धर्मांचा उल्लेख बौद्ध सुत्तनिपातावरील निद्देस या टीकेंत आलेला आहे. येथ वासुदेवाच्या संप्रदायाचा निर्देश केलेला असून तो तुच्छ मानलेला आहे. धर्मसंस्थापक वासुदेव कृष्ण आणि महाभारतांतील पाण्डवसखा कृष्ण हे भिन्न आहेत असें श्री. मॅकडोनेल यांचें मत (History of Sanskrit Language : p 457) आहे. मथुरेच्या आसपास स्थायिक असलेल्या शूरसेनामध्यें प्रचलित असलेल्या कृष्णरूपी विष्णूच्या पूजेचा उल्लेख आद्य मौर्यांच्या दरबारांतला ग्रीक वकील मेगॅस्थेनिस यानें (मॅक्क्रिंडल: पृ. २०१) केलेला आहे ख्रि.पू तिसऱ्या व दुसऱ्या शतकातील शिलालेखात (नागरी, घोसुंडी व बेसनगर) वासुदेव व संकर्षण यांच्या भक्तीचा उल्लेख आलेला आहे. संकर्षण हा वासुदेवाचा सहचर असें पाणिनी सांगतो. संकर्षण व बलराम हे एकच असें कांहीं आधार सांगतात कृष्णाप्रमाणें बलरामाच्याही पूजेचे उल्लेख आढळतात. वैष्णव आगमानुसार हीं नारायणाचीं रूपे आहेत. घोसुंडी व बेसनगर येथील

शिलालेखांवरून दिसतें कीं परकीयांनाहि भागवत धर्माचा स्वीकार करतां येत असे. बौद्धांप्रमाणें भागवतांनीं या परावर्तनप्रथेचा उपयोग राजकीय कारणां-साठीं किंवा पुरस्कारासाठीं करून घेतलेला दिसत नाहीं. शुंग व काण्व घराण्यांत अनुक्रमें भागवत व वासुदेव नांवाचे राज्यकर्ते झालेले आहेत. ख्रि. पू. दुसऱ्या शतकांत पतंजलीनें महाभाष्यांत (४.३.९८) कृष्ण-वासुदेवाच्या सांप्रदायाचा उल्लेख केलेला आहे.

ख्रि. पू. तिसऱ्या शतकाच्या सुमारास भागवत धर्म महाराष्ट्रांत बद्धमूल झाला होता याबद्दल निर्विवाद पुरावा उपलब्ध आहे सातवाहन कुलांतल्या दुसऱ्या राजाचें नांव कृष्ण होतें. तें पौराणिक वंशावळींत, त्याचप्रमाणें नाशिकच्या पाण्डवलेण्यांत नमूद आहे. हें लेणें बौद्ध आहे. नाणेघाटांतील सातवाहनांच्या देवकुलांतील नायनिकेच्या यज्ञलेखांत आरंभीं संकर्षण वासु-देवांना आणि वैदिक दैवतांनाही वंदन केलेलें आहे. यावरून आद्य सातवाहन हे धर्मानें वैदिक पण वृत्तीनें भागवत होते असा निष्कर्ष निघतो. त्याचप्रमाणें या काळांत वैदिक व भागवत धर्मांचा समन्वय झाला होता असेंही ठरतें. शिवाय या उल्लेखावरून सातवाहनांच्या धार्मिक सहिष्णुतेचाही खुलासा मिळतो. महाराष्ट्रांतील सातवाहनांचे उत्तराधिकारी वाकाटक व त्यांचे समकालीन उत्त-रापथांतील गुप्त सम्राट हे तर स्वतःला परमभागवत, परमवैष्णव म्हणवितात. हे त्यांच्या शिलालेखांवरून व नाण्यांवरून स्पष्ट दिसतें.

ऋग्वेदांत यदूचा उल्लेख एकवचनी (१.१०८.८ वगैरे) आणि यादाः असा अनेकवचनीही आलेला आहे. इतिहासपुराणानुसार यदु हा ययातीचा ज्येष्ठ पुत्र. यदूचे वंशज ते यादव. शुक्राचार्यांच्या शापामुळें ययातीला वार्धक्य आलें. त्यानें मागितलेलें तारुण्य त्याला देण्याचें यदूनें नाकारलें म्हणून ययातीनें त्याचा राज्याधिकार नष्ट केला तरी पुढें यदूला त्याच्या राज्याचा कांहीं भाग मिळाला. मात्र ययातीनें यदूला राज्यभ्रष्ट केल्यामुळें यदूच्या कृष्णादि वंशजांना गवळी म्हणत; कारण यादवजन हे गोपालन करीत. यादवजन यमुनेच्या परिसरांत मथुरेपासून प्रयागपर्यंत स्थिरावले आणि कृष्णाच्या नेतृत्वा-खालीं सौराष्ट्रांत व गोमंत पर्वताच्या परिसरांत. कांहीं आधारांनुसार भोज व भीमक हे यदुचे भाऊ. भोजाचे वंशज सौराष्ट्र, अवन्ति व विदर्भ या भागांत स्थायिक झाले. विदर्भ उर्फ भीमक उर्फ भीष्मक हा विदर्भाचा आद्य राज्यकर्ता,

पार्गिटर यांनीं ययातीला मनूपासून सहाव्या व विदर्भाला चाळीसाव्या पिढींत मांडला आहे. (A.I.H.T: pp-144-6) त्याची राजधानी कुण्डिनपूर येथें होती. हा रुक्मिणीचा पिता व कृष्णाचा सासरा. रुक्मी हा भीमकाचा पुत्र. यानें भोजकट येथें राजधानी स्थापन केली. कृष्ण व रुक्मिणी यांचा पुत्र प्रद्युम्न याचा विवाह रुक्मीची कन्या शुभांगी हिजबरोबर झाला आणि प्रद्युम्नाचा पुत्र अनिरुद्ध याचा विवाह रुक्मीच्या नातीशीं झाला. संकर्षण, वासुदेव, प्रद्युम्न व अनिरुद्ध या चौघांवर व्यूहसिद्धांत आधारलेला आहे. विदर्भाचा दहावा वंशज भीमरथ, याचें नांव भीमरथी उर्फ भीमा या नदीस मिळालेलें आहे. भोज व महाभोज यांचे सातवाहनकालीन शिलालेख अपरान्तांत मिळालेले आहेत. कृष्णाच्या काळांत यादव स्थायिक झाले होते त्याच प्रदेशांत अर्वाचीन काळांत यादवांच्या सत्तेचा उदय झालेला आहे. नवव्या शतकांत सेउणचंद्र यादवानें सेउण देशांत, अर्वाचीन खानदेशांत सेउणपुर येथें मांडलिकी राजधानी स्थापने केली आणि दहाव्या शतकांत तिलप चालुक्याच्या वतीनें नर्मदेच्या परिसरांत परमारांचा पराभव केला. कर्नाटकांतील होयसळ बल्लाळ हेही यादवच आहेत. एकूण इतिहासपूर्व कालापासून महाराष्ट्रांत यादवांचा प्रवेश व प्रसार झालेला आहे. या गोपालांनीं राधाकृष्णांच्या व कृष्णगोपींच्या प्रेमाच्या लोकगीतांचा प्रसार या भागांत केला असला पाहिजे. मातुलकन्यापरिणय हें यादव संस्कृतीच्या महाराष्ट्रावरील प्रभावाचें द्योतक व गमक आहे.

सातवाहन कालांत महाराष्ट्रांत अभीर जमात प्रविष्ट झालेली आहे. महाभारतांत (९.३७ १) अभीर पश्चिम राजपुतान्यांत मांडलेले आहेत. पाणिनीच्या काळांत अभीर सिंधेंत होते आणि अशोककालांत सौराष्ट्रांत. गुंडा शिलालेखांत (E. I: XVI. 235) माळव्याच्या रुद्रसिंह क्षत्रपाचा सेनापति रुद्रभूति अभीर याचा उल्लेख आहे. खि. पू. पहिल्या शतकांत अभीर पश्चिम भारतांत घुसले असावेत असें पेरिप्लसवरून दिसतें. विष्णुपुराणांत (Wilson: II. III. p.182-5) अभीर सौराष्ट्रांत व परियात्र पर्वताच्या परिसरांत मांडलेले आहेत आणि मार्कण्डेय पुराणांत (५७.३५-३६) अपरान्तांत. यज्ञश्री सातवाहनानंतर महाराष्ट्राची राजसत्ता अभीरांचे हातीं गेली असावी असें पाण्डव लेण्यांतील ईश्वरदत्ताचे शिलालेखावरून दिसतें. याचे पूर्वज हे क्षत्रपांचे सेनापति असावेत असा पंडित भगवान लालांचा अंदाज आहे. (J.B.B.R.A.S.: 1890:

p. 63 १) पुराणांत अभीरांचे सात ते दहा राजे विकल्पेंकरून दिलेले आहेत व त्यांना ६७ वर्षांचा राज्यकाल दिलेला आहे. त्यांची राजधानी नाशिकच्या आसपास असावी. अभीर या अभिधानाचा अर्थ गवळी असा आहे असें डॉ. हेरास सांगतात. ग्वालेर, गाविलगड, गोवळकोंडा, गोवळकोट वगैरे स्थानें हीं अभीरांच्या प्रसाराचीं द्योतक आहेत. मला तर वाटतें कीं गोदावरीचें गोला हें प्राकृत प्राचीन अभिधान अभीर गोपालांच्या माहात्म्याचें द्योतक असावें. गोदावरीच्या आसमंतांत आणि गिरणा. तापी.व प्राणहिता यांच्या खोऱ्यांत इथींही अभीरांची वस्ती आहे. त्यांच्या प्रभावामुळेंच गोदावरी या अभिधानाचा संबंध गाईशीं जोडण्यांत येऊं लागला असावा. श्री. राजारामशास्त्री भागवत सांगतात कीं अभीर हे अवैदिक व गाईची पूजा करणारे आणि ब्राह्मण हे वैदिक यज्ञ-संस्थाभिमानी व गाईची हत्या करणारे. या अवैदिक-वैदिकांचा संघर्ष तात्त्विक, धार्मिक, बौद्धिक व राजकीय पार्श्वभूमीवर झाला असला पाहिजे. इंद्रध्वज महोत्सवाचे ऐवजीं कृष्णानें पर्वत व गाई यांचा उत्सव करण्याचें ठरविलें. तो फसावा म्हणून इंद्रानें अतिवृष्टि केली. तेव्हां कृष्णानें गोवर्धन पर्वत उचलून धरला आणि आपल्या अनुयायांचें रक्षण केलें. या कथेचें मर्म या संघर्षाचें द्योतक आहे. अभीरांच्या तत्त्वज्ञानाला बौद्ध अहिंसाधर्माचा पाठिंबा मिळाला. आणि अहिंसाप्रधान व सहिष्णु भागवतधर्माचा त्या काळांत विजय झाला. अभीर हे बलदेव-कृष्णांचे पूजक. त्यांनीं कृष्णलीलेच्या कांहीं कथा बरोबर आणल्या व स्वतःच्या वृत्तीच्या द्योतक अशा कांहीं प्रेमकथा निर्माण केल्या व प्रसृत केल्या. वैदिक दैवतांना मान्यता न देणाऱ्या जमातींना सामावून घेण्यासाठीं त्यांच्या अवैदिक दैवताना पौराणिकांनीं योजिलेल्या एकीकरणाच्या प्रचंड संघटनेंत समाविष्ट करून घेतलें आणि सामान्य ग्रामीणांना व नागरी रसिकांना रुचतील अशा राधाकृष्णांच्या प्रेमकथा उत्तरकालीन कवींनीं निर्माण केल्या. गाथासप्तशतींतील कृष्णाचे राधा व गोपी यांशीं संबंध असलेले प्रसंग असेच आहेत. क्र. ७०५ या गाथेंत अभीरी बळजोरीचा उल्लेख आहे. एकाद्या मराठी गवळणींत साजतील असे हे उद्गार आहेत. धनुर्धर अर्जुनाच्या संरक्षणाखालीं असलेल्या यादव स्त्रियांचेंही ज्यांनीं अपहरण केलें ते काय अशा एकाकिनीला सोडतील ?

गणपती : गणवई = गणपति : क्र. ३७२; गणाहिवई=गणाधिपति क्र.४०३. गाथासप्तशतींतील दैवतांपैकीं गणपतीचे बाबतींत कालनिर्णयाचे मुद्यावर संशोधकांमध्यें जें रण माजलें होतें तें मुख्यत्वेंकरून क्र. ३७२ मधील उल्लेखावरून. कारण गणपति हें दैवत प्राचीन नाहीं असा विद्वानांचा अभिप्राय आहे आणि येथें तर गणपति हा देव, त्याची मूर्ति व पूजा असा तिहेरी उल्लेख आहे. हा उल्लेख उच्छिष्ट गणपतीची उपासना करणाऱ्या वाममार्गी गाणपत्यांचा असावा असें मत श्री. राजारामशास्त्री भागवत (प्राकृत भाषेची विचिकित्सा : पृ. ७६) यांनीं मांडले आणि वाममार्गी तान्त्रिक संप्रदाय अर्वाचीन असल्यामुळें गाथासप्तशती हा ग्रंथ सातवाहनकालीन नसून गुप्तोत्तर-कालीन व नवव्या शतकाच्या सुमाराचा असावा असा कांहीं संशोधकांनीं निष्कर्ष काढला. गणपति हें दैवत शालिवाहन शकाच्या पहिल्या शतकांत अस्तित्वांत होतें, असें उपरोक्त गाथांच्या अनुरोधानें प्रतिपादन करणारे लेख पुरातत्त्वभूषण श्री. राजवाडे यांनीं सरस्वतीमंदिर या त्रैमासिकांत (आश्विन व माघ शके १८२७) प्रसिद्ध केले. या गाथा प्रतिष्ठित, मातृपितृसंपन्न व निश्चितवयस्क आहेत असें त्यांचें म्हणणें होतें. या लेखांना विद्याभूषण श्री. कृष्णशास्त्री घुले यांनीं विविधज्ञानविस्तारांत (जानेवारी व जून १९०६) उत्तर दिलें आणि गणपतीच्या उल्लेखामुळें गाथासप्तशती हा ग्रंथ तेराशें वर्षांपलीकडे जात नाहीं असें मत मांडलें. यानंतर अनेक वर्षांनीं हा वाद पुन्हां सुरू झाला. श्री. घुलेशास्त्री यांनीं पूर्वपक्ष केला (वागीश्वरी वर्ष १, अंक १) आणि श्री. राजवाडे यांनीं गाथासप्तशती व हाल सातवाहन यांच्यासंबंधीं केलेलीं विधानें अविश्वनीय आहेत असा एक नवा मुद्दा मांडला. त्या लेखाला श्री. अप्रबुद्ध यांनीं आवेशपूर्ण उत्तर (वागीश्वरी: वर्ष ३, अंक १) दिलें. या उत्तराला शास्त्रीजींनीं दिलेलें प्रत्युत्तर वागीश्वरींतच प्रसिद्ध झालेलें आहे.

श्री घुलेशास्त्री यांच्या विचारसरणीचा गोषवारा असा :

ऋग्वेदांत गणपति हा शब्द आढळतो, पण त्या काळीं गणपतीची पूजा होत होती असें या उल्लेखावरून सिद्ध होत नाहीं. मैत्रायणी संहितेंत व नारायणीयोपनिषदांत गजाननाची गायत्री आहे आणि महाभारतांत गजाननाचे उल्लेख आहेत, ते प्रक्षिप्त आहेत. या काळांत गणपति हें नांव महादेव या अर्थानें रूढ होतें. मानवगृह्यसूत्रांतील उल्लेखांवरून दिसतें कीं विनायक ही

क्षुद्रदेवता असून ती अपायकारक आहे. मूळ विनायक अनेक होते; गृह्यसूत्रांत त्यांची संख्या चारांवर आली आणि याज्ञवल्क्य स्मृतींत त्यांचे एकीकरण होऊन त्याला अम्बिकेच्या मांडीवर बसविण्यांत आलें, म्हणून त्याचें पितृपद महादेवाला मिळालें. या वेळीं त्याला दोनच हात होते व अद्याप त्याला शुंडा चिकटविण्यांत आलेली नव्हती. स द्रगुप्त च्या शिलालेखांत गणपति नाग या राजाचें नांव आलेलें आहे व ललितविस्तारांत गणपतीचा उल्लेख आहे. पण त्याची पूजा होत होती असें या उल्लेखांवरून सिद्ध होत नाहीं. गणपति ही देवता सहाव्या शतकाच्या सुमारास उत्क्रांत झाली असें खुद्द डॉ. भांडारकर सांगतात, तेंच बरोबर आहे अर्थात या उल्लेखांवरून गाथासप्तशतीचा काळ सहाव्या शतकाच्या पुढचा ठरतो.

श्री. अप्रबुद्ध यांनीं केलेल्या उत्तरपक्षाचा गोषवारा असा :

अंबिकापुत्र विनायकाचें संकटनिवारणार्थ द्विजादिकांनीं अर्चन करावें असें याज्ञवल्क्य सांगतो. याचा काल तिसरें शतक. गणपतीची पूजा त्यापूर्वी दोन तीनशें वर्षें तरी अस्तित्वांत असली पाहिजे. महायान पंथाचा आद्य प्रवर्तक राहुलभद्र याला श्रीकृष्ण व गणेश यांच्या उपासना माहीत होत्या असें लो. टिळकांनी तिबेटी ग्रंथांच्या आधारानें गीतारहस्यांत दाखवून दिलेलें आहे. याचा काल ख्रि. पू. दुसरें शतक. अर्थात् गणपतीची उपासना कमींत कमी त्या कालापर्यंत जाते. सबब गाथासप्तशती हा ग्रंथ बेधडक दुसऱ्या शतकांत ठेवतां येईल.

या वादाची भूमिका गाथासप्तशतीच्या कालनिर्णयाशींही संबद्ध असल्यामुळें या विषयाची चर्चा थोड्याफार तपशीलानें करणें अवश्य आहे.

वैदिक दैवतांत गणपतीला स्थान नाहीं. ऋग्वेदांतील 'गणानां त्वां गणपतिं' हा उल्लेख आलेला आहे त्या सूक्ताची (२.२३.१) देवता बृहस्पति किंवा ब्रह्मणस्पति ही आहे आणि 'नि षु सीद गणपते गणेषु त्वाम् आहुः' हा उल्लेख आलेला आहे त्या सूक्ताची (१०.११२.९) देवता इंद्र ही आहे. ऐतरेय ब्राह्मणांतील उल्लेखही (१.२१) याच देवतांना उद्देशून आलेला आहे. या विधानांवरील टीकांच्या आधारानें डॉ. दिवेकर (महाराष्ट्र-विस्तारः वर्ष २० अंक ७) सांगतातः " देवतेस म्हणत कांहींही असोत; अत्यंत विद्वान्, गणांचा

गणपति, विघ्नांपासून रक्षण करणारा व कोणतेंही कर्म ज्याशिवाय होत नाहीं अशी एक देवता ऋग्वेदकालींहि मानलेली होती." उपनिषद् कालापर्यंत बृहस्पति हीच ज्ञानाची देवता होती. गणपतीला हें स्थान बऱ्याच उशीरां मिळालेलें आहे. बृहस्पतीच्या हातीं परशु असे, तो पुढें गणपतीच्या हातीं आला; यावरून या दोन्ही देवतांच्या मुळाशीं एकच कल्पना असली पाहिजे, किंबहुना गणपति हें बृहस्पतीचेंच उत्क्रांत स्वरूप असलें पाहिजे असा श्री. राव (Elements of Hindu Iconography : Vol I, Part I, p 45) यांनीं निष्कर्ष काढला आहे. उत्तरकालीन पुराणांनीं या परशूचा संबंध परशुरामाशीं जोडलेला आहे. यजुर्वेदांत गणपतीचें कार्य रुद्राकडे गेलेलें आहे. डॉ. दिवेकर सांगतात (पूर्वोक्त) 'ऋग्वेदकालीं जें सुखकर गणाधिपत्य बृहस्पति किंवा इंद्रासारख्या देवाकडे होतें तें यजुर्वेदकालीं विघ्नकूर इंद्राकडे आलें. मैत्रायणी संहितेंत (२.९.१) गाणपत्यांचा उल्लेख आहे. तैत्तिरीय आरण्यकांत (१०.१.५) 'तत्पुरुषाय विद्महे वक्रतुंडाय धीमहि तन्नो दन्तिः प्रचोदयात्' हा मंत्र आलेला आहे. मानवगृह्यसूत्रांत विनायक हा चार देवतांचा संघ आहे. या समूहांतून उत्तर कालांत गणपति-विनायक हें एकमेव दैवत उत्क्रांत झालें. बौधायन धर्म सूत्रांत (२.५) एकदन्त, लम्बोदर, वक्रदन्त, हस्तिमुख वगैरे विशेषणें गणपतीला लावलेलीं आहेत. याज्ञवल्क्य स्मृतींत (१.२७१) पुढील वचन आढळतें.

विनायकः कर्मविघ्नसिध्यर्थं विनियोजितः
गणानामाधिपत्येच रुद्रेण ब्रह्मणा तथा ॥

पुरुषार्थाचीं साधनें जीं कर्में त्यांस विघ्नें करण्याकरितां विनायकास पुष्पदन्तादि गणांच्या आधिपत्याचे ठायीं योजिलेलें आहे; अर्थात् विनायक ही दुष्ट देवता कर्मास विघ्न आणणारी असून पूजादिकांच्या योगानें संतुष्ट केली असतां विघ्नांचा नाश करणारी आहे. गणपतीला विघ्नहर्त्या इष्ट दैवताचें स्वरूप पुराण कालांत प्राप्त झालेलें आहे. सर्व उपलब्ध पुराव्यावरून डॉ. भांडारकर निष्कर्ष काढतात कीं याज्ञवल्क्यानें वर्णिलेलें गणपति-विनायकाचें स्वरूप हें त्याचें आद्य स्वरूप असावें, विनायकांच्या जातीचे विधि खिस्तपूर्वकालीन असावेत आणि पुराणांतलें स्वरूप त्याला गुप्तोत्तर कालांत, सहाव्या शतकाच्या सुमारास प्राप्त झालेलें असावें (वैष्णविझम् ॲण्ड शैविझम्: पृ. १४९ व २११).

या व तत्सम पुराव्यावरून श्री. खरे (मूर्तिविज्ञान पृ. १५०) सांगतातः वेद-काळीं यज्ञमार्गी लोकांमध्यें दोन परंपरा असाव्यात; पैकीं ऋग्वेद, बृहदारण्यक वगैरेंच्या पंथांमध्यें गणपतीला महत्त्व नव्हतें; उलट मैत्रायणी संहिता, अथर्व वगैरेंना प्रमाण मानणाऱ्यांच्या पंथांत वैदिक दैवतांप्रमाणेंच रुद्र कुटुंबांतील देवतांनाही प्रामाण्य होतें: आणि बौधायन सूत्रांत गणपतीप्रमाणेंच अनेक देवतांच्या मूर्तींचे उल्लेख आलेले आहेत, त्यांवरून त्या काळींही गणपतीच्या मूर्ति होत्या हें निश्चित.

व्यासांनीं महाभारत सांगितलें व तें गणपतीनें लिहिलें अशी कथा महाभारताच्या प्रस्तावनेंत आहे. याबाबत अनुमान करण्यांत आलेलें आहे कीं विनायक ही एक प्राचीन एतद्देशीय जमात असावी, या जमातींतील कोणा व्यक्तीनें लेखनपद्धति शोधून काढली असावी आणि या सांस्कृतिक कार्याबद्दल त्यांचा नायक गणपति ह्याला देवपद देण्यांत आलें असावें. महाभारताच्या दाक्षिणात्य प्रतींत मात्र ही कथा आढळत नाहीं; सबब ती प्रक्षिप्त असावी असा संशोधकांचा कयास आहे. तंत्रमार्गानें ही दंतकथा स्वीकारलेली आहे. शिवानें गायत्रीनंतर सांगितलें व तें गणपतीनें लिहिलें (महानिर्वाणतंत्रः अव्हॅलॉनः पृ. ४. टीप). याचें प्रतीक म्हणून कोठें त्याच्या हातीं पोथी दिलेली आढळते. पुराणकारांनीं गणपतीच्या निर्मितीबद्दल अनेक कथा दिलेल्या आहेत. सोमेश्वराची पूजा व यात्रा करणारांना शंकरानें स्वर्गप्राप्तीचा हमी दिल्यामुळें वस्तुत: ज्यांचें मरणोत्तर स्थान नरकांत त्यांची स्वर्गांत गर्दी झाली. इंद्रादि देवांनीं याबद्दल तक्रार केली असतां त्यानें पापी भक्तांना दिलेला शब्द परत घेण्याचें नाकारलें. तेव्हां देव पार्वतीकडे गेले. स्वर्गप्राप्तीची इच्छा करणाऱ्या नालायकांच्या निवारणासाठीं तिनें स्वतःच्या शरीरावरील उटण्यापासून विघ्नेश्वराची निर्मिति केली आणि स्वर्गप्राप्तीसाठीं केवळ सोमेश्वराच्या यात्रेवर विसंबणाऱ्यांच्या मार्गांत विघ्नें उत्पन्न करण्याची कामगिरी त्याजवर सोंपविली, मात्र जे तुझी शांति करतील त्यांना साह्य कर असाही आदेश त्याला दिला. शिव तप करीत असतां त्याच्या कपाळांतून प्रकट झालेल्या दिव्य तेजाचें गणपति हें मूर्त स्वरूप आहे असें वराहपुराणांत सांगितलें आहे. याप्रमाणें गणपति हा आपल्या सहकार्याशिवाय निर्माण झालेला पाहून पार्वतीनें त्याला शाप

दिला कीं तुझें पोट ढेबरें होईल व तुझें मस्तक हत्तीसारखें बेडब होईल. पार्वती स्नान करीत होती व गणपति द्वाररक्षण करीत होता; त्यानें शंकरालाही मज्जाव केला, म्हणून शंकरानें याचें मस्तक तोडलें. पार्वतीच्या सांगण्यावरून शंकरानें त्याच्या घडावर इंद्राच्या ऐरावताच्या पुत्राचें मस्तक बसवून त्याला सजीव केलें. गणपतीच्या गजमुखाचें स्पष्टीकरण करण्यासाठीं पुराणांत आणखी एक कथा सांगितलेली आहे. हिमालय पर्वतावर हत्ती व एक हत्तीण यांची क्रीडा पाहून आपणही त्यांच्या रूपांत क्रीडा करावी अशी शंकरपार्वतींना इच्छा झाली. त्यांनीं तशी क्रीडा केली व त्यांना गणपति झाला. या व अशा आणखी अनेक दंतकथाचा विचार केला असतां दिसून येतें कीं परस्परविरोधी धार्मिक समजुती गणपतीच्या निर्मितीच्या मुळाशीं आहेत. वैदिक व अवैदिक समाज व समजुती याचा संघर्ष समेट व संकर या दैवतांत सामावलेला आहे.

गणपतीला बौद्धांनीही आपल्या दैवतांमध्यें स्थान दिलेलें आहे. गणपतिहृदय या नांवाचा मंत्र खुद्द बुद्धानें आनंद भिक्षूला राजगृह येथें सांगितला अशी दंतकथा आहे (Nepalese Buddhist Literature: Mitra : p. 89). या मंत्रांत गणपतीचें ध्यान वर्णिलेलें आहे. खि. पू. तिसऱ्या शतकांत सम्राट् अशोकाची कन्या चारुमती हिनें नेपाळांत पशुपतिनाथाच्या मंदिराच्या उत्तरेस गणेशाचें देवालय उभारलें अशी नेपाळी दंतकथा आहे; पण ही कथा विश्वसनीय नाहीं असा संशोधकांचा अभिप्राय (South Indian Images: Sastri. p. 168) आहे. महायान पंथाचा आद्यप्रवर्तक राहुलभद्र याला श्रीकृष्ण व गणेश यांच्या उपासना होत्या. बुद्धाच्या परिनिर्वाणप्रसंगीं मूषकवाहन गणपति हजर असल्याचें उत्तर-गुप्तकालीन शिल्प सारनाथ येथें आहे. (Iconographie : Buddhique de l' Inde : A. Foucher ' Pl xxx). अमरावती येथेंही गणपतीची यक्षसदृश मूर्ति प्राप्त झालेली आहे.

या वादाशीं तांत्रिक गणपतीचा संबंध असल्यामुळें त्याचाही विचार केला पाहिजे.

' प्राकृत भाषेची विचिकित्सा ' ही लेखमाला ' न्यायमूर्तींच्या चरणीं वाहिलेली माळ ' या शीर्षकाखालीं ग्रंथमालेंत प्रसिद्ध झाली. त्या काळांत प्राकृत हा

तिरस्कारानें खांदे उडविण्याचा विषय होता. प्राकृत भाषा व साहित्य यांना अलीकडेच विद्वानांची व विद्यापीठांची मान्यता मिळालेली आहे. दरम्यानच्या काळांत श्री. राजवाडे यांचे लेख सरस्वतीमंदिरांत प्रसिद्ध झाले. यांपैकीं पहिल्या लेखांत ते म्हणतातः "या गाथेंत केवळ साधाच गणपति उल्लेखिलेला नाहीं. तर वाममार्गी गाणपत्य ज्या उच्छिष्ट गणपतीची पूजा करतात त्या सकलमनःकामना पुरविणाऱ्या देवतेचा उल्लेख केलेला आहे." श्री. घुले शास्त्री यांनीं हीं विधानें मान्य केलीं, कारण त्यांना गाथासप्तशतीचें प्राचीनत्व नाशाबीत करावयाचें होतें. प्राचीन ऐतिहासिक युगाच्या अखेरीच्या सुमारास तंत्रमार्ग निर्माण झाला व मध्ययुगांत त्याचा विशेष प्रचार झाला असें साधारणपणें सर्व संशोधक मानीत. उच्चार व पुनरुच्चार यांमुळें या विधानाला सिद्धान्ताचें स्वरूप आलेलें आहे. तान्त्रिक दैवतें व त्यांची पूजा हीं कमीत कमी वैदिक दैवतें व त्यांची पूजा यांच्याइतकीं पुरातन आहेत किंबहुना शाक्त दैवतें हींच आद्यदैवतें आहेत, असा तंत्रमार्गीयांचा आग्रह आहे. उभय पक्षांची अतिशयोक्ति वगळली असतां दिसून येतें कीं तंत्रमार्ग हा कमींत कमी खि. पू. दुसऱ्या शतकाइतका प्राचीन असला पाहिजे. उच्छिष्ट-गणपति, कुलार्णव तंत्र व महानिर्वाण तंत्र या तंत्र ग्रंथांच्या आधारानें गणपतीबद्दलची संकलित माहिती येथें देतों.

तंत्रमार्गांत गणपतीला महत्त्वाचें स्थान आहे. कुलार्णव तंत्रांत त्याला गजमुख म्हटलेलें आहे. महानिर्वाणांत गणपतीचें ध्यान सांगितलें आहेः त्याचा वर्ण शेंदरी असून त्याला तीन डोळे आहेत; मस्तकावर चंद्रकला आहे व सोंडेंत मद्याचा कुंभ आहे; एक वरदहस्त असून बाकीच्या हातांत शस्त्र, पाश व अंकुश आहेत. वाममार्गी शाक्तांनीं गणपतीला शिवपार्वतींहून अधिक महत्त्व दिलेलें आहे. ब्रह्मचारी गणपतीला पौराणिकांनीं बुद्धि व सिद्धि या भार्या दिलेल्या आहेत; तंत्रमार्गी गणपतीची लक्ष्मी ही भार्या किंवा शक्ति. शाक्त गणपतीचे पांच मुख्य प्रकार आहेत : उच्छिष्ट-गणपति, ऊर्ध्व-गणपति, पिंगल गणपति महागणपति व लक्ष्मी-गणपति. नवनीत-गणपति, संतान-गणपति, स्वर्ण-गणपति व हरिद्रा-गणपति हे प्रकारही कांहीं आधारग्रंथांत नमूद आहेत. त्यांचीं लक्षणें सांगितलीं आहेत, तीं अशीं:

मूर्ति	वर्ण	नेत्र	हस्त	हातीं-	शक्ति
उच्छिष्ट-	लाल	—	४	डाळिंब, वीणा, कमळ, पाश, अंकुश, मोदक, धनुष्य-बाण.	विवस्त्र आलिंगित.
ऊर्ध्व-	पिंवळा	—	६-८	उंसाचें धनुष्य, कणीस व फुलांचा बाण	आलिंगित
पिंगल-	,,	—	६	आंबा, उंस, कल्पकता, लाडू	श्री व समृद्धि या शक्ति.
महा-	लाल	—	८,१०, १२	उंसाचें धनुष्य, डाळिंब व कणीस	आलिंगित.
लक्ष्मी •	शुभ्र	—	४,६,८	पोपट, कल्पकता, बाण, कमळ	पीतवर्ण शक्ति, हातीं कमल.
हरिद्रा	पिंवळा	३	४	(उपासकाच्या दंडावर तप्तमुद्रांकित एकदन्त गजमुखाचें चिन्ह)	

आनंदतीर्थांच्या शंकरदिग्विजयांत (दहावें शतक) सांगितलें आहे कीं उच्छिष्ट गणपति पंथाचे शाक्त भक्त मूर्तीची पूजा डाव्या हातानें करतात, जातिभेद मानीत नाहींत, स्त्रीसंभोगाचे बाबतींत कोणताही निर्बंध जुमानीत नाहींत; तांत्रिक उपासक पूजा करतांना 'नग्ननारिरत', 'नारीयोनिरसास्वाद' अशा गणपतीचें ध्यान करतात; ह्या पूजेचें पुण्य 'स्वयोनिवत्' गोपनीय आहे. उच्छिष्टगणपत्युच्छिष्टचाण्डालिन्युपासना (संपादक श्री गोविंद परशुराम शास्त्री; प्रकाशक : श्री वेंकटेश्वर स्टीम मुद्रणालय : शके १८२९) या पोथींत उच्छिष्टगणपतीचीं ध्यानें दिलेलीं आहेत, तीं अशीं :

चतुर्भुजं रक्ततनुं त्रिनेत्रं
पाशांकुशौ मोदकपात्रदंतौ ॥
करेर्दधानं सरसीरुहस्थम्
उन्मत्तमुच्छिष्ट गणेशमीडे ॥

ॐ शरान्धनुः पाशसृणी स्वहस्तैः
दधानमारक्त सरोरुहस्थम् ॥
विवस्त्रपत्न्यां सुरतप्रवृत्तम्
उच्छिष्टमम्बासुतमाश्रयेहम् ॥

वेगवेगळ्या कार्यांच्या सिद्धीसाठीं उच्छिष्ट गणपतीच्या पूजेचे वेगवेगळे विधि सदर पोथींत सांगितलेले आहेत; त्यांपैकीं कांहीं येथें देतों:

"अभिलषितबालाचित्रोपरि गणेशं संस्थाप्य प्रत्यहमष्टोत्तरशतं जपेत् दिनत्रयादाकर्षयति। तं गणेशं नद्यां नीत्वा प्रक्षाल्य स्वमुखाद्वारचतुष्टयं प्रक्षाल्य तस्मात् पतितं किंचिदुदकं भाडे निक्षिपेत्। तदुदकं ये पिबन्ति ते सर्वे वश्य भवंति। तं गणेशं ताम्रे रौप्ये वा निक्षिप्य कटिबंधनात्स्त्रियो वश्या भवन्ति शत्रुगणः स्तंभीभवति।" इत्यादि.

शिलालेखांतील स्पष्ट उल्लेखांच्या आधारानें पांचव्या शतकापूर्वी निश्चितपणें मांडतां येईल अशी गणपतीची मूर्ति अद्याप उपलब्ध झालेली नाहीं. पण अनुमानानें शकपूर्व कालांत मांडतां येतील अशा गणेशमूर्ति अलीकडे मिळाल्या आहेत. पेड्ड मुडियम् व पेरंबर येथ उत्खननांत मिळालेल्या मूर्ति शकपूर्वकालांतील असल्याचें संशोधकांनीं निश्चित केलेलं आहे (A. S. I.: Annual Report: 1905-6 & 1908-9). अमरावती येथील सातवाहनकालीन स्तूपाभोंवतालच्या कठड्यावर एक मूर्ति आहे. तिच्या मस्तकावर महासर्पाचें वेटोळें किंवा द्रव्याची थली आहे. तिचे डोळे, कान व अधर निःसंशय हत्तीसारखे आहेत. तिचें पोट ढेबरें आहे. पण तिला सोंड मात्र नाहीं. ही मूर्ति गणपतीचीच असलेबद्दल श्री. बर्गेस, श्री. कुमारस्वामी व श्री. डुब्रेल यांचें एकमत आहे ही मूर्ति गणपतीचें यक्षोद्भव सुचविते. सिंहलद्वीपांतील मिहिंतले येथील स्तूपानजीक गजमुख गणपतीची मूर्ति उत्खननांत मिळालेली (Ganeśa: A Getty: Pl. XXII. C.) आहे. हें शिल्पकृत्य पहिल्या, फार तर दुसऱ्या शतकांतील असावं असें आसपासच्या शिलालेखांवरून ठरतें. कुशान राजा हुविष्क याच्या नाण्यावर (इंडियन म्युझियम–कलकत्ता) ब्राह्मी लिपींत 'गणेश' अशीं अक्षरें आहेत. (J. A. S. B. 1897: Part I; p. 8 Pl. I) असें श्री. व्हिन्सेंट स्मिथ याचे म्हणणें आहे मात्र अन्य

संशोधकांनीं याचें वाचन 'भवेश' असें केलेलें आहे. शिवाय त्यावरील मूर्ति शिवाची आहे. वाचन बरोबर असेल तर कांहीं बिघडत नाहीं, कारण शिव व गणेश हे आरंभीं एकच होते असा डॉ. प्रिलुस्की यांचा सिद्धांत आहे. अथर्वशीर्ष उपनिषदांत रुद्र व विनायक हे एकच होत असें वचन आहे रुद्रानें विनायक निर्मिले असें याज्ञवल्क्यानेंही सांगितलेलें आहे. भूमार येथें गणपतीची पांचव्या शतकांतील अद्वितीय मूर्ति आहे. या मूर्तीला सोंड आहे. पण ती अगदीं लहान आहे. पोट सामान्य आहे. किरीटाला घंटा लावलेल्या आहेत आणि छातीवर घटाची माळ रुळत आहे. या मूर्तींची चर्चा करतांना डॉ आनंद कुमारस्वामी (Yakṣa : PartI. pp .7-14) यांनीं एक तिबेटी दंतकथा सांगितलेली आहे. वैशालीचा द्वारपाल मेला व राक्षस झाला. त्यानें गावकऱ्यांना दृष्टान्त दिला कीं माझी प्रतिमा द्वारपालाच्या जागेवर स्थापन करा, तिच्या गळयांत घंटांची माळ घाला, गांवावर संकट आलें कीं या घंटा आपोआप व आगाऊ वाजूं लागतील, यामुळें गांवकऱ्यांना संरक्षणाची तयारी करावास पुरेसा अवसर मिळेल. गावकऱ्यांनीं तसें केलें व यामुळें त्यांना शत्रूंचा अचानक उपसर्ग झाला नाहीं या मूर्तींच्या गळयांत असलेल्या घंटांच्या माळेवरून ते निष्कर्ष काढतात कीं हें गणपतीचें यक्षस्वरूप आहे. कारण शहरांच्या प्रवेशद्वारांचें संरक्षणाचें काम यक्षांकडे सोंपविलेलें असे.

गणपतीला गजमुख धर्मसूत्र कालांत प्राप्त झालें (बौधायनः २ ५) उंदीर हा रुद्राचा पशु असें श्रौतसूत्रांत सांगितलेलें आहे. गणपति रुद्रापासून अलग झाला तेव्हां हें वाहन त्याला प्राप्त झालें. गणपतीचें मुख व वाहन यांवरून अनुमान करण्यांत आलें आहे कीं या दैवताचा वन्य पशूंबरोबरशीं (Religion & Folk-lore of Northern India : Crooke : p 287) संबंध असला पाहिजे. गणपतीच्या वाहनावरून त्याचा सूर्याशीं संबंध जोडण्यांत आलेला आहे. (Gubernatis : Zoological Mythology;. p. 68). त्याच्या हातांतील कणाम व कुंस वगैरे लक्षणांवरून निष्कर्ष काढण्यांत आला आहे कीं हें दैवत शेतकरी लोकांचे असावें. गणपतीच्या एकदन्त या अभिधानाचें भाषांतर 'नांगराचा फाळ' असें ही होऊं शकतें; यावरून हा समृद्धि-देव असावा असेंही अनुमान (I. A. : XXXV : Nov.

1908) करण्यांत आलेलें आहे. 'गणेश' या प्रबन्धाच्या लेखिका मिस् ॲलीस् गेट्टी यांचें अनुमान आहे कीं हें दैवत द्राविडांनीं स्वतंत्रपणें निर्माण केलेलें असावें. तामीळ भाषेंत गणपतीला पिळ्ळैयर असें नांव आहे. पिळ्ळै म्हणजे बालक, पिळ्ळेयर म्हणजे अभिजात बालक पळ्ळु व पेळळ या द्राविडी शब्दांचा अर्थ दांत. हस्तिदंत या पाली शब्दाचा अर्थ हत्तीचें पिल्लूं. या शब्दांवरून लेखिका निष्कर्ष काढतात कीं गजमुख गणपति ही वन्य द्राविडांची एक स्थानिक देवता होती आणि आर्य संस्कृतीशीं संसर्ग होण्यापूर्वीच त्यांनीं ती उत्क्रांत केलेली होती.

जीवसृष्टींतल्या दुसऱ्या कोणत्याही पशूनें हत्तीएवढी मनुष्यावर छाप टाकलेली नाही. विशाल देह व विराट शक्ति, कुशाग्र बुद्धि व आजीव निष्ठा यांचें हें प्रतीक. म्हणूनच प्राचीन भारतीय मुद्रांवर, बुद्धसाहित्यांत आणि दंत-कथांमध्यें हत्तीला प्रमुख स्थान दिलेलें आढळतें; म्हणून गणपतीला देवपूजनांत अग्रस्थान मिळालें आहे. सिंह व वाघ हे दिसावयाला अधिक आकर्षक असले तरी ते स्वभावत: हिंस्र असल्यामुळें व त्यांना माणसाळवणें अशक्य असल्या-मुळें त्यांचा समावेश अतिवन्यांव्यतिरिक्त कोणाच्याही दैवतांत होऊं शकला नाहीं. म्हणूनच, मला वाटतें, नृसिंह हा अवतार विशेष लोकप्रिय झाला नाहीं. वाघ व सिंह यांवर मनुष्याला प्रभुत्व गाजवितां येत नाहीं. म्हणून ती शक्ति मनुष्यानें आपल्या दैवतांना दिली आणि या हिंस्र श्वापदांना त्यांच्या वाहनाचा दर्जा दिला. अश्व हें सेवा व चापल्य यांचें प्रतीक असलें तरी तो इतका माणसाळतो कीं त्याच्याबद्दल कोणालाही दरारा वाटत नाहीं; म्हणून हयग्रीवरूपी विष्णूला पूजास्थान प्राप्त झालें नाहीं. ग्रामदैवतांमध्यें व खुद्द रामायणांत मारुतीचें स्थान महत्त्वाचें असलें तरी आर्यांच्या व सुसंस्कृत नागरिकांच्या दैवतांत त्याचा दर्जा दुय्यम आहे. आर्यांचे अनार्यांशीं संघर्ष झाले; पण एकमेकांचा उच्छेद करणें अशक्य आहे हें प्रत्ययास आल्यामुळें आणि दोघांनाही याच भूमींत नांदावयाचें असल्यामुळें त्यांनीं परस्परांशीं समेट केला. वैदिक दैवतें मागासलीं आणि पौराणिक दैवतें पुढें सरसावलीं हे याचें प्रत्यंतर. अनार्यांचें आर्यीकरण करतांना आर्यांनीं अनार्यांच्या दैवतांचेही आर्यीकरण केलें आणि त्यांपैकीं कांहींच्या गायत्री निर्माण केल्या. आपल्या

प्रतिष्ठेच्या कक्षेबाहेरच्या वन्य व स्थानिक ग्रामेशांचा समावेश आर्यांनीं आपल्या देवताच्या विराट समूहांत करून घेतला, त्यांच्या विषयींच्या प्राथमिक कल्पना संकीर्ण केल्या व प्रचलित दंतकथा अधिक आकर्षक केल्या. जंगली जमातींची गजशिला, असंस्कृत शेतकऱ्यांचा कृषिदेव आणि नागरिकांचा द्वारपाल, बौद्धांचा लम्बोदर यक्ष व आर्यांचा बृहस्पति यांच्या संमिश्रणांतून गणपतीचें पौराणिक स्वरूप उत्क्रांत झालेलें आहे असे या विवेचनावरून दिसून येईल.

गणपतीच्या मूर्ति केव्हापासून रूढ झाल्या ? या बाबतींत डॉ. भांडारकरांनीं केलेल्या विधानानंतर बरेंच संशोधन झालेलं आहे. मिस् गेट्टी यांच्या प्रबन्धाच्या प्रस्तावनेत प्रो आल्फ्रेड फ्राउशर सांगतात.

The almost complete absence of ancient documents relating to Ganeśa is somewhat disconcerting. Yet must one necessarily succumb to the habitual failing of the philologist whose learned candour leads one to infer that all things have their beginning from the time of their first mention in the texts? Such a conclusion would be absurd... One must be as short sighted as a bookworm to deduce from the lack of any mention of Ganeśa in the early epics, that the God did not exist before the fourth or fifth century of our era... Whoever is experienced in the ways of that country knows well that by then the Elephant-god had already behind him century upon century, if not thousands of years, of silent waiting at the foot of the sacred tree of the pre-Aryan village, standing on the roughly built platform which he shares, with the other rustic deities... Those more or less shapeless stones, once bathed in the blood of human victims and today still smeared with vermilion were so deeply rooted in an unfathomable past that the aristocracy of the new gods, introduced by the immigrant Aryans, were compelled to adopt them in some form or other. Had they not come to terms with them they would soon have found themselver estranged from the worship of the populace and their priests deprived of

gifts and followers. It is probable that the Brahmins, the chosen interpreters of the Divine Will, submitted to this but reluctantly; yet, as Manu himself must admit, 'in all things, necessity constitutes law'. (गणेशः प्रस्तावनाः पृ. १७)

प्राध्यापक महाशयांच्या विधानांचा गाषवारा असाः " गणेशाचा उल्लेख आद्य ग्रंथांत नाहीं, हें खरें; पण पहिला उल्लेख आढळतो तेथेंच त्याची उत्पत्ति झाली असें मानणें अदूरदृष्टीचें व हास्यास्पद ठरेल. पढीकपण्डित हे ग्रंथाधारांचे बाबतींत बाळवीइतके अदूरदृष्टि आसतात. ग्रांथिक आधाराचे अभावीं चवथ्या किंवा पांचव्या शतकांपूर्वी गणपति अस्तित्वांतच नव्हता असें मानणें योग्य होणार नाहीं. त्यापूर्वी कितीतरी शतकें तो ओबड धोबड स्वरूपांत अस्तित्वांत असला पाहिजे. या काळांत त्याचें वास्तव्य वटवृक्षाच्या पारावरील ग्रामदेवतांमध्यें असावें. त्याच्या मूर्तीवर शेंदूर चोपडण्यांत येतो, हा रुधिराभिषेकाचा अवशेष असावा हिंदुस्थानांत वसाहतीसाठीं आलेल्या आर्यांनीं अशा स्थानिक दैवतांचा समावेश आपल्या दैवतांत करून घेतला नसता तर ते बहुजनसमाजाच्या धर्मभावनांशीं समरस होऊं शकले नसते." आर्यांनीं ही प्रथा कनिष्ठ सांस्कृतिक पातळीवर असलेल्या बहुसंख्य अनार्यांच्या अनुरंजनासाठीं केली कीं त्यांच्या आर्यीकरणाच्या नियोजित कार्यक्रमानुसार, हा मुद्दा विवाद्य आहे.

या चर्चेच्या अनुरोधानें गाथासप्तशतींतील गणपतीकडे पाहिलें असतां केवळ या उल्लेखांवरूनच हा ग्रंथ अर्वाचीन ठरवितां येणार नाहीं या मुद्याबाबत पढीक पण्डितांचेंही समाधान होईल अशी मला आशा आहे. प्राध्यापक महाशयांच्या विधानांतील "at the foot of the sacred tree—" 'पवित्र वृक्षाच्या पारावर' या शब्दांकडे मी वाचकांचें लक्ष मुद्दाम वेधूं इच्छितों, कारण गाथा सप्तशतींतील गणपतीचा उल्लेख असाच आहे. विशेषतः दक्षिण हिंदुस्थानांत अशा ओबडधोबड गणपतींच्या मूर्ति उघड्यावर, रस्त्याच्या कडेला चबाऱ्यांवर, वृक्षांखालीं किंवा त्यांच्या पारांवर नागशिलांचे जोडीनें मांडलेल्या असतात असें श्री. राव यानीं (पूर्वोक्तः भाग २, पोटभाग १. पृ. १७७) दाखवून दिलें आहे.

गणपतीबद्दल ज्ञानकोशकारांनीं (ग. २४) काढलेला निष्कर्ष येथें देतों: " ही देवता वेदपूर्वकालीन आहे. वेदांत मांत्रसंस्कृतीच्या देवता आहेत व पुराणांत

सूतसंस्कृतीच्या देवता आहत. सूतसंस्कृति मांत्रसंस्कृतीहून जुनी आहे आणि मांत्रधर्म नष्ट होण्यापूर्वी श्रौतसंस्था या स्वरूपांत विकास पावला आणि या विकास कालीं मांत्रसंस्कृति आणि सूतसंस्कृति यांचें म्हणजे वैदिक व पौराणिक धर्मांचे एकीकरण हात होत आणि यामुळें मैत्रायणीसारख्या संहितांतून पौराण-दैवतांचा उल्लेख येतो. पण त्या पौराण दैवतांचं अस्तित्व त्याहूनहि जुनें आहे."

येथवर केलेल्या विवेचनाच्या अनुरोधानें गाथासप्तशतींतील उल्लेखाची तपासणी केली असतां दिसून येते का यथाल गणपति व गणाधिपति हा वैदिक, बौद्ध किंवा पौराणिक नाहीं आणि तांत्रिक किंवा उच्छिष्ट तर नाहींच नाहीं. भव-भूतीनें मालती माधवांत गणपतीला नमन केलेल आहे हें वर्णन उत्तरकालीन व संकीर्ण आहे. त्याशों तुलना केली असतां येथील गणपतीच स्वरूप प्राचीन अस-ल्याचें पटत. उच्छिष्ट गणपतीचे उपासक सुरतप्रवृत्त दैवताचें ध्यान करतात, हें खर, पण एवढ्यावरून क ३७२ मधील गणपतीचा उल्लेख शाक्त ठरत नाहीं. गणपतीची मूर्ति उशाला घेऊन स्त्रीनें संभोगाला प्रवृत्त व्हावें, असा विधि उच्छिष्ट गणपतीच्या बाबतींत कोठेंही सांगितलेला नाहीं. गांवाच्या शिवेपली-कडच्या वडाच्या झाडाखालीं तारुण्यांत शिदळकी करणाऱ्या एका उनाड स्त्रीनें वृद्धपणीं हे उद्गार काढलेले आहेत. गणपतीची मूर्ति तिनें जाणून बुजून किंवा विधि म्हणून उशाला घेतलेली नाही. यासाठीं तिला नागशिलाही चालली असती. शिवाय गणपतीची शाक्त किंवा ब्राह्मणी मूर्ति उशीसारखी वापरणें अशक्य आहे. यासाठीं अनुभवाची किंवा संशोधनाची जरूर नाहीं. नायिकेनें उशीसाठीं वापरलेली मूर्ति सपाट शिला असावी, या शिलेवर कांहीं आकृति कोरलेली असलीच तर ती अगदीं प्राचीन व प्राथमिक अवस्थेतील असली पाहिजे हें उघड दिसतें.

क. ४०३ या गाथेंत गणपतीनें सोंडेनें पाणी ओढून समुद्र कोरडा केल्याचा व त्यामुळ वडवाग्नि भडकल्याचा उल्लेख आहे. पुरुषार्थाच्या गणेशांकांत (भाद्र-पद १८५७) 'गणपतीच्या सहस्रनामांचा अभ्यास' या लेखांत गणपतीच्या अब्धिभूम्यग्निबलघ्न, समुद्रमथन व कराहतिध्वस्तसिंधुसलिल या नांवांचे विवरण करतांना सांगितलें आहे की हा समुद्रावरील शत्रूंच्या आग्नेय बलाचा नाश करण्यास समर्थ असल्यामुळे त्याला हीं नांवें मिळालेली आहेत. समुद्रांत अग्नि

असल्याचा उल्लेख ऋग्वेदांत व महाभारतांत आहे. पण तेथें किंवा अन्यत्र त्याच्याशीं गणपतीचा संबंध आलेला मला आढळला नाहीं.

श्री. वेबर यांनीं वापरलेल्या दहा भिन्न हस्तलिखितांपैकीं नऊ प्रतींत क्र. ३७२ आणि सात प्रतींत क्र. ४०३ या गाथा आलेल्या आहेत. यावरून क्र. ४०३ ही गाथा हालाच्या मूळ संग्रहांत समाविष्ट नसावी असा प्रा. मिराशी (युगवाणीः मार्च १९४६) यांचा अंदाज आहे. क्र. ४०३ ही गाथा मला तेवढी संशयास्पद वाटत नाहीं.

क्र. ३७२ या गाथेंतील गणपतीचा पण्डितांनीं रंगविलेला वाद मूळ गाथेच्या पहिल्या ओळीचे पाठभेद विचारांत घेतले असतां सहज समळ सुटणार आहे. हे पाठभेद असेः

जो सीसम्मि विइण्णो मज्झ जुआणेहि गणवई[1] आसि[2]।

१ वटजक्खो, वडवक्खवे, वडरुक्खे = वटयक्षो, वटवृक्षो.

२ साधारणदेवाच्या प्रतींतील पाठ वडजक्खो जो महु सीसअम्मि दिण्णो पउरयुआणेहि। भाण्डारकर इन्स्टिट्यूटमधील भुवनपालाच्या हस्तलिखितांत आहे तो पाठ असाः वडजारको जो उस्सिसयम्मि दिन्नो मुहं जुवाणेहिं।

या गाथेवरील टीकेंत वटयक्षाबद्दल साधारण देव सांगतोः वटयक्षः वटतले स्थापितः क्षेत्रपालादि प्रतिमा। तेलंग प्रतींतील टीका समानार्थी आहेः पूर्वम् यौवनदात् वटस्य अधःस्थिते यक्षागारके या यक्षप्रतिमा उपाधानीकृत्य युवभिः समं बहुलकालं सुरतसुखं अनुभूय, इदानीम् विगलित यौवनमदा तामेव दैवतमिति पूजयामि।

वटवृक्ष हें सुरक्षित व सोइस्कर संकेतस्थान असल्याचा उल्लेख क्र. ९४ या गाथेंत आलेला आहे. वडाला अनेक पारंब्या असतात व त्याची छाया थंडगार व अंधेरी असते. वडाचीं झाडें बहुधा गांवाबाहेर, निर्जन भागांत किंवा नदीच्या वाटेवर असतात; म्हणून दिवसाउजेडींही संगमोत्सुक प्रेमिकांना या स्थानाचा आश्रय प्रिय वाटे; विशेषतः ग्रामीण हलिकांना व पशुपालकांना. हिंदुस्थानांत वृक्षपूजा फार प्राचीन काळापासून सर्वत्र प्रचलित आहे. ‘कठड्यांतलें झाड’ (Tree in Railing) हें चिन्ह अनेक प्राचीन मुद्रांवर आढळतें. वटपौर्णिमे-सारखे सण हें या प्रथेचें मध्ययुगीन स्वरूप आहे. यामुळें स्त्रियांनाही या

स्थानांचा आश्रय सुलभ असे. क्षेत्रपालादि ग्रामदेवतांच्या शिला बहुधा पारावर वडाच्या बुंध्याला लावून ठेवलेल्या असतात. यक्षपिशाचादि बऱ्यावाईट दैवतांची वस्तीही अशाच जागीं असते. फार प्राचीन काळापासून यक्ष हे भारताच्या ओळखीचे आहेत. ऋग्वेद व अथर्ववेद आणि ब्राह्मणें व उपनिषदें यांत त्यांचे उल्लेख आढळतात. श्री. हीलब्रँट सांगतात कीं ही संज्ञा आरंभीं मानवाच्या आध्यात्मिक शत्रूंची द्योतक होती; नंतर तिला अलौकिक सामर्थ्य व उच्च चारित्र्य प्राप्त झालें. यक्षांचे तीन प्रकार आहेतः श्री, कुबेर व कामदेव यांसारखीं सर्वमान्य दैवतें; शाक्यवाहन व सातगिरी यांसारखीं देशांचीं व कुलांचीं दैवतें; स्थानिक दैवतें, ज्यांचें कर्तृत्व ग्रामसंमच्या किंवा त्यांनीं आश्रय घेतलेल्या वृक्षाच्या कक्षेच्या बाहेर प्रत्ययास येत नाहीं. स्थानिक यक्ष स्त्रियांच्या चारित्र्यावर नजर ठेवतात आणि कधीं स्वतःच कुमारिकांना भोगतात (उत्तराध्ययन चूर्णिः पृ. ८९). किती जणांनीं या समजुतीचा फायदा घेतला असेल तें यक्षच जाणोत !

भटक्या टोळ्यांचे देव स्थानिक व स्थायिक नसतात (Keith : Religion & Philosophy of the Vedas : p.181). असल्याच तर अशा देवांच्या मूर्ति प्रतीकात्मक, वजनांत हलक्या व हलवितां येण्यासारख्या, म्हणून आकारानें आटोपशीर अशा असल्या पाहिजेत. यक्ष व यक्षी यांच्या अजस्र व सुंदर मूर्ति कोरण्याची प्रथा मौर्य कालांत सुरू झाली. मात्र अशा मूर्ति विशेष विख्यात अशाच स्थानीं आढळणार हें उघड आहे. भटक्या टोळ्या स्थायिक होऊन शेती करूं लागल्या म्हणजे क्षेत्रपालादि स्थानिक व स्थायिक दैवतें निर्माण होतात. जसे लोक तसे त्यांचे देव. या न्यायानें खेडवळांचे देव ओबडधोबडच असणार. मग ती मूर्ति आर्यांच्या संसर्गानें उत्क्रांत झालेल्या गणपतीची असो किंवा आदिवासींना भयप्रद म्हणून पूज्य वाटणाऱ्या नागांची असो. अशा दैवतांच्याशिला आज ही खेड्यांपाड्यांतून आढळतात. गाथासप्तशतींतील प्रस्तुत उल्लेखाला अभिप्रेत असलेला वटयक्ष अशाच स्वरूपाचा असला पाहिजे.

राज्यपाल सातगिरी यक्षापासून सातवाहनांचा संभव झाला असा एक सिद्धांत आहे. सातवाहनांना गणपति हें दैवत त्याच्या विविध स्वरूपांत माहीत असलें पाहिजे. ढेरपोट्या यक्षांच्या अनेक मूर्ति उत्खननांत उपलब्ध झालेल्या आहेत. गणपतीही यक्षजन्य व गजरूप असल्यामुळें त्याचें

हें लक्षण याला मिळालेलें आहे. सातव्या सातवाहन राजाचें नांव लम्बोदर असें आहे. हें नांव त्याला त्याच्या पोटाच्या आकारावरून मिळालें असावें असें अनुमान करतां येणार नाहीं.

प्रजापती=पआवई : क्र, ९६३; ब्रह्मन्=बह्मः क्र. ८१०; विहि : = विधि क्र. २०७; २३५, ४२५, ९७६. क्र. ६५६ व ७८३ या गाथांत विधि हा शब्द दैव या अर्थानें आलेला आहे. वेदांतील उल्लेखांनुसार (ऋ. १०.१२१) विधि हा सृष्टीचा निर्माता. म्हणूनच क्र. ९८० या गाथेंत त्याला ठेर-स्थविर म्हटलेलें आहे. त्याचे उल्लेख व श्रेय हीं उत्तरकालीन दिसतात. ब्रह्मदेवाची निर्मिति याच्याही नंतर झालेली आहे. ब्राह्मण व सूत्र वाङ्मयांत प्रजापतीला विशेष महत्त्व प्राप्त झालेलें दिसतें. या काळांत प्रथम ब्रह्मदेव व बृहस्पति (ऐ. ब्रा. १.१९) आणि नंतर प्रजापति व ब्रह्मदेव एकरूप (आ.गृ. सू: ३.४) झालेले दिसतात. ब्राह्मणकारांनीं प्रजापति अनेक कल्पिले आहेत. क्र. ९६३ या गाथेंत याच कल्पनेची सूचना आहे. येथें वर्णिलेलें त्याचें कार्य क्र. २०७ मधील विधीच्या कार्याशीं सदृश आहे. प्रजापति व ब्रह्मदेव, दोघेही लंपट. प्रजापति हा स्वतःच्या कन्यांवर मोहित झाल्याच्या कथा ऐतरेय (३.३३; ५.२) व शतपथ (१.७.४) ब्राह्मणांत आलेल्या आहेत. पण तीं उघड रूपकें आहेत. प्रत्यक्ष पिता संभोगार्थ मृग रूप धारण करून मृगी रूप धारण केलेल्या कन्येच्या मागें लागलेला पाहून रुद्र खवळला आणि त्याच्यावर बाण सोडण्यासाठीं नेम घेणार तोंच प्रजापतीनें विनवणी केली व पशुपति करण्याचें आश्वासन दिलें म्हणून रुद्रानें त्याचा वेध केला नाहीं अशी कथा आहे आणि ती मृग, रोहिणी व व्याध यांना अनुलक्षून आहे. ब्रह्मदेवही असाच. यानें आपल्या अर्धांगापासून शतरूपा नांवाची रूपवती स्त्री निर्माण केली. ती याला प्रदक्षिणा घालूं लागली. तेव्हां तो मोहित झाला. मानसपुत्र भोंवतीं असल्यामुळें तिच्याकडे मान वळवून डोळे भरून पाहतां येईना, म्हणून यानें चार बाजूंना शिरें निर्माण केलीं आणि ती आकाशमार्गे निघाली तेव्हां वर आणखी एक जटाधारी पांचवें शिर निर्माण केलें. हें शिर शंकरानें डाव्या पायाच्या आंगठ्याच्या नखानें खुडलें. एकदां ब्रह्मदेवानें प्रभासक्षेत्रीं यज्ञ केला. त्याची पत्नी सावित्री यज्ञमंडपांत वेळेवर आली नाहीं. यज्ञकर्मास विलंब होऊं नये म्हणून याच्या सांगण्यावरून

इंद्रानें एक गवळ्याची पोर आणली. ती गायत्री या नांवानें ब्रम्ह्याची स्त्री झाली. या यज्ञांत शंकरानें बरीच धामधूम करून मानाचें स्थान मिळविलें. यज्ञसमाप्तीच्या सुमारास सावित्री तेथें आली. झाला प्रकार पाहून ती खवळली. तुझी कोणी पूजा करणार नाहीं, असा तिनें ब्रम्ह्याला शाप दिला. तुम्ही लोभी व परान्नपुष्ट व्हाल, पाप्यांकडेही यज्ञाला जाल आणि द्रव्यसंचयासाठीं यत्न कराल असा तिनें ब्राह्मणांना शाप दिला. ती यज्ञमंडपांतून निघून गेल्यानंतर गायत्रीनें या शापितांना वर दिले. ही कथा स्कन्द पुराणांत (७.१.१६५) आहे. प्रजापति व ब्रह्मदेव यांचे, ब्राह्मणांचें व त्यांच्या या देवांचें माहात्म्य नष्ट झालें आणि त्यांचा उच्छेद सामान्य पशुपालांच्या पशुपति या देवानें केला आणि प्रत्यक्ष ब्रह्मदेवाला गवळ्याची पोर पत्नी म्हणून स्वीकारावी लागली, या कथाभागावरून ब्राह्मणांचें ओसरतें व सामान्य जनांचें वाढतें सामर्थ्य प्रत्ययास येतें. गाथासप्तशतींत या देवतांना पूजेचा मान नाहीं आणि त्यांचें कर्तृत्व सांकेतिक आहे.

मदन : अणङ्ग=अनङ्ग : क्र. २३३ (-निवास), २६० (-गज) ७४२ (-बाण), ९९४ (-शर), **काम** : क्र. १४८, १७७. (गुडिआधणु=गुटिकाधनु), ३२६ (-शर), ४७३ (-चाप), ५८५ (हत्थमल्ल=हस्तमल्ल), ९४३ (आउह =आयुध) चाप : क्र. ४७३, ९८६ **कुसुमचाप** क्र. ९८६ **कुसुमबाण** क्र. ९८२; **कुसुमाउह**=कुसुमायुधः क्र, ९४६; **मअण-मयण**=मदन क्र. २१० (-शर) ३९५ (-बाण) ३८१ (-शर), ४४१ (-बाण) ५४४ (-उत्सव) ५७२ (-अग्गी=अग्नि) ५८१ (-छुहा=क्षुधा) ७५८ युद्ध ८०७ (-मुद्दा=मुद्रा) ९८६ (-चाप), **मअरद्धअ**=मकरध्वज क्र. १०१; **वम्मह**=मन्मथ क्र. ७७६, ८८४ (-विलास), ९४८ **सर**=स्मर क्र. ९९२.

काम हा ब्रह्मदेवाचा पुत्र. तो त्याच्या हृत्कमलापासून निर्माण झाला. ऋग्वेदांत (१०.१२९) सांगितलें आहे, प्रथम मनोरूप बीज उत्पन्न झालें आणि मनाचे ठायीं काम उत्पन्न झाला. अथर्ववेदांत (३.२५) कामदेवाचा मंत्र आहे: "कामशर प्रखर आहेत; त्यांना आसक्तीचा दंड आहे, उत्कण्ठेचे पंख आहेत व संकल्पाचा कण्ठ आहे. त्यांनीं तुझें हृदय विद्ध केलें म्हणजे त्यांच्या प्रखर उष्णतेनें तुझे ओंठ कोरडे होतील, जणूं मी चाबकाने फटकारल्याप्रमाणें तूं आपला पिता

व पति यांचा त्याग करून मजकडे येशील, तुझी प्रतिकारशक्ति नष्ट होईल व तूं मला वश होशील. " तारकासुरानें तप केलें व अमरत्व मागितलें असतां ब्रह्मदेवानें हें नाकारलें व सात दिवसांच्या शिशुहस्तें मरण येईल असा त्याला वर दिला. यामुळें तो मस्त झाला. शंकराच्या औरस पुत्राच्या हातून मरण यावें असा देवांचा सङ्केत होता. या वेळीं शंकर विधुर होता. त्याची प्रथम पत्नी सती हिनें दक्षयज्ञांत देहत्याग केला होता. पुढें तिनें हिमालयाच्या पोटीं जन्म घेतला. सतीच्या वियोगामुळें शिवाचें कामचैतन्य नष्टप्राय झालें होतें. शंकर-पार्वतींचा परिणय व्हावा एतदर्थ देवांच्या विनंतीवरून कामदेवानें शंकराला शरविद्ध करून त्याच्या चित्तांत कामप्रेरणा निर्माण करण्याचें मान्य केलें यानें बाण सोडला. त्याला संवेदना होतांच त्यानें खवळून तृतीय नेत्र उघडला. त्याच्या प्रखर तेजानें कामदेवाच्या शरीराचें भस्म झालें. पण देवांचा हेतू साधला. शंकरपार्वतींचें प्रेम जमलें, त्यांचा विवाह झाला, त्यांच्या पोटीं स्कन्द आला व त्यानें तारकासुराचा वध केला. क्र. ७५८ या गाथेंत मदन-शंकर युद्धाचा उल्लेख आहे. तेव्हां पासून काम हा अनङ्ग झाला. याला अङ्ग नसलें तरी ज्यांना तें आहे त्यांच्याहून याचें सामर्थ्य अधिक आहे. याला मदनराज (क्र. ८०७) म्हटलेलें आहे यानें त्रैलोक्य (क्र. ९८६) जिंकलें आहे. याला शरीर नाहीं, तरी त्याच्या आगमनाची चाहूल लागतांच स्तन वृद्धिंगत होतात (क्र. ९४८) आणि ही आपल्या कर्तृत्वाची खूण म्हणून मदनराज त्यावर मोहोर (क्र. ८०७) करतो! कवींनीं कल्पिलें आहे कीं स्मराचा वर्ण श्यामल (क्र. ९९२) आहे, त्याचें धनुष्य कुसुमांचें (क्र. ९४६) आहे आणि बाणही कुसुमांचेच आहेत. कोणी सांगतात हें धनुष्य नागकेशराच्या फांदीचें असतें (Chandra Chakravarty : Cultural History of the Hindus : p 370) आणि रतिरहस्यकार (१–१) सांगतात, तें उंसाचें असतें व त्याची दोरी भ्रमरपंक्तीची असते. त्याचेपाशीं पांच बाण असतात. क्र. १७५ मध्यें कामाला गुटिकाधनु म्हटलेलें आहे. कोणी सांगतात—

अरविंदमशोकं च चूतं च नवमल्लिका।
नीलोत्पलं च पञ्चैते पञ्चबाणस्य सायकाः॥

पैकीं क्र. ९९४ मधील शराग्रीं आम्रमंजिरी आहे. हे शर मृदु खरे, पण ते असे विलक्षण कीं (क्र. ३२५, ३२६) त्यांची प्रखरता स्पर्शापूर्वी असह्य

वाटते आणि त्यांनीं झालेली जखम सुखावह! मदन हा पुष्पधन्वा व त्याचे शर कुसुमांचे, कारण रतीचें सुगंधाशीं साहचर्य आहे. क. ५८५ मध्यें त्याच्या हातीं माला आहे. कपोत हें त्याचें वाहन आणि त्याच्या ध्वजावर मकर (क. १०१) हें चिन्ह; कपोत, कारण सदैव कूजन करणारा कपोत हा खरा कामवेडा आहे. आणि मकर, कारण त्याचे अंगीं विलक्षण कामसामर्थ्य आहे. अशी समजूत आहे.

पुराणांत कोठें सांगितलें आहे कीं मदन हा विष्णु व लक्ष्मी यांचा पुत्र. लक्ष्मी समुद्रमंथनांतून निर्माण झाली तशीच ग्रीकांचा मदन इरॉस याची आई अफोडीट ही समुद्राच्या फेसांतून प्रकट झाली. रोमन मदनाची माता व्हीनस् ही रतिदेवता आहे, सबब लक्ष्मीसारखी सती नाहीं, ती अनेक देवांशीं रत होते म्हणून असती आहे. मदनाची पत्नी रति ही मात्र सती आहे! आपल्याकडे बदामी व वेरूळ येथें कामदेवाच्या मूर्ति आहेत.

राम व लक्ष्मणः राम, सौमित्ती = (लक्ष्मण): क. ३५. रामकथा मराठी वाचकांच्या चांगल्या परिचयाची आहे आणि येथे अभिप्रेत असलेलें वैशिष्ट्यही. लक्ष्मण हा सुमित्रेचा मुलगा, म्हणून त्याला सौमित्र म्हटलेलें आहे. लक्ष्मण हा आदर्श कनिष्ठ भ्राता. प्राचीन रिवाजाप्रमाणें वडील भावाच्या पत्नीवर अगर विधवेवर धाकट्या भावाचा डोळा व हक्क असावयाचा. म्हणूनच मायामृगाच्या प्रसंगीं सीता याला टाकून बोलली असावी. पण यानें तिच्याकडे मान वर करून पाहिलें सुद्धां नाहीं. पुढें ऋष्यमूक पर्वतावर वानरांनीं दाखविलेल्या सीतेच्या अलंकारांपैकीं नूपुर तेवढे यानें ओळखले. या वेळीं तो म्हणाला.

नाहं जानामि केयूरे, नाहं जानामि कुंडले।
नूपुरे त्वभिजानामि नित्यं पादाभिवन्दनात्॥

मी नेहमीं सीतामाईच्या पायां पडत असल्यामुळें मला तिचे नूपुर तेवढे ओळखतात. क. ३५ च्या नायिकेनें हाच प्रसंग भिंतीवर रंगविलेला असावा. क. ३११ या गाथेंत लंकेचा सांकेतिक उल्लेख आलेला आहे. गाथासप्तशतींतील रामाचा उल्लेख आदरपूर्ण आहे.

खि. पू. चवथ्या शतकांत रामकथा गाथांच्या स्वरूपांत अस्तित्वांत होती, त्यांवरून वाल्मीकीनें रामायण रचलें असें श्री विंटरनिझ यांचें मत (**History of Indian Literature: Vol I. pp. 509--510**) आहे. ही

कथा गाथासप्तशतीच्या काळांत रामायणाच्या स्वरूपांत महाराष्ट्राच्या बहुजन समाजाला अवगत होती हें या उल्लेखांवरून ठरतें. रामायणाच्या स्वरूपांत, असें म्हणण्याचें कारण हें कीं दशरथजातकांत रामकथा विकृत स्वरूपांत मांडलेली आहे. जातकांत सीता ही रामलक्ष्मणाची सख्खी बहीण आहे आणि राम व सीता यांचा विवाह तीं हिमालयांतील वनवासाहून परत आल्यानंतर झालेला आहे. दशरथ जातकांतील कथा जाणून बुजून विकृत आहे हें निःसंशय; कारण जयद्दिस जातकांत रामाच्या दण्डकारण्यांतील वनवासाचा आणि वेस्सतर जातकांत राम व सीता हीं पतिपत्नी असल्याचा उल्लेख आलेला आहे. नाशिकच्या पाण्डवलेण्यांतील गोतमी बालश्रीच्या लेखांत (नाशिक गॅझेटीयरः पृ. ५५० ते ५५४) रामाच्या पराक्रमाचा व तेजाचा उल्लेख आलेला आहे. या वरूनही वरील अनुमानाला बळकटी येते. पातिव्रत्य व एकपत्नीव्रत यांचीं प्रतीकें म्हणून सीतारामांच्या भक्तीचा पंथ मात्र उत्तरकालीन असून तो व्यभिचारी राधाकृष्णांच्या विकृत स्वरूपांत प्रचलित झालेल्या भक्तिपंथाला आव्हान म्हणून अस्तित्वात आला असावा.

वामनः वामण = वामन = क. ४०६ ४२५; याशीं संबद्धः त्रिविकम = क ४११; बलिः क: ४०६; समुद्रमंथन · क. (खीरोअ) ११७, दुद्धसमुद्द ३८८, ४७५; अमृतः क. ४९३; कौस्तुभः क. १५१.

वामन हा विष्णूचा पांचवा अवतार. हरि व विष्णु हे एकच. हरीचा वामन हा अवतार, याची गाथाकवींना स्पष्ट कल्पना (क. ४०६) आहे. विष्णूनें तीन पावलांत जग व्यापलें व जेथें पाऊल ठेवलें तेथें सद्धर्माची स्थापना केली असा उल्लेख ऋग्वेदांत (१. २२.१७-१८) आलेला आहे. येथें बळीचा उल्लेख आलेला नाहीं. यज्ञप्रसंगीं देव व दैत्य यांचें जागेबद्दल भांडण झालें असतां वामनाचे आकाराएवढी जागा त्यांना देण्याचें दैत्यांनीं कबूल केलें, तेव्हां विष्णु जमीनीवर निजला व पडल्या पडल्या एवढा वाढला कीं त्यानें सर्व पृथ्वी व्यापून टाकली, अशी कथा ऐतरेय ब्राह्मणांत आलेली (६.२.५) आहे. तैत्तरीय संहितेंत सांगितलें आहे कीं (२.१.३; २.४.१२.२) बळीनें घेतलेलें राज्य वामनानें इंद्राला परत मिळवून दिलें. बळी हा दैत्यांचा राजा, हिरण्यकशिपूचा पणतू. त्याला नृसिंहानें ठार केलें व याला वामनानें नामोहरम केलें या वरून या दोन अवतारांत दोनच पिढ्यांचें अंतर दिसतें. बळीचा पुत्र बाणासुर व

त्याची कन्या उषा. हिच्याशीं कृष्णाचा नातू अनिरुद्ध यानें गांधर्वविधीनें विवाह केल्यावरून दैत्य व यादव यांमध्यें युद्ध झालें. या युद्धांत कृष्णानें भाग घेतला होता. वामन व कृष्ण यांमध्यें परशुराम व राम हे दोन अवतार होऊन गेले. अवतारांच्या योजनेनुसार या दोघांना आपआपलें अवतारकार्य करण्यास काळाची फारशी सवडच रहात नाहीं. शुक्राचार्यांच्या सांगण्यावरून यानें स्वारी करून स्वर्गाचें राज्य मिळविलें. यानें इंद्राची संपत्ति हरण केली, पण तो ती नेत असतां ती समुद्रांत पडली. ती बाहेर काढण्यासाठीं विष्णूच्या सूचनेवरून देव याला शरण आले म्हणून दैत्यांनीं देवांशीं सहकार्य करून समुद्रमंथन केलें. मंथनाच्या सुरुवातीस देवांनीं दैत्यांना मंदर पर्वताभोंवतीं गुंडाळलेल्या नागराजाच्या मुखाची बाजू देऊन त्यांना विशेष उपसर्ग होईल अशी युक्ति केली आणि अखेरीस रत्नें त्यांच्या हातीं लागूं दिलीं नाहींत, इतकेंच नव्हे, अमृताच्य बाबतींतही त्यांची वंचना केली. या मथनांतून चौदा रत्नें निघालीं, असें कांहीं आधार सांगतात आणि कांहीं चोवीस रत्नांची यादी देतात. या रत्नांचा (क्र. ४७५) व त्यांपैकीं अमृत, कौस्तुभ व लक्ष्मी यांचा उल्लेख गाथासप्तशतींत आलेला आहे. कौस्तुभ हा चिंतामणि विष्णूनें हृदयावर धारण केला आणि त्यानेच लक्ष्मीचाही स्वीकार केला. अमृताचे बाबतींत फसगत झाल्यामुळें देव व दैत्य यांचं मोठें युद्ध झालें. या युद्धांत इन्द्रानें वज्र फेकून बळीचा वध केला. पण शुक्राचार्यानें त्याला सजीव केले. यानंतर यानें पुन्हां स्वर्ग जिंकला व विजयोत्साहार्थ शंभर अश्वमेध केले. नर्मदातीरीं भृगुकच्छ येथे अखेरचा यज्ञ चालू असतां विष्णु वामनरूपांत यज्ञस्थानीं आला. बळीनें त्याची पूजा केली व कांहीं तरी मागावें अशी त्याला विनंति केली. वामनानें तीन पावलें जमीन मागितली. शुक्राचार्यानें अतिथीचें कपट ओळखलें व बळीला सूचना दिली. ती झिडकारून यानें वामनाच्या हातावर उदक सोडलें. लगेच वामनानें विराट् स्वरूप धारण केलें व दोन पावलात ब्रह्माण्ड व्यापलें. हें पाहतांच कांहीं दैत्य वामनावर धांवले. बळीनें त्यांचें निवारण केलें. तोच प्रसंगाचें गांभीर्य ओळखून गरुडानें बळीला वरुणपाशानें बद्ध केले. नंतर वामनानें तिसरें पाऊल ठेवण्यास जागा मागितली. यावर बळी म्हणाला, तूं कपटाने मोठा झालास, माझें वचन फिरणार नाहीं. नंतर वामनाला पाऊल ठेवण्यासाठीं बळीनें त्याच्यापुढें मस्तक नमविलें. मग वामनानें त्याच्या मस्तकावर पाय ठेवला. त्यामुळें बळी पाताळांत

दडपला गेला. नतर वामनानें बळीचें राज्य मनुपुत्रांना दिलें व दैत्यांना हांकून लावलें. बळी हा चिरंजीव आहे. तो तेव्हांपासून पाताळांत बायकांबरोबर फांसे खेळत बसला आहे. त्रिविक्रमाचीं तीन पावलें हीं सूर्योदय, माध्याह्न व सूर्यास्त यांचीं द्योतक असावींत असें कांहीं संशोधकांचें म्हणणें आहे.

शंकरः गौरी-हृदयदयितः क्र. ४६७, **पसुवइः क्र.** १,६९; **पमहादिव= प्रमथाधिप.** क्र. ४४८; **रुद्द=रुद्रः** क्र. ४५५; **वासुकीः** क्र. ६९; **हरः** क्र. ७००. ७५८.९८५: ऋग्वेदांत रुद्रावर तीन सूक्तें आहेत. तेथें त्याचें स्वरूप लोकोपकारक (१.११४.३) आहे आणि लोकघातक (१.११४.१०) ही. त्याला गाथापति, पशुपति (अथर्वः ११.२.९;शतपथः १ ७.३.८)व त्र्यंबक(७.५९.१२) म्हटलेलें आहे. प्रजापतीनें दुहितृगमन केलें तेव्हां रुद्र त्याला शिक्षा करण्यासाठीं धांवला असतां त्याला पशुपतित्व प्राप्त झालें. शिवाचें वाहन हें त्याच्या पशुपतित्वाचें द्योतक आहे (ऐ ब्रा. : ३.३३). त्र्यंबक याचा अर्थ कोणी त्रिनेत्र असाही करतात. ब्रम्ह्याने निर्माण केलेल्या अप्सरेकडे हा मोहित होऊन पहात आहे असें दिसतांच पार्वतीनें त्याचे डोळे झांकले, तेव्हां याच्या कपाळावर तिसरा डोळा (स्कन्दः ६.१५३) निघाला. प्रमथ हा एक गण असून रुद्र हा त्याचा अधिपति आहे. रुद्राचें प्रमथाधिप हें अभिधान गुप्त कालानंतर लुप्त झालें. वेबरनें पमहादिव व डॉ. गोपालाचारि यांनीं (Early History of Andha Country, p. 128) परमहादिव = परमताधिप असे पाठ दिलेले आहेत. याची वृत्ति तामस असून हा गजचर्मासारखें अमंगल व वासुकीसारखे भयप्रद पदार्थ धारण करतो. कापालिक हे याचे अनुयायी. तपश्चर्या करीत असतां मदनानें याच्या चित्तांत विकार निर्माण केला, म्हणून यानें आपल्या तृतीय नेत्रांतील अग्नीनें त्याला जाळलें. हा अमंगल व शिश्नदेव, म्हणून ब्रह्मदेवादि शिष्ट देव याला हीन लेखीत दक्ष हा याचा सासरा. उच्चनीच भावाच्या अभिनिवेशानें त्यानें याचा अपमान केला, तेव्हां यानें त्याचा यज्ञ उध्वस्त केला व त्याचा वध केला. ब्रह्मदेवाच्या यज्ञांत यानें जबरदस्तीनें मानाचें स्थान मिळविलें. यानें त्रैलोक्यांतील गंधर्व व किन्नर यांच्या स्त्रियांवर मोहिन्यस्त्रप्रयोग करून त्यांसह कैलासावर क्रीडा केली. हें समजतांच पार्वतीनें त्यांना चोपलें व शाप दिला. म्हणून त्या चांडाळ व म्लेच्छ योनींत जन्माला आल्या. या कथा व त्यांत नमूद झालेली लक्षणें यांवरून रुद्राच्या उत्क्रांतींतील कांहीं टप्पे ओळखतां येतात. रुद्र हा शिष्ट यज्ञ-

कत्यांचा देव; विनायकाप्रमाणेंच आरंभीं विघ्नकारक व नंतर विघ्नहारक, तामसी व विलासी. आर्यांच्या भटक्या टोळ्या स्थिरावल्यानंतर त्याला पशुपतित्व प्राप्त झालें. यामुळें व त्याच्या राहणीमुळें त्याचा दर्जा हिणावला व यज्ञादि समारंभांत त्याला जबरस्तीनें स्थान मिळवावें लागलें. मोहेंजो दारो येथें उपलब्ध झालेल्या अतिप्राचीन मृत्तिकामुद्रांवर योगींद्र पशुपतीची मूर्ति आढळते आणि सिंध प्रदेशांत उत्खननांत जागोजाग दगडी शिवलिंगें व योनि मिळालेल्या आहेत. सर जॉन मार्शल यांनीं या पशुपतीला प्रोटो-शिव अशी संज्ञा दिलेली आहे. यावरून या काळांत रुद्रपूजेचा लिंगपूजेशीं समन्वय झाला असावा असें दिसतें. डोंगरी प्रदेशांत शिवपूजा व मैदानी मुलखांत विष्णुपूजा प्रचलित असल्याचें मेगॅस्थेनिस (ईलियट : २·१३७) सांगतो. सम्राट् अशोक हा आरंभीं शैव (डॉ. स्मिथ : Early History of India : p. 185) होता. पतंजलीनें (५·२·७६) शिवभागवतांचा उल्लेख केलेला आहे. सातवाहनांचे समकालिन उत्तर हिंदुस्थानी सम्राट कुशान यांच्या नाण्यांवर शंकराची प्रतिमा आढळते. शिव हा बहुजनसमाजाचा देव होता आणि प्राचीन द्रष्ट्यांनीं योजिलेल्या आर्यीकरणाच्या संघटनेंत त्याला व त्याच्या अनुयायांना शिष्ट दैवतांत व समाजांत स्थान मिळालेलें असावें, असा यावरून निष्कर्ष निघतो. कान्हेरी, कार्लें, कुडा व जुन्नर येथील लेण्यांतील शिलालेखांत महादेव, शिव व स्कन्द या नांवांच्या अनेक व्यक्ति आढळतात. स्कन्द व शिव हीं नामांवें असलेले राजे खुद्द सातवाहन घराण्यांत (५ स्कन्दस्तम्भि, ११ स्कन्दस्वाति, २२ शिवस्वाति, २५ शिवश्री व २६ शिवस्कन्द) होऊन गेलेले आहेत. यावरून गाथासप्तशतीच्या काळांत शिवपूजा प्रचलित होती व शिवकथा लोकांना अवगत होत्या असा निष्कर्ष काढावयास प्रत्यवाय नाहीं.

शंकराची उभारणीच संकीर्ण आहे. वैदिक रुद्राचें रौद्र स्वरूप गाथासप्तशतींत राजस झालेले आहे. शंकर हा वृत्तीनें तामस खरा, परंतु दक्षकन्येच्या भावना सांभाळण्याविषयीं तो दक्ष (क. ६९) आहे; शंकर हा अपरिग्रह-वृत्तीनें स्मशानांत राहणारा, पण पार्वतीकडून प्रेरणा मिळतांच आपद्ग्रस्तांना त्यांची योग्यायोग्यता विचारांत न घेतां साह्य करण्याविषयींच्या त्याच्या तत्परतेबद्दलच्या अनेक कथा संस्कृत व प्राकृत वाङ्मयांत जागोजाग आढळतात. त्याची ही वृत्ति क. ४६७ या गाथेत व्यक्त झालेली आहे, म्हणूनच त्याला येथें

गौरीहृदयेश म्हटलेलें आहे असें वाटतें. संस्कृत सारस्वताच्या अभिजात कालात कालिदासानें वर्णिलेले शंकरपार्वतीचे विलास (क्र. ४५५) येथें मूल स्वरूपांत पहावयास मिळतात. शंकर हा जसा भोगी तसाच योगी; म्हणूनच त्याचें मदनाला आव्हान (क्र. ७५८) आहे. शंकर हा देवाधिदेव खरा, पण तोही सूर्याचें ध्यान करतो व गायत्री जपतो (क्र. १·४४८·७००), म्हणून हाल सातवाहन हा बाह्यतः शैव भासला तरी तो सूर्योपासक असला पाहिजे असें अनुमान होतें.

सूर्यः सूरः क्र १. ३४, ३३२, ६५३, ७०० : सर्व प्राचीन संस्कृतींनीं सूर्याला देवत्व दिलेलें आहे. सकाळीं, दुपारीं व संध्याकाळीं गायत्री मंत्राचा जप करून सूर्याचें ध्यान करावयाचें आणि त्याला अर्घ्य द्यावयाचे, हा त्रैवर्णिकाचा सन्ध्याविधि हिंदुस्थानांत वैदिक काळापासून (तै. आः २.२) प्रचलित आहे. प्रजापतीची कन्या संज्ञा ही सूर्याची पत्नी तिला सूर्याचें तेज सहन होईना म्हणून तिनें स्वत ची प्रतिमा अशी छाया ही स्त्री उत्पन्न केली आणि पतीची सेवा व मुलांचें पालन करावयाची कामगिरी तिजवर सोंपवून संज्ञा उत्तर कुरु देशांत अज्ञातवासांत राहूं लागली. छायेच्या सापत्न भावामुळें संज्ञेचें कृत्रिम सूर्याच्या लक्षांत आलें. या छायेचा क्र. ३४ या गाथेंतील छायेशीं कांहीं संबंध नाहीं सूर्य हा मूळचा अवयवहीन, त्याला त्वष्ट्यानें सुंदर रूप दिलें, पण तें कंबरेपर्यंतच दिलें. म्हणून याला अंतरिक्षांतलें दैनिक परिभ्रमण रथारूढ होऊनच करावें लागतें.

क्र. १६ या गाथेंत चंद्राला अमृतमय, गगनशेखर व रजनीमुखतिलक म्हटलेलें आहे : क्र ९८० या गाथेंत संध्या ही चंद्राची प्रिया असल्याचें सांगितलेलें आहे. पुराणांनुसार सन्ध्या ही ब्रह्मदेवाची मानसकन्या; देहत्यागानंतर ती अरुन्धती झाली. क्र. ९८० मधील सन्ध्येचा हिच्याशीं कांहीं संबंध नाहीं. चंद्र हा अमृतमंथनांतून निघाला. दक्षानें याला आपल्या सत्तावीस कन्या दिल्या. त्यांचीं नांवे पुढें नक्षत्रांना मिळालीं. त्याचा पुत्र बुध हा त्याला बृहस्पतीची पत्नी तारा हिजपासून झाला. चंद्र हा अंतरिक्षांतील नक्षत्रांचा व पृथ्वीवरील औषधींचा राजा. क्र. ३४६ या गाथेत उदयसमयीं चंद्राला फुलें वाहण्याच्या प्रथेचा उल्लेख आहे. उगवत्या चंद्रावर फुलें उधळण्याचा विधि मला अन्यत्र आढळला नाहीं.

क्र.७९८ या गाथेंत राहूचा उल्लेख अम्बुपिसाअ=अम्बुपिशाच या देशी नांवानें आलेला आहे. समुद्रमन्थनानंतर सुरांनीं असुरांना वगळून अमृत पान सुरू केलें तेव्हां राहूनें प्रच्छन्नरूपानें अमृतपानास सुरवात केली; परंतु तें अमृत याच्या गळयापर्यंत उतरलें न उतरलें तोंच याचें कपट व मूळचें दैत्य रूप सूर्यचंद्रांच्या ध्यानीं आलें. त्यांनीं हें विष्णूला सांगितलें. लगेच विष्णूनें याचा शिरच्छेद केला. तरीही हा अमर झाला. तेव्हांपासून तो सूर्यचंद्रांना ग्रासतो. त्याच्या शिराला केतु म्हणतात व धडाला राहू. पुराणांत राहूला स्वर्भानु (विष्णु: १·२१) म्हटलेल आहे. स्वर्भानु असुराचे सूर्य ग्रहणादि प्रताप ऋग्वेदांत (५·४०·५–९) वर्णिलेले आहेत. पौर्णिमेच्या चंद्राला ग्रासणाऱ्या पिशाचाला गाथासप्तशतींत अम्बुपिसाअ म्हटलेलें आहे. असुर वेगळे, पिशाचें वेगळीं. ह्या पिशाच्याची वस्ती पाण्यांत असते अशी गाथाकर्वीची समजूत होती असें दिसतें. अर्थात् वैदिक स्वर्भानु व पौराणिक राहू यांशीं याचा उच्चार अगर कल्पनादि साम्यां सारखा कोणताही संबंध नाहीं. हें पिशाच लांडग्याच्या रूपानें चंद्रसूर्यांना ग्रासतें व आरडा ओरडा केला असतां भयभीत होऊन पळतें अशी प्राचीन जर्मनांची समजूत होती आणि ग्रहणप्रसंगीं ते जमावानें आरडाओरडा करीत असत (A Biographical Dictionary of Puranic Personages; Akshaya Kumari Devi, p.2). आपल्याकडेही ग्रहणाच्या वेळीं असाच आरडा होतो. हें पिशाच आर्यांचा भारतांत प्रवेश होण्यापूर्वींचें असावें असें यावरून अनुमान करण्यास प्रत्यवाय नाहीं

सूर्याच्या रथाला सात घोडे आहेत असें प्रतीकारात्मक विधान ऋग्वेदांत (८·७२.१६) आहे म्हणून सूर्याला सप्तवाहन म्हणतात सातवाहन हें कुलनाम आहे. तसंच स्यातिनामही आहे ही संज्ञा सप्तवाहन या अभिधानापासून निर्माण झालेली असावी असें माझें म्हणणें आहे. तें मी अन्यत्र (अॅनल्स : भांडारकर इन्स्टिटयूट : भाग २७ पृ. २३७ २८७) विस्तारानें मांडलें आहे. अनेक सातवाहन राजांच्या नांवांत अन्त्यार्थांत वारंवार आढळणाऱ्या कर्ण या शब्दानें त्याचें सूर्यजनकत्व सूचित होतेसें दिसतें. गाथासप्तशतीच्या आद्य-तीच्या गाथांत शंकराला वंदन केलेलें आहे, पण खुद्द पशुपति हा सूर्याचें ध्यान करीत आहे. यावरून सूर्य हें शालिवाहनाच इष्ट दैवत असावें असा निष्कर्ष निघतो आणि तो माझ्या वरील सिद्धान्ताला पोषक आहे.

हरि : क्र. १५१, ४०६, ४११, ८१०, ९८२. हरि व विष्णु हे एकच. ऋग्वेदांत विष्णुचा उल्लेख थोड्याच सूक्तांत (१.१५४, १५५, १५६; ७.१०० इ.) आलेला आहे. लोकांना राहण्यासाठीं पृथ्वी योग्य व्हावी म्हणून विष्णूनें त्रैलोक्यांत तीन पावलें (८-१२-२७) टाकलीं. ऋग्वेदांतील विष्णूचें वर्णन सूर्याशीं जुळतें. ब्राह्मणोपनिषद् काळांत विष्णूचा यज्ञाशीं (मै. उ. ६.१६) समन्वय होऊं लागला. याच काळांत ब्रह्मा, विष्णु व महेश्वर हें त्रैरूप निश्चित झालें. विष्णूच्या अवतारसंकेताचें मूळ ऋग्वेदातही आढळतें. क्र. ४०६ व ४११ या गाथांत वामनरूपी हरीचा उल्लेख आलेला आहे. समुद्रमंथनांतून निघालेल्या रत्नांपैकीं कौस्तुभ व लक्ष्मी हीं विष्णूला प्राप्त झालीं. त्यांचा उल्लेख क्र. १५१ व ९८२ या गाथांत आलेला आहे. विष्णूच्या नाभींतून निघालेल्या कमळांत ब्रह्मदेवाचें आसन असतें, याला चार तोंडें असल्यामुळें त्याची नजर चुकविणें अशक्यप्राय असतें, कारण देव डोळे झांकीत नाहींत. त्याला आपला प्रणयप्रसंग दिसूं नये म्हणून लक्ष्मीला बिचाऱ्या बेसावध विष्णूचे डोळे झांकावे लागले, कारण विष्णूचे डोळे झांकले म्हणजे त्रैलोक्यात अंधार होतो. या सर्व संकेतांचा उल्लेख क्र. ८१० या गाथेंत आलेला आहे. लक्ष्मीला वाटतो तसा संकोच विष्णूला वाटत नाहींसें दिसतें. प्रसन्नराघवाच्या नान्दींत जयदेव सांगतो, विष्णूनें एका हातानें ब्रह्मदेवाच्या कपाळीं पुण्यवर्णावली काढली आणि त्याच वेळीं दुसऱ्या हातानें लक्ष्मीच्या स्तनांवर कस्तुरीनें मकराकार नक्षी काढली! सारेंच विलक्षण! समुद्रमंथनानंतर विष्णूनें मोहिनी रूप धारण केलें ही कथा क्र. ९८२ या गाथेंत सूचित आहे असें वाटतें.

२. देवता

गाथासप्तशतात देवांप्रमाणें कांहीं देवतांचे उल्लेख आलेले आहेत. क्र. १९४ या गाथेंत गृहदेवतेचा उल्लेख आहे. घरोघर रोज गृह-देवतांची पूजा होत असे व त्यांच्या गळ्यांत ताज्या व सुगंधी फुलांची माळ घालण्यांत येत असे, असें या उल्लेखावरून दिसतें. लक्ष्मीचे (लच्छी : क्र. ४२, १५१, ३८८, ५७४, ५७७, ८१०, ९८७) उल्लेख अनेक आहेत. पैकीं क्र. ५७४, ५७७ व ९८७ या गाथांत अनुक्रमें मधुमासलक्ष्मी, प्रावृड्लक्ष्मी व जयलक्ष्मी यांचे उल्लेख आहेत. क्र. ४२ मधील लक्ष्मी ही अभ्युदय व ऐश्वर्य यांची द्योतक आहे. समुद्रमंथनांतून

लक्ष्मी निर्माण झाली ही कथा गाथाकर्वींना माहीत होती. तिची गौरता वृद्धिंगत करण्यासाठींच जणूं तिला क्र. ३८८ मध्यें दुग्धसमुद्रमंथनांतून निर्माण केली आहे. क्र. १५१ व ८१० या गाथांतील लक्ष्मी ही विष्णूच्या सान्निध्यांत असून विपरीत रत करीत आहे. क्र. ८१० मधील लक्ष्मीनें आपला विलास परक्याला दिसूं नये म्हणून विष्णूचा सव्य नेत्र झांकला आहे. या लक्ष्मीची क्र. ४५५ मधील पार्वतीशीं तुलना करण्यासारखी आहे. येथें पार्वतीनें कटी केलेली आहे. क्र. ९७७ या गाथेंत वाणी=सरस्वतीचा उल्लेख आहे. ब्रम्ह्यानें स्वत:च्या अर्धांगापासून उत्पन्न केलेल्या शतरूपेलाच गायत्री, वाणी, सरस्वती व सावित्री हीं वैकल्पिक नांवें आहेत असें काहीं आधारग्रंथ सांगतात. ऋग्वेदांत सरस्वतीचा उल्लेख (५.४३.११) आलेला आहे. सिरि=श्री या देवतेचा उल्लेख क्र. ७५, ७७६, ८१० व ९७१ या गाथात आलेला आहे. पैकीं क्र. ७५ व ९७१ या गाथांतील • उल्लेख जयश्रीचे असून क्र. ७७६ मधील उल्लेख मधुश्रीचा आहे. क्र. ४६ या गाथेंत भअवइ णिसा=भगवति निशा व क्र. ८८७ या गाथेंत माण= मानदेवता याचे उल्लेख आलेले आहेत. या सर्व देवतापैकीं कोणाच्याही पूजेचा उल्लेख गाथासप्तशतींत आलेला नाहीं.

अज्जा = आर्या; (क्र. १७२); उमा (क्र. ९८५); गोरी = गौरी (क्र. १, ४४८, ४६७, ७००); पव्वई = पार्वती (क्र. ६९, ४५५, ९८५) हरवहू = हरवधू (क्र. ९८५).

आर्या ही आदिमाया, जगदम्बा, दुर्गा. अज्जा हें दुर्गेचें शांत स्वरूप (Jaina : Life in Ancient India : p. 224). तिनें दक्षाच्या घरीं सतीरूपानें अवतार घेतला. त्यानें ती महादेवाला दिली. दक्षानें यज्ञ आरंभिला. महादेव भणंग, म्हणून सतीला आमंत्रण गेलें नाहीं. तरी ती यज्ञाला गेली. तेथें तिचा अपमान झाला. तेव्हा तिनें यज्ञकुण्डांत उडी घेतली. नंतर तिनें हिमालयाच्या उदरीं जन्म घेतला. पर्वताच्या पोटीं आली म्हणून तिला पव्वई = पार्वती हें नांव पडलें. पूर्वपतीची प्राप्ति व्हावी म्हणून तिनें तप आरंभलें. तपानंतर तिला उमा हें नांव मिळालें. असीरियन भाषेंत उम्मा म्हणजे आई. (Racial History of India. : Chandra Chakrabarty : p 185). वायव्य सरहद्दोपलीकडील खट्टी जमातींत उम्मा

नांवाची मातृदेवता आहे. अम्मा व उम्मा या एकच (Religion of the Vedas : Keith : p. 199). जैमिनीय उपनिषद् ब्राह्मणांत (४.२०.१२) उमेचा उल्लेख आलेला आहे. पार्वतीचा वर्ण सांवळा होता, म्हणून तिला काली हें नांव मिळालें. एकदां शंकरानें तिच्या कृष्णवर्णाचा संबोधनपूर्वक उल्लेख केला, तेव्हां ती चिडली. नंतर ब्रह्मदेवानें तिला गौरवर्ण दिला. म्हणून तिला गौरी हें नांव मिळालें. पार्वती नेहमीं शंकराच्या सन्निध असते. (क्र १, ४४८, ७००). तिचा स्वभाव मोठा संशयी व मत्सरी. शंकर मोठा विलासी; आणि पार्वतीही (क्र. ४५५). तो कोठें इकडे तिकडे पहात आहे कीं काय यावर तिची दक्ष दृष्टि आहे. आर्तांना साह्य करण्याविषयीं ती शंकराला प्रोत्साहन देत (क्र. ४६७) असते. अनेक प्राचीन व मध्ययुगीन कथा या संकेतावर आधारलेल्या आहेत. क्र. ४५५ मध्यें पार्वतीनें आपल्या ओठांनीं शंकराचा तृतीय नेत्र झांकल्याचा उल्लेख आहे. या नेत्राच्या निर्मितीची कथा महाभारताच्या अनुशासन पर्वात उमामहेश्वरसंवाद या अध्यायांत आलेली आहे. एकदां उमेनें महेश्वराचे नेत्र झांकले. तेव्हां त्यांवर अवलंबून असलेलें जगाचें चैतन्य एकाएकीं नष्ट झालें. तेवढ्यांत शंकराच्या भालप्रदेशांतून एक महान् ज्वाला निघाली व तेथें प्रलयाग्नीसारखा भयंकर तृतीय नेत्र निर्माण झाला. बुद्धमूर्तींच्या कपाळावर दिव्य दृष्टीचें प्रतीक असें जें ऊर्ण रत्न असतें त्याचें हें ब्राह्मणीकरण असावें, असा श्री. हॅव्हेल (Ideals of Indian Art: p. 51) यांचा अंदाज आहे. वस्तुस्थिति या विधानाच्या अगदीं उलट असण्याचा संभव आहे.

क्र. १७२ मध्यें अज्जाघर असा उल्लेख आहे. येथे देऊळ व मूर्ति यांची स्पष्ट सूचना आहे. गृहपतीनें आपल्या मेलेल्या रेड्याच्या गळ्यांतली मोठ्या घंटांची माळ येथें लावलेली आहे. यावरून दिसतें कीं ही ग्रामदेवता असावी आणि तिची मूर्ति ओबडधोबड किंवा केवळ शिलाखंडाची प्रतीकात्मक असावी.

शिवपार्वतींच्या कथांमध्यें आर्य व अनार्य यांच्या एकीकरणाचा, किंवा अनार्यांच्या आर्यीकरणाचा प्रयत्न प्रत्ययास येतो. किंवा पुरोहितांनीं व पौराणिकांनीं आरंभिलेल्या अनार्यांच्या अनुरंजनाचा.

३. देवालयें व मूर्तिपूजा :

गाथासप्तशतींत देवळांचे अनेक उल्लेख आलेले आहेत. अज्जाघरः क्र. १७२; देअउलं: क्र. ६४; देउल : क्र. १०९, १९०. देऊळ हा शब्द देवकुल (कुल = घर) पासून सिद्ध झालेला आहे. मराठींत कोनाडा या अर्थानें देवळी हा शब्द वापरांत आहे. घराच्या भिंतींतला पहिला कोनाडा गृहदैवतांच्या स्थापनेसाठीं ठेवण्यांत आला, असें तर नसेल ? गाथासप्तशतींत आलेल्या देवळांच्या वर्णनांवरून दिसतें कीं तीं विशेष विस्तीर्ण नसावींत. कलाकृतींनीं सजलेल्या बांधीव मंदिरांची प्रथा उत्तरकालीन आहे. गाथासप्तशतींतील मंदिरांवर शंकूच्या आधारानें उभारलेले बांधीव कळस (क्र. ६४) आहेत व त्यांभोंवतीं विस्तीर्ण पटांगणें (क्र. १९०) आहेत. या पटांगणांत सार्वजनिक उत्सव होत असावेत; त्याचप्रमाणें ही गांवकऱ्यांची जमण्याची जागा असावी. देवळांत प्रवाशांच्या मुक्कामाची कांहीं (क्र. १०९) सोय असावी. कांहीं देवळांचा संकेतस्थानासाठीं उपयोग झालेला आहे, यावरून तीं गांवाबाहेर असावींत आणि ठराविक वेळांखेरीज तिकडे वर्दळ नसावी असें वाटतें. क्र. ६४ मधील देऊळ पडकें आहे. या अवस्थेला शकांचें आक्रमण जबाबदार होतें कीं काय ? कीं देऊळ बांधावयाचें व त्याच्या डागडुजीची तरतूद करून ठेवावयाची नाहीं ही आजची दुर्दैवी प्रथा तेव्हांही प्रचारांत होती ?

गाथासप्तशतींत मूर्तींचे उल्लेख फक्त तीन आहेत : अज्जा, गणवई व सुरनाह. पैकीं अज्जेची मूर्ति आहे व ती देवळांत आहे हें अज्जाघर या प्रयोगावरून निश्चित ठरतें. मेलेल्या रेडयाच्या गळयांतील माळ अज्जाघरांत (क्र. १७२) टांगलेली आहे. त्याअर्थी ही अज्जा ग्रामणि, शिलास्वरूपी असावी. गणपतीची मूर्ति दगडी आहे व उशीसारखी वापरतां येण्याजोगी हलकी व चपटी आहे. गणपतीच्या देवळाचा उल्लेख नाहीं. ही मूर्ति पारावरली, शिलास्वरूपी असावी. इंद्राची मूर्ति लांकडी व घरगुती आहे. गृहदेवतेच्या मूर्ति घरोघर, देवळींत मांडलेल्या असाव्यात.

गाथासप्तशतींत देवांचीं ध्यानें व प्रार्थना (क्र. ४८, ३१२) जागोजाग केलेलीं आहेत. गणपति, त्रिविक्रम, पशुपति, रुद्र, वामन, विष्णु व सूर्य या देवांना गाथाकर्त्यांनीं वंदन केलेलें आहे किंवा त्यांचा जयकार

(क्र. ३३२, ३५५, ४०६) केलेला आहे. अशींच नमनें मदनबाणांना (क्र. ३२५) व प्रेमाला (क्र. ५४४) केलेलीं आहेत. यांपैकीं मूर्ति अशी फक्त गणपतीची आहे. अन्य नमनें मानसिक व सांकेतिक आहेत. मूर्तींची प्रत्यक्ष पूजा अशी फक्त गृहदेवतेची (क्र. १९४) झालेली आहे क्र. १९६ मध्यें नागराच्या पूजेचा उल्लेख आहे. गाथाकवींना पूजेची प्रथा माहीत होती हें निश्चित. क्र. १५० या गाथेंत स्तनांवरील नखक्षतांची पूजा नीलकमळांनीं केलेली आहे आणि क्र. ३४६ या गाथेंत चंद्रावर फुलें उधळलीं आहेत. या गाथेला सरस्वतीकण्ठाभरणांत (निर्णयसागर : पृ. ६५४) अष्टमी-चंद्रक असें शीर्षक दिलेलें आहे. सूर्याला अर्घ्य व अञ्जलि अर्पण (क्र. १, ३३२, ३५५, ४७८, ७००) केलेल्या आहेत आणि इष्टदैवतांचें मंत्रपूर्वक ध्यान केलेलें (क्र. ३३२, ७००) आहे. प्रातःसंध्या व सायंसंध्या (क्र. १, ७००) प्रचारांत होत्या. पूजेसाठीं मरकतभाजन व शंखशुक्ति (क्र. ३, ३००) यांचा वापर होता; मात्र ही पूजा घरगुती देवांची आहे. मूर्तिपूजा ही संज्ञा हल्लीं आपण ज्या अर्थानें वापरतों त्या अर्थानें ती गाथासप्तशतीच्या काळांत अस्तित्वांत नव्हती असें विधान करावयास प्रत्यवाय नाहीं. मूर्तिपूजेचें हल्लींचें स्वरूप बौद्धधर्माच्या महायान पंथाच्या उत्तरकालीन आहे.

४. दिव्यें व व्रतें, विधि व रिवाज

क्र. २११ या गाथेंत अग्नितापनीय दिव्याची सूचना आहे. याचा तपशील मिताक्षरेंत (याज्ञवल्क्यस्मृतिः मिताक्षरासारः वे. शा. सं. रा. विष्णुशास्त्री बापट, पृ. १९७-९) दिलेला आहे. " लोहाच्या शुद्धीकरितां चांगला तापविलेला लोहपिंड उदकांत टाकून पुनः अग्नींत घालून लाल करावा, नंतर पुनः एकदां तसेंच करून तिसऱ्या वेळीं लाल झालेल्या त्याला...शोध्याच्या दोन्ही हातांवर ..ठेवावा ..त्यानें लोहपिंड ओंजळींत घेऊन सात मंडलांतून सावकाश गमन करावें...इतकें करूनही हात जळला नसेल तर तो शुद्धीस प्राप्त होतो." सोन्याचा अलंकार घडवतांना तो वारंवार अग्नींत तापवावा व पाण्यांत थंड करावा लागतो. एवढ्यापुरताच या क्रियेचा दिव्याशीं संबंध आहे. क्र. १८५ या गाथेंत उल्लेखिलेलं सामसबल = श्यामशबल दिव्य असेंच आहे. पण्डित मथुरानाथ शास्त्री टीकेंत सांगतात : "श्यामशबलं व्रतविशेषं। पूर्वमग्नौ

प्रविश्य जले प्रविश्यते।" यामुळें शरीराला अपाय झाला नाहीं तर व्रतकर्ता निर्दोष आहे असें समजावें.

क्र. ४४८ या गाथेंत प्रमथाधिप शंकर कोशपान करीत आहे. शंकराचें प्रमथाधिप हें नांव उत्तरकालांत लुप्त झालेलें आहे. या दिव्याचा तपशील याज्ञवल्क्यस्मृतीच्या व्यवहाराध्यायांत दिलेला आहे : देवानुग्रान्समभ्यर्च्य तत्स्नानोदकमाहरेत्। संश्राव्य पाययेत्तस्माज्जलं तु प्रसृतित्रयम्॥ ११२॥ अर्वाक् चतुर्दशादह्नो यस्य नो राजदैविकम्। व्यसनं जायते घोरं स शुद्धः स्यान्न संशयः ॥११३॥ दुर्गा, आदित्य, इत्यादि उग्र देवांचें गंध–पुष्पादिकांनीं पूजन करून व त्यांना अभिषेक करून त्यांचें स्नानोदक आणावें हें जल अभिमंत्रित करून न्यायाधीशानें त्यांतील तीन ओंजळी जल शोध्याकडून पिववावें. धर्माचें आवाहन, सर्व देवतापूजन, होम, मस्तकावर प्रतिज्ञापत्र बांधणें, इत्यादि विधि यथाशास्त्र केल्यानंतर हें तीर्थपान करवावें. गोमयाचें मंडल करून व त्यांत शोध्य पुरुषाला आदित्याभिमुख स्थापून कोशपान करवावें. जो ज्याचा भक्त असेल त्या देवाचें स्नानजल त्याच्याकडून पिववावें. तो सर्व देवांचे ठायीं समभाव ठेवीत असल्यास त्यास आदित्याचें तीर्थ पाजावें. एखाद्याचा विश्वास यावा म्हणून, एखाद्याविषयीं कांहीं शंका आल्या असतां त्यांच्या निवृत्यर्थ व चित्तशुद्धीकरतां कोशपान द्यावें. पानकर्ता आस्तिक व व्यसनरहित असला तरच त्याला हें दिव्य करावयास सांगावें. महापातकी, वर्णाश्रमधर्मरहित, पाखंडी, कृतघ्न, नपुंसक, प्रतिलोमज, नास्तिक, व्रात्य इत्यादिकांकडून हें व्रत करवूं नये. इतर व्रतें व दिव्यें यांचा प्रत्यय ताबडतोब येतो; पण कोशपानाच्या प्रत्ययाला अवधि लागतो. हें दिव्य केल्यापासून चौदा दिवसांच्या आंत ज्याला राजाच्या निमित्तानें अथवा दैवी आपत्तीनें घोर व थोर दुःख होत नाहीं तो शुद्ध होय असें जाणावें. कोणत्याही देहवानाला अल्पदुःख होणें अगदीं अपरिहार्य आहे. महादुःखही चवदा दिवसांनंतर झाल्यास कांहीं दोष नाहीं. अल्प अपराधाला अल्प अवधि सांगितलेला आहे. कोशपानव्रताचा तपशील इतरत्र वेगळा दिलेला आहे : ज्यांत देवाची प्रतिमा प्रतिबिंबित झालेली आहे अशा जलाञ्जलींचें प्राशन. यामुळें अपाय झाला नाहीं तर तो निरपराधी आहे असें समजावयाचें. कोशपान या गाथेंत खूद